(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: विदर्भ मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना.

मु.शी.: विदर्भ मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, अरुण गुजराथी, नितीन गडकरी, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री उल्हास पवार, जयप्रकाश छाजेड, सय्यद.जमा, जैनुद्दीन जव्हेरी, वसंतराव खोटरे, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, सर्वश्री विलासराव शिंदे, रमेश शेंडगे, जयंत प्र. पाटील, कमलकिशोर कदम, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुढे चालू)

उपसभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. आता सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज या प्रस्तावावरील चर्चा सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख पुढे सुरु करतील तत्पूर्वी मी सांगू इच्छितो की, मागच्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी विदर्भ आणि मराठवाडा या मागास भागाच्या संदर्भातील हा प्रस्ताव विधान परिषदेमध्ये मांडला होता. आपल्या राज्यामध्ये आपण 1994 ला वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली. 1994 नंतर सातत्याने आपण वैधानिक विकास मंडळाच्या मुदतीत वाढ केली आणि आजपर्यंत वैधानिक विकास मंडळांचे कामकाज चालू आहे. पुढच्या पाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

वर्षाकरिता वैधानिक विकास मंडळाला मान्यता द्यावी असा प्रस्ताव मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये मांडला होता. त्या प्रस्तावाच्या संदर्भात दोन महिन्यानंतर आज या ठिकाणी मुंबईच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख चर्चा पुढे सुरु करणार आहेत. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी बहुतेक सर्व मुद्दे मांडलेले आहेत. ही चर्चा करीत असताना मला एकच सांगावयाचे आहे की, एकूण या महाराष्ट्रामध्ये जो मागासलेला भाग आहे तो दुर्लक्षित असेल, त्या ठिकाणी विकास झाला नसेल तर त्याबाबत विचार करीत असताना राज्यातील इतर कोणत्याही भागातील जनतेला असे वाटू नये की, आमच्यावर कोठे तरी अन्याय होतो. आम्हाला दुर्लक्षित केले जाते, आमच्या संदर्भातील निर्णय उलटे फिरविले जातात असा समज कोणत्याही भागाचा होऊ नये अशी अपेक्षा मला शासनाकडून तसेच सभागृहाच्या माध्यमातून होणाऱ्या चर्चेतून राहील. कारण पैसा महत्वाचा नाही. उद्या आपण पाच पन्नास हजार कोटी रुपये जरी निर्माण केले तरी विदर्भ, मराठवाड्यातील जी तुटलेली मने आहेत ती जोडणे कठीण होईल. आज बेळगाव आणि तिकडचा काही भाग महाराष्ट्रात यावा म्हणून सातत्याने प्रयत्न करीत आहोत आणि कितीही किंमत देऊन आपण तो भाग घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. राज्यातील एखादा भाग दुर्लक्षित होईल किंवा मने तुटली जातील किंवा आपल्याप्रती निर्णय होत नाहीत अशी भावना निर्माण होईल अशा प्रकारचे काही होऊ नये अशी अपेक्षा आहे. त्या दृष्टीकोनातून सभागृहाने याकडे पहावे आणि त्या दृष्टीकोनातून शासनाने सुध्दा विचार करावा. त्यामध्ये काहीही अडचण येऊ नये असे मला वाटते. एवढीच विनंती मला या निमित्ताने करावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे जेष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. त्यांनी आता जे आपले मत व्यक्त केले त्या मताशी मी पूर्णपणे सहमती व्यक्त करतो. सन 2010 हे वर्ष आपण महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. मागील दहा वर्षामध्ये म्हणजे 2010 मध्ये संपत आलेल्या दहा वर्षामध्ये तीन गोष्टींचा सुवर्ण महोत्सव होत आहे. महाराष्ट्राचे जे फाऊंडेशन आहे, महाराष्ट्र राज्य निर्माण झाले त्याचे अधिष्ठान, त्याचे मूळ फाऊंडेशन कशामध्ये असेल तर मराठी भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्रात सामील झालेल्या सर्व घटकांना समाधान देणारे अशा प्रकारचे ॲग्रीमेंट 28 सप्टेंबर, 1953 ला झाले. तीनही भागाचे प्रतिनिधी त्या ठिकाणी हजर होते. त्याला सुध्दा या दहा वर्षामध्ये 50 वर्षे पूर्ण झालेली आहेत. हे जे ॲग्रीमेंट झाले ते नुसते ॲग्रीमेंट झाले अशातील भाग नाही तर त्या ॲग्रीमेंटला कायदेशीर अशा प्रकारचे स्टेटस देण्यात आले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

1956 मध्ये 'To the extent possible' नागपूर करार हा भारताच्या संविधानामध्ये अंतर्भूत करण्यात आला. त्यासाठी भारतीय संविधानामध्ये 371 (2) चा समावेश करण्यात आला. आज या गोष्टीला सुध्दा 10 वर्षे पूर्ण होत आहेत. एका बाजूला नागपूर करार आहे. जे अधिष्ठान म्हणून समजतो, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची बैठक म्हणून समजतो. हा जो नागपूर करार आहे या करारामध्ये पहिलेच कलम असे आहे की, "भारताच्या सर्व राज्यांची पुनर्रचना किंवा फेरआखणी करण्याच्या प्रश्नावर अहवाल देण्यासाठी एक उच्चाधिकार आयोग नेमण्यात येत असल्याने, मराठी भाषिक प्रदेशांमध्ये विविध भागामध्ये राहणारे आम्ही लोक अशा सर्व क्षेत्रांचा समावेश असलेल्या एका स्वतंत्र राज्याची निर्मिती करण्यासाठी आधारभूत म्हणून पुढील निर्णय घेत आहोत." याच्यावर त्यावेळचे या तिनही विभागाचे ज्येष्ठ नेते आहेत त्यांनी दिनांक 28.9.1953 रोजी नागपूर याठिकाणी हा करार झाला. या करारावर आर.के.पाटील, रामराव देशमुख, पी.के.देशमुख, गोपाळराव खेडकर, भाऊसाहेब हिरे, शेषराव वानखेडे, देवकीनंदन नारायण, नानासाहेब कुंटे, यशवंतराव चव्हाण, लक्ष्मणराव भटकर, पंढरीनाथ पाटील यांच्या स्वाक्ष-या आहेत. तिनही भागातील मान्यवर नेत्यांनी हा करार केला. ते हा करार करुन केवळ थांबले नाहीत. त्यांची मनापासून इच्छा होती, तळमळीची होती म्हणून गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली पार्लमेंटची संयुक्त समिती निर्माण झाली होती. Parliamentary Joint Select Committee ने "The Constitution (Ninth Amendment) Bill, 1956" या विधेयकावरील रिपोर्ट दिनांक 16 जुलै, 1956 रोजी सादर केला आहे. त्यावेळचे गृहमंत्री माननीय गोविंदवल्लभ पंत हे या समितीचे अध्यक्ष होते. या संयुक्त समितीने रिपोर्ट सादर केला होता तो 22 परिच्छेदांचा आहे. त्यातील परिच्छेद क्रमांक 17 मी मुद्दाम सभागृहासमोर नमूद करु इच्छितो. त्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "It was urged before the Committee by its Members from Vidarbha that the agreement entered into in September, 1953, known as the Nagpur Agreement, should, to the extent practicable, be given constitutional recognition. The Members from the other Maharashtra areas gave their full

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

support to this proposal. A new clause has accordingly been added to the proposed Article 371 with the consent of the Members from Maharashtra." हे मी मुद्दाम सांगितले आहे की, महाराष्ट्रातील त्यावेळच्या सर्व भागातील नेत्यांमध्ये अप्रामाणिकपणा असता तर केवळ नागपूर करार करुन दिवस काढता आले असते. नागपूर करार हा सभागृहामध्ये झालेला नव्हता. सभागृहामध्ये दिलेला तो शब्द नव्हता. एका खाजगी जागेवर बसून महाराष्ट्रातील मान्यवर नेत्यांनी महाराष्ट्रातील जनतेला केलेले ते एक मोठे मार्गदर्शन होते. याचा परिणाम असा झाला की, या कमिटीने शिफारस केली आणि भारताच्या घटनेमध्ये 371(2) हे कलम समाविष्ट झाले. 1956 ते 1960 हा काळ महाराष्ट्रामध्ये द्विभाषिकामुळे वेगळया प्रकारचा काळ गेला. जवळजवळ सारा महाराष्ट्र 1956 ते 1960 पर्यंत अस्वस्थ होता. मग 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची दारे किलकिली व्हायला लागली आहे असे दिसू लागले. 1960 च्या सुरुवातीच्या 2-4 महिन्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचा उदय क्षितिजावर होणार ही गोष्ट पूर्णपणे स्पष्ट झाली. सभापती महोदय, सिनसियॉरिटी ऑफ पर्पज ज्याला म्हणतात, "The Bombay Reorganisation Bill, 1960 (A Bill to provide for the Reorganisation of the State of Bombay and for matters connected therewith." या नावाचे एक बिल राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांनी सभागृहात मांडले. त्यांनी केवळ बिल मांडले नाही तर या बिलाला पाठिंबा देत असताना ते असे म्हणाले की, "Mr. Speaker, Sir, before I offer my remarks on the Bombay Reorganisation Bill, 1960, I have to place on the Table of the House an important document - Statement of Government policy. I would seek your permission, Sir, to read out that Statement of Government policy and place it on the Table of the House."

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...

सभापती महोदय, हे निवेदन त्यांनी सभागृहामध्ये केले. या निवेदनामध्ये विदर्भ आणि मराठवाडयाला अतिशय उत्तम अशा प्रकारची आधारभूत अशी संरचना या निवेदनामध्ये असल्याचे नमूद केले आणि हेही सांगितले की याचे आधार हे नागपूर करारामध्ये आहेत. नाही म्हटले तरी या तिन्ही विभागामध्ये विदर्भ आणि मराठवाड्या विषयी त्या पालिसी स्टेटमेंटमध्ये 6 क्लॉजेस आहेत. ते क्लॉजेस मी मुद्दाम सभागृहाचा वेळ जाईल म्हणून वाचून दाखवित नाही. नागपूर करार आणि 378(2) मधील गोष्टींचा ठाम पाठपुरावा त्या पॉलिसी डॉक्युमेण्टमध्ये करण्यात आलेला आहे.

"An equitable arrangement providing adequate facilities for technical education and vocational training will be made. Adequate opportunities for employment in services under the control of the State Government, subject to the requirements of the State as a whole, will also be provided."

सभापती महोदय, या ठिकाणी आपल्याला असे दिसून येईल की या निवेदनामध्ये एक अतिशय महत्वाचे वाक्य त्यांनी वापरलेले आहे. करारामध्ये आणि ॲग्रीमेंण्टमध्ये जे काही मान्य केले ते तर आम्ही देऊच पण त्या पेक्षा या अविकसित भागासाठी आणखी जास्त सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहील. मराठवाड्याची मागासलेली स्थिती लक्षात घेऊन एक विशेष परिच्छेद त्या निवेदनामध्ये जोडण्यात आलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, त्यावेळी सुध्दा या तिन्ही भागाच्या नेत्यांमध्ये जो एक प्रकारचा समज अपसमज होता त्यामधून ही स्थिती निर्माण झाली होती. ॲग्रीमेण्ट हे त्या पोटीच निर्माण झाले होते. सर्व भागाच्या नेत्यांना असे मनापासून वाटत होते की मराठी भाषा बोलणा-यांचे एक राज्य झाले पाहिजे आणि हे एक राज्य झाले पाहिजे आणि त्याला निश्चित अशा प्रकारचे फाऊंडेशन, अधिष्ठान असले पाहिजे. ते अधिष्ठान कशावर आधरित असावे याचे दृढ सिध्दांत या नागपूर करार आणि कलम 371(2) मध्ये नमूद केल्याचे दिसून येतात.. या बिलावर मार्च 1960 मध्ये तीन-चार दिवस चर्चा झाली. 1 मे 1960 ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. ही निर्मिती होण्यापूर्वी या सभागृहामध्ये त्यावेळी चर्चा उपस्थित झाली त्यावेळी भाऊसाहेब हिरे यांच्या तोंडी जे वाक्य आहे. ते असे, "ज्या गोष्टी पूर्वी आपल्या नेत्यांनी मान्य केल्या त्यांच्या बाबतीत पुन्हा वाद उकरुन काढण्याचे कारण नाही." त्यावेळी भाऊसाहेब हिरे यानी अशा प्रकारचे मत व्यक्त केले. मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, अे.बी.बर्धन हे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...

ठाम नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली विदर्भातील आम्ही अनेक विद्यार्थ्यांनी त्या लढयामध्ये स्वत:ला झ ोकून दिले होते. त्या अे.बी.वर्धन सारख्या माणसाला असे वाटले की आपण हे करण्यामध्ये काही फसगत तर करीत नाही ना. म्हणून त्यांनी काय करावे ? यांनी या रिऑर्गनायझेशन बिलाला सुधारणा सुचविल्या आणि या सा-या सुधारणामध्ये त्यांनी असे सांगितले की, "विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये निधीचे समन्यायी वाटप झाले पाहिजे. नोक-यांमध्ये समन्यायी वाटप झाले पाहिजे. व्यावसायिक शिक्षणाच्या आणि तांत्रिक शिक्षणाच्या ज्या जागा आहेत त्या समप्रमाणात मिळाल्या पाहिजेत. अशा प्रकारची तरतूद या कायद्यामध्येच करण्यात यावी." त्यांनी असेही सांगितले की, "घटनेमध्ये तरतूद आहे हे मला माहीत आहे, 371(2)या कलमामध्ये तरतूद आहे हे मला माहीत आहे. पण ही तरतूद फक्त एनेब्लिंग क्लॉझ आहे. तो क्लॉज कम्पलसरी किंवा बायडिंग अशा प्रकारचा नाही. त्यामुळे तो बायडिंग करावा अशा मताचा मी आहे." या ठिकाणी त्यांनी ज्या अमेण्डमेटस् मांडलेल्या होत्या त्या विषयी बोलताना ते असे म्हणाले की, "I would submit that Article 371 is only an enabling provision. For example, it states - "Notwithstanding anything in this Constitution, the President may by order made with respect to the State of Bombay, provide for any special responsibility of Governor for the following things." I do not wish to read the entire list and take the time of the House, but I would only say that this is a mere enabling provision in the Constitution and it does not guarantee that this provision would be carried out."

नंतर श्री. खंदारे...

अशुद्धीत्र प्रत / शीघ्रलेखी नोंदी

प्रा.बी.टी.देशमुख.....

ह्या ज्या घटनेच्या कलम 371 मध्ये तरतूद करुन ठेवण्यात आल्या आहेत या तरतुदी अंमलात येतील याची काही खात्री नाही. एनेंब्लिंग प्रोव्हीजन्स आहेत, गरज पडली तर भारताचे राष्ट्रपती आदेश काढतील आणि अशाप्रकारची व्यवस्था करतील. आपले भाषण करताना ते असे म्हणाले की, "So far as Vidarbha is concerned, the hopes and aspirations of the people of Vidarbha to unite with other Marathi-speaking people are no doubt to be realised in the near future." आता हे बिल आल्यामुळे आमच्या इच्छा पूर्ण होत आहेत. त्यानंतर पुढे त्यांनी सभागृहात वाक्य उच्चारले, "Therefore, Sir, on this historic occasion of United Maharashtra coming into existence with the inclusion of Vidarbha, I would make an appeal to the leaders and administrators, to the ruling party and to all men, big and small, from this State of Maharashtra that in the near future State they should so create conditions that another reorganisation has not to take place, that they should so behave and so carry out their agreements and pacts which they have entered into, that the Vidarbha people are re-assured of those agreements and pacts by inserting them in the Bill itself." या तरतुदी या बिलामध्ये मी का टाकतो याचे जोरदार समर्थन या सभागृहात त्यांनी केले. अतिशय हिरीरीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या आमच्या भागातील नेत्यांमध्ये कॉ.बर्धन यांचा क्रम खूप वरचा होता. मला अभिमान वाटतो, आजही याबाबतीत त्यांचे विचार ठाम आहेत. राज्याचे तुकडे केल्याने अनुशेषाचा प्रश्न सुटत नाही. हे दोन-तीन वर्षापूर्वी त्यांनी केलेले मार्गदर्शन आहे. त्यांनी कायद्याला सुधारणा सुचविल्या. परंतु मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण साहेबांनी सभागृहात विनंती केली. एकंदरीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दृष्टीने सभागृहात वातावरण आनंदाचे होते. एस.एम.जोशी यांनी जे उद्गार काढले ते मला याठिकाणी वाचून दाखविले पाहिजेत. ते या चळवळीतील अतिशय आदरणीय नेते होते. एस.एम.जोशी आणि आम्ही सर्व त्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत होतो. या चळवळीमध्ये एस.एम.जोशी यांनी जे उद्गार काढले, चव्हाण

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

साहेबांनी जे उद्‌गार काढले, परिणामी कॉ.बर्धन यांनी त्या सुधारणा मागे घेतल्या. त्यांनी सांगितले की, हे वातावरण मला स्पॉईल होऊ द्यायचे नाही. राज्याचे मुख्यमंत्री ज्यावेळेला याठिकाणी डॉक्यूमेंट ऑन पॉलिसी, धोरणात्मक निवेदन करीत आहेत, धोरणात्मक निवेदन करुन ज्यावेळी विनंती करतात त्यावेळी मी त्यावर विश्वास ठेवतो आणि घटनेच्या कलम 371(2) मध्ये या तरतुदी असल्यामुळे मी माझ्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्या मी मागे घेतो.

सभापती महोदय, हे राज्य निर्माण झाले त्यावेळेला एस.एम.जोशीसारख्या ऋषितुल्य व्यक्तीने सभागृहात काय उद्‌गार काढले ते मी वाचून दाखवितो.

उपसभापती : माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर अनेक माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. सर्वांना संधी मिळेल एवढे लक्षात ठेवावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण मला वेळ द्याल तेवढ्या वेळेत मी भाषण पूर्ण करण्याची दक्षता घेईन. हे महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे मी आकडेवारी सांगून वेळ घेणार नाही. अनेकदा मी सभागृहात आकडेवारीसह मुद्दा मांडलेला आहे. त्यामुळे मी थोडक्यात माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. महाराष्ट्राचे अधिष्ठान हलता कामा नये. All big and small men. सर्व मोठ्या आणि लहान माणसांनी याची काळजी घेतली पाहिजे. सुवर्ण वर्षामध्ये आम्ही आहोत म्हणून मी हा विषय नव्याने मांडत आहे. मी आकडेवारी पुष्कळ मांडली आहे. आपण वेळ दिला त्याबद्दल मी आभारी आहे. द्याल तेवढ्या वेळेत मी भाषण पूर्ण करणार आहे.

उपसभापती : 10.40 वाजता आपण भाषण थांबवावे. आणखी 22 माननीय सदस्यांना या विषयावर आपले विचार मांडावयाचे आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एस.एम.जोशी यांनी सभागृहात जे उद्‌गार काढले ते मी जशास तसे वाचून दाखवितो.

नंतर इ.1...

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख .....

"विदर्भासंबंधी आणि मराठवाड्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सरकारी धोरणाचे निवेदन केले ते स्वागतार्ह आहे, असे मी समजतो. अर्थात या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित केला गेला आहे की, या आश्वासनाचे रुपांतर कायद्यात का होऊ नये ? व्यक्तिश: मला असे वाटते की, नैतिक बंधन हे कायद्याच्या बंधनांपेक्षा श्रेष्ठ आहेत. या सभागृहात आपण सर्व माणसे बोलणार आहोत आणि या धोरणाला मान्यता देणार आहोत. तेव्हा हेच बंधन अधिक प्रभावी आहे असे मला वाटते. तथापि विदर्भातील लोकांना जर असे वाटत असेल की याचे कायद्यात रुपांतर झाले तरच त्यांना दिलासा मिळेल म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना असे म्हणेन की, याबाबतीत कायदेपंडितांचा सल्ला घ्यावा आणि या निवेदनातील जो भाग कायद्यात समाविष्ट करण्यासारखा असेल तो करण्याचा विचार करावा". श्री. एस.एम.जोशी हेच आमचे नेते नव्हते तर ए.बी.बर्धन हे सुध्दा आमचे नेते होते. त्यांनी त्यावेळेस असे उद्‌गार काढले आणि ही दुरुस्ती मागे घेतली. सन 1960 मध्ये संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर पुढील काळात जी परिस्थिती निर्माण झाली ती मी विशद करणार आहे. सन 1960 ते 1980 या दरम्यान प्रामुख्याने 1980 ते 1982 या काळात "महाराष्ट्राचा विकास हा समतोल स्वरुपात होत नाही त्यामुळे प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात वाढत आहे" अशा प्रकारची चर्चा दोन्ही सभागृहांमध्ये सुरु झाली. मी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांना धन्यवाद देतो की, सभागृहात श्री. गिरिजाशंकर नागपुरे यांनी ठराव मांडला होता व त्या ठरावाला उत्तर देताना घोषणा करण्यात आली होती की, महाराष्ट्रामध्ये काही जिल्ह्यांमध्ये विकास कामे कमी झाली तर काही जिल्ह्यांमध्ये ती जास्त झाली, अशा प्रकारची चर्चा सातत्याने सभागृहात होणे बरोबर नाही म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, यासाठी एक तज्ज्ञांची समिती नेमून विकासाचे व प्रगतीचे मोजमाप कसे ठरवावे याचे मापदंड ठरविण्यात यावे आणि त्यानुसार राज्याचा सरासरी विकास कसा होईल, कोणत्या जिल्ह्याचा जास्त व कोणत्या जिल्ह्याचा कमी विकास झाला हे त्यावरुन ठरवावे, असे उत्तर दिले आणि माननीय श्री. गिरीजाशंकर नागपुरे यांनी आपला ठराव मागे घ्यावा तसेच शासनाच्या वतीने असा ठराव मांडण्यात येईल, असेही त्यावेळेस सांगण्यात आले होते. त्यानंतर 8 दिवसातच यासंबंधीचा जी.आर. निघाला व दांडेकर समिती नेमण्यात आली. त्यानंतर भीषण अशा प्रकारचे राज्याचे चित्र समोर आले ते म्हणजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख .....

महाराष्ट्राच्या तीन विभागांचा समतोल विकास होत नाही म्हणून राज्याच्या दोन्ही सभागृहांनी दि. 26 जुलै, 1984 रोजी एकमताने ठराव पास केला की, "हे सभागृह देशाच्या माननीय राष्ट्रपतीला अशी विनंती करीत आहे की, त्यांनी आता घटनेच्या 371 (2) अन्वये त्यांना जे अधिकार दिलेले आहेत त्यांचा वापर करुन राज्याच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवावी" अशा प्रकारची विनंती करणारा ठराव सभागृहाने पास केला. मी तो व्हर्बायटेम वाचून दाखवित नाही, कारण तसाच मी अगोदर सांगितलेला आहे. अशा प्रकारचा ठराव पास झाल्यानंतर मात्र सांगण्यास दु:ख होत आहे. कारण दु:ख व्यक्त करण्याशिवाय गत्यंतर नाही. सन 26 जुलै, 1984 रोजी हा ठराव पास झाला आणि भारताच्या महामहीम राष्ट्रपतींनी दि. 9 मार्च, 1994 रोजी आदेश काढले. "Now therefore, in exercise of the powers conferred by clause (2) of Article 371 of the Constitution of India, the President of India hereby makes, with respect to the State of Maharashtra, the following order." What is that Order? "This Order may be called the State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order. It shall come into force on the day appointed by the President on this behalf. It shall remain in force for the period of five years from the date it comes into force or upto such date as the President may, by order made in this behalf, specify." पाच वर्षासाठी ही ऑर्डर काढली, त्या ऑर्डरला एक्स्टेंशन मिळाले, दुसऱ्यांदा एक्स्टेंशन मिळाले आणि ती मुदत आता 30 एप्रिल म्हणजेच पुढील 8 ते 10 दिवसात एक्सपायर सुध्दा होईल. अशा प्रकारे 30 एप्रिल, 2010 रोजी माननीय राज्यपालांच्या आदेशांची मुदत संपत आहे. हे आदेश निर्गमित झाल्यानंतरच्या 15-20 वर्षातील आढावा घेतला असता तो आढावा आपल्याला असे सांगतो की.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

या आदेशाची मुदत वाढविण्याशिवाय आता गत्यंतर राहिलेले नाही. या राज्याच्या निर्मितीचे पावित्र्य जर आपल्याला कायम ठेवायचे असेल, या राज्याच्या निर्मितीचे अधिष्ठान जर आपल्याला हादरु द्यावयाचे नसेल तर केंद्रशासनाला या शासनाने मुदत वाढविण्याच्या संदर्भात शिफारस करावयास पाहिजे. या एका भागाविषयी दोन तीन महत्वाचे तपशील मी सांगू इच्छितो. दिनांक 26 जुलै,1984 रोजी ठराव पास झाल्यानंतर 9 मार्च, 1994 रोजी आदेश पारीत झाला व हा आदेश पारीत झाल्यानंतर निदेश 15 डिसेंबर,2001 रोजी निघाला. सभापती महोदय, या सा-या प्रकाराचे आपण साक्षीदार आहात. या आदेशाची अंमलबजावणी ज्या पध्दतीने झाली त्याचे परिणाम सांगणे हा या ठरावाचा दुसरा भाग आहे. हा विषय मी थोडक्यात सांगणार आहे कारण हा विषय या सभागृहात ब-याच वेळा चर्चेला गेला आहे. हा जो आदेश निघाला त्या आदेशाचे परिणाम महाराष्ट्रात काय झाले ते मी आपल्याला सांगणार आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना या विषयावर आपले विचार पूर्ण करण्यासाठी अजून किती वेळ लागणार आहे ?

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी माझे विचार 10 मिनिटात संपवितो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना किती वेळ बोलू द्यायचे हा आपला अधिकार आहे. कोणाला कितीही वेळ बोलू द्या, कितीही वेळ चर्चा होऊ द्या परंतु आम्हालाही उत्तर देण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्वपक्षीय सदस्यांच्या वतीने हा ठराव मांडण्यात यावा यासाठी मी माननीय सभापती महोदयांशी बोललो व माननीय सभापती महोदयांनी हा ठराव मांडण्याची आम्हाला संधी दिली. मी माननीय सभापती महोदयांना विनंती केली होती की, या ठरावावर पूर्ण दिवस चर्चा करण्याची संधी मिळाली पाहिजे. या प्रस्तावावर विचार मांडण्याची संधी मागील नागपूर अधिवेशनात मिळालेली नाही त्यामुळे मी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सांगितले होते की, ज्या दिवशी आपण हा प्रस्ताव चर्चेला घ्याल त्या दिवशी केवळ प्रश्नोत्तरे घेण्यात यावी व त्यानंतर या प्रस्तावावर संपूर्ण दिवस चर्चा झाली पाहिजे. वैधानिक विकास मंडळाची मुदत संपते आहे त्यामुळे या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांना विचार मांडण्यासाठी पूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

दिवस पाहिजे अशी मी विनंती केली होती कारण ही चर्चा महाराष्ट्राच्या अविकसित भागाच्या दृष्टीने महत्वाची असल्यामुळे संपूर्ण दिवस या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. या चर्चेला कोणतीही मर्यादा असता कामा नये. या विषयामुळे इतर भागात उलट सुलट मत प्रवाह निर्माण होत आहेत त्यामुळे उलट सुलट चर्चा होऊ नये यासाठी या विषयावरील चर्चा संपूर्ण दिवस चालली पाहिजे. या प्रस्तावाच्या संदर्भात चर्चा घडावी म्हणून मी माननीय सभापती महोदयांना पाच वेळा विनंती केलेली आहे. परंतु या ठिकाणी या चर्चेला केवळ दोनच तासाचा अवधी दिलेला आहे. चर्चेसाठी आम्ही नागपूरपासून सतत आग्रह धरलेला असतांना ही चर्चा दोन तासात संपविणे योग्य होणार नाही. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय जे म्हणाले ते बरोबर आहे कारण या चर्चेवर सन्माननीय सदस्यांनी विचार मांडल्यानंतर त्यास उत्तर देण्यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनाही पुरेसा वेळ मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे या चर्चेला जास्तीत जास्त वेळ कसा मिळेल यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी आपला हुकूम प्रणाम मानून बरोबर 10 मिनिटात माझे विचार संपवितो. डिसेंबर, 2001 मध्ये हा आदेश पारीत झाला. नोक-यांमध्ये समन्यायी प्रतिनिधीत्व देण्याचा आदेश अजूनपर्यंत पारीत झालेला नाही. विदर्भ-मराठवाडयामध्ये उद्योगाच्या संदर्भात समन्यायी आदेश अजूनपर्यंत पारीत झालेला नाही. सिंचनाच्या बाबतीतील अनुशेष दूर करण्याची राज्यपालांनी 15 डिसेंबर, 2001 रोजी आदेश काढला होता व या आदेशाची ज्या त-हेने अंमलबजावणी झाली त्याचे सारे तपशील वर्णन करण्यापेक्षा त्याचे आज काय चित्र आहे ते 10 मिनिटातच मांडणार आहे. आमचा अनुशेष कमी झाला की, वाढला ? 1982 च्या दांडेकरांच्या रिपोर्टमध्ये 924 हजार हेक्टरचा अनुशेष होता तो आता 1878 हजार हेक्टर झालेला आहे. मराठवाडयाचा अनुशेष दांडेकरांच्या रिपोर्टमध्ये 260 हजार हेक्टरचा अनुशेष होता तो आता 500 हजार हेक्टरचा झालेला आहे. विदर्भाचा अनुशेष 527 हजार हेक्टरचा होता तो आता 1075 हजार हेक्टरचा झालेला आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

दांडेकरांनी पहिल्यांदा आम्हाला आरशामध्ये चेहरा दाखविला. त्यांनी चेहरा दाखविल्यानंतर 2008 ची अधिकृत आकडेवारी वॉटर रेग्युलॅरिटी ऑथॉरिटीच्या अहवालात आलेली आहे. दांडेकरांनी अहवाल दिला तेव्हा राज्याची 22.85 एवढी सरासरी होती. 2008 मध्ये 54.42 एवढी झालेली आहे. म्हणजे राज्याची सिंचन क्षमता सरासरीने दुपटीपेक्षा जास्त वाढली आणि नेमका त्याच वेळी अनशेषग्रस्त भागांचा अनुशेष देखील दुपटीने वाढला. या गोष्टीला आपण न्याय देऊ शकलो नाही याचा मला संकोच आहे. या सभागृहाने तर सन 2001 पासून सातत्याने खूप संघर्ष केला, याची सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये नोंद घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी ठराव मांडला असून त्यांनी नेमके यावर बोट ठेवले आहे. तेवढ्याचाच मी उल्लेख करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

सभापती महोदय, जिल्हावार आकडेवारी मी सांगत नाही. कारण ती पुष्कळ वेळा सांगितली आहे. याला दोन कारणे आहेत. पाहिले महत्त्वाचे कारण असे आहे की, कोण्या एका दिवसाचा अनुशेष धरून बसायचे आणि तो धरून बसलेला अनुशेष आम्ही दूर करीत आहोत असे सांगत जायचे. ते करीत असताना तो अनुशेष रूपयाच्या किंमतीमध्ये काढून त्या काल्पनिक किंमतीवर आधारलेला अनुशेष गेली 15 वर्षे दूर करीत आहोत. 1984 च्या अनुशेष दांडेकर समितीच्या अहवालामध्ये जून 1982 च्या सरासरीवर आला. तो दूर करता करता आमच्या नाकात दम आला. तो दूर झाला नाही. दांडेकर अहवालात आपण दहा हजार रूपये किंमत धरली. ही काल्पनिक आहे. ही किंमत पाटबंधारे विभागाने त्यांना दिली होती. 1994 मध्ये 50 हजार रूपये किंमत धरली. जून 2007 मध्ये 80 हजार किंमत धरली आणि जून 2008 मध्ये देखील 80 हजार किंमत धरली. यात किंमत धरण्याचा मुद्दा आहे. किंमत कमी धरल्यामुळे अनुशेष कमी होतो. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये दुर्दैवी अशा प्रकारचे वाक्य माननीय वित्त मंत्र्यांच्या गेल्या वर्षीच्या अधिकृत भाषणात आले. ते वाक्य असे होते, "जलसिंचन या क्षेत्रातील आर्थिक अनुशेष दूर झालेला आहे, याबद्दल सभागृहाला सांगताना मला अत्यंत आनंद होतो." त्यांचे हे वाक्य खरे होते की खोटे होते हा वादाचा विषय होऊ शकतो. त्यांचे हे वाक्य खरे होते. जी किंमत 1994 मध्ये धरली तेवढे रूपये

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

खर्च केले. त्यातून काय दूर झाले किंवा झाले नाही हे आपण पहा. दुर्दैवाने मी सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विभागाचा आणि सर्वात जास्त अनुशेष असलेल्या जिल्ह्याचा प्रतिनिधी आहे. मी जेव्हा ऐकले की, अमरावती जिल्ह्याचा जलसिंचाना अनुशेष दूर झाला तेव्हा मला धक्का बसला. सभापती महोदय, मला शासनाचे आभार मानले पाहिजेत. माननीय राज्यपालांचे आभार मानले पाहिजेत. एक वर्षामध्ये त्यांनी भूमिका बदलवली. या वर्षी हे मान्य केले की, अमरावती विभागातील पाचही जिल्हे हे महत्तम अनुशेषामध्ये आहेत. राज्याच्या सरासरीवर पोहोचण्यासाठी जिल्ह्याला जी क्षमता द्यावी लागते तो म्हणजे त्याचा भौतिक अनुशेष. हेक्टरामध्ये तो अनुशेष काढला तर अमरावती जिल्ह्याचा 134 हजार हेक्टर अनुशेष येतो. हे उदाहरण मी मेरिट नंबर वन म्हणून देत आहे. 134 हजार हेक्टरचा अनुशेष आता 2008 मध्ये 235 हजार हेक्टर झालेला आहे. हे सर्व अहवालामध्ये आहे. हे माननीय राज्यपाल आणि शासन यांनी मान्य केले आहे. अमरावती विभागामध्ये सर्वात जास्त अनुशेषामध्ये आहे. अमरावती विभागात 416 हजार हेक्टर अनुशेष होता तो आता 897 हजार हेक्टर इतका झालेला आहे. सभापती महोदय, माझी शेवटची तीन मिनिटे राहिली आहेत. तेवढ्या वेळातच मी माझा शेवटचा मुद्दा संपवितो.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / परिशुद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

सभापती महोदय, विदर्भ असो वा मराठवाडा असो, एक जिल्हा असो वा दुसरा जिल्हा असो राज्याच्या सरासरीवर पोहोचण्यासाठी जेवढया हेक्टरची सिंचन क्षमता आवश्यक आहे तेवढी सिंचन क्षमता दिलीच पाहिजे त्याचे नाव फिजिकल बॅकलॉग असे ठेवण्यात आलेले आहे. 1982 साली काल्पनिक किंमत दहा हजार रुपये त्यांनी ठरवली होती तितके पैसे जर खर्च झाले असतील तर मग दहा पट अनुशेष दूर झाला ..अमरावती जिल्हयाचा 134 कोटी रुपयांचा बॅकलॉग होता आणि अमरावती विभागाचा 416 कोटी रुपयांचा होता, विदर्भाचा 527 कोटी रुपयांचा बॅकलॉग होता. त्या हिशोबाप्रमाणे तर दुप्पट तिप्पट अनुशेष दूर झाला आहे. आता काही अनुशेषच शिल्लक नाही. अनुशेंषच संपला आहे. तेव्हा अशा प्रकारे ही गोष्ट बरोबर नाही.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये जी मागणी करण्यात आलेली आहे ती बरोबर आहे.या निमित्ताने मी एक गोष्ट स्पष्ट सांगतो की, दिनांक 30 एप्रिल 2010 रोजी दुर्दैवाने ऑर्डर एक्सटेन झ ाली नाही तर ही जबाबदारी ट्रेझरी बेंचवर येऊन पडते. सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री अजित दादा पवार यांना मी सांगू इच्छितो की,आज या संदर्भात माननीय राज्यपालांची ऑर्डर असून त्याप्रमाणे निधी देणें भाग आहे असे म्हणण्यास आपल्याला स्कोप आहे परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवाने जर या ऑर्डरला एक्सटेन्शन मिळाले नाही तर ट्रेझरी बेंचला ही जबाबदारी घ्यावी लागेल. ज्यावेळी ही जबाबदारी ट्रेझरी बेंचवर येईल व यासंबंधी विचार करावा लागेल त्यावेळी या बाबी त्यांना दुर्लक्षित करता येणार नाहीत.अनुशेषाचे सिंध्दांत दांडेकर समितीने ठरवून दिले होते तेच निर्देशांक समितीने मानले होते, ते जसेच्या तसे कायद्यामध्ये आलेले आहेत.वहितीखालील जमीन किती आहे, ओलिताखालील जमीन किती आहे, त्याची टक्केवारी किती आहे,राज्याची सरासरी टक्केवारी किती आहे आणि राज्याच्या सरासरीवर येण्यासाठी मागे असलेल्या जिल्हयांना किती हजार हेक्टर सिंचन क्षमता दिली पाहिजे याचे नाव भौतिक अनुशेष आहे. त्यासाठी किती रुपये लागणार आहेत यावी बाबा आदमच्या काळात किमत काढली होती. त्यानुसार 1982 सालची किंमत 10 हजार रुपये होती आणि 1994 सालची किंमत 50 हजार रुपये होती. त्याचे नाव आर्थिक अनुशेष आहे. तो अनुशेष दोन चार वेळा दुरुस्त होतो.

सभापती महोदय, माझे भाषण मी तीन वाक्यात संपविणार आहे.सभापती महोदय, माझी पहिली मागणी अशी आहे की, ,हा जो मेकॅनिझम आहे त्याचे एक्सटेन्शन महाराष्ट्रात आवश्यक

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

आहे या संबंधी राज्य शासनाने भारताच्या माननीय राष्ट्रपतींना आणि केन्द्र शासनाला विनती करावी. हे एक्सटेन्शन राज्य शासनाला मिळाले तर त्यांनी याबाबत माननीय राज्यपालांना विनंती करावी अशी माझी राज्य शासनाला विनंती आहे.दुर्देवाने एक्सटेन्शन मिळाले नाही तर मी जी सूचना करणार आहे तिचा विचार करुन शासनाने धोरण ठरवावे. या संदर्भात माझी सूचना अशी आहे की,रुपयामध्ये आर्थिक अनुशेष काढणे बंद केले पाहिजे. कामाच्या सोयीसाठी किंमत धरावी लागते ती जरुर धरण्यात यावी.परंतु रुपयातील अनुशेष हा खरा नाही .एका कोणत्या तरी वर्षातील अनुशेष धरुन ठेवावयाचा आणि दरवर्षी इतका अनुशेष कमी झाला ,तितका अनुशेष कमी झाला हे सांगावयाचे हे बरोबर नाही. 15 - 20 वर्षानंतर असे दिसून येते की,प्रत्यक्षात अनुशेष काहीही कमी झालेला नाही उलट तो दुप्पट वाढलेला आहे. संपूर्ण राज्याचा असा इतिहास आहे तो बदलण्यात आला पाहिजे. दरवर्षीच्या जलसिंचनाच्या अनुशेषाचे अपडेटीग झाले पाहिजे. अनुशेष एका कारणामुळे कमी होत असतो. शासन त्या भागासाठी जो निधी देते त्या निधीतून जे सिंचन प्रकल्प तयार केले जातात त्यामुळे अनुशेष कमी कमी होत असतो. परंतु तो एका कारणामुळे वाढतही असतो.राज्याची सरासरी वाढली की हा अनुशेष देखील वाढत जातो. वाढलेल्या सरासरीवर मागे असलेल्या जिल्हयांना आणण्याची जी कृती आहे तो अपडेटींगचा आत्मा आहे. दरवर्षी अनुशेष अपडेटींग केला पाहिजे. ज्या प्रमाणे बॅकेत किती पैसे टाकले आणि किती काढले हे समजण्यासाठी आपण वारंवार पासबुक अपडेट करुन घेतो त्याप्रमाणे अनुशेंषाचे अपडेटीग केले पाहिजे.सुदैवाने दरवर्षी् अनुशेषाचे अपडेटीग करणारी यंत्रणा कायद्याने महाराष्ट्र राज्यात निर्माण करण्यात आलेली आहे. त्यासाठी वेगळी समिती करण्याची काहीही गरज नाही. या समित्यांनी महाराष्ट्राचा सत्यानाश केला आहे.दांडेकरांनी वेळेच्या आत रिपोर्ट दिला. अनुशेष व निर्देशांक समिती अनेक वर्षे आम्हाला दिसली नाही. मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे अनुशेषाचे दरवर्षी अपडेटीग केले पाहिजे तसेच महाराष्ट्राच्या इतिहासाने या पिढीच्या लहान मोठया नेत्यांवर जी जबाबदारी सोपवली आहे तिला सामोरे जावे आणि महाराष्ट्राला विघटनापासून वाचवावे अशी विंनती करुन मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी याठिक्राणी उभा असतांना त्यांनी आज याठिकाणी जी भावना व्यक्त केली तिचा मी आदर व्यक्त करतो. आणि माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी भाषण संपवितांना सांगितल्याप्रमाणे अखंड महाराष्ट्रामध्ये भविष्यातील सर्व भावी तरुण नेत्यांकडून ही भावना जोपासून अविकसित भागाकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाईल. काही नेत्यांनी आठ दिवसापूर्वी पत्रकार परिषद घेऊन "महाराष्ट्र दिन" हा "काळा दिन" म्हणून पाळला जावा अशाप्रकारची घोषणा केली आहे, त्याबाबत मी स्वतंत्रपणे बोलणार आहे. परंतु अशाप्रकारची घोषणा करीपर्यंत काही लोक येतात, त्याचे विवेचन माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांनी भाषण संपविता संपविता केले. त्याची आदरणीय मुख्यमंत्र्यांनी आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने अत्यंत गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, येत्या 30 तारखेला वैधानिक विकास मंडळाची मुदत संपत आहे, ती वाढवून देण्यासंबंधी या ठरावाचा विषय आहे. हा सर्वपक्षीय प्रस्ताव म्हणून सभागृहापुढे यावा याकरिता मी दौऱ्यावर असतांना माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना विनंती केली. तसेच, आदरणीय श्री. भाऊसाहेब फुंडकर यांना विनंती केली, माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना विनंती केली आणि सभापती महोदय आपणालाही विनंती केली. त्याप्रमाणे हा सर्वपक्षीय प्रस्ताव या सदनामध्ये कोण आणत आहे? काय आणत आहे? यापेक्षा हा सर्वपक्षीय प्रस्ताव अधिकृतरित्या ट्रेझरी बेंचकडून, सत्तारुढ पक्षाकडून यावा म्हणून महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेसचे अध्यक्ष या नात्याने माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना हा प्रस्ताव मांडण्याचा मी सन्मान दिला. आपण नागपूर येथे हा प्रस्ताव मांडीत असतांना जे भाष्य केले, ते अखंड महाराष्ट्राच्या भावना जपणारे आहे, आणि अविकसित भागाला न्याय द्या असे सांगणारेही आहे. त्याकरिता वैधानिक विकास मंडळाची गरज आहे. माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख हे अनुशेषाच्या संदर्भातील आमच्या संपूर्ण लढयाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांनी योध्दयाच्या भूमिकेमध्ये आपली भूमिका मांडली. त्यावर खूप काही बोलावे अशातला भाग नाही. त्यांनी पूर्णपणे विस्तृत अशी भूमिका मांडली. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या निर्मितीपासून ते 1980 साली दांडेकर समितीच्या बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयानंतर व 1984 साली दांडेकर समितीच्या झालेल्या निर्मितीपर्यंत संपूर्ण इतिहास सांगताना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दांडेकर समितीची निर्मिती झाली तरी आम्हाला न्याय मिळाला नाही हे सांगताना ते अत्यंत तळमळीने बोलले. त्यानंतर सन 2001 मध्ये या सभागृहामध्ये मोठे आक्रंदन निर्माण झाल्यानंतर माननीय राज्यपाल महोदयांनी निर्देश दिले. करतो करतो असे सांगावयाचे परंतु काहीच करावयाचे नाही अशी जी भूमिका निर्माण झाली होती ती किती वर्षे झाली? ती 1994 पासून 2001 पर्यंत होती, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. त्यामधून राज्यकर्त्यांची मानसिकता प्रकट होत होती. त्यानंतर माननीय राज्यपालांनी आपला अधिकार वापरण्याचा प्रयत्न केला. असे असतांना सुध्दा अविकसित महाराष्ट्रामधील मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश या भागाच्या जखमेवर मीठ चोळण्याकरिता माननीय अर्थमंत्री "अनुशेष आम्ही दूर केला आहे, आता तुमचे तुम्ही बघा" असे जे बोलले ते माननीय प्रा.बी.टी. देशमुख यांनी याठिकाणी सांगितले. ही प्रवृत्ती वेदना देणारी आहे. यानिमित्ताने मी याठिकाणी सर्व काही पुन्हा पुन्हा सांगावे अशातला भाग नाही. परंतु माननीय राज्यपाल महोदयांनी वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना यांच्या संदर्भातील प्रसिध्द झालेली पुस्तिका माझ्याकडे आहे. ती 27 मे 2009 साली सभागृहाच्या पटलावर ठेवली असल्यामुळे सर्वांना विदित झाली आहे. सभापती महोदय, या पुस्तिकेचे शीर्षक असे आहे की, 27 मे 2009 साली "Directives of the Hon'ble Governor of Maharashtra under Clause 7 of The Development Boards for Vidarbha, Marathwada and the Rest of Maharashtra." वैधानिक विकास मंडळ असल्यानंतर किमान आपल्याजवळ आपली आई आहे. आणि आईचे संरक्षण असल्यानंतर बालकाला जो आनंद होतो, ती परिस्थिती सद्यातरी वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीत आहे. माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, वैधानिक विकास मंडळ नसेल तर काय होईल? सभापती महोदय, आता वैधानिक विकास मंडळ असावे अशी भूमिका कां निर्माण झाली ? आमच्या हातामध्ये आलेले पुस्तक मराठीमध्ये मागूनही मिळाले नाही. "Directives dated 19th March, 2010 of the Hon'ble Governor of Maharashtra." ही पुस्तिका सुरुवातीला इंग्रजीमध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. त्याचवेळी मी उभे राहून सांगितले की, ही मराठीमध्ये कां आली नाही? अजूनही मला त्याची मराठी प्रत मिळाली नाही. मराठीची अवहेलना चालूच आहे, तरीसुध्दा जे प्राप्त आहे ते स्वीकारुन त्यावर बोलणे भाग असते. सभापती महोदय, हे वैधानिक विकास मंडळ असलेच पाहिजे या संदर्भात या पुस्तकातील काही गोष्टी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सांगितल्या जात आहेत. या पुस्तकाच्या पान क्र. 2 वर असे म्हटले आहे की, " Further, to ensure liquidation of this remaining financial backlog, conditions were put in Para 13, 36 & 43 of the Directives dated 27th May, 2009....."

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणजे मघाशी मी वाचून दाखविले ते "....that these funds would be earmarked exclusively for these five backlog districts and these funds would neither be diverted to other districts nor be allowed to lapse." काय ताकद आहे? या डायरेक्टीव्हज्मध्ये एवढे सामर्थ्य आहे की सदरहू निधी तेथेच वापरला गेला पाहिजे, दुसरीकडे वापरता येणार नाही असे माननीय राज्यपालांच्या निर्देशामध्ये म्हटलेले आहे. पुढे परिच्छेद क्र.6 मध्ये असे म्हटलेले आहे की, "Principle of allocation of funds and its relevance - Considering the fact that the financial backlog of 1994 is expected to be liquidated by the year 2010 i.e. almost after 16 years, it would be difficult to envisage a fixed time frame for liquidation of remaining backlog as on 1994." आता याठिकाणी जो भौतिक अनुशेष मांडलेला आहे, ती परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. याच पुस्तकातील पान क्र.3 वर म्हटलेले आहे की,"The Governor, therefore, has decided to constitute a Committee of experts to look into these issues keeping in view the present status of various sectors in all the three regions and review the issue of balanced regional development taking into consideration the views of all the stakeholders. The equitable allocation of development expenditure would then be guided as per the new approach and new allocation principles." याचा अर्थ वैधानिक विकास मंडळाला पुन्हा मुदतवाढ मिळाल्यानंतर सगळे जुने संकेत टाळावयाचे आणि नवीन पध्दतीने कमिटी नेमून वेगवेगळ्या भागातील बॅकलॉग कोणता आहे, याकरता पुन्हा नवीन पध्दतीने विचार करण्यात येईल अशा प्रकारची भावना त्यांनी व्यक्त केलेली आहे. पुढे पॅरा क्र.13 मध्ये म्हटलेले आहे की,"The Directives of 15th December, 2001..." जो मुद्दा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडला होता. ".....envisaged the weightages to backlog, population and net sown area in the ratio of 50%, 25% and 25% respectively. Since the financial backlog has....."पुढे सगळे डिटेल्स्मध्ये म्हटलेले आहे. सभापती महोदय, पुढे असे म्हटलेले आहे की, "Requirements of Inter-State Projects." तसेच पॅरा क्र.16 मध्ये असे

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हटलले आहे की, " In case of Godavari river basin...." हे मला सर्वात महत्वाचे वाटते. " In case of Godavari river basin, the total water available for the State is yet to be fully planned..."अजूनही गोदावरी खोऱ्याचे नियोजनच झालेले नाही. "....especially in Vidarbha region. Further, the river basins in Konkan, although not covered under inter-state Award, also require due consideration. It is also necessary to give due consideration to the requirement of the barrages in Marathwada region. The Governor has, therefore, observed that out of the funds available to the three regions, (other than the funds earmarked for removal of remaining backlog) the State Government should be able to spend as per the priority to fulfill the requirements of implementing the inter-state Award for Godavari, bilateral agreement for Tapi river basins, irrigation projects in Konkan and barrages in Marathwada region." असे जेव्हा माननीय राज्यपाल महोदय स्पष्ट शब्दात म्हणतात, तेव्हा भविष्यामध्ये हे पाच वर्षात होईल की नाही हे सांगता येत नसल्यामुळे, पुढील पाच वर्षाची मर्यादा का असावी याचे स्पष्टीकरण या अधिवेशनामध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी दि.19 मार्च 2010 रोजी जे निर्देश दिलेले आहेत,त्यामध्ये स्पष्ट शब्दात आलेले आहे.माननीय राज्यपाल महोदयांकडे तीनही वैधानिक विकास मंडळांच्या बाबतीत बैठक झाली होती. त्यावेळी त्यांनी अशी भावना व्यक्त केली आहे की, " A blue print of development should be prepared which should serve as a basis for allocation of State resources. There should be perspective plans for the three regions for medium and long term development. Irrigation should not be the lone yardstick for development in all the areas. An expert committee is required to be constituted to look into the issues of need based development on which basis allocations principle for three regions can be worked out."

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत / शोधनासाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

श्री. अजित पवार त्या मिटिंगला उपस्थित होते त्यावेळी माननीय राज्यपाल महोदयांनी ही भावना व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, दिनांक 1 एप्रिल,2009 चा जो अनुशेष आहे. त्यासंदर्भात माननीय प्रा. बी.टी.देशमुख यांनी याठिकाणी सर्व आकडेवारी वाचलेली आहे. परंतु ते याबाबत सांगत असताना मी अत्यंत बेचैन झालो होतो. महाराष्ट्रात सर्वात जास्त बॅकलॉग विदर्भात आहे. आणि विदर्भामध्ये सगळयात जास्त बॅकलॉग अमरावती मध्ये आहे आणि त्या भागाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी ते येथे उभे होते म्हणजे एवढे वर्षे एकहाती या लढयाचे नेतृत्व करीत असताना त्यांच्याच जिल्हयाची अवस्था ते सांगत होते. ही परिस्थिती सत्य आहे त्यामुळे त्याबद्दल आणखी सांगण्याचा प्रश्न येत नाही. विदर्भाचा शिल्लक अनुशेष बराच मोठा आहे याबद्दल दुमत असण्याचा प्रश्नच येत नाही. त्याचवेळेला मराठवाडयाचा अनुशेष विदर्भापेक्षा थोडा वाढल्यासारखी परिस्थिती आहे. विदर्भाचा चार लाख हेक्टरचा बॅकलॉग आहे तर मराठवाडयाचा 4.30 लाख हेक्टर इतका भौतिक बॅकलॉग वाढलेला आहे. यासंदर्भात एक्सपर्ट समिती नाही. प्रा. बी.टी. देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे वाल्मीमध्ये नियोजन झालेले आहे. आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची निर्मिती झालेली आहे. त्यासंदर्भात जी कमिटी आहे त्यांच्याकडे ही जबाबदारी दिलेली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण वार्षिक अहवाल 2008-2009 च्या पृष्ठ 1 वर अनुक्रमांक 1.1 मध्ये असे म्हटले आहे की, "जलसंपत्तीचे समन्यायी व शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी तसेच जलसंपत्तीचे वाटप व वापर याचे नियमन सुकर करण्यासाठी तसेच त्याची निश्चिती करण्यासाठी व कृषी,औद्योगिक, पिण्याच्या व इतर प्रयोजनांसाठी वापरावयाच्या पाण्याचे दर निश्चित करणे" हे या समितीचे काम आहे. याच अहवालातील पृष्ठ 1 वर अनुक्रमांक 1.2 (क) मध्ये असे म्हटले आहे की,"पाणी टंचाईच्या काळात जलसंपत्ती प्रकल्प,उपखोरे आणि नदी-खोरे स्तरावर,उपलब्ध असलेल्या पाण्याच्या समन्यायी वितरणाचे प्रधान्य निर्धारित करणे." पाण्याच्या समन्वय वाटपाच्या संदर्भात या समितीचे फार महत्वाचे आणि मोलाचे काम राहाणार आहे. आपल्याकडे हा कायदा निर्माण झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, पृष्ठ 2 वर (इ) मध्ये असे म्हटले आहे की, राज्यातील नद्यांच्या पाणीपुरवठयाबाबत आंतरराज्यीय पाणीवाटपाचे प्रशासन व व्यवस्थापन करणे." म्हणून मघाशी गोदावरी नदी, तापी नदी आंतरराज्यीय नसली तरी या नदीच्या पाण्याचे व्यवस्थापन झाले पाहजे असे मत माननीय राज्यपाल महोदयांनी व्यक्त केले आहे. सभापती महोदय,अनुशेष राहिला असल्यामुळे भविष्यामध्ये या मंडळाला वाढ मिळावी असे याच अहवालामध्ये म्हटलेले आहे.

सभापती महोदय, परिचछेद क्रमांक 1.4 मध्ये असे म्हटले आहे की," राज्यपालांच्या निदेशानुसार सिंचनाचा अनुशेष निर्मूलनासाठी प्राधिकरणास अधिनियमाद्वारे विशेष जबाबदारी निहित (बहाल) करण्यात आली आहे (अनिधियमातील कलम 21(1)). त्यानुसार राज्यामध्ये जलसंपदा विभागाकडे उपलब्ध आहे त्या मनुष्यबळाकडून अनुशेषग्रस्त भागात प्रकल्पांचे सर्वेक्षण,नियोजन,तपशीलवार संकल्पन करुन अनुशेष निर्मूलनार्थ नवीन प्रकल्प बांधकामासाठी वेळेत उपलब्ध होतील असे प्राधिकरण पाहील " ही कायद्यातील तरतूद भविष्यामध्ये या प्राधिकरणाकडे देण्यात आलेली आहे. त्यामुळे अनुशेष निर्मूलन समिती, दांडेकर समिती हा या पुढील एक कायदेशीर भाग महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण झालला आहे.

सभापती महोदय, सिंचनाच्या अनुशेषाबाबत या समितीने स्पष्ट शब्दामध्ये पृष्ठ 16 वर अनुक्रमांक 11.1 मध्ये आपले मत पुढीलप्रमाणे मांडलेले आहे." महाराष्ट्र जल नियमन प्राधिकरण अधिनियमातील कलम 20.(1) (ख) अन्वये "अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरुन प्रमाण रब्बी समतूल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये प्रत्येक जिल्हयाचा मोजण्यात आलेला अनुशेष, जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतूल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पध्दतीने अद्ययावत माहिती उपलब्ध असलेला अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या राज्य सरासरीवर जलसिंचन व विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्ययावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक)" जो सध्या 80 हजार रुपये

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/

श्री. दिवाकर रावते....

धरलेला आहे तो आता वाढविणे आवश्यक आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, "दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल." सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी त्यांचे भाषण संपविताना जी भावना व्यक्त केली ती भावना या तरतुदीमध्ये या आयोगाने व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, अहवालातील पृष्ठ 17 वर अनुक्रमांक 11.2 मध्ये त्यांनी अशीच भावना व्यक्त केलेली आहे. "उपरोक्त माहिती जलसंपदा विभागाच्या दि.20/05/2009 च्या पत्रान्वये प्राप्त झाली असून ती जोडपत्र 5(1) मध्ये स्थित आहे." सभापती महोदय, जोडपत्र 5 मध्ये सिंचनाचा जो अनुशेष दिलेला आहे ती सगळी आकडेवारी वाचून मी येथे वेळ घेऊ इच्छित नाही परंतु कोकण विभागाचा अनुशेष रकाना क्रमांक 8 मध्ये 101.98 हजार हेक्टर इतका दिलेला आहे त्याचवेळेला हा अनुशेष रकाना क्रमांक 9 मध्ये अनुशेषाची रक्कम यामध्ये 815.87 हेक्टर अशा प्रकारचा दिलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

नाशिक विभागाचा अनुशेष 199.16 हजार हेक्टर दिला आहे तर पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर यांचा अनुशेष निरंक देण्यात आलेला आहे. मराठवाडा विभागाचा अनुशेष हा 500.97 हजार हेक्टर दाखविलेला आहे. 2009 ची जी शेवटची आकडेवारी आली त्याप्रमाणे हा अनुशेष आहे. त्याचवेळेला अमरावती विभागाचा सर्वात जास्त म्हणजे 897.14 हजार हेक्टर अनुशेष नमूद केलेला आहे. विदर्भाचा एकूण अनुशेष त्यांनी 1076.79 हजार हेक्टर नमूद केलेला आहे. यात म्हटल्याप्रमाणे जोडपत्र 5 मध्ये असे म्हटले आहे की, रत्नागिरी, नंदूरबार, जालना, हिंगोली, बुलढाणा, अकोला,. वाशिम, अमरावती, यवतमाळ या 9 जिल्ह्यातील भौतिक अनुशेष होता. निव्वळ लागवडीखालील क्षेत्राच्या आधारित राज्य रब्बी समतुल्य निर्माण झालेल्या सिंचन क्षमतेची टक्केवारी 1994 च्या म्हणजे दांडेकर समितीप्रमाणे 35.11 टक्के या राज्य सरासरीपेक्षा कमी होती. त्यांनी त्यामध्ये जो अनुशेष दाखविलेला आहे त्यामध्ये प्रत्येक तालुका घेतलेला आहे. आत्महत्याग्रस्त अशा सहा जिल्ह्यांमध्ये बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती या विभागामध्ये सर्वात जास्त अनुशेष त्यांनी नमूद केलेला आहे. त्यांनी जोडपत्र 3 मध्ये म्हटल्याप्रमाणे 8 अनुशेषग्रस्त जिल्हे आहेत त्यामध्ये कोकण विभागाचा पुन्हा अनुशेष दिलेला आहे. मराठवाड्याचा अनुशेष दिलेला आहे आणि पुन्हा अमरावती विभागाचा आणि नागपूर विभागाचा एकत्र अनुशेष दिलेला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा अहवाल सुध्दा सांगतो की, राज्यामध्ये सिंचनाचा समतुल्य विकास झालेला नाही. आजही त्या भागामध्ये ते करण्याची गरज आहे.

माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांनी या सदनामध्ये दिलेले एक सुंदर उत्तर आहे आणि ते कोकणाच्या संदर्भातील आहे. ती अंमलबजावणी करण्याचा निर्धार आपण दोन वर्षापूर्वी व्यक्त केलेला आहे. हे खाते आपल्याकडे असल्यामुळे तो निर्धार पुढे नेण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये असल्यामुळे कोकण विभागाच्या वशिष्ठी खोऱ्याच्या संदर्भात आपली सुंदर तीन चार पानाची जी नोट आहे तिचे मी स्वागत करतो. कोकणातील खोरे हे जरी आंतरराज्य नदीच्या खोऱ्यामध्ये येत नसले तरी आपण वशिष्ठी खोऱ्यामधील जी संकल्पना मांडलेली आहे ती आपण अंमलात आणली तर कोकणातील अनुशेष सुध्दा दूर होण्यामध्ये 100 टक्के मदत होऊ शकते.शेवटी जाता जाता दोन व्यथा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. मराठवाड्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

पाण्याकरिता श्री. शंकरराव चव्हाण यांना आम्ही मराठवाड्यामध्ये भगीरथपुत्र म्हणून आजही सन्मानित करतो. भगिरथपुत्र म्हणून त्यांनी आमच्या मराठवाड्याकरिता पाणी आणले. त्यांनी जायकवाडी धरण आणले. आपला करार असा होता की, जे 215 टीएमसी पाणी उपलब्ध आहे त्यातील 100 टीएमसी पाणी मराठवाड्याला द्यावयाचे आणि फक्त 115 टीएमसी पाणी वरच्या भागामध्ये अडवावयाचे. परंतु आता काय झाले आहे हे माननीय मंत्रिमहोदयांना सुध्दा माहीत आहे. मी कोणालाही दोष देण्याकरिता उभा नाही. परंतु मराठवाड्याचे दुर्दैव असे आहे की, 215 टीएमसीपैकी या घडीला नगर-नाशिकमध्ये 195 टीएमसी पाणी अडवले गेले आहे आणि एवढे प्रकल्प त्या ठिकाणी निर्माण केले. ते प्रकल्प कमी पडतात म्हणून की काय 8 हजार तलावांची निर्मिती केली आणि कालव्याच्या माध्यमातून त्या तलावांचे भरण केले आणि मराठवाड्याच्या वाट्याचे पाणी सुध्दा आपण हिसकावून घेतलेले आहे. अगदी भरपूर पाऊस पडल्यानंतर किंवा महापूर आल्यानंतर कोठे तरी जायकवाडी धरण भरते नाही तर जायकवाडी धरण भरत नाही. 215 टीएमसीपैकी 195 टीएमसी पाणी आपण उचलून घेतल्यामुळे मराठवाडयाच्या वाट्याला जेमतेम 20 ते 25 टीएमसी पाण्याची उपलब्धी या घडीला अधिकृतरीत्या आहे. आपण हे सर्व कसे निर्माण करणार हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांनी मध्यंतरी एक घोषणा केली होती की, जूनपर्यंत 6 बॅरेजेस पूर्ण करण्यात येतील. पण हे 6 बॅरेजेस मराठवाड्याकरिता जादा पाणी मिळण्याकरिता नाहीत. विष्णुपुरी प्रकल्पामध्ये जे 11 टीएमसी पाणी अडवावयाचे होते त्या विष्णुपुरी प्रकल्पामध्ये साधारणत: 3 टीएमसी पाणी थांबते. त्यापेक्षा जास्त पाणी थांबत नाही. म्हणून जे 11 टीएमसी पाणी उपलब्ध पाणी आहे त्यासाठी मागे 6 बंधारे बांधण्याचा प्रकल्प आहे पण मागे जे पाणी अडविले आहे त्यामुळे भविष्यामध्ये आणखी किती तरी बॅरेजेस निर्माण करावे लागतील. त्या निमित्ताने थोडे थोडे पाणी त्या गोदावरीच्या खोऱ्यामध्ये निर्माण करता येईल. दुर्दैवाने ही परिस्थिती आहे. म्हणून 1995 ते 2001 पर्यंत आपण दीड लाख कोटी रुपये खर्च केले आणि मराठवाड्याच्या वाट्याला फक्त 26 टक्के आले. विदर्भाच्या वाटयाला फक्त 28 टक्के आले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणून मराठवाडयाचा हेक्टरी अनुशेष दुप्पट झाला. विदर्भाचा आणि मराठवाडयाचाही सिंचनाचा भौतिकनुसार हेक्टरी अनुशेष दुप्पट झाला. रुपया आण्यामध्ये अनुशेष काढण्यापेक्षाही सिंचनाखाली जमीन किती आली हे पहा. या भागातील जमीन सिंचनाखाली किती आली हा महत्वाचा भाग असून राज्याच्या सरासरीनुसार सिंचनाखाली येणारे क्षेत्र जोपर्यंत वाढत नाही तोपर्यंत अनुशेष वाढत जाणार आहे ही परिस्थिती आहे.

सभापती महोदय, कृष्णा खो-यातील पाणी हा एक स्वतंत्र विषय आहे. मला वाटते की, हा विषय सभागृहात तीन वेळा उपस्थित झालेला आहे. कृष्णा खो-यात 521 टीएमसी पाणी आहे. त्यापैकी मराठवाडयाच्या लोकसंख्येनुसार 10 टक्के वाटा मिळाला पाहिजे. आमची मागणी 52 टक्क्यांची होती, परंतु मंत्री महोदयांनी 21 टीएमसी मिळेल असे म्हटले होते. आम्ही तेही स्वीकारले आहे. परंतु 21 टीएमसी पाण्याचा एकही प्रकल्प तेथे सुरु झाल्याचे दिसत नाही. त्याठिकाणी 21 टीएमसीपैकी एकही थेंब उपलब्ध झाला आहे असे वाटत नाही. हे माझे मत आहे, मंत्री महोदयांनी ते खोडून काढले तर मला आनंद होईल. 21 टीएमसीकरिता कृष्णा खो-याचे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर आम्हाला ते पाणी मिळेल अशाप्रकारची भूमिका मध्यंतरी घेतली होती. ती कृपया सोडावी. कृष्णा खो-यातील जे प्रकल्प आहेत त्याच प्रमाणात मराठवाडयात प्रकल्प चालू व्हावेत आणि 52 टीएमसी नाही तर निदान 21 टीएमसी पाणी तरी मराठवाडयाला द्यावे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी एक गोष्ट का सांगितली नाही ते कळले नाही. विदर्भात सिंचनाचा अनुशेष वाढलेला आहे. तेथे सिंचनाची परिस्थिती गंभीर आहे. काल सभागृहात चर्चा केली आहे की, चंद्रपूरचा हायड्रो प्रोजेक्ट बंद पडला आहे, त्यामुळे 250 मेगावॉटपेक्षाही जास्त वीज निर्मिती बंद झाली आहे. तेथे मुळात पाणी कमी आहे, असे असले तरी तेथे नवीन 49 प्रकल्प निर्माण होत आहेत, त्याबाबत लोकांमध्ये प्रक्षोभाची भावना आहे. वेगळया विदर्भाची भूमिका घेणा-यांसमोर काहीच विषय नव्हते. या नवीन विषयाने त्यांच्या हातामध्ये कोलीत दिल्यासारखे झाले आहे. सिंचनाच्या अनुशेषातून निर्माण होणारी ती दुर्दैवी परिस्थिती आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी ती आकडेवारी मांडायला पाहिजे होते. पण त्यांनी ती मांडली नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ SBT/ KTG/ ST/

श्री.दिवाकर रावते....

सन्माननीय मंत्री महोदय, श्री.अजित पवार यांना सांगू इच्छितो की, आपण या प्रकल्पांसाठी झगडा करुन पैसा उभा करावयाचा, प्रकल्प उभे करावयाचे, या प्रकल्पातून उपलब्ध झालेले सिंचनाचे पाणी आहे ते जर अशाप्रकारे प्रकल्पांना जाणार असेल आणि पुन्हा शेतकरी जर उद्ध्वस्त होणार असेल तर शेतक-यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, त्या किती वाढणार आहे ते सांगता येत नाही. अशी दुर्दैवी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून शासनाने तिनही वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ द्यावी. परंतु एक गोष्ट नक्की आहे की, मी तत्कालीन राज्यपाल डॉ.पी.सी.ॲलेक्झांडर यांना भेटण्यासाठी गेलो होतो त्यावेळी त्यांनी सुध्दा यासंदर्भात स्पष्ट भावना व्यक्त केल्या होत्या. मराठवाडा, विदर्भ हे सर्व ठीक आहे, कारण ते घटनेमध्ये दिलेले आहे. पण उर्वरित महाराष्ट्रातील कोकणात अनुशेष आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही कायम स्वरुपी दुष्काळग्रस्त तालुके आहेत. तेव्हा आता नवीन मुदतवाढ देताना, द्याल अशी अपेक्षा आहे, ती द्यावी लागेल. परंतु उर्वरित महाराष्ट्राच्या वैधानिक विकास मंडळाच्या अनुशेषाच्या संदर्भातील निश्चित असा भाग जाहीर केला गेला पाहिजे. मुंबई, विदर्भ एकवटला आहे, पुणे त्यात धरणार काय, त्यामुळे कोकण, खानदेश, ठाण्यातील अर्धा भाग म्हणजे डहाणू, तलासरी, पालघर हा भाग मागासलेला आहे आणि दुस-या बाजूला ठाणे विकसित आहे, हे चित्र दिसत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त तालुके आहेत की ज्यांचा सिंचनाचा अनुशेष भरुन निघालेला नाही. अशा प्रकारे त्या वैधानिक विकास मंडळाला एक क्षेत्र ठरवून दिले तर सर्वामध्ये असंतोष निर्माण झाला आहे तो थांबेल आणि सरकारला आणि राज्यपालांच्या माध्यमातून निश्चित स्वरुपात मार्गदर्शन करील अशी मी विनंती करतो. भविष्यामध्ये आर्थिक अनुशेषापेक्षा भौतिक अनुशेष हे सूत्र वापरुन या मंडळाने काम करावे अशी सूचना करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

यानंतर श्री.शिगम.....

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित): माननीय सभापति जी, आज यहां पर वैधानिक विकास महामंडलों की मुदत बढ़ाने के बारे में चर्चा हो रही है. मुझे लगता है कि मैं इसमें दो और विषयों को भी जोड़ दूं. मैं कहना चाहूंगी कि जुलाई 2006 में गवर्नर साहब ने एक आदेश दिया था कि खानदेश के लिए अलग से एक वैधानिक विकास महामंडल स्थापन किया जाना चाहिए. आज उस बात को कहे हुए चार साल का समय बीत गया है. लेकिन अभी तक उस बारे में न तो कोई चर्चा हुई है और न ही किसी तरह की मूवमेंट इस दिशा में हुई है कि उसका फालोअप करके उस वैधानिक विकास महामंडल की स्थापना की जाये. इस तरह का कोई भी चिन्ह हमें यहां पर दिखायी नहीं देता है. इसलिए वैधानिक विकास महामंडलों का जो उद्देश्य था कि समतोल और सर्वांगीण विकास महाराष्ट्र का होना चाहिए,उसी उद्देशय को सामने रखकर मैं यहां पर यह बात दोहराना चाहती हूं कि इन चार वैधानिक विकास महामंडलों की मुदत बढाने के साथ-साथ हमारे खानदेश वैधानिक विकास मंडल की स्थापना भी होनी चाहिए. एक बात मैं यहां पर कहना चाहूंगी कि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडल के लिए जो तरतूद की जाती है उसमें इस बात का उल्लेख या स्पष्टता कहीं पर नहीं रहती कि इसमें कितनी तरतूद खानदेश के विकास के लिए की गयी है. खानदेश के विकास के लिए कितना निधि वहां पर दी गयी है, इस बात का कहीं पर कोई उल्लेख नहीं रहता है. इसी वजह से हम अपने यहां पर अनुशेष पूरा करने की मांग नहीं कर पाते हैं क्योंकि हमें यह मालूम ही नहीं रहता है कि खानदेश के लिए कितनी निधि वहां पर उपलब्ध करायी गयी है. यही वजह है कि जहां एक ओर पश्चिमी महाराष्ट्र का अच्छा विकास हुआ है वहीं दूसरी ओर खानदेश पूरी तरह पिछड़ा हुआ रह गया है. यही वजह है कि खानदेश में आज आत्महत्या और कुपोषण की समस्या बड़े पैमाने पर है. आदिवासियों की समस्या भी वहां पर बड़े पैमाने पर है. आदिवासियों की दारिद्रय की समस्या इतनी बड़ी है कि उन लोगों के हाल, बेहाल हो गए हैं.

माननीय सभापति जी, आज खानदेश में अनेक ऐसे प्रकल्प हैं जो पिछले 25-30 साल से अधूरे पड़े हुए हैं. उन प्रकल्पों के लिए मिलने वाली निधि अपूरी होने की वजह से वे प्रकल्प 30-30 साल अधूरे पड़े हुए हैं.निम्न तापी, वाघुर और पाडळसे नदी जोड़ जैसे प्रकल्प अधूरे पड़े हुए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती जैन...

हैं. और उसका जो नतीजा है वह हमें वहां के लोगों के रहन-सहन पर दिखायी पड़ता है.देरी के कारण उन प्रकल्पों की जो लागत थी वह लागत आज 10 गुना बढ़ गयी है. इसलिए मेरा कहना है कि उन अधूरे प्रकल्पों को पूरा करने के लिए जितनी निधि की आवश्यकता है वह निधि उन प्रकल्पों के लिए जल्द से जल्द उपलब्ध कराया जाना चाहिए. जब तक वे प्रकल्प वहां पर पूरे नहीं किये जाते हैं तब तक वहां के लोगों का जीवन स्तर ऊंचा नहीं उठ सकेगा. और जो गरीबी हमें खानदेश में आज दिखायी देती है वही गरीबी हमें हमेशा दिखायी देती रहेगी. मैं बताना चाहूंगी कि आज पूरे महाराष्ट्र में बीपीएल कार्ड होल्डर्स की संख्या 35प्रतिशत है जबकि जलगांव में बीपलीएल कार्ड होल्डर्स की संख्या 43 प्रतिशत, धुलै में 54 प्रतिशत और नंदूरबार में यह संख्या 73 प्रतिशत है. यदि हमें सम्पूर्ण महाराष्ट्र का सर्वांगीण विकास करना है तो वह विकास खानदेश की ओर दुर्लक्ष करके नहीं हो सकता है. इसलिए यह बहुत जरुरी है कि खानदेश के लिए अलग से वैधानिक विकास महामंडल की स्थापना की जाये. और जब तक खानदेश वैधानिक विकास महामंडल की अलग से स्थापना नहीं होती तब तक यह होना बहुत जरुरी है कि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडल में खानदेश के लिए अलग से तरतूद की जाये और इस बात की जानकारी माननीय सदस्यों को दी जाये कि उस महामंडल में खानदेश के विकास के लिए कितनी तरतूद की गयी है. खानदेश के विकास के ऊपर खास जोर दिया जाना भी बहुत आवश्यक है.

माननीय सभापति जी, एक और बात की ओर मैं सदन का ध्यान दिलाना चाहूंगी कि उत्तर महाराष्ट्र में उकई जैसे प्रकल्प हैं जिनसे जलगांव, धुलिया और नंदूरबार इन तीन जगहों का विकास हो सकेगा. यहां पर हालत यह है कि जो पैसा हमारे विकास के लिए केंन्द्र सरकार से आता है वह भी जलगांव तक नहीं पहुंचता है. केंद्र से आये हुए फंड भी इधर उधर हो जाते हैं. एआइबीपी के अंतर्गत 70 करोड़ रुपए केन्द्र सरकार से आए हैं, वे कहां खर्च हुए या उसका क्या हुआ मालूम नही. वह फंड भी जलगांव तक पहुंचा ही नहीं . अगर खानदेश के लिए अलग वैधानिक विकास महामंडल होता तो शायद यह नहीं होता. इसलिए मेरा कहना है कि जुलाई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती जैन...

2006 में माननीय गवर्नर साहब ने खानदेश के लिए अलग से वैधानिक विकास महामंडल बनाने की जो बात कही थी उस पर अमल किया जाये. यह वैधानिक विकास महामंडल जल्द से जल्द स्थापित किया जाना आवश्यक है. और जब तक यह वैधानिक विकास महामंडल अलग से खानदेश के लिए निर्माण नहीं होता तब तक उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडल में खानदेश के लिए अलग से तरतूद की जानी चाहिए. उसके बिना चाहे शिक्षण का क्षेत्र हो या सिंचन का क्षेत्र हो या कोई दूसरा क्षेत्र हो, हमारे यहां पर खानदेश के अंदर समतोल और सर्वांगीण विकास संभव नहीं है. इसलिए माननीय सभापति जी मेरा अनुरोध है कि इस ओर विशेष ध्यान दिया जाये. इतना ही मुझे कहना है. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-0-

इसके बाद श्री शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या प्रस्तावावरील उत्तरासाठी वेळ केव्हा देण्यात येणार आहे ?

उपसभापती : अजून ब-याच सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी नावे दिलेली हेत.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही चर्चा आपण किती वेळ घेणार आहात ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे आता सभागृहामध्ये नाहीत. त्यांनी सांगितलेली गोष्ट मला मान्य आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना मान्य असेल तर दुपारी 12.15 वाजेपर्यन्त चर्चा संपली नाही तर प्रश्नोत्तराच्या तासानंतर ही चर्चा सुरु करावी. राज्याच्या सर्व विभगांच्यादृष्टीने ही चर्चा अतिशय महत्वाची आहे. या चर्चेला निश्चितपणे न्याय मिळाला पाहिजे आणि राज्य सरकारची भूमिका काय आहे हेही या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील जनतेला समजली पाहिजे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आजच चर्चा पूर्ण झाली पाहिजे. यापूर्वी सुध्दा दोन वेळा असेच झालेले आहे. नागपूर अधिवेशनात चर्चा झाली. आमचे बोलणे होते आणि उत्तर येत नाही.

उपसभापती : मी चर्चा थांबविण्यापूर्वी माननीय सभापतींकडे निरोप पाठवितो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही चर्चा आजच झाली पाहिजे. प्रश्नोत्तराच्या तासानंतर पुन्हा चर्चा सुरु करावी, मंत्रीमहोदयांनाही उत्तराच्या भाषणासाठी पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. राज्याच्या समतोल विकासाच्या दृष्टीने ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे. कितीही वेळ लागला तरी चालेल परंतु ही चर्चा आज पूर्ण झाली पाहिजे.

उपसभापती : मी या संदर्भात माननीय सभापतींबरोबर चर्चा करतो. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त जे विभाग आहेत, विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, उर्वरित महाराष्ट्रासह कोकणातील अनुशेषाबाबत जो प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने धटनेच्या कलम 371(2) अन्वये या राज्यामध्ये वैधानिक विकास मंडळे गठित करण्यात आली. या मंडळांची मुदत 30 एप्रिल, 2010 रोजी संपत आहे. या चर्चेच्या अनुषंगाने राज्य शासन या मंडळांना मुदत वाढवून देणार आहे का? काही पर्यायी व्यवस्था करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे का? याबाबतची स्पष्टता होणे आवश्यक आहे. माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, ही वैधानिक विकास मंडळे सुरु राहिली पाहिजेत. वैधानिक विकास मंडळांऐवजी पर्यायी व्यवस्था निर्माण करणार असाल तर त्या पर्यायी व्यवस्थेमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येणार आहे. अनुशेषग्रस्त भाग जो आहे, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुके आहेत त्या संदर्भातील स्पष्ट चित्र सभागृहासमोर आले पाहिजे. सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला वस्तुस्थिती कळली पाहिजे.

सभापती महोदय, मी राज्य शासनाला जरुर धन्यवाद देतो. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या माहितीसाठी मला सांगितले पाहिजे की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना 1984 साली दांडेकर समिती नेमण्यात आली होती. या समितीला राज्याच्या संपूर्ण अनुशेषाबाबत शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करुन अहवाल सादर करण्यास सांगितले होते. या समितीने राज्य शासनाला 1984 साली अहवाल सादर केला. माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे 10 वर्षानंतर म्हणजे 9 मार्च, 1994 रोजी माननीय राज्यपालांनी घटनेच्या कलम 371(2) अन्वये गॅझेट नोटिफिकेशन काढून विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्रासाठी विकास मंडळे स्थापुन केली. घटनेच्या कलम 371(2) अन्वये गुजराथ राज्यातील सौराष्ट्र व इतर भागांसाठी विकास मंडळाची तरतूद केली होती. सौराष्ट्रासाठी विकास मंडळ नेमण्यात आले. परंतु पुढील सहा महिन्यात विकास मंडळ बंद करण्यात आले ही वस्तुस्थिती आपल्याला मान्य करावी लागेल. गेली 15 वर्षे आपण विकास मंडळांचा अनुभव घेत आहोत. घटनेच्या कलम

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

371(2) अन्वये 1994 साली राज्यपालांनी या विकास मंडळांची अधिसूचना काढली होती. दुर्दैवाने 1995 साली या राज्यामध्ये राजकीय परिवर्तन झाले. नवीन विचारांचे सरकार सत्तेवर आले. नव्याने सत्तेवर आलेले सरकार या राज्यामध्ये नवीन विकासाचे दालने उघडण्याचे काम करु इच्छित होते.

नंतर पी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

अशा प्रकारे सन 1995 मध्ये नवीन सरकार या राज्यात आले. विरोधी बाकावर बसणारे सत्तेत आले त्या काळात मात्र वैधानिक विकास मंडळ किंवा अनुशेषाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नाही हे मुद्दाम मला नमूद करावयाचे आहे. सन 1994 मध्ये राष्ट्रपतींनी काढलेल्या नोटिफिकेशननंतर या राज्यात वैधानिक विकास मंडळांची संकल्पना रुजली. त्या काळात या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य देखील सदस्य म्हणून होते. तेव्हा मात्र विदर्भ, मराठवाडा या भागातील भौतिक तथा आर्थिक अनुशेषाच्या बाबतीत कुठलीही चर्चा झाली नाही. पण सन 2001 मध्ये मात्र फिजिकली या अनुशेषासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला हे देखील सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी ध्यानात घ्यावे. या वर्षी इतका निधी दिला होता की, इतिहासात पहिल्यांदा एवढा निधी दिला असेल. जवळपास 56 हजार कोटी एवढी रक्कम विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकणातील सिंचन प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन दिले होते. कोकणात किती रक्कम दिली याची माहिती माझ्याकडे नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील पाणी मराठवाड्यात जाईल कसे अशीही काहींची विवंचना त्यावेळेस होती, आमच्या कोकणाचे दु:ख मात्र वेगळेच आहे. कारण राज्यात एकूण जेवढा पाऊस पडतो त्याच्या 40 टक्के पाऊस एकट्या कोकणातच पडतो. इतर भागात पावसाची वाट पाहतात परंतु कोकणात मात्र एकदा पाऊस सुरु होतो तो बंद होण्याचे नावच घेत नाही. असे असूनही कोकणातील सिंचनाची आकडेवारी अत्यंत कमी आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी कालच कोकणातील सिंचनाची आकडेवारी फक्त 2 टक्के एवढीच असल्याचा उल्लेख केला होता परंतु शासनाने त्यात दुरुस्ती केली आणि हे प्रमाण 6 टक्के एवढे असल्याचे सांगितले. आजही कोकणातील वसिष्ठी नदीचे 67 टीएमसी पाणी, कोयनेचे बॅकवॉटर संपूर्णपणे समुद्रात वाहून जाते ही आमची विवंचना आहे. तिकडे मात्र अकोला, वाशिम या भागातील मानव विकास निर्देशांक कमी असल्याची विवंचना आहे. आम्ही मात्र 67 टीएमसी पाणी अडवू शकत नाही म्हणून ते सर्वच्या सर्व पाणी समुद्रात वाहून जाते, अशा प्रकारची व्यथा निर्माण झाली आहे. त्यातील 27 टीएमसी पाणी जर आपण अडवू शकलो तर कोकणातील 80 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकेल, म्हणून कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ निर्माण करण्याची गरज आहे. या सभागृहात कोकणातील सिंचनाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

बाबतीत मोठ्या गर्जना केल्या आणि 356 कोटीचा निधी दिला म्हणून सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितले की, 396 कोटी तर इतरांची देणी द्यावयाची आहे, अशा परिस्थितीत 356 कोटी कसे पुरे होणार, त्याचा काहीच फायदा होणार नाही....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

माननीय अजितपवार साहेब जबाबदार मंत्री आहेत त्यामुळे ते यांसदर्भात माहिती देतील. आज आम्ही तिल्लारी प्रकल्पाचे पाणी पैसे नसल्यामुळे अडवू शकत नाही. पैसे नसल्यामुळे कालवे सुध्दा करु शकत नाही. सिंधुदुर्ग जिल्हयातील टाळंबा प्रकल्प व्हावा म्हणून आम्ही गेल्या 25 वर्षापासून मागणी करीत आहोत परंतु पैसे नसल्यामुळे हा प्रकल्प होऊ शकत नाही.

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय शरदचंद्र पवार साहेबांनी 13 मार्च 1989 रोजी या सभागृहात या विषयाच्या संदर्भात ठराव आणला होता. कोकणाला सुध्दा वैधानिक विकास मंडळ देण्यात यावे अशी आम्ही त्यावेळी मागणी केली होती. विदर्भाचा, मराठवाडयाचा, उत्तर महाराष्ट्राचा विकास झाला तर आम्हाला आनंद होईल परंतु आमच्या कोकणाच्या विकासाच्या संदर्भात काय ? आम्हा कोकणवासींयासाठी तुम्ही काय देणार आहात ? कोकणात सुध्दा मोठया प्रमाणात अनुशेष आहे. त्यामुळे मी मागणी करतो की, आमच्या कोकणाच्या सिंचनाचा जो अनुशेष आहे त्याचे पैसे आम्हाला मिळालेच पाहिजे. ठाणे जिल्हयातील मोखाडा, जव्हार या आदिवासी भागात आज पिण्याचे पाणी मिळत नाही. या ठिकाणी धरणे नाही अशी परिस्थिती नाही तर या ठिकाणी धरणे आहेत पण त्या धरणाच्या पाण्याचा उपयोग या आदिवासी भागातील लोकांना शेतीसाठी, पिण्यासाठी करता येत नाही तर हे पाणी मुंबईला पिण्यासाठी दिले जाते. या लोकांच्या डोळयासमोर पाणी आहे परंतु हे लोक ते पाणी पिऊ शकत नाही किंवा शेतीसाठी वापरु शकत नाही अशी स्थिती आहे. या ठिकाणच्या तानसा, वैतरणा धरणाचे पाणी मुंबईला पिण्यासाठी येते. असे असतांनाही ठाणे जिल्हयाचा अनुशेष नाही असे म्हणणे चुकीचे आहे.1972 मध्ये काळ प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यामुळे बाणगाव, रोहा या ठिकाणचा भाग सुजलाम-सुफलाम झालेला आहे. या ठिकाणी 3-3 पिके घेतली जातात. काळ प्रकल्प सोडला तर कोकणातील सिंचनाची काय परिस्थिती आहे ? कोकणाचा आर्थिक आणि भौतिक अनुशेष भरुन निघालाच पाहिजे. विदर्भाचा भौतिक अनुशेष वाढलेला आहे. राज्य सरकारने जर पैसे उपलब्ध करुन दिले तरच आर्थिक आणि भौतिक अनुशेष नष्ट होऊ शकेल. आज विदर्भाचा भौतिक अनुशेष 40 हजार कोटी रुपयांचा आहे, मराठवाडयाचा भौतिक अनुशेष 20 हजार कोटी रुपयांचा आहे. आणि कोकणाचा भौतिक अनुशेष...

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी यांनी काळ प्रकल्पाच्या संदर्भात माहिती दिली ती वस्तुस्थिती आहे. काळ प्रकल्पामुळे 8.5 हजार हेक्टर जमीन सिंचन होणार होते. या ठिकाणी 3 पीके घेतली जात होती परंतु आता या ठिकाणी भाताचे एकच पीक घेतले जाते. काळ प्रकल्पाचे सिंचनाचे क्षेत्र आपल्याला हळू हळू कमी करावे लागले आहे. या प्रकल्पाचे पाणी रायगड जिल्हयातील मोठ मोठया औद्योगिक प्रकल्पास दिले जाते व राज्याला सिंचनाच्या प्रकल्पातून जे काही उत्पन्न मिळते त्याच्या सर्वाधिक उत्पन्न या प्रकल्पातून मिळते आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच्याशी मी सहमत आहे परंतु त्यासंदर्भातील थोडीशी अधिक माहिती मी सभागृहासमोर ठेवलेली आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी...

जव्हार, मोखाडा येथील आदिवासी पाड्यामध्ये जा. तेथे विदारक चित्र आहे. तेथे माणूस कशा प्रकारे राहतो हा प्रश्न उपस्थित होतो. त्या भागात अडवलेले पाणी दूर कोसावरून मुंबईला आणत आहोत आणि त्या लोकांना पाणी देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण आम्हाला सांगता की, ठाण्याचा अनुशेष भरला आहे, तेथे अनुशेष नाही. रायगडला अनुशेष नाही. मग आम्ही करायचे काय ? कोकणाचे दुर्दैव आहे की, आम्ही आम्हाला स्वतंत्र व्हायचे आहे, असा हट्ट धरत नाही. आम्ही आंदोलन धरण्याचा हट्ट धरीत नाही आणि महाराष्ट्रापासून अलग होऊ असे देखील म्हणत नाही. आम्ही आवाज करीत नाही असे जर चित्र या सभागृहामध्ये उमटत असेल तर त्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतली पाहिजे. आज मराठवाड्याचे देखील प्रश्न आहेत. आज पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागाचे देखील प्रश्न आहेत. पश्चिम महाराष्ट्रातातील काही भागामध्ये 2 सें.मी.देखील पाऊस पडत नाही. पश्चिम महाराष्ट्राने सब खाया असे चित्र सन्माननीय सदस्य जैनुद्दीन झव्हेरी निर्माण करतात. मी येथे पश्चिम महाराष्ट्राचे ब्रीद घेतलेले नाही. पश्चिम महाराष्ट्र हा सुद्धा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला असे नेहमी बोलले जाते म्हणून आपण तेथे जाऊन बघा. आज पश्चिम महाराष्ट्रातील 72 तालुक्यांमध्ये प्यायला पाणी नाही. गुरांना पाणी नाही. तेथे माणसे शेती करू शकत नाही, असे विचारक चित्र 72 तालुक्यामध्ये आहे हे ही मान्य करायला पाहिजे. वैधानिक विकास महामंडळाला मान्यता मिळाली पाहिजे, मुदतवाढ मिळायला पाहिजे या भूमिकेचा मी आहे. 371 (2) अंतर्गत ही सगळी वैधानिक विकास महामंडळे सुरू असली पाहिजेत. तसेच आंदोलन केले तर महाराष्ट्र राज्य स्वतंत्रपणे मदत करते अशी भूमिका राहता कामा नये. त्यामुळे प्रवृत्ती वाढेल. मदत केली नाही तर आम्ही बाहेर पडू अशी धमकी दिली जाते. हा देखील नाजूक प्रश्न आहे. म्हणून माझी प्रा.बी.टी.देशमुख यांच्या माध्यातून एक विनंती आहे. जर पर्यायी व्यवस्था झाली तर राज्यातील निरनिराळ्या भागामध्ये निधी उपलबध व्हायला पाहिजे. कोकणासाठी निधी दिला पाहिजे. कोकणामध्ये फक्त सिंचनाचा अनुशेष नाही. अन्य जो अनुशेष आहे त्याबाबत देखील राज्य शासनाने लक्ष दिले पाहिजे. आज आनंदाची

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी .....

गोष्ट आहे. राज्यामध्ये आम्हाला सगळे मिळाले. कोकणाचे तीन मुख्यमंत्री झाले. बॅ.ए.आर.अंतुले, श्री.मनोहर जोशी आणि श्री.नारायण राणे. आम्हाला अर्थमंत्री मिळाला नव्हता. आमच्या पक्षाच्या नेत्यांनी कोकणातील श्री.सुनील तटकरे यांच्याकडे वित्त मंत्री पदाची जबाबदारी दिली आहे. श्री.माणिकराव ठाकरे म्हणाले की, आता प्रवृत्ती वाढत आहे. हे खरे आहे. मी त्यांच्या भावनेशी सहमत आहे. पहिल्यांदा आपण संपूर्ण राज्यासाठी राजकारण करीत होतो. आता मात्र आपण विभागासाठी राजकारण करीत आहोत. काळी वेळा तर आपण मतदारसंघाच्या पुढे जाऊ शकत नाही. जिल्ह्याच्या पुढे जाऊ शकत नाही. हे दुर्दैवी चित्र आज आपण महाराष्ट्रामध्ये पहात आहोत. ही रस्सखेच सुरू असताना राज्य एक राहिले पाहिजे अशी भूमिका या सार्वभौम सभागृहाची असली पाहिजे. सर्व सन्माननीय सदस्यांची असली पाहिजे, हे ही मला येथे नमूद करणे आवश्यक आहे. मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. 371 (2) नुसार आपण वैधानिक विकास महामंडळाला मुदत वाढ दिली तर आम्हाला बरे वाटेल. जर आपण मुदत वाढ दिली नाही तर पर्यायी व्यवस्था करताना कोकणाला जास्तीत जास्त प्राधान्य दिले पाहिजे आणि कोकणाचे जे प्रश्न आहेत त्याची उत्तरे शोधण्यासाठी जास्तीत जास्त निधी द्यावा एवढी विनंती मी या प्रस्तावाच्या निमित्ताने करतो आणि माझे विचार संपवितो.

.....

यानंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे, प्रा. बी.टी. देशमुख, श्री पांडुरंग फुंडकर तथा अन्य माननीय सदस्यों ने म.वि.प. नियम 260 के अंतर्गत जो प्रस्ताव यहां पर चर्चा के लिए रखा है उसका मैं स्वागत और समर्थन करता हूं. मैं कहना चाहूंगा कि विदर्भ की जो परिस्थिति है वह सभी को मालूम है. माननीय सदस्य श्री गुरुनाथ कुलकर्णी साहब ने एक बहुत ही महत्वपूर्ण बात यहां पर कही कि डरा कर मांग करने की कोई प्रवृत्ति नहीं होनी चाहिए. मैं कहूंगा कि माननीय कुलकर्णी साहब बहुत बुजुर्ग और सीनियर सदस्य हैं. जब महाराष्ट्र में आंदोलन हुआ और गुजरात से मुंबई ली गयी उस समय भी कहीं न कहीं पर तकलीफ थी. उस समय भी सरकार को गोली चलानी पड़ी. और उस समय जो सरकार थी वह भारतीय सरकार थी. उस समय कोई अंग्रेजों की सरकार नहीं थी. यह बात हम सभी को ध्यान में रखनी चाहिए. जब हमारे लोग देश की आजादी के लिए लड़े उस समय जो सरकार थी उनको भी ऐसा लगता था कि आंदोलन करने वाले लोग क्रिमिनल लोग हैं. लेकिन यह बात हमें नहीं भूलनी चाहिए कि वही आंदोलन कर्ता आजादी मिलने के बाद फ्रीडम फाइटर बने. जिन लोगों को आज हम शहीद बोलते हैं उस समय की सरकार की नजरों में वे आंदोलन कर्ता कौन थे, यह बात मेरे द्वारा बोलना ठीक नहीं है. आज हम विदर्भ की बात बोल रहे हैं मैं तो कहता हूं कि भगवान हमारी सरकार को सद्बुद्धि दे कि यह सरकार विदर्भ विकास महामंडल को मंजूरी न दे. लेकिन कांग्रेस के एक कार्यकर्ता की हैसियत से मैं कहूंगा कि सरकार उसको मंजूरी दे दे. अगर सरकार इस विकास महामंडल को मंजूरी नहीं देती है तो हमारे आंदोलन को एक बहुत बड़ा सपोर्ट मिलेगा. हम यहां पर किसी से भीख नहीं मांग रहे हैं. मैं कहना चाहूंगा कि पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा और कोंकण के खिलाफ न तो मैं कुछ बोलता हूं और न ही कुछ करता हूं. मैं तो सिर्फ जय विदर्भ बोलता हूं तो उसका कारण यह है कि उससे मेरी दिल से मुहब्बत है. मैं जिस जगह पर रहता हूं, जिस गांव में रहता हूं और जिस प्रांत में रहता हूं, उसकी जय बोलना कोई गुनाह नहीं है. हम स्कूल में जाते हैं तो हम शिक्षक दिवस मनाते हैं या महापुरुष का दिन मनाते हैं उनकी जय बोलते हैं तो क्या यह कोई गुनाह है. मैं यहां पर किसी आतंकवादी की या किसी विदेशी व्यक्ति

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी.....

की जय नहीं बोल रहा हूं. मैं तो अपने प्रांत की जय बोल रहा हूं और मैं आपको बताना चाहता हूं कि हमारे विदर्भ के लोग आत्महत्या कर रहे हैं. हम आत्म हत्या क्यों कर रहे हैं, हमको समझ नहीं थी. हमें आज भी लिखना पढ़ना नहीं आता है. हम पिछड़े हुए हैं. आपको मालूम होना चाहिए कि एक पुलिस चौकी, एक नायब तहसीलदार का आफिस या एक छोटा सा आफिस यदि किसी गांव में है उसे आप बंद करके बताओ, खून खराबा हो जाएगा. लेकिन हमारी राजधानी नागपुर में बड़े बड़े बंगले, मंत्रियों के बंगले हैं वहां पर डेप्युटी कलेक्टर का बंगला 5 एकड़ जगह में है. उन सब सरकारी आफिस को ताला मारा गया. वह किस के भरोसे किया गया. हमारे जो कांग्रेस के बड़े बड़े नेता थे वे आज ऊपर से देख रहे होंगे कि हमारे किए हुए वादे आज हमारे बच्चे पूरे कर रहे हैं कि नहीं कर रहे. उन नेताओं के बोलने की वजह से, हमारे नेताओं के बोलने की वजह से हमारी राजधानी जो नागपुर में थी वह द्विभाषिक राजधानी बनी. उसके बाद अखंड महाराष्ट्र का नारा चला. और उस नारे में हमारे विदर्भ के कई जिले इस अखंड महाराष्ट्र में आये.

आज हम अपने महाराष्ट्र की स्वर्ण जयंती मना रहे हैं क्योंकि हमारे महाराष्ट्र को बने 50 वर्ष हो गए हैं. लेकिन हमने कई परिवारों में देखा है कि हिस्से हुए हैं. जब कभी भी यह बात देखी गयी कि कोई बड़ा या छोटा बच्चा अनपढ़ है और उसके ऊपर कोई अन्याय होता है तो उस परिवार के लोग भी अलग अलग हो जाते हैं. यदि घर अलग अलग हो गए तो इसका मतलब यह नहीं है कि भाईयों में मुहब्बत नहीं है. ऐसा नहीं होता है. माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख साहब ने भी यहां पर बताया.

(इसके बाद श्री तालेवार के पास भाषण जारी..)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी.....

ये आँकड़े मेरे नहीं है. ये सरकार द्वारा दिए गए आँकडे हैं. नागपुर करार मेरा नहीं है, सम्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे जी का नहीं है. उस समय के वरिष्ठ नेताओं जिनमें श्री यशवंतराव चव्हाण भी थे, यह नागपुर करार उनकी उपस्थिति में हुआ है. आप विदर्भ पर एहसान नहीं कर रहे है. आप कितनी चतुराई से टाईमपास कर रहे है, यह हम जानते हैं. ठराव 1984 में पास हुआ था. लेकिन उसका आदेश 1994 में निकाला गया और 2001 में विकास मंडल बना. यानी विकास मंडल बनाने में 20 साल लग गए. क्या दिमाग है ! पिछड़ेपन को दूर करने के लिए एक मिनट में ठराव पास हो जाता है और एक मिनट में सस्पेंड भी हो जाता है. उसके पहले पैसा दे दिया जाता है. आमदार निधि एक करोड़ रुपये से बढ़ाकर डेढ़ करोड़ कर दिया है. सम्माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख ने यहां अभी अपनी भावना व्यक्त की है. वे अपने दिल की व्यथा बता रहे थे. वे पृथक विदर्भ राज्य की मांग नहीं कर रहे हैं. वे विदर्भ का विकास चाहते हैं. हम भी विदर्भ का विकास चाहते हैं. हम भी चाहते हैं कि महाराष्ट्र अखंड रहे. लेकिन अगर अनुशेष दूर नहीं हुआ तो एक दिन महाराष्ट्र नाम के लिए अखंड रहेगा. जय विदर्भ होगा. मैं जानता हूं कि शिवसेना अलग विदर्भ के फेवर में नहीं है. वे भी चाहते हैं कि बॅकलॉग दूर होना चाहिए. विदर्भ, कोंकण, पश्चिम महाराष्ट्र का बॅकलॉग दूर करने के लिए सरकार कोई नीति बनाए और आवश्यक धनराशि दें. सरकार पर लाखों-करोड़ों रुपये का कर्ज है. यह सब को मालूम है. सरकार की नीति ऐसी होनी चाहिए कि जो धनराशि दी जा रही है, वह धनराशि इंसाफ से बांटी जानी चाहिए. हम लोग दिल से चाहते हैं कि वैधानिक विकास मंडल की मुद्दत बढ़े. क्योंकि सरकार ने विदर्भ को जरुरत के मुताबिक कुछ नहीं दिया है. परिणामस्वरुप विदर्भ में किसान आत्महत्या कर रहे हैं. अब तक 40 हजार किसान आत्महत्या कर चुके हैं. कई सदस्य कहते हैं कि कोंकण में किसान आत्महत्या नहीं कर रहे हैं. विदर्भ के किसान ही आत्महत्या क्यों कर रहे हैं? मैं यह बताना चाहता हूं कि विदर्भ के किसान आत्महत्या करने के लिए मजबूर है. विदर्भ में फसल नहीं होती, नौकरी नहीं मिलती. इसलिए किसान आत्महत्या कर रहे हैं. चंद्रपुर में इतने सारे उद्योग है लेकिन वहां के युवकों को नौकरी नहीं मिलती. वहां पोलूशन भी इतना है कि लोग कांच नहीं खोलते हैं. कई कोयला खदाने हैं लेकिन वहां भी नौकरी नहीं मिलती. कई बार हम शिकायत कर चुके हैं. ऑटोमोटीव्ह प्लाण्ट है. पहले 250 टन उत्पादन होता है आज वह बढ़कर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी.....

800 टन हो गया है. लेकिन हमारे क्षेत्र के कितने लोगों को नौकरी मिली ? श्री माणिकराव ठाकरे मेरे गुरु है. वे भी यहां विदर्भ की वेदना बता रहे थे. उन पर विदर्भ की जिम्मेदारी है. वे गृह विभाग के राज्य मंत्री थे. उन्हें अपने क्षेत्र में जाकर जनता को जवाब देना है. मेरा शासन से अनुरोध है कि, सरकार को इस बात पर विचार करना चाहिए कि किसान आत्महत्या क्यों कर रहे है. बॅकलॉग क्यों बढ़ रहा है, विचार करने के बाद उस पर उपाय किए जाने चाहिए. सरकार को यह बात ध्यान में रखनी चाहिए कि आज विदर्भ में क्या परिस्थिति है. सम्माननीय सदस्य कोंकण की बात कर हे हैं. सबसे ज्यादा पानी विदर्भ की भूमि में है. कोंकण में पानी बह जाता है. हमारे क्षेत्र में पानी जमीन के भीतर समा जाता है. आप के क्षेत्र में 250 से 1000 फीट गहराई से पानी निकाला जा रहा है. बोरिंग किया जा रहा है. आपकी जमीन के भीतर का पानी नीचे चला गया. हमारा बाहर का पानी ले जा रहे हो.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री दत्त

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी...

मैं कहूंगा कि यह मजाक की बात नहीं है. जहां तक खनिज की बात है मैं कहूंगा कि विदर्भ के सभी 11 जिलों में जमीन के नीचे खनिज भरे पड़े हैं. चाहे लाइम स्टोन हो, आयरन ओर हो या दूसरा कोई खनिज पदार्थ हो, अनेक खनिज पदार्थ वहां पर जमीन के नीचे भरे पड़े हैं. विदर्भ एक तरह से सोने की जमीन है. बड़े-बड़े उद्योगपति अब वहां पर आ रहे हैं. लेकिन आज दूसरों के फायदे के लिए हमको यूज किया जा रहा है. क्योंकि सभी कारपोरेट ऑफिस आज मुंबई में हैं. जिसकी वजह से पूरा टैक्स मुंबई को मिलता है. यदि आप नागपुर को राजधानी बना दें तो पूरा टैक्स विदर्भ् को मिलने लगेगा.

मैं आपको एक उदाहरण देना चाहता हूं कि विदर्भ में सबसे ज्यादा टैक्स काशमीर की एक कंपनी भरती थी. एक बार मैं इंकम टैक्स आफिस में गया तो वहां के लोगों ने बताया कि सबसे ज्यादा टैक्स यह कंपनी भरती है. उस कंपनी का धंधा काशमीर, मुंबई, दिल्ली और दूसरी जगहों पर था, लेकिन उस का हैड ऑफिस बल्लारशाह में था और इस वजह से अपने इंकम टैक्स की रिटर्न वह बल्लारशाह से भरता था. और चूंकि ज्यादातर कारपोरेट ऑफिस मुंबई में हैं और दिल्ली में हैं इसी लिए वहां पर इंकट टैक्स भरने के ज्यादा आंकड़े हमको दिखायी देते हैं.

उपसभापति : आपकी आवाज नीचे तक आ रही थी. इसीलिए मैं दौड़कर आपका भाषण सुनने के लिए यहां आया हूं.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सर, मैं तो चाहता हूं कि आप भी सुनें, मुख्यमंत्री जी भी सुनें और दिल्ली के दूसरे बड़े नेता भी हमारी आवाज सुनें और जल्दी से जय विदर्भ कर दें. हमको कोई मंडल इत्यादि चीजें नहीं चाहिएं. आपकी यह मेहरबानी सिर्फ 2-4 साल के लिए ही है. क्योंकि इतने समय ही हम आपके साथ और रहेंगे.

उपसभापति : मैं तो अब जा रहा हूं. आज मेरा निरोप समारंभ है.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : हम तो कहते हैं कि भगवान करे, आप वापस आओ ताकि हमें यहां पर बोलने का टाइम मिलता रहे. मैं कहूंगा कि यहां पर माननीय मंत्री अजितदादा पवार साहब बैठे हुए हैं. उनकी भी इच्छा है कि विदर्भ वैधानिक विकास महामंडल, कोंकण वैधानिक विकास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जेनुद्दीन जव्हेरी...

महामंडल तथा उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडल को मुदत वाढ़ मिले. मैं कहूंगा कि यहां पर कांग्रेस पार्टी और राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी की मिली जुली सरकार है इसलिए सरकार ऐसी कोई नीति न अपनाए जिसकी वजह से विरोधियों को यह हथियार मिल जाए कि इस सरकार ने जनता को क्या दिया ? इसलिए इस सरकार से और खास तौर से माननीय मंत्री अजितदादा पवार साहब से मेरी विनती है कि आज के दिन वह बड़े दिल से यह डिक्लेयर करें कि जिस जिस भाग का पूरा विकास नहीं हुआ है उस उस भाग के लिए यहां पर वैधानिक विकास महामंडल बनाया जाएगा. इतना ही मुझे कहना है. जय हिंद और जय विदर्भ.

-0-

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : माननीय सभापति महोदय, महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस पार्टी के अध्यक्ष तथा विधान परिषद के सदस्य माननीय श्री ठाकरे जी ने यहां पर विदर्भ तथा दूसरे वैधानिक विकास महामंडलों की अवधि बढ़ाने के लिए यह प्रस्ताव यहां पर रखा है. इसके लिए मैं उनका अभिनन्दन करता हूं. मेरे से पहले के वक्ता श्री बी.टी.देशमुख साहब, श्री रावते साहब और श्री गुरुनाथ कुलकर्णी साहब ने तथा माननीय सदस्या श्रीमती जैन ने भी यहां पर अपने विचार रखे. मैं यहां पर कहना चाहूंगा कि विदर्भ के लोगों की यह भावना है कि विदर्भ को अलग होना चाहिए. बहुत सारे लोग इस बात से सहमत हैं.लेकिन हम एक बड़ी अन्तर्राष्ट्रीय लेवल की कांग्रेस पार्टी के सदस्य हैं. हमारी व्यक्तिगत सोच कुछ भी हो लेकिन हम हमेशा इन्स्टीटयुशनल सोच के हिसाब से ही काम करते है. हमारी इन्स्टीटयुशनल थिंकिंग है, एक ऑरगेनाइजेशनल डिसीप्लीन है. इसलिए जिस लाइन पर हमारी पार्टी काम करती है उसी के मुताबिक हम काम करते हैं. इसलिए हम अपने तौर पर प्रयास कर रहे हैं कि विदर्भ के विकास के बारे में, मराठवाडा के विकास के बारे में और उर्वरित महाराष्ट्र के विकास के बारे में सरकार का क्या विचार है इस बारे में यहां पर खुलासा होना चाहिए. और उस बारे में यहां पर स्पष्ट नीति की घोषणा हो. अभी विदर्भ वैधानिक विकास महामंडल का कार्यकाल पूरा हो रहा है उसको बढ़ाने की बात यहां पर की जा रही है. यह विषय पिछले कई महीनों से चर्चा में है. यह चर्चा नागपुर अधिवेशन में भी हुई थी और यहां पर भी यह चर्चा हो रही है..

(इसके बाद श्री तालेवार के पास भाषण जारी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा....

मैं शक के दायरे में इसलिए बात कर रहा हूं, क्योंकि इसमें विलंब हुआ है. ऐसा लगता है कि इसके पीछे थोड़ी राजनीति हो रही है. मैं यह मानता हूं कि हर राज्य भारत देश का अंग है और हम उसके सम्माननीय नागरिक है. आज क्षेत्रवाद की बात हो रही है लेकिन हमारी पार्टी की सोच है कि भारत एक है. जब विकास की दृष्टि से बात होती है, तो हम कहते हैं कि हमारा क्षेत्र पिछड़ गया है, विकास नहीं हो रहा है, कोई क्षेत्र आगे बढ़ता है तो कोई क्षेत्र पीछे रह जाता है. जब इस प्रकार की परिस्थिति पैदा होती है तब ही क्षेत्रवाद की बात होती है, अलग होने की बात होती है. हम ऐसा सुन रहे हैं कि इस मुद्दे पर कुछ आमदार बैठक कर रहे हैं, बनना चाहिए या नहीं बनना चाहिए. अगर उसके पीछे एकेडेमिक कारण है तो हम विचार कर सकते हैं. हम समझते हैं कि वैधानिक विकास मंडल को एक्सटेंशन मिलना चाहिए. कोंकण के सम्माननीय सदस्यों ने कोंकण के पिछड़ेपन के बारे में यहां बताया है. सम्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन ने खानदेश के पिछड़ेपन और बॅकलॉग के बारे में यहां बताया है. पश्चिम महाराष्ट्र के 60-62 तालुकों में पानी नहीं है. तो जहां जहां विकास नहीं हुआ है, उसके बारे में यहां जिक्र किया जा रहा है. विशेष रुप से सिंचाई और पीने के पानी के बारे में यहां अभी चर्चा की जा रही है. जहां तक बॅकलॉग की बात है, अगर विदर्भ की तुलना करें तो विदर्भ का बॅकलॉग बहुत बढ़ गया है. आज हम सिर्फ सिंचाई के बॅकलॉग की बात कर रहे हैं. सिंचाई का बॅकलॉग कितना है, आर्थिक अनुशेष है या भौतिक अनुशेष है, आज इस पर चर्चा हो रही है. पर्यटन का क्षेत्र हो, सड़क का बॅकलॉग हो, पीने के पानी की समस्या हो, खनिज की बात हो, श्री जव्हेरी जी ने उद्योगों की बात की है, पोलूशन की बात उठायी है, नौकरी की बात उठायी है, कपड़ा उद्योग मिलें बंद हो गई हैं, तो ये सारे सवाल हैं. आज इन सारी चीज़ों को जाने दीजिए, अभी हम सिर्फ सिंचाई के बॅकलॉग की बात करें. दूसरे क्षेत्रों से तुलना करें तो मुझे लगता है कि विदर्भ, मराठवाड़ा, उर्वरित महाराष्ट्र और पश्चिम महाराष्ट्र के कुछ तालुकों का बॅकलॉग है. अगर इन सारे क्षेत्रों में बॅकलॉग है तो वह दूर क्यों नहीं हुआ ? उर्वरित महाराष्ट्र में सभी क्षेत्र कवर हो जाते हैं. सवाल यह है कि सभी क्षेत्रों का समान विकास क्यों नहीं हुआ, जब कि समान विकास होना चाहिए था, यह केन्द्रीय सरकार की नीति है. केन्द्रीय सरकार की नीति के अनुसार पिछले 50 सालों में विकास नहीं हुआ है इसलिए राजनीतिक दृष्टि से हम फेल हो गए हैं. अभी वित्त मंत्री श्री तटकरे जी यहां

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा....

बैठे हुए थे, वे यहाँ से चले गए हैं लेकिन माननीय मंत्री श्री अजित पवार जी यहाँ बैठे हैं. मैं उनसे दो-तीन बातें समझना चाहता हूं. मुझे लगता है कि यह प्रस्ताव सॉयक्लॉजिकल सैटिस्फैक्शन के लिए है. क्या वैधानिक विकास मंडल बनाने से समुचित विकास होगा ? मुझे नहीं लगता है. 2010-11 का वार्षिक बजट है. वार्षिक बजट पास हो गया. हेडवाईज अलोकेशन हो गया. माननीय मुख्यमंत्री जी ने विदर्भ के लिए 10 हजार करोड़ रुपये के पॅकेज की नागपुर में घोषणा की. जिस पर तीन साल में क्रियान्वयन होगा. इस पॅकेज के संबंध में आदेश भी जारी हो गया है. मुख्यमंत्री सचिवालय में एक मॉनेटरिंग कमेटी का गठन भी किया गया है. यह समिति देखेगी कि समयबध्द क्रियान्वयन हो रहा है या नहीं. तीन साल का समय है. यह कार्यक्रम सौ प्रतिशत अमल में आना चाहिए. यह कार्यक्रम तीन साल के भीतर पूरा किया जाए. क्योंकि क्रियान्वयन में देरी होने से प्रोजेक्ट की कीमत में वृध्दि होती है. जिसके कारण राज्य के बजट पर भार पड़ता है. कर्ज बढ़ता है. हमारी सरकार कर्ज लेकर ही विकास कार्य कर रही है. हमारी सरकार 14 हजार करोड़ रुपये ब्याज के रुप में दे रही है. ऐसी स्थिति में 10 हजार करोड़ रुपये का पॅकेज जाहिर हुआ है. मैं यह जानना चाहता हूं कि इस पॅकेज के अन्तर्गत कार्यक्रम शुरु हुए है या नहीं ? मैं दूसरी बात यह जानना चाहता हूं कि क्या वैधानिक विकास मंडल के लिए अलग से बजट में प्रावधान किया गया है. माननीय मंत्री जी इन चंद बातों का स्पष्टीकरण दें. वैधानिक विकास मंडल को एक्सटेंशन मिलें, यह हमारी पार्टी की सोच है. हम इसका समर्थन करते हैं.

यानंतर श्री दत्त ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नहीं

श्री. सय्यद जमा ....

लेकिन मैं पूछना चाहता हूं कि इसका हमें फायनेंशियल बेनिफिट क्या मिलेगा. बजट कहां से आएगा. माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख साहब यहां पर बहुत सीनियर सदस्य हैं और मैं उनका नाम काफी पहले से भी सुनता आ रहा हूं. मुझे लगता था कि वह विदर्भ के बारे में बहुत कट्टरवादी हैं. वह विदर्भ के विकास की बात पहले से ही करते रहे हैं इसलिए सबसे ज्यादा सजा उनको ही दी गयी है. सबसे ज्यादा सजा उनके अमरावती जिले को ही दी गयी है. वैधानिक विकास महामंडल बनने के बाद भी आज वहां पर सबसे ज्यादा बैकलॉग है. मेरा कहना है कि सभी विकास महामंडलों को एक्सटेंशन मिल भी गया तो उसके लिए पैसा कहा से आएगा? उसके लिए माननीय राज्यपाल महोदय अलग से फंड देंगे क्या. बैकलॉग दूर करने के सबंध में जो आदेश नियम 371 (1) के अंतर्गत दिया है उसके लिए बजट में तरतूद की गयी होगी, ऐसा मैं समझता हूं. वह बात हमारे माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख यहां पर क्लियर कर देंगे.लेकिन मुझे लगता है कि अलग से तो फंड नहीं आएगा. फिर भी मुझे लगता है कि विदर्भ वैधानिक विकास महामंडल, मराठवाडा वैधानिक विकास महामंडल और दूसरे जो महामंडल हैं उनका टाइम बढ़ाया जाना चाहिए. इसलिए हमारे माननीय नेता और माननीय सदस्य श्री ठाकरे साहब ने जो प्रस्ताव यहां पर लाया है उसका मैं समर्थन करता हूं. मैं कहूंगा कि फायनेंशियल बैकलॉक को दूर करने की बात सही है या गलत है वह बात हमारे दूसरे माननीय सदस्य देखेंगे लेकिन मेरा कहना है कि फिजिकल बैकलॉग दूर होना चाहिए और इस दिशा में सरकार को कदम उठाने चाहिए, उसके लिए बजट अलोकेशन भी किया जाना चाहिए. मैं कहूंगा कि आज बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम के नाम पर बहुत डिले होता है. जिसकी वजह से हमारे फंड्स लैप्स होते हैं. एक बात मैं कहूंगा कि हमारा जो तीन साल के लिए 10 हजार करोड़ रुपए का पॅकेज है उसे लागू करने के लिए एक एफिशिएंट मशीनरी होनी चाहिए. साथ ही वैधानिक विकास महामंडलों के टाईम एक्सटेंशन की मांग का समर्थन करते हुए मैं अपनी बात समाप्त करता हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र और जय विदर्भ.

-0-

(इसके बाद श्री बरबड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. वैधानिक विकास मंडळाची मुदत संपत आहे आणि त्या अनुषंगाने या ठिकाणी आणलेला हा प्रस्ताव अत्यंत मौलिक आणि महाराष्ट्राला दिशा देणारा आहे. वैधानिक विकास मंडळाच्या मुदतवाढीची मागणी अत्यंत मौलिक असून ती आपण तातडीने मान्य केली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये सिंचनाचा जो अनुशेष आपण काढलेला आहे तो जुना आहे. त्यासाठी नवीन निकष लावण्याची आवश्यकता आहे. आज सर्वत्र जो काही विकास होत आहे त्या अनुषंगाने या अनुशेषाचे समालोचन करुन त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्राचा अनुशेष जाहीर केला पाहिजे. आम्ही विदर्भ मागतो परंतु सिंचनाच्या बाबतीत विदर्भालाच द्यावे असे आम्ही म्हणत नाही तर सिंचनाचा प्रश्न हा संपूर्ण् महाराष्ट्राचा आहे. राज्यातील कोणताही भाग असेल अगदी छोटासा कोपरा जरी असला तरी तो सुटावयास नको. सगळीकडे शेतकरी राहतात आणि शेतकऱ्यांना सिंचनाच्या पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून हा जो राज्यव्यापी प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्याचे मी स्वागत करतो.

राज्याचा विकास झाला पाहिजे हे खरे आहे. राज्याच्या विकासाकरिता कोणतेही सरकार असले तरी त्यांनी जे अनुदान दिले असेल त्याचे आपण स्वागतच केले पाहिजे. पण सिंचनाचा अनुशेष लवकर कसा भरुन काढता येईल याचाही आपण विचार केला पाहिजे. प्रत्येक विभागाच्या अडचणी आहेत. आम्ही विदर्भ मागत आहोत. ती आमची मागणी आहे. या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांचा त्या मागणीला विरोध आहे. तो असलाही पाहिजे. कारण हे आमचे मत आहे आणि ते त्यांचे मत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

परंतु 1950 साली करार झाला आणि संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भ सामील झाला. त्यावेळी अटी व शर्थी घातल्या होत्या त्याचे पालन केले असते तर विदर्भात अनुशेष राहिला नसता. परंतु जे घडले ते घडले. त्याला इतिहास साक्षी आहे. परंतु इतिहासाची पुनरावृत्ती न करता विदर्भाचा जलद गतीने विकास कसा करता येईल याकरिता शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी अधिक निधी देऊ शकता. प्रत्येकजण आपल्याकडे असलेल्या अधिकाराचा वापर करीत आहे. यामुळे मला मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, निधीचे वाटप करीत असातना संपूर्ण महाराष्ट्राला समोर ठेवून, महाराष्ट्राचा नकाशा समोर ठेवून सर्व क्षेत्रांना न्याय कसा देता येईल या अनुषंगाने निर्णय घेतला पाहिजे. खऱ्या अर्थाने पश्चिम विदर्भामध्ये 5-6 जिल्हयांमध्ये आत्महत्या होत आहेत. त्याठिकाणी सिंचन क्षमता वाढण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्याठिकाणच्या शेतक-यांना जीवनदान द्यावयाचे असेल तर विदर्भ वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे. पश्चिम विदर्भामध्ये सिंचनाची सर्व व्यवस्था आहे. परंतु पूर्व विदर्भामध्ये काळीसराड, पुजारीटोला व सिरफर हे तीन बंधारे आहेत. त्या बंधा-यांमध्ये साधारणपणे 22 टक्के पाणी असते. त्यामुळे अजूनही 78 टक्के पाणी शेतक-यांना द्यावयाचे आहे. त्याठिकाणी वन खात्याच्या जमिनीमुळे प्रकल्पांची कामे अडकली आहेत. सातबहिणी या प्रकल्पाला वन क्षेत्रातून वगळण्यात आले आहे असे ऐकावयास मिळाले आहे. परंतु त्याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही झ ालेली नाही. त्याचप्रमाणे तिगाव प्रकल्प आमगाव तालुक्यामध्ये आहे. त्याचे पाणी मिळणार होते, परंतु त्या प्रकल्पातूनही पाणी आम्हाला मिळत नाही. या भागातील शेतकरी फार मोठया आशेने पाण्याच्या प्रतिक्षेत आहे. मनोरसागर या धरणातून पाणी मिळते, परंतु रोटेशन पध्दतीनुसार 5 वर्षातून एकदा पाणी मिळते. म्हणून अन्य योजना पूर्ण केल्यातर पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांची चिंता दूर होईल. मोरगाव अर्जुनी धरण मोठे आहे, त्यात पाणी आहे. त्याचा परिसर विस्तीर्ण आहे. मोरगाव अर्जुनी धरणाचे पाणी वडसा पर्यंत दिले जाते. त्याची व्याप्ती वाढवून ते गडचिरोलीपर्यंत दिले पाहिजे. त्याचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. त्याचे पाणी दुबार पिकाला देऊ शकत नाही. काळीसराड, पुजारीटोला व सिरफर या धरणातील पाणी वाटप

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/ D/ KTG/

श्री.केशवराव मानकर....

समितीचा मी सदस्य आहे. यावर्षी पिण्याची पाणी कमी पडले म्हणून या धरणांचे पाणी रब्बीच्या पिकाला देऊ शकलो नाही. कार्यकारी अभियंत्यांनी 500 हेक्टर किंवा 1000 हेक्टरला पाणी देऊ शकतो असे म्हटले होते. परंतु आम्ही त्यांना सिंचनासाठी पाणी न देण्याची विनंती केली आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे आम्ही तो निर्णय घेतला आहे. सन्माननीय मंत्री श्री.अजित पवार यांना विनंती करतो की, एप्रिल महिन्याचा शेवटच्या आठवडा आहे. आतापासूनच तेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे पुजारीटोला धरणाचे पाणी सोडण्याची आवश्यकता आहे. त्याठिकाणी जेवढया नळ पाणी पुरवठा योजना आहेत त्या रखडलेल्या आहेत. त्यामुळे जनावरांच्या चा-याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचनाच्या अनुशेषाच्या प्रस्तावाच्या निमित्ताने मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, गोंदिया जिल्हाधिका-यांना पिण्याच्या पाण्याच्या योजना नीटपणे चालू राहण्यासाठी आदेश द्यावेत. कारण यावर्षी लवकर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत भरपूर आहेत. परंतु त्याठिकाणी वन क्षेत्र जास्त आहे. संपूर्ण राज्याचा विचार करता वनाच्या बाबतीत विदर्भ राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. परंतु या वनामुळे सिंचन प्रकल्प थांबलेले आहेत. मराठवाडा, खानदेश, कोकणामध्ये फार जंगल दिसत आहेत. परंतु सर्वत्र भरपूर जंगल दिसत नाही. म्हणून संपूर्ण राज्याचा विकास करावयाचा असेल तर वन क्षेत्र वाढविण्याची आवश्यकता आहे. पण वन क्षेत्रामुळे प्रकल्प अडले आहेत. त्यांना त्यातून बाहेर काढले पाहिजे. केंद्र शासनाची परवानगी घेऊन हे प्रकल्प सुरु करता येतील. गडचिरोली जिल्हयातील नेते श्री.अशोक नेते यांनी 7 पाटबंधारे मंजूर करुन घेतले होते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य भाषणासाठी किती वेळ घेणार आहेत ? दुपारी 12.30 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी माझे भाषण थोडक्यात संपवितो. गडचिरोली जिल्हयामध्ये 7 बंधा-यांना मंजुरी मिळालेली आहे. हे 7 बंधारे बांधले गेले तर हजारो एकर जमीन सिंचनाखाली येऊ शकेल. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होते. विदर्भामध्ये पाण्याचा जलसाठा देखील मोठ्या प्रमाणावर जमा होऊ शकतो आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्याला पुरेल एवढी विद्युत निर्मिती विदर्भामध्ये होऊ शकते. आपण वीज प्रकल्प करतो त्यावेळी त्याचे अनेक चांगले वाईट परिणाम होत असतात. आपल्याला एका बाजूला शितल छाया हवी असते आणि दुस-या बाजूला तीव्र उन्हाळयाचे चटकेही सहन करावे लागत असतात. विदर्भाचा विकास हा भौगोलिक दृष्टीकोनातूनच केला पाहिजे. विकासासाठी आपल्याला जल पाहिजे, विद्युत पाहिजे, औद्योगिकीकरण झाले पाहिजे. या सर्व गोष्टी पाहिजेत. म्हणून यादृष्टीने अनुशेष भरुन काढण्यासाठी आपण शर्थीचे प्रयत्न केले पाहिजेत. केवळ प्रादेशिक वादविवाद करुन चालणार नाही. माननीय मुख्य मंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये तीन वर्षासाठी 10 हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. खरे म्हणजे विदर्भाच्या तोंडाला हे पॅकेज देऊन पाने पुसलेली आहेत. राज्य सरकारने विदर्भातील 5 जिल्ह्यांसाठी दिलेले पॅकेज अपुरे पडले. या पॅकेज पेक्षा अजून काही चांगले करता येईल का ते पहावे. 10 हजाराचे पॅकेज तीन वर्षासाठी दिले. खरे म्हणजे तीन वर्षाऐवजी एका वर्षासाठी 10 हजाराचे पॅकेज विदर्भाला दिले तर विदर्भवादी आम्हाला वेगळा विदर्भ द्या असे कधीही म्हणणार नाही. तहानलेल्या माणसाला पिण्यासाठी पाणी मिळाले तरच त्याही तहान भागू शकेल. म्हणून विदर्भाचा अनुशेष म्हणजे विदर्भाची तहान आहे. ही तहान भागविली तरच विदर्भातील लोकांचे समाधान होईल. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी याठिकाणी आकडेवारीसहीत अनुशेषासंबंधीची माहिती दिली. विदर्भ, मराठवाडा, खानदेश या भागांचा अनुशेष दूर करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करण्याची गरज असून ते काम हे राज्य शासन करील असा विश्वास व्यक्त करुन, सभापती महोदय, मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : प्रस्तावावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे. उर्वरित चर्चा व माननीय मंत्री महोदयांचे उत्तर लक्षवेधी सूचनांवरील चर्चेच्या आधी घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(दुपारी 12.18 ते 12.30 सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभापतीस्थानी माननीय सभापती</u>

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

ठाणे जिल्हयातील जव्हार मोखाडा या तालुक्यातील आदिवासींना रोजगार हमी योजनेतून कामे उपलब्ध करुन देण्याबाबत

अल्पसूचना प्रश्न क्रमांक-६७५१ डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील जव्हार मोखाडा या तालुक्यातील आदिवासींना रोजगार हमी योजनेतून कामे उपलब्ध करुन देण्यास आदिवासी विभागाचे अधिकारी टाळाटाळ करीत असून रोजगार भत्ताही दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे आदिवासींवर उपासमारीची पाळी आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) हे खरे नाही.

२), ३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या अल्पसूचना प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी अगदी अल्प उत्तर दिले आहे. छोट्यात छोटे उत्तर कसे देता येईल याचा मंत्रीमहोदयांनी विचार केला आहे. ठाणे जिल्हयातील जव्हार व मोखाडा तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेवर आदिवासींना काम मिळत नाही. रोजगार हमी योजना कायदा, 2005 नुसार वर्षातून किमान 100 दिवस काम देण्याची हमी दिलेली आहे. अकुशल कामगार असेल तर त्याला 15 दिवसानंतर बेरोजगार भत्ता देणे आवश्यक आहे. 'रोजगार भत्ता दिला जात नाही हे खरे आहे काय?' या प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण किती कुटुंबांना काम दिले? किती लोकांना बेरोजगार भत्ता दिला? शेल्फवर किती कामे आहेत?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील जव्हार व मोखाडा या दोन तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भातील हा प्रश्न आहे. आज जव्हार तालुक्यामध्ये 1201 व मोखाडा तालुक्यामध्ये 714 मजूर कामावर आहेत. ज्यावेळी कामाची मागणी केली जाते, फॉर्म न.4 भरुन दिला जातो, त्यानंतर 15 दिवसात काम दिले गेले नाही तर बेरोजगार भत्ता दिला जातो. परंतु शासनाने फॉर्म नं.4 भरुन दिला नाही तरी कामाची मागणी केल्यास 15 दिवसात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्रमांक-6751..... श्री.बाळासाहेब थोरात.....

काम दिले नाही तर बेरोजगार भत्ता देण्याची तजवीज केली आहे. फॉर्म भरुन घेण्याची पूर्तता मागाहून केली जाते. काम सुरु करण्याची शासनाने तयारी ठेवलेली आहे. त्यामुळे बेरोजगार भत्ता देण्याची आवश्यकता भासली नाही. जव्हार तालुक्यामध्ये 686 व मोखाडा तालुक्यामध्ये 409 कामे शेल्फवर तयार आहेत. कोणी काम मागितले तर त्याला काम देण्याची तयारी असल्यामुळे बेरोजगार भत्ता देण्याची आवश्यकता भासणार नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ज्या पध्दतीने ग्रामपंचायतींकडे रोजगार हमीवर कामाच्या मागणीची नोंद करण्याची जबाबदारी सोपविली आहे त्याचा परिणाम म्हणून आज रोजगार हमी योजनेमध्ये पहिल्या क्रमांकावर असणारा महाराष्ट्र 12 व्या क्रमांकावर आला आहे. देशात या योजनेचे कौतुक होत असताना काम मागण्याच्या संदर्भात काही तांत्रिक त्रुटी आहेत, त्या त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने उपसमिती नेमली आहे. या संदर्भातील कार्यवाही केव्हा पूर्ण होईल? उद्या अधिवेशन संपणार आहे. एप्रिल आणि मे महिन्यात ठाणे जिल्हयातील मजूर स्थलांतरित होतील. मजुरांचे स्थलांतर होऊ द्यायचे नसेल तर तेथे कामे सुरु केली पाहिजेत. या त्रुटी केव्हा दूर होतील? बेरोजगार भत्ता देण्याची अंमलबजावणी होईल काय?

नंतर 2ए.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्र. 6751.....

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, बेरोजगार भत्त्याची आवश्यकता कधी भासते हे सांगायचे झाले तर ज्यावेळेस मजूर काम मागतात आणि त्याला काम देऊ शकलो नाही त्याच वेळेस असा भत्ता दिला जातो, परंतु येथे तशी आवश्यकता भासलेली नाही. सध्या ठाणे जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या कामांचा आढावा सुरु असून आयुक्त व जिल्हाधिकारी एका तालुक्यात गेलेले आहेत. त्या तालुक्यात दवंडी देऊन वगैरे कोणाला काम पाहिजे काय अशी विचारणा करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला त्यानुसार एकंदर राष्ट्रीय पातळीवरुन येणाऱ्या निधीचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या राज्यात व्हावा व जास्तीत जास्त कामे निघावीत त्या मानाने आपले राज्य खर्च करु शकले नाही. यामध्ये आपले राज्य जरी 12 व्या क्रमांकावर असले तरी गुजरात आणि कर्नाटक ही राज्य देखील आपल्या जवळपासच आहेत. शेवटी हेतू हा आहे की, राष्ट्रीय संपत्तीत जास्तीत जास्त भर पडावी आणि रोजगार निर्माण व्हावा म्हणून यासाठी मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमण्यात आली असून त्या समितीमध्ये चर्चा सुरु आहे. त्यानुसार या कामासाठी आपल्या राज्यात जास्तीत जास्त निधी कसा आणता येईल यादृष्टीने प्रयत्न सुरु असून येत्या 30 तारखेपर्यंत या समितीचा अहवाल समोर येईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, रोजगार हमी योजनेची कामे न निघाल्यामुळे अनेक मजुरांनी स्थलांतर केले व त्याचा परिणाम कुपोषणामध्ये वाढ होण्यात होतो. मंत्री महोदय सांगू शकतील काय की येणाऱ्या पावसाळयापूर्वी एकही आदिवासी रोजगार हमीचे काम मिळाले नाही म्हणून स्थलांतर करणार नाही, यासंबंधीचा स्पेशल ड्राईव्ह शासन घेणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : असा ड्राईव्ह सध्या सुरु असल्याचे मी अगोदरच सांगितले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी व आयुक्त सुध्दा एका तालुक्यात जाऊन बसलेले आहेत व तेथे जाहिरात देऊन कामाची गरज असल्यास तशी मागणी करावी असा प्रचार केला जात आहे. तसेच जे कोणी गाव सोडून जात असतील त्यांनी गावाबाहेर जाऊ नये याची काळजी आपण घेतच असतो व त्यानुसार गावात कोणाला कामाची आवश्यकता आहे त्यांनी फक्त इच्छा व्यक्त करावयाची असे शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच यासंबंधीचा फॉर्म तलाठी अथवा ग्रामसेवकांनी देण्यास टाळाटाळ केली तर ते सुध्दा कळविण्याची विनंती केली आहे. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई शासन करणार असा शासनाचा निर्णय आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्र. 6751.....

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, रोजगार हमी योजनेचे जे पूर्वीचे निकष होते त्यात केंद्रशासनाच्या निकषांप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे. आपल्या राज्यात रोजगार हमी योजनेचे पूर्वीचेच निकष लागू करण्याचा निर्णय शासन घेणार काय ? कारण केंद्रशासनाच्या नॉर्म्स प्रमाणे रोजगार हमी योजनेच्या कामावर योग्य मजुरी मिळत नसल्याने मजूर येण्यास तयार होत नाहीत. मंत्री महोदयांनी मागील वेळेस सभागृहात आश्वासन दिले होते की, यासंबंधी शासन विचार करीत आहे, त्यानुसार कार्यवाही शासन करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, राज्यशासन आणि केंद्रशासनाच्या रोजगार हमी योजनेमध्ये मुलभूत फरक एवढाच आहे की पूर्वी रोहयोवरील मजुरांना रोखीने पेमेंट दिले जात होते तर आता तेच पेमेंट बँक अथवा पोस्टाच्या माध्यमातून दिले जाते. यात दुर्गम भागात अडचणी येतात म्हणून राष्ट्रीयकृत बँकांना बरोबर घेत आहोत व त्यानुसार प्रत्येकाला आपापल्या गावातच पैसे मिळण्याची व्यवस्था होऊ शकेल म्हणून या नॉर्म्समध्ये दुरुस्ती करण्याची गरज नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदास मान्यता देऊन निधी वितरीत करणेबाबत

(1) * 2619 **श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे** : **दिनांक 10 एप्रिल, 2008 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक 4 मधील प्रश्न क्रमांक 50189 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या वाढीव पदांस मान्यता देऊन अनुदान मिळण्याकरिता शिक्षण संचालकांकडे प्रलंबीत असलेले प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त बाबतीत अनुदान मिळण्यासंदर्भात वित्त विभागाचे संमतीनुसार कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(3) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) होय.

(2) नाही.

(3) ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर असमाधानकारक आहे. 26 फेब्रुवारी, 2002 च्या जी.आर. मध्ये शिक्षकांच्या पदामध्ये वाढ झाल्यास अशा वाढीव पदांना शासन मान्यता घेणे आवश्यक आहे असे आदेश आहेत. त्यानुसार त्यांची कार्यवाही सुरु आहे. वाढीव पदामध्ये आता फार मोठी वाढ झालेली असतांना देखील अजूनपर्यंत मान्यता मिळालेली नाही. पदांची वाढ का झाली यासंदर्भात बरीच कारणे आहेत. संगणकीय प्रणालीचा वापर आता सुरु झालेला आहे. संगणकीय प्रणाली वापरण्यापूर्वी जे अर्धवेळ शिक्षक होते त्यांचा कार्यभार त्यावेळी मोजला जात नव्हता परंतु संगणकीय प्रणालीमुळे तो आता मोजला जातो. संगणकीय प्रणालीमुळे आता पदे वाढलेली आहेत. अभ्यासक्रमामध्ये संगणकशास्त्र, विज्ञान, पर्यावरण हे विषय एक्स्ट्रा आलेले आहेत त्यामुळे असंख्य पदे वाढलेली आहेत. पदे वाढलेली असतांना सुध्दा अद्यापपर्यंत मान्यता मिळालेली नाही. सन 2002 पासून ते आज पर्यंत एकाही पदाला मान्यता मिळालेली नाही, निधी मिळाला नाही. त्यामुळे माझे दोन प्रश्न असे आहेत की,महाराष्ट्रात जिल्हानिहाय माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांची किती पदांची वाढ झाली याची आम्हाला जिल्हानिहाय माहिती मिळेल काय? या सर्वांचा एकत्र प्रस्ताव करुन तो वित्त विभागाकडे केव्हा पाठविला जाणार आहे ? शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माध्यमिक शिक्षकांची वाढीव जी पदे आहेत त्यासंदर्भातील जिल्हा निहाय यादी माझ्याकडे आता उपलब्ध नाही परंतु ही यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. दि. 11.2.2010 रोजी 1650 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रस्ताव संचालकांकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर आमच्या विभागाने दि.12.3.2010 रोजी नियोजन विभागाला सादर केलेला आहे. नियोजन विभागाने यामध्ये काही क्वेरीज काढलेल्या आहेत. या क्वेरींची पूर्तता 7 दिवसामध्ये करण्यात येईल व हा पूर्तता केल्यानंतर हा प्रस्ताव नियोजन विभागाकडे पाठविण्यात येईल.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, सन 2002 पासून वाढीव पदांना मान्यता मिळालेली नाही. वर्ग तुकडया सुरु आहेत परंतु मान्यता नसल्यामुळे वेतनही मिळत नाही. संचालकांकडून तशा प्रकारची माहिती मिळालेली नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी वित्त विभागाकडून संमती घेऊन या प्रस्तावाला मान्यता मिळेल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, नियोजन व वित्त विभागाकडे हा प्रस्ताव जाणार आहे. वित्त विभागाच्या समितीची मंजुरी घेऊन हा प्रस्ताव उच्च स्तरीय समिती पुढे जाणार आहे. ही सर्व प्रोसेस दोन महिन्यात पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, चांगल्या चांगल्या व्यवस्था कशा उध्वस्त होतात याचे हे एक सुंदर उदाहरण आहे. शासनाने जी.आर. काढला आणि सन 2001 मध्ये जी पदे होती ती पदे पायाभूत मानली त्याबाबतचा शासन निर्णय 2002 मध्ये काढला. पायाभूत पदांमध्ये काही वाढ झाली तर आमची परवानगी घ्या असे जी.आर.मध्ये म्हटले आहे. पायाभूत पदे निर्माण केल्यानंतर शासन निर्णयामध्ये अशी तरतूद आहे की, विहित अभ्यासक्रम, विहित कार्यभार किंवा शैक्षणिक वाढीमुळे, तुकडयातील विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे अशा कोणत्याही कारणामुळे पायाभूत पद संख्येपेक्षा शिक्षकाची जादा पदे असली तर 31 ऑक्टोबर पर्यंत त्यासंदर्भातील प्रस्ताव पाठविण्यात यावा." त्याप्रमाणे प्रस्ताव पाठविण्या ात आला,परंतु 2005 चे 31 ऑक्टोबर गेले, 2006 चे 31 ऑक्टोबर गेले, 2006-07,2007-08,2008-09 ची जवळ जवळ 760 पदे पेंडींग

अशुद्धीत मत / शोधनीयही नाही

ता.प्र.क्र. : 2619....

प्रा. बी.टी.देशमुख ....

आहेत. दहा दहा वर्षे होऊन सुध्दा पदांना मान्यता मिळत नसल्यामुळे सगळी सिस्टीम उध्वस्त होईल. कनिष्ठ महाविद्यालयात गणित आणि संख्या शास्त्र या विषयांचे प्रात्यक्षिक तास तुम्ही वाढविलेले आहे. अभ्यास क्रमामध्ये तुम्ही बदल केलेले आहेत, प्रॅक्टिकल्स तुम्ही वाढविलेले आहेत.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. कनिष्ठ महाविद्यालयातील गणित व संख्या शास्त्राची 991 पदे मान्यतेची वाट आहेत. शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी प्रयत्न करू असे मंत्रिमहोदय म्हणतात. तर मग आम्ही काय करायचे ? "प्रयत्न करू" हे आम्ही म्हणायला पाहिजे आणि मंत्रिमहोदयांनी "आम्ही करतो" असे म्हणायला पाहिजे. त्यामुळे मंत्रिमहोदयांचे उत्तर बरोबर नाही. त्यामुळे उत्तराचा निषेध करून सभात्याग करायचा काय ? हे बरोबर नाही. म्हणूनच मी येथे स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी या पदांना शासन मान्यता देईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यात अडचण अशी असते की, क्वेरी निघाली की तिची पूर्तता करावी लागते. यासाठी दोन महिन्यांची मुदत मागितली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय 6-6 वर्षे क्वेरी निघत असेल तर क्वेरी काढणाऱ्याला शासनाने सरळ करावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, चूक झाली की क्वेरी निघते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी शासन या पदांना मान्यता देणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, दोन महिन्यामध्ये या पदांना मान्यता देऊ.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षक सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उठले की, माईक लगेच सुरू होत नाही. सभापती महोदय, उच्च माध्यमिक शिक्षकांची 1731 पदे आहेत. या पदांना सन 2005-2006 पासून मान्यता मिळालेली नाही. आता माध्यमिक शिक्षकांची 2000 पदे मान्यते अभावी प्रलंबित आहेत. जेव्हा शासनाला प्रश्न विचारण्यात येतो तेव्हा शासन उत्तर देते की, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तेव्हा शासन प्रत्येक बाबींचा विचार करत बसते की काय ? काम करते की नाही ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सन 2010-2011 चे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी उच्च माध्यमिक शिक्षकांची 1731 आणि माध्यमिक शिक्षकांची 2000 पदांना शिक्षण विभाग मान्यता कधी देणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारला होता त्यास दोन महिन्यामध्ये मान्यता देऊ असे उत्तर मी दिलेले आहे. आता सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्यासंबंधी त्वरित प्रस्ताव करण्याबाबतच्या सूचना शिक्षण संचालकांना देण्यात येतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, संगणकीय प्रणालीमुळे शिक्षक सरप्लस झाले आहेत. पदे वाढत आहेत. त्यामुळे आपण संगणक प्रणालीला सूचना द्यायच्या आहेत आणि त्यात सुधारणा करायच्या आहेत. ती दुरूस्त केली तर बऱ्याच शाळांचे प्रश्न सुटू शकतील. मुंबई किंवा अन्य महानगरांमध्ये जे शिक्षक सरप्लस झालेत त्यांचे समायोजन झाल्यानंतर तुकड्या शिल्लक राहतात. तुकडी पाठविणे हे चुकीचे आहे. ती डिलिंग केलेली आहे. या तुकड्यांचे समायोजन केले तर अर्ध्याहून अधिक सरप्लस शिक्षकांना न्याय मिळू शकेल. तेव्हा शासन तुकड्यांचे समायोजन शासन युद्धपातळीवर करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा मुद्दा तपासून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. शिक्षकांच्या संबंधातील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते विचारू शकत नाही.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सभापती महोदय, किती विद्यार्थ्यांमागे शिक्षक असावेत हा पायाभूत विषय आहे. माझ्या महितीप्रमाणे इंडियन एज्युकेशन सोसायटीमध्ये प्राथमिक शाळेमध्ये एक हजार विद्यार्थ्यांच्या मागे एक चित्रकलेचा शिक्षक आहे. हे गणित मला अजून समजले नाही. त्यामुळे किती विद्यार्थ्या मागे चित्रकलेचा शिक्षक असणे आवश्यक आहे ? एवढे विचारण्याकरिता प्रश्नोत्तराच्या तासापैकी 30 टक्के कालावधी गेला आहे, हा सरकारचा दोष आहे. विद्यार्थी परीक्षेत जास्त प्रमाणात नापास झाले तर तो शिक्षकांचा दोष असतो काय ? हे मला अजून कळलेले नाही. तेव्हा याबाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये आपण आणखी काही बदल करीत आहोत. विद्यार्थी जास्त प्रमाणात नापास होऊ नये म्हणून याची काळजी आपण घेत आहोत आणि तशा प्रकारचे सहकार्य करण्याची भूमिका शिक्षक घेत आहेत. त्यामुळे हा प्रश्न उपस्थित होत नाही.

.....

यानंतर गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महेंद्र शिक्षण संस्था, नागपूर या संस्थेच्या
विविध शाळांमधील तक्रारीबाबत

(२) * ६१६७ श्री.रामनाथ मोते, श्री.भगवान साळुंखे, श्री.संजय केळकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महेंद्र शिक्षण संस्था, नागपुर या शैक्षणिक संस्थेच्या विविध शाळांमधील कामकाजाबाबत शासनाकडे गेल्या १ वर्षात अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीचे थोडक्यात स्वरुप काय आहे.
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू संस्थेंतर्गत माध्यमिक शाळेत कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आहेत. शिक्षकांना वरिष्ठश्रेणी लागू न करणे, गणवेशाची सक्ती करणे, २५% वेतनश्रेणी मंजूर न करणे, रजा शिल्लक असतांना रजा मंजुर न करता वेतन कपात करणे, काही शिक्षक कर्मचाऱ्यांचे काम न करता वेतन अदा करणे, इ.तसेच माध्यमिक शाळेतून प्राथमिक शाळेत कनिष्ठ लिपिकांची नियमबाह्य बदली करणे.
(३) शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी चौकशी केली आहे.
(४) चौकशीच्या अनुषंगाने संस्था तथा शाळा स्तरावर शिक्षकांना देय असलेले लाभ देण्याबाबत, शाळा स्तरावर असलेल्या त्रुटयांची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, नागपूरच्या महेंद्र शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-या संदर्भात तसेच प्रशासनाच्या संदर्भात मोठया प्रमाणावर तक्रारी करण्यात आल्या होत्या. म्हणून या तक्रारीचे स्वरुप काय आहे, असा मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देत असतांना ज्या महत्वाच्या तक्रारी होत्या त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही व या संस्थेला जाणीवपूर्वक पाठीशी घालण्याचे काम शासनाकडून केले गेले आहे, असे आम्हाला दिसते. या संस्थेमध्ये बोगस विद्यार्थी संख्या दाखविण्यात आली होती, परंतु त्याचा उल्लेख लेखी उत्तरामध्ये केलेला नाही. काम न करता वेतन काढण्यात आले होते त्याचा देखील उल्लेख लेखी उत्तरामध्ये केलेला नाही. इतकेच नव्हे तर जातीवाचक शिवीगाळ करणे, शिक्षकांना अपमानित करणे, त्या बाबतीत ॲट्रॉसिटीखाली सुरु

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6167 .....

श्री.रामनाथ मोते ....

असलेल्या केसेस, शिक्षकांना सेवेतून काढून टाकणे इत्यादी तक्रारीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा या सर्व तक्रारीची दखल घेऊन त्या संस्थेवर तातडीने कारवाई करण्यात येणार आहे काय ? तत्कालिन शिक्षण राज्य मंत्र्यांनी दिनांक 14.6.2009 रोजी या संस्थेच्या संदर्भात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीत विविध तक्रारी बाबत चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी या संस्थेवर तातडीने प्रशासक नेमण्यात यावा असा आदेश दिला होता त्या आदेशाप्रमाणे या संस्थेवर तातडीने प्रशासक नेमण्यात येणार आहे आणि ही कार्यवाही किती दिवसात पूर्ण् करण्यात येणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, महेंद्र शिक्षण संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत. त्या संस्थेबाबत सातत्याने तक्रारी करण्यात आल्या होत्या शिक्षण उप निरीक्षक आणि राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या माध्यामातून या तक्रारीची चौकशी करण्यात आली होती. एकंदर 13 तक्रारी एकत्रित केल्या आहेत. या संस्थेच्या शाळांमध्ये बोगस विद्यार्थी दाखविली गेली असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडला होता . या तक्रारी पाहिल्यानंतर असे दिसून आले की, इयत्ता 5 ते 12 पर्यतच्या विद्यार्थ्यांची पट संख्या 868 असून प्रत्यक्षात 627 विद्यार्थ्यांची उपस्थिती आढळून आली असून ही टक्केवारी 94 टक्के आहे. त्यामध्ये बोगस विद्यार्थी असल्याचे आढळून आलेले नाही. या संस्थेची संपूर्ण तपासणी केल्यानंतर 12 लहान मोठया अनियमितता आढळून आल्या आहेत. परंतु या संस्थेवर प्रशासक नेमावा, अशी बाब आढळून आलेली नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, किरकोळ कारणांवरुन संस्थेवर प्रशासक नेमण्यात आला आहे, अशी अनेक उदाहरणे् आहेत. परंतु या सस्थेमध्ये गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असतांनाही प्रशासक नेमण्यात आलेला नाही. तेव्हा प्रशासक नेमण्याच्या बाबतीत शासनाचे कोणते धोरण आहे ? अनेक संस्थाच्या बाबतीत दोन - तीन वर्षा पासून सातत्याने तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. अनुदानित,विनाअनुदानित तसेच इंग्रजी वा मराठी माध्यमाच्या शाळांमधील तक्रारी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

बाबत लवकर कार्यवाही करण्यामध्ये विलंब होतो. यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आह ?. तक्रारीवर कार्यवाही करण्यामध्ये दोन दोन वर्षे विलंब होत असतो तेव्हा हा विलंब न होता लवकर कार्यवाही करता यावी आणि त्या संस्थेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना न्याय मिळेल, यासाठी शासन कोणंती ठोस उपाययोजना करणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, तक्रार आल्यानंतर ती एक किंवा दोन महिन्यात तपासण्यात यावी, अशा प्रकारचे जर बंधन घालावयाचे ठरविले तर तसे बंधन घालता येईल. तशा प्रकारचा एखादा कालावधी निश्चित करुन त्या कालावधीतच त्या तक्रारीची तपासणी करुन त्याचा अहवाल देण्यासंबंधीच्या सूचना देण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी लागू न करणे, गणवेशाची सक्ती करणे, 25 टक्के वेतनश्रेणी मंजूर न करणे,रजा शिल्लक असतांना रजा मंजूर न करता वेतन कपात करणे, काही शिक्षक कर्मचा-यांचे काम न करता वेतन अदा करणे, माध्यमिक शाळेतून प्राथमिक शाळेत कनिष्ठ लिपिकांची नियमबाहयबदली करणे इत्यादी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. या तक्रारीच्या बाबतीत चौकशी करण्यात आलेली आहे, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. या संस्थेवर प्रशासक आजच नेमण्यात आला पाहिजे, अशा प्रकारची स्थिती आहे व त्याबाबतीत उत्तरामध्येच माहिती देण्यात आलेली आहे. चौथ्या उत्तरात असे म्हटलेले आहे की,चौकशीच्या अनुषंगाने संस्था तथा शाळा स्तरावर शिक्षकांना देय असलेले लाभ देण्याबाबत, शाळा स्तरावर असलेल्या त्रुटयाची पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत,"

नतर श्री सरफरे

अशुद्धीत प्रत/ शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6167...

श्री. दिवाकर रावते...

याचा अर्थ अनुदान तिथपर्यंत पोहोचले की नाही हे सांगा. आणि ते जर शिक्षकांना दिले नसेलतर हा जास्त गंभीर गुन्हा आहे. शासनाचे पैसे स्वत: वापरावयाचे, शिक्षकांना त्यांच्या हक्काचे पैसे न देणे हा गंभीर गुन्हा आहे. हे चौकशीमध्ये सिध्द झाले आहे. म्हणून आपण त्याठिकाणी ताबडतोब प्रशासक नेमणार काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबत तक्रार करण्यात आल्यानंतर शिक्षकांच्या संदर्भात त्यांनी निर्णय घेतला. शिक्षकांची वर्तणूक चांगली नसेल, शिक्षक जर शिस्त पाळत नसतील तर त्याबाबत शिक्षा करण्याचे अधिकार त्या संस्थेला आहेत. त्यादृष्टीने संस्थेने कारवाई केल्याचे आढळते.

श्री. रामनाथ मोते : मागासवर्गीय म्हणून शिवीगाळ करणे हा त्यांना अधिकार आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, प्रत्येक तक्रारीसंबंधी स्पष्टीकरण देणे शक्य आहे. आपण म्हणत असाल तर ते स्पष्टीकरण याठिकाणी मी देऊ शकेन. त्यामध्ये असे दिसते की, गणवेशाची सक्ती करण्याबाबत एखादी संस्था किंवा शाळा सांगू शकते की, शाळेतील शिक्षकांनी गणवेशामध्ये आले पाहिजे, हे म्हणण्याचा त्यांना अधिकार आहे. काही शिक्षक जर न सांगता रजेवर जात असतीलतर त्यांना शिक्षा करण्याचा संस्थेला अधिकार आहे. त्या शाळेमध्ये शिस्त आणणे ही त्या संस्थेची जबाबदारी आहे. त्याबाबतीत शिक्षकांकडून सहकार्य मिळत नसेलतर त्यांना शिक्षा करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे याठिकाणी कुणाचीही बाजू घेण्याचे कारण नाही. ते शिक्षक माझ्या ओळखीचे नाहीत, संस्था माझ्या ओळखीची नाही.एकंदरीत या अहवालामधून असे दिसते की, त्या शाळेमध्ये शिस्त आणण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे त्यासाठी वेगळी कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे् त्या संस्थेला इतके अधिकार आहेत काय? एखादा शिक्षक गैरवर्तणूक करीत असेल तर त्याचा पगार रोखण्याचा त्या संस्थेला अधिकार आहे काय? तसेच, त्यांनी जातीवाचक शिवीगाळीचा उल्लेख केला हा गंभीर प्रकार आहे. अशापध्दतीने ही संस्था त्याठिक्राणी वागत असेल तर त्या संस्थेच्या केलेल्या चौकशीमध्ये काय आढळले आहे? तो चौकशी अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले हे सभागृहापुढे आले पाहिजे, ते आणणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

ता.प्र.क्र. 6167...

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अहवाल मोठा आहे माननीय सदस्यांची मागणी असेल तर तो पटलावर ठेवता येईल. त्यावर पुढील अधिवेशनामध्ये आपल्याला चर्चा करता येणे शक्य आहे. जातीवाचक शिवीगाळ केल्याबाबतची तक्रार आहे. त्याबाबत माहिती घेतली असता त्या प्रकरणी कोर्ट-कचेरी झाल्यानंतर आणि त्यामध्ये ते निर्दोष सुटल्यानंतर त्याबाबतीत सुध्दा ठपका रहात नाही. त्यामुळे तो अहवाल आपण पटलावर ठेवणार आहोत. शिक्षकांची वर्तणूक पहाता त्यांना द्यावयाची वरिष्ठ श्रेणी रोखण्याचा अधिकार त्या संस्थेला आहे. त्यापध्दतीने त्यांची वेतनश्रेणी रोखण्यात आली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूर्व विदर्भातील ७.३१ लाख हेक्टर क्षेत्रासाठी जाहीर केलेले अर्थसहाय्य

(३) * ५४६५ श्री.व्ही.यु. डायगव्हाणे, श्री.जयंत प्र.पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५०३०३ ला दिनांक १ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९-१० च्या खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या पूर्व विदर्भातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, जिल्हावार किती आर्थिक तरतूद केली, व केलेल्या तरतूदीचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या वर्षीच्या रब्बी हंगामातील पिकासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली वा येत आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१), (२) व (३) राज्यात खरिप हंगाम २००९ मध्ये सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने तसेच पावसातील खंडामुळे शासनाने २२१ तालुके टंचाईग्रस्त जाहिर केले आहेत. या तालुक्यातील प्राथमिक अहवालानुसार ५० टक्केपेक्षा जास्त पिक नुकसानीचे क्षेत्र ४४,२९,२०६.०० हेक्टर आहे. त्याकरिता राष्ट्रीय आपदा आकस्मिकता निधी (एन.सी.सी.एफ) च्या निकषानुसार अर्थसहाय्य मिळणेबाबत प्रस्ताव मेमोरन्डम् द्वारे केंद्र शासनास सादर केला होता. केंद्र शासनाने रु.१४८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

श्री.व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, पूर्व विदर्भातील सहा दुष्काळग्रस्त जिल्हयांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. खरीप आणि रब्बी हंगाम २००९ या दोन्ही हंगामाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. पहिला प्रश्न "पूर्व विदर्भातील दुष्काळग्रस्त जिहयातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे काय?" याला "नाही" असे उत्तर दिले, दुसरा प्रश्न "जिल्हावार किती आर्थिक तरतूद केली, व केलेल्या तरतूदीचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले आहे काय?" त्यालाही "नाही" असे उत्तर दिले, आणि तिसरा प्रश्न "यावर्षीच्या रब्बी हंगामातील पिकासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली वा येत आहे?" त्यालाही "नाही" असे उत्तर दिले. असे असतांना आपण याठिकाणी २२१ तालुके टंचाईग्रस्त घोषित कले आहेत..

सभापती : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, पूर्व विदर्भातील सहा जिल्हयांची माहिती आपल्याकडे आहे.त्याठिकाणी सोयाबीन अर्धा क्विंटल, एक क्विंटल...

सभापती : आपणास प्रश्न विचारावयाचा नाही काय?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी प्रश्न विचारु इच्छितो की, या सहा जिल्हयामध्ये खरीप हंगामातील ५० टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेले तालुके आणि गावे किती? त्यांना आपण किती निधी दिला? तो निधी शेतकऱ्यांपर्यंत वितरीत करण्यात आला काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5465 . . ..

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एकंदरीत 2009 मधील खरीप हंगामामध्ये पाऊस कमी झाल्यामुळे जी आपत्ती आली आणि त्यामुळे जे नुकसान झालेले आहे. त्याबाबत सांगावयाचे तर पूर्व विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील 15 तालुके आणि गडचिरोली जिल्ह्यातील 4 तालके ॲफेक्टेड झालेले आहेत. अशा वेळी दोन पध्दतीने मदत होत असते. एक म्हणजे जेथे 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असते, तेथे टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर करुन मदत केली जाते. याशिवाय उत्तरात सांगितल्याप्रमाणे आपण केंद्र सरकारकडे सुध्दा निधीची मागणी केलेली आहे आणि त्यातील काही निधी उपलब्ध झालेला आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, आतापर्यंत किती तालुक्यांमध्ये किती निधी देण्यात आला ? तसेच तो निधी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, चंद्रपूर जिल्ह्यातील मधील 15 तालुके आणि गडचिरोली जिल्ह्यातील 4 तालुके ॲफेक्टेड झालेले आहेत. ज्याठिकाणी टंचाईची परिस्थिती आहे, तेथे अशी परिस्थिती जाहीर केल्यानंतर राज्य शासन काही निर्णय घेत असते, त्यामध्ये शेतसारा माफ करणे, विजेच्या बिलामध्ये सूट देणे, इतर कामे सुरु करणे अशा प्रकारचा जो जी.आर.आहे, त्याप्रमाणे ते होत असते. त्या व्यतिरिक्त केंद्र शासन देखील आपल्याला मदत करते आणि त्यामध्ये कोरडवाहू पिकासाठी दोन हेक्टरपर्यंत 2 हजार रुपये प्रति हेक्टर, आश्वासित सिंचनमध्ये विहीर, बागायत यासाठी दोन हेक्टरपर्यंत 4 हजार रुपये प्रति हेक्टरपर्यंत आणि बहुवार्षिक पिकांमध्ये फळबागांसाठी 6 हजार रुपये दोन हेक्टरपर्यंत अशा प्रकारे मदत करण्यात येते. एकंदर आपल्याला जी मदत मंजूर झालेली आहे, ती राज्यासाठी 564 कोटी रुपये एवढी मंजूर झालेली आहे. त्यामध्ये 148 कोटी रुपयांचा पहिला हप्ता आलेला आहे. परंतु त्याचे वाटप करीत असताना वरील प्रमाणे वाटप करावे लागणार आहे. म्हणून केंद्र शासनाकडून पूर्ण निधी प्राप्त झाल्याशिवाय वाटप करणे अवघड आहे. म्हणून आम्ही पूर्ण निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा करीत आहोत. आपल्याला तो निधी प्राप्त झाल्यावर त्याचे वाटप करणे शक्य होणार आहे. कारण सध्या संपूर्ण महाराष्ट्रासाठी 148 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. त्याचे आता वाटप करावयाचे आणि मग उरलेला निधी आल्यानंतर पुन्हा त्याचे वाटप करणे हे अत्यंत मुष्किलीचे काम

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होणार असल्याने, आम्हाला 564 कोटी रुपयांचा पूर्ण निधी देण्यात यावा असा आपण आग्रह धरलेला आहे आणि तो निधी प्राप्त झाल्यानंतर त्याचे वाटप केले जाईल.

श्री सय्यद जमा : सभापति जी, माननीय मंत्री जी ने विस्तृत रुप से जवाब दिया है लेकिन मैं उनका ध्यान इस ओर दिलाना चाहता हूं कि उन्होंने 221 तालुके टंचाई ग्रस्त डिक्लेयर किए और उसके बारे में यहां पर बताया. यहां पर माननीय राणे साहब ने भी कहा कि वह केंद्र सरकार से करीब 7 हजार करोड़ रुपए का स्पेशल पॅकेज मांग रहे हैं. मेरा एक स्पेसिफिक प्रश्न है कि पूर्व विदर्भ के 6 जिलों में खरीप और रब्बी की फसलें खराब हुई हैं. यानी दोनों ही फसलें खराब हुई हैं और आनेवारी भी 50 प्रतिशत से कम हुई है. मुझे पूछना है कि क्या उसमें चंद्रपुर के 15 और गडचिरोली के चार तालुके हैं ? मुझे यह भी पूछना है कि जो तालुके 50 प्रतिशत आनेवारी से कम के हैं उसमें भंडारा, गोंदिया और नागपुर के तालुके भी हैं या नहीं ? कृपया माननीय मंत्री महोदय उस बारे में भी बताएं. इसके अलावा आपने केंद्र सरकार से अनुदान मिलने की बात कही. है. मुझे पूछना है कि इस बारे में केंद्र सरकार ने कुछ मदद की है या कुछ रकम दी है क्या ? मेरा अंतिम प्रश्न यह है कि जिन तालुकों में आनेवारी कम होने की वजह से किसानों को नुकसान हुआ है. वहां पर किसानों को कोई विशेष पॅकेज महाराष्ट्र शासन की ओर से दिया है क्या ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी वर्गवारीच्या बाबतीत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे राहून गेले आहे. मी सांगू इच्छितो की, यामध्ये देवळी, हिंगणघाट व आष्टी हे तीन तालुके आहेत. यामध्ये भंडारा व गोंदिया हे दोन्ही जिल्हे नाहीत. महाराष्ट्रातील 221 तालुके ॲफेक्टेड झालेले आहेत.

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील 408 ग्रामपंचायत सदस्यांकडे अद्यापही शौचालय नसल्याबाबत

(4) * 6182 श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.संजय दत्त : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील 408 ग्रामपंचायत सदस्यांकडे अद्यापही शौचालय नसल्यामुळे पंचायत समितीने त्यांना शौचालय बांधण्यासाठी वारंवार नोटीस देऊनही या ग्रामपंचायत सदस्यांनी शौचालय बांधलेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, 2010 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या ग्रामपंचायत सदस्यांवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे काय,

(3) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकरिता : (1) होय.

(2) शौचालय नसलेल्या ग्रामपंचायत सदस्यांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

अ) संबंधित सदस्यांचा बैठक भत्ता बंद करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

ब) सदस्यत्व रद्द करणेबाबत कारवाईची नोटीस दिलेली आहे.

क) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत त्यांना अपात्र ठरविण्यासाठी प्रस्ताव समुचित अधिकाऱ्यास सादर करण्याचा ठराव पारित झाला आहे.

ड) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 चे कलम 31 (1) प्रमाणे अपात्रतेची कारवाई करणेपुर्वी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणी घेण्यात आलेली आहे.

इ) या सदस्यांवर अपात्रतेची कारवाई करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापुर यांनी आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रणजित देशमुख : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये मला दुरुस्ती करावयाची आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरातील (ड) मध्ये "मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 चे कलम "31 (1)" याऐवजी ते "39 (1)" वाचावे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, हा प्रश्न महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. ज्या ग्रामपंचायती शौचालय बांधणार नाहीत त्या ग्रामपंचायती बरखास्त करुन त्याठिकाणी प्रशासक नियुक्त करण्याची कारवाई केली जाईल अशा प्रकारचे धोरण राज्य शासन जाहीर करणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सद्य:स्थितीत असा काही नियम नाही पण कॅबिनेट बैठकीमध्ये शासनाने एक निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयाचे कायद्यामध्ये रुपांतर होणार आहे. यापुढे कोणत्याही जिल्हापरिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपरिषद आणि महानगरपालिका सदस्य ज्यांच्याकडे स्वत:चे वैयक्तिक शौचालय राहणार नाही ते निवडणुकीला अपात्र ठराणार आहेत. निश्चितपणे या पुढच्या कालावधीत या संदर्भात कायदा बनविण्यात येणार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी असा प्रश्न विचारला होता की, ग्रामपचायत एरियामध्ये शौचालये बांधली गेली नाहीत तर ती संपूर्ण ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा शासन विचार करील काय.? या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून आलेले नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाचे धोरण असे आहे की, अगोदर वैयक्तिक शौचालये बांधली पाहिजेत. ज्यांच्याकडे जागा उपलब्ध आहे त्यांनी आपल्या निवासस्थानात वैयक्तिक शौचालय बांधले पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी त्यांच्या स्वत:च्या निवासस्थानामध्ये जागा उपलब्ध नाही अशा ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधण्यात येणार आहेत त्यामुळे ग्रामपंचायत बरखास्त करुन त्याठिकाणी प्रशासक नेमणे हे शक्य नाही.शासन जेव्हा एखादा कायदा बनविते त्यावेळी इन्डिव्हिज्यूअलि व्यक्तीला लक्षात घेऊन कायदा बनविण्यात येतो. गावावर आधारित कायदा बनविला आणि एखाद्या व्यक्तीने समजा शौचालय बांधले नाही तर त्याचे दुष्परिणाम संपूर्ण गावावर होतील हे योग्य होणार नाही. त्यामुळे वैयक्तिक शौचालयासाठी हा कायदा बनविण्यात येत आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे देव्हाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील पाझर तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(5) * 6545 श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे देव्हाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील पाझर तलावाचे बांधकाम 15 वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) उक्त प्रकरणी या तलावाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) हे खरे आहे.

(2) अतिवृष्टीमुळे सदर पाझर तलाव सन 1998 मध्ये फुटला होता. तद्नंतर फुटलेल्या भागाची दुरुस्ती करण्यात आली. तथापि 2000 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पुन्हा तलाव फुटला व प्रकल्पाच्या काही भागाची माती वाहून गेली. तसेच पोचमार्ग व पुच्छ कालव्याचे खोदकामही अपूर्ण आहे. त्यामुळे तलावाचे काम अपूर्ण आहे.

(3) तलावाच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक एक मध्ये असा प्रश्न विचारणत आला आहे की, मौजे देव्हडा (ता.मोहाडी.जि.भंडारा) येथील पाझर तलावाचे बांधकाम 15 वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे. उत्तरात असे म्हटलेले आहे की, 2000 मध्ये अतिवृष्टीमुळे हा तलाव फुटला आणि त्याचे नुकसान झाले.

माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सुधारित अंदाजपत्रक तयार झालेले आहे ते किती रुपयाचे आहे आणि यासाठी निधी केव्हा दिला जाणार आहे. याला तांत्रिक मान्यता देऊन 30 जूनपूर्वी या तलावाचे बांधकाम पूर्ण केले जाईल काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, भंडारा जिल्हयात रोजगारहमी याजनेंतर्गत झालेला हा तलाव 1996 पूर्ण झाला आणि प्रथम 1998 साली फुटला. त्यानतर तो दुरुस्त करण्यात आला आणि पुन्हा तो 2000 साली फुटलेला आहे. या तलावाच्या कामाची तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्रशासकीय मान्यतेसाठी वित्त विभाग व नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. एकंदर 98,79038 एवढया खर्चाची तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे आणि अखेरच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6545....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मूळ प्रश्नाचे उत्तरच आले नाही. याठिक्राणी प्रश्न असा विचारण्यात आला होता की, "मौजे देव्हाडा (ता.मोहाडी,जि.भंडारा) येथील पाझर तलावाचे बांधकाम 15 वर्षापासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय? त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी खरे आहे असे उत्तर दिलेले आहे.सभापती महोदय, तो तलाव पूर्ण झाला नव्हता तो तलाव अर्धवट स्थितीत होता. त्या तलावाचे काम पूर्ण न होता 1998 मध्ये जास्त पाऊस झाल्यामुळे जो भराव टाकण्यात आला होता तो भराव वाहून गेला. तो तलाव पूर्ण करण्याची आवश्यकता होती मात्र याठिकाणी उत्तर असे देण्यात आलेले आहे की, अतिवृष्टीमुळे तो तलाव फुटला आणि तलावाच्या काही भागाची माती वाहून गेली. सभापती महोदय, हा तलाव अपूर्णावस्थेत होता तो पूर्णच झाला नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6545..... श्री. पांडुरंग फुंडकर....

पाझर तलाव अर्धवट होता आणि जास्त पाऊस पडल्यामुळे तो वाहून गेला. या तलावाच्या कामाचे एस्टिमेट तयार करुन, त्याला मंजुरी देऊन तलावाचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण करणार ? पंधरा वर्षे झाली तरी तलावाचे काम अपूर्ण आहे. आणखी 10 वर्षे लागणार असतील तर ते योग्य होणार नाही. सकाळी या सभागृहात वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भातील प्रस्तावावर चर्चा करताना सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सिंचनाच्या संदर्भात सर्व परिस्थिती सांगितलेली आहे. त्यामुळे हे काम पूर्ण् करण्याच्या बाबतीत काही तरी कालावधी निश्चित केला पाहिजे. किती दिवसामध्ये तो तलाव बांधून पूर्ण केला जाईल ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जो कालखंड गेला त्या कालखंडामध्ये मध्ये ज्या काही चुका झालेल्या आहेत त्याची पूर्ण चौकशी करण्यात आलेली आहे. त्याचा निलंबन निधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर प्रशासकीय मान्यता घेण्याकरिता वित्तीय व्यय समितीकडे प्रस्ताव पाठविला होता. त्या समितीने त्यामध्ये काही त्रुटी काढून प्रस्ताव परत पाठविला. त्यांनी असे सांगितले की, एमआरईजीएसमधून काम पूर्ण करुन घ्यावे. विभागाने पुन्हा असे सांगितले आहे की, इ.जी.एस. मधून काम पूर्ण् होणे अशक्य आहे. त्यादृष्टीने पुन्हा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/ KTG/ D/

मुंबईतील टाटा, पोद्दार व इंडिया युनायटेड क्रमांक-५ या तीन गिरण्यांच्या आधुनिकीकरणाबाबत

(६) * ४८०४ श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील टाटा, पोद्दार व इंडिया युनायटेड क्रमांक-५ या तीन गिरण्यांच्या आधुनिकीकरणाचा उद्घाटन समारंभ दिनांक १९ जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात एनटीसीच्या २२ गिरण्यांमध्ये सुमारे २५ ते ३० हजार कामगार काम करीत होते इतक्या मोठ्या प्रमाणावरील रोजगार संपवून केवळ २५०० कामगारांना रोजगार मिळणार असुन त्यातही बहुतांशी कामगार हे कंत्राटी पद्धतीने काम करतात उर्वरित बेकार कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासन आवश्यक ती उपाययोजना करणार आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके, श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान यांच्याकरिता: (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबईतील राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या २२ गिरण्यांमध्ये स्वैच्छिक सेवानिवृत्ती योजना राबविण्यात आली होती. ज्या कामगार/कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने सदर योजनेंतर्गत सेवानिवृत्ती स्विकारली त्यांना या योजनेद्वारे मिळालेले सर्व फायदे व इतर कायदेशीर देणी अदा करण्यात आलेली आहेत. तसेच ज्या कामगारांनी सदर स्वेच्छासेवानिवृत्ती योजना स्विकारली नाही, त्यांना राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या सुरु असलेल्या अन्य गिरण्यांतून काम / रोजगार देण्यात आलेला आहे.

सदर गिरण्या पूर्ण क्षमतेने सुरु रहाव्यात तसेच गिरण्यातील कामगारांना कामाचा अतिरिक्त ताण पडू नये तसेच त्यांच्या गैरहजेरीत उत्पादनाची हानी होऊ नये आणि बाजारातील मागणी व पुरवठा व्यवस्थेशी योग्य ताळमेळ राखता यावा याकरीता नव्याने प्रशिक्षित, कुशल कामगार उपलब्ध होईपर्यंत अन्य प्रशिक्षित कंत्राटी कामगारांकडून उत्पादनाचा दर्जा टिकविण्याचा प्रयत्न एनटीसीकडून करण्यात येत आहे.

तसेच मुंबईतील बंद पडलेल्या कापड गिरण्यांच्या जागेत नव्याने विकसित होणाऱ्या उद्योगधंद्यामध्ये निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांमध्ये अर्हताकारक गिरणी कामगार किंवा त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला प्राधान्याने नोकरी देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, छापलेल्या उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही बदल करावयाचा आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, उत्तरामध्ये सुधारणा करावयाची नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/ KTG/ D/

ता. प्र. क्र. 4804 .....

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी काल याच प्रश्नाच्या संदर्भात विधानसभा सभागृहात गिरणी कामगारांसाठी 10 हजार घरे देण्याचा जो निर्णय जाहीर केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे सुरुवातीला अभिनंदन करतो. त्याचबरोबर काल या सभागृहामध्ये नगरविकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांनी आतापर्यंत गिरणी कामगारांच्या एकाही मुलाला नोकरी देण्यात आलेली नाही असे उत्तर दिलेले आहे आणि आजच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, आम्ही त्यांना प्राधान्याने नोकऱ्या दिलेल्या आहेत. नेमके काय खरे आहे ? या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, कुशल कामगार उपलब्ध होईपर्यंत अन्य प्रशिक्षित कंत्राटी कामगारांना कामावर ठेवलेले आहे. ज्या लोकांना नोकऱ्या दिलेल्या आहेत त्यापेकी निम्म्यापेक्षा जास्त नोकऱ्या प्रशिक्षित कंत्राटी कामगारांना दिलेल्या आहेत. गिरणी कामगारांची मुले प्रशिक्षित नाहीत म्हणून त्यांना नोकऱ्या देत नाहीत. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, महामंडळाच्या अन्य गिरण्यांमधून त्यांना रोजगार देण्यात आलेला आहे. आतापर्यंत किती कामगारांना कामावर घेतले आहे आणि राहिलेल्या कामगारांना कधी नोकऱ्या देणार ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा प्रश्न एन.टी.सी.च्या गिरण्यांच्या संदर्भात आहे. एनटीसीच्या गिरण्यांमध्ये एकूण 17 हजार 428 कामगार होते. त्यापैकी स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कामगारांची संख्या 15 हजार 436 आहे. उर्वरित 1992 कामगारांना तीन मिलमध्ये सामावून घेतले आहे. टाटा मिलमध्ये एकंदर 889 कामगारांना सामावून घेतले आहे. पोद्दार मिलमध्ये 645 कामगारांना सामावून घेतलेले आहे. इंदू मिलमध्ये 458 कामगारांना सामावून घेतलेले आहे. अशा प्रकारे एकूण 1992 कामगारांना या तीन गिरण्यांमध्ये सामावून घेतलेले आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, एन.टी.सी.कडील किती मिल विकल्या आणि किती चालू आहेत ? उच्च न्यायालयाने एनटीसीला फटकारले असून किती जमीन विकली आणि किती कामगारांची देणी दिली याबाबत तीन आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. ही जबाबदारी फक्त एनटीसीची नसून राज्य वस्त्रोद्योग महामंडळ त्यासाठी काय करणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4804.... श्री.किरण पावसकर....

राज्य शासनाला जर हायकोर्ट विचारत असेल तर राज्याच्या वस्त्रोद्योग मंडळाची जबाबदारी नाही का ? दिनांक 1 जानेवारी, 1982 पूर्वी जेवढे कायम स्वरुपी किंवा कंत्राटी कामगार असतील त्यांची संख्या पटलावर किती होती आणि कंत्राटी कामगारांच्या बाबतीत एनटीसीची भूमिका काय आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, एनटीसीमध्ये जेवढे कामगार होते त्यापैकी काहींनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. जे उर्वरित कामगार होते त्यांना या 3 मिलमध्ये सामावून घेतले आहे. त्यामुळे एनटीसीच्या संदर्भातील कामगारांचा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहात चुकीचे रेकॉर्ड होत आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माहिती चुकीची आहे असे म्हणून चालणार नाही तर बरोबर काय आहे ते सांगावे. मी आकडेवारीसह माहिती दिली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, 192 व 130 कामगारांची संख्या सांगितली आहे. एवढया कामगारांच्या आधारावर या 3 मिल चालत होत्या काय ? दिनांक 1.1.1982 पूर्वी या मिलच्या पटलावर किती कामगार होते ?

श्री.प्रकाश सोळंके : त्याठिकाणी जे कामगार होते त्यापैकी किती कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली, त्यांना किती लाभ दिला हे सांगितले आहे. राहिलेले 192 कामगार होते त्यांना या 3 मिलमध्ये सामावून घेतले आहे. त्यामुळे तो प्रश्न निर्माण होत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी गिरणी कामगारांच्या मुलांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी शासन 10 वर्षामध्ये एकाही कामगारांना नोकरी देऊ शकले नाही असे सांगितले होते. त्यांच्या डोळयात केवळ पाणी येण्याचे शिल्लक राहिले होते, इतके ते भावूक झाले होते. मग त्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे की, आपले उत्तर बरोबर आहे ? सभागृहात चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून मी हा प्रश्न विचारला आहे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी एनटीसीच्या गिरण्यांच्या संदर्भातील माहिती देत आहे. यामध्ये बाकीच्या खाजगी गिरण्यांचा समावेश नाही. सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेले उत्तर चुकीचे आहे असे मी म्हणणार नाही. त्यांनी इतर खाजगी मिलमधील कामगारांसंबंधी उत्तर दिले होते, मी एनटीसीच्या मिलसंबंधी उत्तर देत आहे.

श्री.दिवाकर रावते : शासनाने 3 गिरण्या चालू ठेवल्या आहेत. त्यामध्ये 130 व 175 कामगारांना सामावून घेतले आहेत. या 3 गिरण्या आज पूर्ण क्षमतेने चालत असतील तर तेथे किती कामगार काम करीत आहेत ? या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर गिरण्या पूर्ण क्षमतेने सुरु रहाव्यात," म्हणजे त्यांची क्षमता किती आहे, "तसेच गिरण्यातील कामगारांना कामाचा अतिरिक्त ताण पडू नये" असे नमूद केले आहे. त्यांच्यावर ताण पडतो हे शासनाला कोणी सांगितले, त्यांना ओव्हर टाईम दिला जातो काय, ते कामगार पाळयांमध्ये काम करतात का ? पुढे असे नमूद केले आहे की, "तसेच त्यांच्या गैरहजेरीत उत्पादनाची हानी होऊ नये आणि बाजारातील मागणी व पुरवठा व्यवस्थेशी योग्य ताळमेळ राखता यावा" म्हणून मी प्रश्न विचारला होता की, या 3 गिरण्यांमध्ये एकूण किती कामगार आहेत ? या कामगारांना सामावून घेतल्यामुळे एकूण किती कामगार झाले ? या गिरण्यांमधून किती कापडाची निर्मिती होते, बाजारातील मागणी व पुरवठा याचे प्रमाण किती आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : मी मघाशी असे सांगितले आहे की, या 3 मिलमध्ये 1992 कामगारांना सामावून घेतलेले आहे. या व्यतिरिक्त 1060 कामगार कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत. ते स्वेच्छा निवृत्तीधारक कर्मचारी आहेत. त्यांना कामावर ठेवण्याचे कारण असे की, ते अनुभवी कामगार आहेत. त्यांना कंत्राटी पध्दतीने काम दिलेले आहे. या कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्यानुसार 1060 लोकांना कंत्राटी पध्दतीने काम देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या लोकांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास भाग पाडले आणि आता त्याच कामगारांना कंत्राटी पध्दतीने कामावर घेतले आहे. त्यांना कायम स्वरुपी कामगार म्हणून का घेतले नाही ? त्यांनी स्वखुषीने स्वेच्छानिवृत्ती घेतलेली नाही. प्रथम मिल बंद केल्या जातात, त्यांना स्वेच्छानिवृत्ती घेण्यास भाग पाडले जाते आणि त्यांनाच पुन्हा कंत्राटी पध्दतीने कामावर घेतले जाते हे योग्य नाही. या कामगारांना कायम स्वरुपी कामगार म्हणून घेणार काय ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : ज्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली.... स्वेच्छानिवृत्ती म्हणजे स्वत:हून घेतलेली निवृती...

सभापती : ज्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली त्यांना कंत्राटी कामगार म्हणून घेतलेले आहे. याबाबतीत सखोल चौकशी करावी. जर अशी परिस्थिती असेल तर मग त्यांना स्वेच्छानिवृत्ती देण्याचे कारण नव्हते. म्हणून यानुषंगाने चौकशी करावी.

श्री. प्रकाश सोळंके : होय.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने अभी जवाब दिया कि एनटीसी की तीन मिलों में वीआरएस दिया गया. बचे हुए 1992 लोगों को उन्होंने ले लिया. उसके बाद 1007 आदमी उन्होंने कांट्रेक्ट पर रखे हैं जिसमें वीआरएस लिए हुए लोग हैं. जिसके बारे में सभापति जी आपने आदेश भी दिया कि इसकी जांच की जाये. सभापति जी, मैं आपके माध्यम से मंत्री महोदय से कहना चाहता हूं कि हमारे राज्य में एक श्रम मंत्रालय भी है. यह टैक्सटाइल का मैटर है इसलिए आपने डील किया, यह अच्छी बात है.लेकिन हमारा श्रम मंत्रालय क्या कर रहा है? वीआरएस का मतलब है कि उनकी फैक्ट्री बंद हो रही है या उनके पास काम नहीं है या काम कम हो रहा है. 15 हजार लोगों को उन्होंने वीआरएस दिया. और दूसरी तरफ वे ठेकेदारी पर मजदूर रख रहे हैं. एनटीसी केन्द्र सरकार का उद्योग है. अगर हमारी केन्द्र सरकार की एनटीसी मिल श्रमिकों का शोषण कर रही है तो हमारे श्रम मंत्रालय को इस बारे में कड़क कदम उठाना चाहिए और एनटीसी के प्रबंधक के ऊपर प्रॉसिक्यूशन करना चाहिए. क्योंकि वे एक तरफ तो वीआरएस दे रहे हैं और दूसरी तरफ कांट्रेक्ट लेबर ले रहे हैं. मुझे पूछना है कि उन पर प्रॉस्क्यूशन करने के लिए टैक्सटाइल मिनिस्ट्री श्रम मंत्रालय को कहेगी क्या ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : 15 वर्षापूर्वी बी.आय.एफ.आर. या नियंत्रण मंडळाला एन.टी.सी.च्या 10 गिरण्या चालवू असे आश्वासन देऊनही केन्द्र सरकारने त्याबाबतीत कोणतेही पाऊन उचललेले नाही, हे खरे आहे काय ? या बाबतीत राज्य शासन पुन्हा केन्द्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : या प्रश्नाची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ही माहिती मी पटलावर ठेवीन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अहवाल पटलावर येईल यादृष्टीने काळजी घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांना उत्तर देताना गहिवरुन आले होते. त्यांच्या डोळयातून अश्रू येण्याचेच बाकी होते. कामगारांच्या प्रश्नाबाबत राज्यमंत्री महोदय इतके संवेदनाशील असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन केले. या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "मुंबईतील बंद पडलेल्या कापड गिरण्यांच्या जागेत नव्याने विकसित होणा-या उद्योगधंद्यामध्ये निर्माण होणा-या नोक-यांमध्ये अर्हताकारक गिरणी कामगार किंवा त्यांच्या कुटुंबातील एका सदस्यांना प्राधान्याने नोकरी देण्यात येते." अशा प्रकारे उत्तर दिलेले असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यानी "उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय" असा प्रश्न विचारला होता. तेव्हा हे दिलेले उत्तर सन्माननीय मंत्री महोदयांनी मागे घ्यावे, अन्यथा आम्हाला हक्कभंग दाखल करण्याची आपण परवानगी द्यावी.

श्री. प्रकाश सोळंके : ही जी माहिती घेतलेली आहे ती एन.टी.सी.च्या गिरण्यांच्या संदर्भातील आहे.

सभापती : अनावधानाने उत्तरामध्ये काही चूक असेल तर ती पहावी.

श्री. भाई जगताप : हा एन.टी.सी.च्या गिरण्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे. या प्रश्नाला दिलेले उत्तर काही अंशी बरोबर आहे. माझा थेट प्रश्न असा आहे की, गिरण्यांच्या जागा विकून त्यामधून आलेले पैसे वापरुन काही गिरण्या चालू करण्यात आल्या. त्या गिरण्यांमध्ये या कामगांराना कंत्राटी कामगार म्हणून भरती केलेले आहे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4804.... श्री.भाई जगताप....

दोन प्रश्न आहेत. त्यामध्ये गिरणी कामगारांची मुले किती आहेत?.....

श्री.दिवाकर रावते : मंत्रीमहोदयांनी यापूर्वीच उत्तर दिले आहे. त्या कामगारांनी व्हीआरएस स्वीकारली, त्यांनाच पुन्हा कंत्राटी कामगार म्हणून कामावर घेतल्याचे सांगितले आहे.

श्री.भाई जगताप : मी आपला प्रश्न ऐकला आहे. व्हीआरएस योजनेमध्ये अट असते की, व्हीआरएस स्वीकारलेल्या कामगाराला तेच काम देता येत नाही. म्हणून त्यांना कंत्राटी पध्दतीवर घेतले आहे. हे कंटिन्यू प्रोसेसचे काम आहे. शासनाला कंत्राटी पध्दतीवर कामावर ठेवता येत नाही. कंत्राटी कामगारांना कोणत्या प्रकारचे काम दिले जाते हे देशाच्या आणि राज्याच्या कायद्यांमध्ये डिफाईन केलेले आहे. शासन या कंत्राटी कामगारांना कायम सेवेत घेणार आहे का?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्यांच्यासाठी काय करता येईल याचा निर्णय घेतला जाईल.

सभापती : कामगारांशी संबंधित प्रश्न आहे. या अनुषंगाने मी असे करतो की, माझ्या दालनात संबंधित सर्व आमदार आणि कामगार मंत्री, वस्त्रोद्योग मंत्री यांची एक बैठक आयोजित करतो. त्याशिवाय हा गुंता सुटणार नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पावणाई (ता.देवगड) येथील मळेशेतीत समुद्राच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्याने शेतीचे झालेले नुकसान

(७) * ५४०५ श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, ॲड.अनिल परब : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पावणाई (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मळेशेतीत समुद्राच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्याने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास पाणी शिरुन शेतीचे नुकसान झाले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीचे पंचनामे झाले आहेत काय,
(३) असल्यास, त्यांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या प्रश्नासाठी मला दोन मिनिटे अधिक वेळ द्यावा अशी मी विनंती करतो. पावणाई, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मळेशेतीत समुद्राच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्यामुळे ४ फेब्रुवारी, २०१० रोजी समुद्राचे पाणी शिरले आणि तेथील शेतीचे नुकसान झाले. सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कुळीथ, पावटा, उडीद आणि चवळीची लागवड केली होती. त्या शेतीचे नुकसान झाले. उत्तरामध्ये म्हटले आहे की, हे खरे नाही. पंचनामे झाले नाहीत. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, शुक्रवार, दिनांक ९ एप्रिल, २०१० रोजी माननीय महसूल मंत्री यांनी याच सभागृहात उत्तर दिले होते की, अशा पध्दतीचे समुद्राला उधाण येऊन नुकसान झाले, त्याचे पंचनामे रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये झाले आहेत. या प्रश्नाला उत्तर देताना नुकसानीचे पंचनामे करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे म्हटले आहे. देवगड तालुक्यामध्ये जे नुकसान झाले त्याचे पंचनामे झाले आहेत. कृषि सहाय्यक श्री.तांदळे यांनी पंचनामे केले आहेत. त्या ठिकाणी सरपंच श्री.नरेश लाड आणि पोलीस पाटील, जिल्हा परिषद सदस्य श्री.प्रमोद घाडी उपस्थित होते. माझ्याकडे पंचनामे झाल्याबाबतचे फोटोग्राफ उपलब्ध आहेत. मंत्रीमहोदयांनी याठिकाणी असत्य उत्तर दिले आहे. नुकसानीचे पंचनामे झाले नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे म्हटले आहे. महसूल मंत्र्यांनी तसे उत्तर सभागृहात दिले आहे. ही नुकसान भरपाई द्यावी लागेल म्हणून टाळाटाळ केली जात आहे का? पंचनामे झाले असतील तर किती दिवसात नुकसान भरपाई देणार आहात?

...३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.५४०५....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे मी दुरुस्ती करतो. ही दुरुस्ती करीत असताना मी सांगू इच्छितो की, ४ फेब्रुवारी २०१० रोजी नुकसान न होता ३१ जानेवारीला उधाण आले, समुद्राला भरती आली होती. त्यामुळे ३१ जानेवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान नुकसान झाले. म्हणून तशा प्रकारचे उत्तर दिले. त्या उत्तरामध्ये दुरुस्ती करतो. पावणाई येथे २.५ हेक्टर शेतीचे नुकसान झाले. याबाबत एका लक्षवेधी सूचनेवर सविस्तर चर्चा खालच्या सभागृहात झाली. महसूल, मदत कार्य व खार भूमी विकास मंत्र्यांनी त्याबाबत उत्तर दिले आहे. या संदर्भात आणखी वेगळी चर्चा करावी असे मला वाटत नाही.

नंतर २एल.१..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मीरा भाईंदर महानगरपालिकेत सर्व शिक्षा अभियान योजनेत झालेला गैरव्यवहार

(8) * 4509 श्री.किरण पावसकर, ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) केंद्र सरकार पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील मीरा भाईंदर महानगरपालिकेस सन 2007-2008 मध्ये 60 लाख तर सन 2008-2009 मध्ये 70 लाख अनुदान मिळाले होते हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मीरा भाईंदर महानगरपालिकेस मिळालेल्या या निधीत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत केलेल्या चौकशीत काय निष्पन्न झाले व दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) होय.
(2) नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. किरण पावसकर : शिक्षण विभागाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत मीरा-भाईंदर महानगरपालिकेला सन 2007-08 मध्ये 60 लाख रुपये आणि सन 2008-09 साठी 70 लाख रुपये एवढे अनुदान मिळाले होते. वास्तविक हे अनुदान गरीब व वंचित घटकातील मुलांना शैक्षणिक सुविधा, सकस आहार पुरविणे व शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी खर्च करावयाचे असते. परंतु या दोन वर्षात मीरा भाईंदर महापालिकेत मात्र अशा कामासाठी हा खर्च न करता खोटी व बोगस बिले सादर करुन लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली आहे अशी माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेली अधिकृत माहिती माझ्याकडे आहे. शिक्षकांचे एक दिवसाचे प्रशिक्षण सुध्दा याच निधीतून ठेवण्यात आले होते. शिबीरासाठी आलेल्या सरकारी पाहुण्यांची मोठ्या हॉटेलमध्ये बडदाश्त ठेवून त्यावर यातूनच खर्च करण्यात आला. शिक्षण विभागासाठी औरंगाबादच्या ठेकेदाराकडून लॅपटॉप भाड्याने घेण्यात आला होता. उत्तरात मात्र असे काहीही झाले नसल्याने कारवाईचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे सांगण्यात आले. माझ्याकडे माहितीच्या अधिकारातून मिळालेली माहिती असून यामध्ये दोषी असणाऱ्या लोकांविरुध्द शासन कारवाई करणार काय ? कारण या माहितीमध्ये अत्यंत डिटेल अशी माहिती असल्याने ती सभागृहात वाचून दाखवित नाही तर ती मंत्री महोदयांना देऊ शकतो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांसाठी आलेला पैसा इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4509.... श्री. किरण पावसकर .....

कामांसाठी वापरण्यात आला आणि त्याबाबत शिक्षण विभागातील श्री. सोनार नावाचे अधिकारी यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. म्हणून याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, मीरा-भाईंदर महापालिकेला सन 2007-08 या दोन वर्षात अनुक्रमे 60 व 70 लाखाचे जे अनुदान सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त झाले त्या संपूर्ण खर्चाचे ऑडिट झालेले असून सकृतदर्शनी तरी यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांची हरकत आहे म्हणून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेची एक टीम पाठवून या प्रकरणाची सविस्तर चौकशी करुन त्यात जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्र्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

पृ.शी. : खैरलांजी गाव तंटामुक्त करण्यासंबंधीची शिफारस केल्याचा राज्यमंत्र्यांवर केलेला आरोप

मु.शी.: खैरलांजी गाव तंटामुक्त करण्यासंबंधीची शिफारस केल्याचा राज्यमंत्र्यांवर केलेला आरोप यासंसबंधी उर्जा राज्यमंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री. विजय वडेट्टीवार (उर्जा राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे वैयक्तिक स्पष्टीकरण देत आहे.

महोदय, भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी हे गांव तंटामुक्त गांव म्हणून घोषित करण्याच्या संदर्भात सभागृहात शिफारस केली असा माझ्या नावाचा पालक मंत्री म्हणून सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी उल्लेख केलेला आहे, त्या अनुषंगाने मी हे निवेदन करीत आहे. असा उल्लेख केल्यानंतर माझ्या राजीनाम्याची मागणी त्यांनी सदनात केली. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, तंटामुक्त गांव घोषित करण्याबाबत किंवा पुरस्कार देण्याबाबतची जी प्रकरणे असतात त्या प्रस्तावांशी माझा पालकमंत्री म्हणून काहीच संबंध नाही. कारण त्यावर पालकमंत्र्यांची सही कुठेही लागत नाही. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी व एस.पी. मार्फत शासनाकडे पाठविला जातो. तसेच जिल्हा अंतर्गत व जिल्हाबाह्य समिती अशा समित्यांकडून तो मंजूर होतो. तसेच इलेक्ट्रॉनिक मिडियावर सुध्दा माझ्या नावाची चर्चा झाली होती. परंतु मी पुन्हा असे सांगू इच्छितो की, तंटामुक्त गाव पुरस्कार घोषित करण्यासाठी जी शिफारस पाहिजे ती पालकमंत्र्यांची नसते अथवा त्यांची त्या प्रस्तावावर कुठेही सही नसते, असे मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून नेत्रदान करण्याचा संकल्प करणेबाबत

प्रा. फौजिया खान (आरोग्य राज्यमंत्री) : महोदय, राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष हे औचित्य साधून विधिमंडळातील सदस्यांनी नेत्रदान करण्याचा संकल्प करावा, या हेतूने मी सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री म्हणून सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करीत आहे. यासाठी सहमती पत्र रुम नं. 35 (अ), विधानभवन, मुंबई येथे भरुन घेण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी इच्छुक सन्माननीय सदस्यांनी आपले सहमती पत्र कृपया उपरोक्त ठिकाणी जाऊन भरुन द्यावे व नेत्रदान करावे, अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी , तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतांराकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी , तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सचिन अहिर (गलिच्छ वस्ती सुधारणा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन 199-2000,2000-2001,2001-2002,2002-2003, 2003-2004,2004-2005,2005-2006 व 2006-2007 या वर्षाचे वार्षिक लेखा व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेखा व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितचा सन 1995-1996 व 1996-1997 चा अनुक्रमे बाविसावा व तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितचा सन 1996-1997,1997-1998 व 1998-1999 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. गुलाबराव देवकर (भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितचा सन 1996-1997 चा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती :वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा व संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या लेखावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा सन 2005-2006 ते सन 2007-2008 चा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, 2007 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना/अटी/बेस्ट उपक्रम/ 630, दिनांकित 2 एप्रिल 2007 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, राज्य ग्रिड संहिता विनियम, 2006 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ-151/ राज्य ग्रिड संहिता / 0338, दिनांकित 15 फेब्रुवारी, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (माहितीच्या नियमित नोंदी ठेवणे व सादर करणे) विनियम, 2009 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ:211/ 2009-2010/774, दिनांकित 21 एप्रिल, 2009 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

यानंतर श्री.भारवि.....

अशुद्धीत पत्र / मुद्रितासाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम,2008 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/टीपीसी/2008/1666, दिनांकित 20 ऑगस्ट 2008.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम,2005 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/0736,दिनांकित 21 एप्रिल 2005 वत्यास काढलेले शुद्धिपत्र क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/2083, दिनांकित 19 ऑक्टोबर 2006.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (राज्य सल्लागार समिती) विनियम,2005 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमइआरसी 055/2005-2006/2254, दिनांकित 31 ऑक्टोबर 2005.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम,2006 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल:2005 चा 116/0822,दिनांकित 20 एप्रिल 2006.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम,2004 मधील सुधारणा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम,2006 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/130, दिनांकित 10 जोनवारी 2007.

सभापती :अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचासन 2008-2009 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन 2007-2008 चे वार्षिक लेखे व सन 2007-2008 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखे व प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या विचारार्थ अशासकीय विधेयकांस द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 22 एप्रिल, 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील विचारार्थ असलेल्या अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1) सन 2009चे वि.प.वि.क्रमांक 2 - श्रीमती निलम गोऱ्हे, वि.प.स. 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही
2) सन 2009चे वि.प.वि.क्रमांक 4 - श्री.रामनाथ मोते, वि. प. स. 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही
3) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 1 - श्री कपील पाटील, वि.प.स. 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही
4) सन 2010चे वि.प.वि.क्रमांक 2 - डॉ.दिपक सावंत वि.प.स. 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही अशासकीय विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी . वसुंधरा पुरस्कार 2009

मु.शी. : वसुधरा पुरस्कार 2009 संबंधी माननीय उद्योग राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आज "जागतिक वसुंधरा दिनी "मला हे नमूद करण्यास अभिमान वाटतो की, " वसुंधरा पुरस्कार 2009 " अशी अभिनव स्पर्धा घेणारे महाराष्ट्र हे संपूर्ण भारतातील पहिलेच राज्य ठरणार आहे.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने " वसुंधरा पुरस्कार 2009 " या स्पर्धेची घोषणा " जागतिक पर्यावरण दिनी " दिनांक 5 जून 2009 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केली होती

ही स्पर्धा एकूण चार विभागात घेण्यात येत आहे :-

पहिला गट - औद्योगिक आस्थापना (लहान व मोठे उद्योग)

दुसरा गट - महानगरपालिका व नगरपालिका

तिसरा गट -शासकीय व खाजगी विद्यालय

चौथा गट - पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या सामाजिक संस्था

गट पहिला :- औद्योगिक आस्थापना

मोठे उद्योग -प्रथम क्रमांक मे. टाटा मोटर्स लि. पिंपरी,पुणे

व्दितीय क्रमांक - मे. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. (ऑटोमोटिव्ह सेक्टर),सातपूर नाशिक

तृतिय क्रमांक - मे.क्लॅरिअंट केमिकल्स (इं.) लि.रोहा, रायगड

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर .....

लहान उद्योग प्रथम क्रमांक मे. पास्को एनव्हायर्नमेंटल सोल्युशन्स प्रा.लि. पिंपरी, पुणे

गट दुसरा महानगरपालिका / नगरपालिका

महानगरपालिका

प्रथम क्रमांक - नवी मुंबई महानगरपालिका

व्दितीय क्रमांक -ठाणे महानगरपालिका

तृतिय क्रमांक -नाशिक महानगरपालिका

नगरपालिका

प्रथम क्रमांक - कुळगाव बदलापूर नगरपालिका,जिल्हा ठाणे

वसुंधरा पुरस्कार 2009 यातील पुढील टप्प्यातील शासकीय व खाजगी विद्यालये व पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या सामाजिक संस्था या स्पर्धेची घोषणा दिनांक 1 मे 2010 रोजी करण्यात येणार आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी " रायगड जिल्हयातील दिघी या गावच्या समुद्र किनारा व खाडी एका उद्योगपतीने खरेदी करुन त्या ठिकाणचे झाडे तोडून समुद्र उत्खनन केल्याने मच्छिमारांचा मासेमारीचा व्यवसाय उद्ध्वस्त केल्या बाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.किरण पावसकर,परशुराम उपरकर यांनी " तारापूर येथील (बोईसर) औद्योगिक वसाहतीतील सत्तर बंगला एस-33 या प्लॉटवर गेल्या काही महिन्यापासून एक रासायनिक कंपनी घातक रासायनिक गाळ व कचरा कोणतीही प्रक्रिया न करता मीठागराच्या जवळ असलेल्या भूखंडात अनधिकृतपणे टाकत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयत प्र.पाटील, कपिल पाटील. यांनी " इंडियन पेट्रोल केमिकल लि. नागोठाणे (जि. रायगड) या कंपनीसाठी अंबेगर, ता. रोहा येथील श्री दत्तात्रय गणपत माळी या प्रकल्पग्रस्ताच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांना नोकरीत सामावून न घेतल्यामुळे कै. श्री माळी यांच्या पत्नीने आत्महत्या करण्याची दिलेली नोटीस " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे यांनी " सह संचालक, उच्च शिक्षण विभाग, मुंबई यांनी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुधारित वेतन निश्चितीसाठी शासन निर्णयामध्ये असलेल्या तीन प्रोफॉर्म्यापेक्षा एक वेगळा प्रोफार्मा तयार केला होता व तो सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्याना पाठविला होता. सदर प्रोफार्मा रद्द केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी " दिनांक 10 डिसेंबर 2009 रोजी सातारा जिल्हयातील पाटण् शहरातील धनिक पुत्रांनी मोबाईलव्दारे अश्लिल चित्रफिती तयार केल्याचे उघडकीस येणे, शिरोळ तालुक्यातील नोंदणी येथील चितानंद मेंढगौरे व त्याचा साथीदार राजेंद्र डंके यांनी काही महिलांशी अनैतिक संबंध ठेऊन त्याचे अश्लिल चित्रीकरण करुन त्याच्या चित्रफिती करीत असल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आल्यामुळे, महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे यांनी " मुंबईतील कोळीवाडयांना कुटुंब विस्तारामुळे वाढत्या घरासाठी जागा अपुरी पडत असून कोळीवाडयातील मोकळया जागांवर बिल्डरांचे अतिक्रमण होत आहे त्यामुळे कोळीवाडे संकटात सापडत आहेत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते संजय केळकर चंद्रकांत पाटील यांनी " राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयाशी निगडीत असलेल्या इस्पितळाचा औषध पुरवठा कोटयावधी रुपयांच्या बिलाची थकबाकी असल्यामुळे, ओषध वितरकांनी बंद केल्याने मुबईतील इस्पितळातील औषध विभागाकडून गेले दोन महिने औषध पुरवठा बंद केल्यामुळे सामान्य रुग्णांना औषधे वैद्यकीय साहित्य खाजगी विक्रेत्याकडून खरेदी करण्यास सांगण्यात येत असल्याबाबत. " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रकी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनासंबंधी

सभापती : माझ्याकडे नियम 93 अन्वये सूचनेची एकूण 17 निवेदने आहेत. आजचे सभागृहापुढील एकंदरीत कामकाज पहाता माननीय सदस्यांना प्रत्येक निवेदनावर फक्त एकच उप प्रश्न विचारता येईल.

पृ. शी. : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब

मु. शी. : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब याबाबत प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनावणे, वि.प.स. यांनी "शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीबाबत होत असलेला अक्षम्य विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण दिलेल्या निर्देशाप्रमाणे सोमवार, दिनांक 19 एप्रिल, 2010 रोजी राखून ठेवलेले निवेदन मला सादर करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत करण्यात आल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर अशाप्रकारची बाब आहे. संपूर्ण महाराष्ट्रात उच्च शिक्षण विभागाला लाजेने मान खाली घालायला लावणारे त्यांचे हे वर्तन आहे. काल माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये जे सांगितले होते ते मी याठिकाणी सांगतो. त्या म्हणाल्या, "माझ्याकडे त्या प्रोफॉर्म्याची कॉपी आहे, संबंधितांविरुध्द नक्कीच ॲक्शन घेतली जाईल, तो प्रोफॉर्मा रद्द केलेला आहे". त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, तो प्रोफॉर्मा रद्द केल्याचे आदेश आपण दिले आहेत काय? त्यांना तसे सांगितले आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, तो जो प्रोफॉर्मा तयार करण्यात आला होता, तो एक चेक लिस्ट टाईप होता. ज्यावेळी विद्यापीठ फिक्सेशनचे काम करते, त्यावेळी फिक्सेशन रिलिज करण्याचे काम जॉईंट डायरेक्टर करीत असतात. अशाप्रकारे सर्वसाधारणपणे यु.जी.सी. चे नियम आहेत. त्यासंबंधीचे एक वाक्य मी याठिकाणी वाचून दाखवितो. साधारणपणे जॉईंट डायरेक्टरचे काम काय असू शकेल? ते वाक्य असे आहे, " The University shall submit this Certificate along with the Fixation Forms etc. to the concerned Regional Joint Directors, Higher Education, who shall, thereafter release the Grant after broadly satisfying themselves." त्यामुळे त्यांनी एक चेक लिस्ट तयार केली होती. म्हणून मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्या चेक लिस्टच्या माध्यमातून दिरंगाई होईल म्हणून शासनाने सुध्दा त्यांना याच पध्दतीच्या सूचना दिल्या आहेत की, फिक्सेशनच्या संदर्भात आपण जर डिटेल स्क्रुटिनी केली असेल तर याठिकाणी अधिक दिरंगाई होता कामा नये. ती नोटिस बोर्डावर लावलेली चेक लिस्ट होती, ती कोणत्याही कॉलेजला पाठविण्यात आलेली नव्हती. ती मागे घेण्यात आली. आणि आता साडे आठ हजारांपैकी जवळ जवळ सहा ते सव्वा सहा हजार पर्यंत फिक्सेशनचे काम किंवा जॉईंट डायरेक्टरचे काम पूर्ण झाले आहे. दोन हजार प्रस्ताव राहिले आहेत ते काम येत्या 15 दिवसात किंवा 20 दिवसात पूर्ण केले जाईल. नोटिस बोर्डावर लावण्यात आलेली चेक लिस्ट सुध्दा मागे घेण्यात आलेली आहे. याऊपरही माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांचे असे म्हणणे आहे की, त्याठिकाणी जाणीवपूर्वक किंवा मलाफाईड इंटरेस्टनी चेक लिस्ट लावण्यात आलेली आहे. दोन दिवसापूर्वी सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी माननीय राज्यमंत्र्यांकडून तसे बोलले गेल्याचे मला कळले व तसे काही असेल तर या गोष्टींची सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

चौकशी केली जाईल असे मी अत्यंत जबाबदारीने सांगतो. आणि जर जाणीवपूर्वक किंवा काही उद्देशाने केले असेल तर त्याबाबत सुध्दा कारवाई केली जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हे अत्यंत गंभीर असे प्रकरण आहे. स्वत:च्या सहीने जर एखादा प्रोफॉर्मा इश्यू केला असेल तर आपण समजू शकतो. मंत्रिमहोदय, चेक लिस्ट जी आहे ती वेगळी आहे, आणि प्रोफॉर्मा वेगळा आहे. प्रोफॉर्मा मंत्रिमहोदयांच्या हाती होता. मी त्यांना सांगितले की, एन्क्लोजर नं. 6 प्रोफॉर्मा आहे. त्या "हो" म्हणाल्या. आणि तो रद्द केला असल्याचे जाहीर केले. सभापती महोदय, त्या सहसंचालकांचे म्हणणे असे आहे की, "मी फक्त बोर्डावर लावला होता. माझी त्यावर सही नव्हती. मी मंत्र्यांना ब्रिफिंग केले होते."

सभापती : माननीय प्रा. देशमुख साहेब, या प्रोफॉर्माच्या अनुषंगाने जर गरज लागली तर संपूर्ण चौकशी केली जाईल असे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी उत्तर दिले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी हा प्रोफॉर्मा रद्द केला असे माननीय राज्यमंत्री काल म्हणाल्या. परतु त्या सहसंचालकांचे असे म्हणणे आहे की, मी माझ्या बोर्डावर प्रोफॉर्मा लावला होता. त्याच्यावर माझी सही नाही. मी मंत्रिमहोदयांना ब्रिफिंग केले होते. तर मग मंत्र्यांनी रद्द केला असे कसे सांगितले? सभापती महोदय, ही गंभीर गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकप्रकारचे ॲप्रुव्हल दिले गेले. इथे मुंबईमध्ये मात्र दोन प्रकारचे ॲप्रुव्हल दिले गेले. मी तुम्हाला पुन्हा विचारतो की, तुम्ही मुंबईला वेगळे काढले काय? हा एन्क्लोजर नं. 6 चा प्रोफार्मा आला कसा? हा वेगळा प्रोफॉर्मा आहे असे काल मंत्रिमहोदयांनी मान्य केले. आणि तो रद्द केल्याचे जाहीर केले. तो सहसंचालक म्हणतो की, "मी मानायला तयार नाही." तुमच्याकडे लेखी तक्रार त्याबाबत आलेली आहे. त्यांनी ती तुमच्याकडे पाठविली नाही. काल 5 वाजता सादर केलेल्या सही व शिक्क्याची तक्रारीची प्रत माझ्याकडे आहे. सभापती महोदय, मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देतो. साऱ्या महाराष्ट्रामध्ये एक प्रोफॉर्मा आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . ..

येथे दोन प्रोफार्मा आहेत आणि माझ्याजवळ त्याची प्रत आहे. एक प्रत फिक्सेशन केल्याबाबत आहे.....

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, महाराष्ट्रामध्ये मुंबईला वेगळी वागणूक देणारा हा सहसंचालक आहे.आजच्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, त्या अधिकाऱ्याकडे ॲडिशनल चार्ज आहे, माझे असे म्हणणे आहे की, त्याच्याकडून हा चार्ज ताबडतोब काढून घेण्यात यावा आणि हे काम ज्याचे असेल, त्याच्याकडे ते काम सोपवावे. मुंबईमध्ये दोन प्रकारची ॲप्रुव्हल आहेत आणि ही गोष्ट अत्यंत चुकीची आहे. सर्व महाराष्ट्रामध्ये एकाच प्रकारचे ॲप्रुव्हल आणि मुंबईमध्ये मात्र कंडीशनल ॲप्रुव्हल अनेक ठिकाणी व काही ठिकाणी सरळ ॲप्रुव्हल दिलेले आहे. तेव्हा आपण संबंधित अधिकाऱ्यांकडून ताबडतोब हा चार्ज काढून, ते काम दुसऱ्या व्यक्तीकडे सोपविणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी याठिकाणी जबाबदारीने सांगू इच्छितो. पहिला मुद्दा हा प्रोफार्माबाबत आहे. तर याबाबतीत त्यांनी जरी नवीन प्रोफार्मा दिला असेल . . . .

प्रा.बी.टी.देशमुख (खाली बसून) : शासन निर्णयात नसलेला नवीन प्रोफार्मा दिला आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ठीक आहे, दिला असेल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते मी मान्य करतो. मी सांगू इच्छितो की, तो प्रोफार्मा विथ्ड्रॉ करण्यात येईल, तो अडचणीचा विषय नाही. मी याठिकाणी सांगितले की, जर अशा प्रकारचा नवीन प्रोफार्मा देण्यामागचा उद्देश, हेतू असेल तर शेवटी हा चौकशीचा विषय आहे. मला असे विचारावयाचे आहे की, अशा काही घटना घडलेल्या नाहीत काय ? कधी-कधी पे-फिक्सेशन चुकीचे होते, त्यामुळे त्या दृष्टीकोनातून त्यांनी वेगळा प्रोफार्मा दिला असेल. पण मी याठिकाणी सांगू इच्छितो की, जर त्यांनी मनामध्ये काही वाईट हेतू ठेऊन किंवा मालाफाईड इंटरेस्टने अशा प्रकारचा प्रोफार्मा दिला असेल तर त्याची चौकशी केली जाईल आणि तशा प्रकारचा हेतू असल्याचे दिसून आले तर त्यांचा प्रभारी चार्ज सुध्दा काढून घेण्यात येईल.

. . . .2 क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 बाबत</u>

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांच्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन पुढे ढकलण्यात आले आहे.

. . . .2 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 26/11 च्या आतंकवादी हल्ल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली यंत्र सामुग्री दाखल झाल्यानंतरही ती पोलीस प्रशासनाने अद्याप ताब्यात न घेणे

मु.शी.: 26/11 च्या आतंकवादी हल्ल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली यंत्र सामुग्री दाखल झाल्यानंतरही ती पोलीस प्रशासनाने अद्याप ताब्यात न घेणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते,संजय केळकर,चंद्रकांत पाटील वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री.विनोद तावडे,रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "26/11 च्या आतंकवादी हल्ल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली यंत्र सामुग्री दाखल झाल्यानंतरही ती पोलीस प्रशासनाने अद्याप ताब्यात न घेणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनूलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 क्यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदन अतिशय स्पष्ट आहे. 26/11 ची घटना घडल्यानंतर, त्यावेळी तातडीने टोटल कन्टेनमेंट व्हेकल यंत्राची मागणी करण्यात आली. त्याचे टेंडर निघाले. नंतर ते पास झाले आणि ते संबंधिताला मिळाल्यानंतर त्याने ते यंत्र इम्पोर्ट देखील केले. यातील मेख अशी आहे. मला अधिकाऱ्याचे नाव माहिती आहे, पण ते मी सांगत नाही. तर कोणत्यातरी अधिकाऱ्याबरोबरची अर्थपूर्ण चर्चा फिस्कटली ....त्यापूर्वी त्याने जी सामुग्री दिली होती, त्याची माहिती काढली आणि मग ती किंमत कमी आहे वगैरे.....विमानतळाची ती प्रायव्हेट कंपनी आहे, तेच कस्टम ड्युटी भरणार आहेत, ते समुद्रमार्गे मागविणार होते. पण आपण तातडीने मागविल्या मुळे वेगळया पध्दतीने मागविले गेले. असे सगळे असताना, नियमाने सर्वकाही झाल्यानंतर केवळ एका अधिकाऱ्याचा इगो असेल किंवा बाकी काही गोष्टी असतील, पण ते ज्याने मागविलेले आहे, ते आपण कसे नाकारत आहोत ? एवढा साधा प्रश्न आहे. तेव्हा आपण ही यंत्रसामुग्री ताब्यात घेणार आहात काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले, ती गोष्ट खरी आहे. निविदा प्रक्रियेच्या सर्व अटी-शर्तींचा भंग केला. मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट यांनी तेच उपकरण तीन ते चार कोटी रुपयांना घेतलेले आहे. प्रश्न असा आहे की, आपण ज्या वस्तूची मागणी केली आहे, त्याची किंमत 6 कोटी 24 लाख रुपयांची आहे. मग 6 कोटी 24 लाख रुपयांना हे उपकरण घ्यावयाचे काय ? हा मुद्दा आला. म्हणून अधिकाऱ्यांनी शासनाला विचारले की, आपण जी वस्तू विकत घेत आहोत ती मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्टच्या अधिकाऱ्यांनी 3 ते 4 कोटी रुपयांना घेतली आहे आणि निविदाकारांनी कोट केलेली रक्कम 6 कोटी रुपयांची आहे. यामध्ये तफावत असल्यामळे त्याबाबत पुरवठादाराकडून खुलासा मागितला. त्याने याबाबतचे स्पष्टीकरण समाधानकारक न दिल्यामुळे, पुन्हा गृह विभागाने महाअधिवक्ता यांच्याकडून अभिप्राय मागवावा असे सांगण्यात आले. तो अभिप्राय अद्याप प्राप्त न झाल्यामुळे सदर पुरवठाधारक कोर्टामध्ये गेला आणि सध्या ही बाब न्यायप्रविष्ठ असल्याने प्रलंबित आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा साधा प्रश्न असा आहे की, तुम्ही ऐकत नाही म्हणून संबंधित पुरवठादार कोर्टामध्ये गेला. तुम्ही ही यंत्रसामुग्री घेतो असे सांगितले तर तो लगेच केस मागे घेईल. त्यामध्ये काहीच अडचण नाही. माननीय राज्यमंत्री महोदयांनी ज्या दोन एअरपोर्ट

. . . .2 क्यु-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाबत उल्लेख केला आहे, तर त्यांना या टेंडरच्या अगोदर यंत्र दिलेले आहे. मग असे असताना तुम्ही टेंडर कसे पास करता ? हा प्रश्न आहे. टेंडर पास केल्यामुळे त्यांनी यंत्र सामुग्री मागविली असेल. कारण ती प्रायव्हेट कंपनी आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही कस्टम ड्युटी भरतो. आमच्या पध्दतीने करतो, काही घाई नाही, सावकाश येऊ दे. परंतु आपल्याला याची तातडी होती. कारण जे बॉम्ब सापडले होते, ते निकामी करता आले नव्हते अशा सर्व गोष्टी होत्या.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्या अधिका-यांबरोबर झालेली अर्थपूर्ण बोलणी फिसकटली. अशा अधिका-यांना शासनाने पाठिशी घालू नये. हे केस मागे घेतील, तसे झाले तर शासन केस मागे घेणार का एवढेच विचारले आहे.

श्री.रमेश बागवे : कोर्टाचा निकाल लागल्यानंतर केस मागे घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये अन्याय झाल्याचे दिसत आहे. मंत्री महोदय केस मागे घेणार काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, केस मागे घेण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : श्रीमती नुरिया हवेली यांनी मध्यरात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत पोलीस ऑफिसर व पादचा-याच्या अंगावर भरधाव गाडी घातल्याने त्यांचा झालेला मृत्यू

मु. शी. : श्रीमती नुरिया हवेली यांनी मध्यरात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत पोलीस ऑफिसर व पादचा-याच्या अंगावर भरधाव गाडी घातल्याने त्यांचा झालेला मृत्यू याबाबत डॉ.दीपक सावंत वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी " श्रीमती नुरिया हवेली यांनी मध्यरात्रीच्या वेळी मद्यधुंद अवस्थेत पोलीस ऑफिसर व पादचा-याच्या अंगावर भरधाव गाडी घातल्याने त्यांचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हे अतिशय महत्वाचे निवेदन आहे. नुरिया हवेलीवाला या महिलेने मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवून एका पोलिसाला ठोकले. त्यानंतरही पोलीस विभागातील पोलीस आपल्याच सहका-याबाबत ही दुर्दैवी घटना घडलेली असताना कसा व्यवहार करतात त्याचे हे मूर्तीमंत उदाहरण आहे. नुरिया हवेलीवाला या मुलीने अंमली पदार्थाचे सेवन केल्यानंतर उपनिरीक्षकांना उडविले. तसेच होंडा युनिकॉर्न मोटरसायकल गाडीच्या चालकाला धडक दिली. यामध्ये दोघांचा मृत्यू झाला, 4 पोलीस कर्मचारी जखमी झाले तरी देखील नुरियाला जामीन मिळतो. 60 दिवसाच्या आत तिच्यावर दोषारोप पत्र दाखल न केल्यामुळे तिला जामीन मिळाला आहे. याला कोणते पोलीस अधिकारी जबाबदार आहेत ? त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? पोलिसांना मारुन देखील 60 दिवसामध्ये नुरिया हवेलीवाला हिला पोलिसांनी जे.जे.हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करुन ठेवले होते हे खरे आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने माहिती देतो की, अशाप्रकारच्या गुन्हयामध्ये आरोपीस 61 दिवस कोठडीत ठेवण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. पहिले 6 दिवस पोलीस कोठडी मिळाली होती. त्यानंतर 55 दिवसाची न्यायालयीन कोठडी मिळाली होती. अंमली पदार्थ कोठून आला याचा तपास करण्यासाठी पुन्हा पोलीस कस्टडी मागण्यात आली. परंतु न्यायालयाने अर्जदाराला 60 दिवसाची न्यायालयीन कोठडी दिली जाते या तरतुदीचा आधार घेऊन 304 (2) प्रमाणे ग्राहय धरुन न्यायालयाने सुटका केली. असे असताना सरकारी अभियोक्याने या आदेशाविरुध्द भा.दं.वि.सं.304 नुसार जन्मठेप अथवा 10 वर्षांची शिक्षेची तरतूद असल्याचे नमूद करुन...

श्री.दिवाकर रावते : याप्रकरणी कोणत्या कलमांचा वापर करण्यात आला ते विचारलेले नाही.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सरकारी वकिलांनी कोर्टाच्या निदर्शनास ही बाब आणली होती की, कलम 304 अन्वये आजन्म कारावास किंवा 10 वर्षांची शिक्षा व दोषारोप दाखल करण्याची मुदत 90 दिवसांची आहे. असे स्पष्ट केलेले असताना देखील कोर्टाने जामीन दिला. त्याचप्रमाणे अतिरिक्त दंडाधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द 1.4.2010 रोजी सेशन कोर्टात अपील करण्यात आलेले आहे. या अपीलावर 27 रोजी सुनावणी होणार आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव ते चिखली या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा प्रस्ताव

मु.शी. : बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव ते चिखली या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा प्रस्ताव याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदिश गुप्ता, वि.प.स.यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. अब्दुल सत्तार (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदिश गुप्ता, वि.प.स. यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते चिखली या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा प्रस्ताव" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनामध्ये खामगांव-चिखली या रस्त्याचे चौपदीकरणाचे काम सुरु झालेले आहे. या रस्त्याच्या बाजूची जमीन संपादित केली जाणार आहे. यामुळे शेतक-यांची जमीन व झाडे जाणार आहेत. त्याचा मोबदला दिला जाईल की नाही ते दिलेले नाही. हा रस्ता 24.0 मीटरचा पूर्वीचा रस्ता असल्यामुळे जमीन संपादित करण्याची गरज नाही असे म्हटले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे शेतक-यांची निवेदने आहेत. त्यांनी जिल्हाधिकारी, एसडीओ, सा.बां.विभागाकडे निवेदने दिलेली आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....

माझा प्रश्न असा आहे की, आता जो रस्ता त्या ठिकाणी आहे त्या रस्त्यासाठी ज्या शेतक-यांची जमीन संपादित करण्यात आली त्यांना अजून मोबदला मिळालेला नाही. आता हा रस्ता चौपदरी करण्यात येत आहे. यासाठी शेतक-यांची जमीन जाणार आहे. तेव्हा ज्या शेतक-यांची जमीन घेतली जाईल त्या शेतक-यांना झाडासहीत बाजारभावाप्रमाणे मोबदला देण्यात येणार आहे काय ?

श्री. अब्दुल सत्तार : 24 मीटरची जागा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीची आहे. त्या जमिनीवरील तोडण्यात येणा-या झांडाचा मोबदला शेतक-यांना देण्याचा प्रश्न येत नाही. त्या व्यतिरिक्त काही जमीन घेतली असेल किंवा त्या जागेत झाडे असतील तर त्याबाबतीत सार्वजनिक बांधकाम खात्याच्या माध्यमातून सर्व्हे केला जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अकोला जिल्हयात होत असलेले अवैध उत्खनन

मु.शी. : कोला जिल्हयात होत असलेले अवैध उत्खनन बाबत श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स. यांनी " अकोला जिल्ह्यात होत असलेले अवैध उत्खनन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपिकिसन बाजोरिया : गौणखनिजाच्या उत्खननासाठी प्रत्येक वर्षी शासनाकडून केव्हा निविदा काढण्यात येते ?. गौणखनिजाच्या उत्खननामुळे निर्माण होणा-या खड्डयामध्ये जनावरे पडून ती मृत होण्याच्या घटना घडतात. तेव्हा अशा घटनांच्या बाबतीत ठेकेदाराला जबाबदार धरुन नुकसान भरपाई देण्यासंबंधी शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : जीएसडीअे यांनी उत्खननास अनुकूल ठरविलेल्या स्थळामधूनच उत्खननास परवानगी देण्यात येते. सर्वसाधारणपणे मुदत त्या वर्षाच्या जुलै महिन्यापर्यन्त असते. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याचे उत्तर सजेशन फॉर ॲक्शन असे आहे.

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पेण (जि.रायगड) तालुक्यातील डोलवी गावात इस्पात कंपनीने केलेले अनधिकृत माती भरावाचे काम

मु.शी. : पेण (जि.रायगड) तालुक्यातील डोलवी गावात इस्पात कंपनीने केलेले अनधिकृत माती भरावाचे काम याबाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पेण (जि. रायगड) तालुक्यातील डोलवी गावात इस्पात कंपनीने केलेले अनधिकृत माती भरावाचे काम या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : संबंधित कंपनीने शेतक-यांच्या परवानगी शिवाय माल टाकलेला आहे. त्यामुळे त्या कंपनीवर काय कारवाई करणार आहात ? याठिकाणी वॉल बांधली तेव्हा व जमीन बिगर शेती करण्याची परवानगी देण्यात आली त्यावेळी कंपनीचे पाणी व्यवस्थित जाईल याची काळजी महसूल खात्याने घेतली होती काय ?

श्री. प्रकाश सोळंके : या कंपनीने जवळ जवळ 19 शेतक-यांच्या शेतामध्ये वेस्ट टाकलेले आहे. एक महिन्याच्या आत वेस्ट उचलून टाकण्याची कारवाई कंपनीने केलेली आहे. 50 टक्के काम पूर्ण झालेले आहे. वेस्ट टाकलेल्या कालावधीसाठी जो भाडे पट्टा शेतक-यांना द्यावयाचा आहे त्याबाबतीत शेतकरी आणि कंपनी यांची बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल.

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यात घडलेल्या बलात्काराच्या

घटना

मु.शी. : अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यात घडलेल्या बलात्काराच्या घटना याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे,वि.प.स..यांनी "अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यात घडलेल्या बलात्काराच्या घटना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : दोन्ही घटना अहमदपूर तालुक्यातील आहेत. अहमदपूर तालुक्यामध्ये परत परत अशा प्रकारच्या सामाहूक बलात्काराच्या घटना घडत आहेत. पहिल्यांदा जेव्हा पीडित

महिलेच्या पत्ीने त्याच्या पत्नीच्या अंगावर दगडफेक करुन धक्काबुक्की केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केली तेव्हाच जर पोलिसांनी कठोर पावले उचलली असती तर बलात्कार करणा-यांचे असे कृत्य करण्याची हिंमत झाली नसती. तेव्हा गुन्हेगारांविरुध्द कठोर कारवाई करण्यास दिरंगाई झाल्याबाबत चौकशी करुन संबंधितावर योग्य ती कारवाई करणार काय ? तसेच डी.एन.ए. टेस्ट केली जाईल काय ?

श्री. रमेश बागवे : पहिल्यांदा केलेल्या तक्रारीची दखल का घेण्यात आली नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. दिनांक 17.10.2009 रोजी तक्रार अर्जाची नोंद केली होती. त्या तक्रार अर्जानुसार चौकशी चालू असताना पीडित महिलेवर बलात्कार झाल्याची तक्रार केलेली आहे. डी.एन.ए.बाबत सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. त्याबाबतीत कारवाई केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील घाटकोपर येथे अल्पवयीन मुलीवर झालेला सामुहिक बलात्कार

मु. शी. : मुंबईतील घाटकोपर येथे अल्पवयीन मुलीवर झालेला सामुहिक बलात्कार याबाबत श्री.किरण पावसकर, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.किरण पावसकर, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील घाटकोपर येथे अल्पवयीन मुलीवर झालेला सामुहिक बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-9....

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, शासनाने सादर केलेल्या निवेदनामुळे माझे समाधान असल्यामुळे मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राईस मिल असोसिएशनला मिलिंग व वाहतुकीचे भाडे निश्चित करुन देणे

मु. शी. : राईस मिल असोसिएशनला मिलिंग व वाहतुकीचे भाडे निश्चित करुन देणे याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "राईस मिल असोसिएशनला मिलिंग व वाहतुकीचे भाडे निश्चित करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-10.....

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, 300 कोटी रुपयाच्या धानाचा हा प्रश्न आहे. गोडावून उपलब्ध नाही असे निवेदनात म्हटले आहे. परंतु खरी अडचण ही वाहतुकीच्या दरासंबंधीची आहे. राईस मिल असोसिएशनला वाहतूक दरामध्ये वाढ न दिल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला. दोन महिन्यानंतर पावसाळा येणार आहे. तातडीने या संदर्भात बैठक घेऊन वाहतूक भाडे वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील काय? मी शासनाला धन्यवाद देतो. हमालीचे काही पैसे दिले आहेत. उर्वरित पैसे किती कालावधीत राईस मिल असोसिएशनला दिले जातील?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या माध्यमातून एफसीआयला 2008-09 व 2009-10 वर्षासाठी ट्रान्सपोर्ट भाडे निश्चित करावे यासाठी अनेकदा विनंती केली आहे. हा निर्णय अंतिम टप्प्यात असून लवकरच भाडे निश्चित होणार आहे. हमालीच्या पैशाबाबत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. हमालीपोटी 62 लाख रुपयांपैकी 31 लाख रुपये अदा केले असून उर्वरित 31 लाख रुपये लवकरात लवकर देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शहापूर, जि.ठाणे येथील लिबर्टी ऑईल मिलला लागलेली आग

मु. शी. : शहापूर, जि.ठाणे येथील लिबर्टी ऑईल मिलला लागलेली आग याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "शहापूर, जि.ठाणे येथील लिबर्टी ऑईल मिलला लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-11.....

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सातत्याने अशा आगी लागतात. प्रत्येक वेळी उत्तर दिले जाते की, अग्निशमन दलाची व्यवस्था केली आहे. जवळजवळ 5-6 दिवस आग सुरु होती. भूमीपुत्रांचे व तेथील स्थानिक ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाईची काय व्यवस्था केली आहे?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, खाद्यतेलाच्या मिलला आग लागली होती. मिलचे नुकसान झाले असून भूमिपुत्रांचे किंवा स्थानिक ग्रामस्थांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. कोणीही जखमी झालेले नाही. मिलमधील पॅकींग विभाग जळून खाक झाला. आगीच्या कारणाची चौकशी सुरु आहे. आग लागली त्यावेळी पॅकींग विभाग बंद होता. रात्रीच्या वेळी आग लागली. 24 तासात आग विझविण्यात आली. अशा घटना घडू नयेत म्हणून कामगार विभागाने सेफ्टी ऑडिट स्वीकारलेले आहे. त्याचे गॅझेट निघाले असून भविष्यात असे अपघात घडू नयेत यासाठी कामगार विभाग दक्षता घेत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : फाऊंड्री उद्योगाला सिलिका वाळूचा पुरवठा बंद केल्याने झालेले नुकसान

मु. शी. : फाऊंड्री उद्योगाला सिलिका वाळूचा पुरवठा बंद केल्याने झालेले नुकसान याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर (खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, रामनाथ मोते यांनी "फाऊंड्री उद्योगाला सिलिका वाळूचा पुरवठा बंद केल्याने झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...8 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-12....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूरच्या फाऊंड्री उद्योगाला सिलिका सँडची आवश्यकता असते. त्यासाठी उत्खनन केले जाते ते प्रदुषणाचे कारण देऊन बंद करण्यात आले. 12 एप्रिल, 2010 रोजी महसूल मंत्र्यांसमवेत बैठक झाली त्यावेळी उत्खनन सुरु करण्यास परवानगी दिली गेली. तीन महिने विलंबाने बैठक आयोजित केली, त्यामुळे फाऊंड्री उद्योगाचे नुकसान झाले. आता जी परवानगी देण्यात आली त्यामध्ये कोणत्या अटी घालण्यात आल्या आहेत?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, घटनाक्रम पाहिला तर डिसेंबर महिन्यापासून तक्रारी आल्यानंतर त्या संदर्भात सर्व पूर्तता करीत असताना, पाणी आणि इतर सर्व गोष्टींची पूर्तता करीत असताना 22 जानेवारी, 2010 रोजी स्थगिती दिली होती. पुढील दोन-तीन महिन्यानंतर वेगवेगळया कारणास्तव आपण काही अटी व शर्तीनुसार परवानगी दिली. या अटीमध्ये वेट ब्रिज म्हणतो त्याठिकाणी उत्खनन केल्यानंतर त्या मालाची वाहतूक करताना ब्रिज काट्यावर वजन करुनच माल बाहेर नेला पाहिजे. वॉशिंग प्लॅट बनविण्याची तरतूद केली पाहिजे. त्यादृष्टीने वॉशिंग प्लँटमध्ये पुढच्या काळात ॲसिडिक कन्टेन्ट घालून वॉश केले जाते त्याठिकाणच्या नदीचे व पिण्याचे पाणी प्रदुषित होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर परवानगी दिली आहे.

नंतर 2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आदिवासी मुलींना हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्यानंतरही सेवेत सामावून न घेणे

मु. शी. : आदिवासी मुलींना हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्यानंतरही सेवेत सामावून न घेणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकासमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, यांनी "आदिवासी मुलींना हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्यानंतरही सेवेत सामावून न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांकरिता रोजगार निर्माण व्हावा म्हणून अशा प्रकारचे प्रशिक्षण शासनाने सुरु केले आहे. उत्तरात म्हटले आहे की, 545 लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या असून त्यातील 97 लोकांची निवड करण्यात आली व त्यांना ॲकेडमीमध्ये पाठविले. तसेच जे उत्तर दिलेले आहे ते मात्र आदिवासींच्या दृष्टीने अवमानकारक असेच आहे. त्यात शासनाने असे म्हटले की, आदिवासी मुले गावंढळ असतात, आदिवासी मुली सुंदर नसतात, त्यांना इंग्रजी बोलता येत नाही अशा प्रकारे जर शासनाचा ॲप्रोच असेल तर कशासाठी ही योजना शासनाने सुरु केली हेच मला समजत नाही. इकडे मात्र शासन हवाई सुंदरी बनविणे, हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देण्याची घोषणा शासन करीत आहे दुसरीकडे अशा प्रकारचा ॲप्रोच शासन ठेवत आहे. माझा प्रश्न असा आहे की, जर रोजगाराभिमूख शासन आहे असे म्हटले तर यामध्ये ज्या मुलांची निवड झाली आहे त्या मुलांना नोकरीत सामावून घेण्यात येईल काय ? तसेच आदिवासी मुलांचे दहावी-बारावीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर रोजगाराच्या संधी त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तालुक्याच्या ठिकाणी अशी माहिती उपलब्ध करण्यासाठी कोणती योजना आहे ? कारण आताच ही प्रशिक्षण केंद्रे सुरु झालेली असून सध्या तरी तशी व्यवस्था नाही, म्हणून शासन असा निर्णय घेणार काय आणि नियम 93 अन्वयेच्या सूचनेला जे निवेदन दिलेले आहे ते आदिवासींचा अवमान करणारे असल्याने ते निवेदन मागे घेण्यात येणार आहे काय ?

सभापती : मीच हे निवेदन आज प्रलंबित ठेवतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळेस निवेदन राखून ठेवण्याची विनंती करीत असतात)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी मागणी केली म्हणून मी हे निवेदन प्रलंबित ठेवत नाही तर आदिवासींच्या अनुषंगाने हा प्रश्न असून यावर चर्चा होईल तेव्हा दोन तीन सप्लिमेंटरी ॲड व्हाव्यात म्हणून राखून ठेवत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रस्ता रुंदीकरणासाठी कोल्हापूर महापालिकेने काढलेली अतिक्रमणे

मु. शी. : रस्ता रुंदीकरणासाठी कोल्हापूर महापालिकेने काढलेली अतिक्रमणे याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे यांनी "रस्ता रुंदीकरणासाठी कोल्हापूर महापालिकेने काढलेली अतिक्रमणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, कोल्हापूरमध्ये रस्ता रुंदीकरणासाठी रेल्वे स्टेशनच्या जवळच असलेली 73 अतिक्रमणे काढण्यात आली त्यावेळी एक वर्षापूर्वी महानगरपालिकेने 8 कोटी रुपये नुकसान भरपाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा केले होते. 80 टक्के नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय अशा प्रकारचे अतिक्रमण काढतायेत नाही म्हणून ही रक्कम दिलेली आहे काय ? तसेच हे करीत असताना 18 प्रॉपर्टीज जास्तीच्या काढण्यात आल्या हे स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी देखील मान्य केले आहे. त्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, 7.97 कोटी एवढी रक्कम भू-संपादन अधिकाऱ्याकडे जमा करण्यात आली आहे परंतु 73 बाधित व्यापाऱ्यांनी अद्यापपर्यंत रक्कम घेतलेली नाही. हे व्यापारी अशी रक्कम घेणार असतील तर त्यांना तात्काळ ती देण्यात येईल. त्याचबरोबर जे बाधित आहेत त्यापैकी पूर्णपणे विस्थापित झालेल्या 10 लोकांच्या बाबतीत सहानुभूतीने विचार करावा लागेल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रोहा शहरात दूषित पाण्यामुळे काविळीची झालेली लागण

मु. शी. : रोहा शहरात दूषित पाण्यामुळे काविळीची झालेली लागण याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि.स.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री. जयंत प्र.पाटील यांनी "रोहा शहरात दूषित पाण्यामुळे काविळीची झालेली लागण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रोहा शहरातील काविळीची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासकीय रुग्णालयाचे पथक रोहा शहरात पाठविण्यात आले होते काय ? रोहा शहरामध्ये मध्ये शासकीय रुग्णालयाचे पथक आले असल्यास त्यांनी शासनास काय अहवाल सादर केलेला आहे? रोहा शहरातील पाण्याचे जेव्हा नमुने घेण्यात आले होते तेव्हा स्टॉल व हॉटेलमधील पाण्याचे सुध्दा नमुने घेण्यात आले होते काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, रोहा शहरात दि. 17.3.2010 च्या सुमारात काविळीची लागण सुरु झाली होती. एकंदरीत 74 संशयीतांना काविळीची लागण झाल्याची शंका होती परंतु त्या ठिकाणी पथक पाठविण्यात आले व पथकाने घरातील पाण्याचे नमुने घेण्यात आले, हॉटेलमधील पाण्याचे नमुने घेण्यात आले परंतु काविळीची साथ कशामुळे आली याचे निश्चित कारण समजू शकले नाही. रोहा शहरात 52 व्यक्ती कावीळ बाधित आढळून आलेले असून आता या ठिकाणी एकही कावीळ बाधित व्यक्ती शिल्लक नाही. या शहरातील पूर्ण परिस्थिती आटोक्यात आलेली आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गिरणी कामगारांना / त्यांच्या वारसांना घरासाठी जागा देण्याबाबत

मु. शी. : गिरणी कामगारांना / त्यांच्या वारसांना घरासाठी जागा देण्याबाबत याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री. दिवाकर रावते यांनी गिरणी कामगारांना / त्यांच्या वारसांना घरासाठी जागा देण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 3 वर असे म्हटलेले आहे की, "गिरणी मालकाने गिरणी बंद झाल्यापासून सहा महिन्यांच्या किंवा सदर अधिसूचनेपासून सहा महिन्याच्या आत यापैकी जो कालावधी नंतरचा असेल त्या कालावधीत गिरणीचा अभिन्यास सादर करावा आणि अभिन्यास मंजूर झाल्याबरोबर म्हाडा व मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित केलेल्या जमिनी संबंधित प्राधिकरणाच्या ताब्यात तात्काळ द्याव्यात." सभापती महोदय, शासनाने गिरणी मालकांच्या बाजूने उत्तर दिलेले आहे. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वर असे म्हटले आहे की, "बॉम्बे डाईंग, वडाळा व प्रभादेवी या दोन युनिटचा प्रस्ताव एकत्रितपणे व रुबी मिल, यांचे प्रस्ताव हे आधुनिकीकरण करण्याच्या नियमाखाली मंजूर करण्यात आलेले असून तथापि अजूनपर्यात जागा हस्तांतरणाचा टप्पा/चेळ आलेली नाही." सभापती महोदय, या गिरणी मालकांनी कामगारांच्या घरांसाठी जागा दिलेली नाही. गिरणी मालकांनी त्या ठिकाणच्या एकूण जमिनीपैकी 1/3 जागा कामगारांच्या घरांसाठी दिली पाहिजे मग त्यांनी त्या ठिकाणी विकास करो व न करो त्यांनी सहा महिन्याच्या आत गिरणी कामगारांच्या घरांसाठी जागा देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. परंतु उत्तरात असे म्हटले आहे की, "गिरणी मालकांने कामगारांच्या घरांसाठी जागा दिलेली नाही." "कमला मिल व फिनिक्स मिल येथे जुन्या बांधकामाचे क्षेत्रफळ चटई क्षेत्र निर्देशांकानुसार जास्त असल्यामुळे तेथे जमीन हस्तांतरण लागू होत नाही" असे आपण उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "सेन्च्यूरी मिल येथे 58(1)(ब) नुसार परवानगी देण्यात आली असून म्हाडा व महापालिकेस देय असलेली जमीन ताब्यात देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच रघुवंशी मिलमध्ये विकासाचा कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. मुकेश मिल ने विकास प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केला असून त्यावर छाननी सुरु आहे."
सभापती महोदय, या ठिकाणच्या सर्व मिल आता बंद झालेल्या असून काही मिलच्या जागेवर टॉवर उभे राहिले परंतु मिल मालकांनी कामगारांच्या घरांसाठी 1/3 जागा दिलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात आपण तातडीने कोणती कारवाई करणार आहात? तसेच ज्या जागेवर विकास सुरु आहे त्या गिरणी मालकांना कामगारांच्या घरांसाठी 1/3 जागा देईपर्यंत शासन आजच्या आज स्थगिती देणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महत्वाचे असे दोन प्रश्न विचारलेले आहेत. ज्या गिरणी मालकांनी 1:3 जमीन कामगारांच्या घरांसाठी दिलेली नाही त्या गिरणी मालकांवर आपण काय कारवाई करणार आहात असा एक प्रश्न विचारलेला आहे. या निवेदनामध्ये मी सविस्तर उत्तर दिलेले असून शासनाने कोणतीही भूमिका लपवून ठेवलेली नाही. एकंदरीत किती कामगारांना घरे द्यावी लागणार आहेत यासंदर्भात चौकशी सुरु असून राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली असून ती यासंदर्भात काम पहात आहे. घरांसाठी जे कामगार पात्र असतील त्यांना घर देण्यास शासन बांधील आहे.

सभापती :सन्माननीय सदस्यांचा उपप्रश्न असा होता की, गिरणी मालकांनी कामगारांच्या घरांसाठी जमीन दिलेली नाही त्या मिलच्या जागेवर आता जो काही विकास सुरु आहे तो विकास थांबविण्यासाठी आपण स्टे देणार आहात काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होता.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सर्व माहिती विस्ताराने दिलेली आहे. या प्रश्नामध्ये खूप गुंतागुत आहे. वेगवेगळे निर्णय सुध्दा या विषयाच्या संदर्भात घेण्यात आलेले आहेत. 58(ब) (1) बाबत निर्णय झाल्यानंतर कामगारांना घरे देण्याचा निर्णय घेण्यात होता. पूर्वी असा निर्णय घेण्यात आला नव्हता. या निवेदनाच्या संदर्भात सर्व माहिती सविस्तर दिलेली आहे. जे कामगार त्या ठिकाणी काम करीत होते त्या कामगारांना घर देण्यास शासन बांधील आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वांद्रे,मुंबई येथील सी-रॉक हॉटेल पाडण्याचे काम सुरू असणे

मु. शी.: वांद्रे,मुंबई येथील सी-रॉक हॉटेल पाडण्याचे काम सुरू असणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर, श्री चंद्रकांत पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते,संजय केळकर आणि चंद्रकांत पाटील यांनी "वांद्रे,मुंबई येथील सी-रॉक हॉटेल पाडण्याचे काम सुरू असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वांद्रे येथील सी-रॉक हॉटेल बंद पडले आहे. येथील 1500 कामगारांचा प्रश्न हा जुना आहे. या हॉटेलचे मालक आता ताज हॉटेलचे व्यवस्थापन झालेले आहे. कामगार आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतरच आपण डेव्हलपमेंटचे पुढचे अधिकार देतो. ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने पुढेच अधिकार दिले आहेत काय ? या माझ्या प्रश्ना उत्तर येईल की, जुन्या कंपनीच्या नावाने अर्ज केला आहे. या कंपनीचे बहुतांश शेअर टाटाने घेतले आहेत. त्यामुळे आता ते मालक झाले आहेत. तेव्हा त्याच नावाने अर्ज आला की, जुन्या नावाने अर्ज आला. जुन्या नावाने अर्ज आला असल्यास आता त्यात कोणाचे किती शेअर्स आहेत ? सीआरझेडच्या कायद्याप्रमाणे तळमजला सोडून वरचे माजले पाडू शकतात आणि पुन्हा बांधू शकता. तळ मजला पाडला की, ती नवीन पुनर्बांधणी झाली. त्यामुळे तळमजला पाडणार नाही, असे वरवर दाखविणार. तळमजला न पाडता त्यावर पुन्हा हॉटेलसाठी 25 मजली इमारत उभी करणे शक्य नाही. तेव्हा येथे सीआरझेडचे उल्लंघन होते आहे काय ? असल्यास, यासंबंधातील चौकशी करून शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. महानगरपालिकेकडे एफएसआय वाढवून मागण्यासंबंधी अर्ज आला होता तो मूळ मालकाच्या नावाने आला की, जो हे हॉटेल घेऊ पहात आहे, त्याच्या नावाने आला काय ? असा प्रश्न विचारला आहे. पहिल्या प्रश्नाला उत्तर आहे की, मूळ हॉटेल मालकाच्या नावानेच एल.एल.आलेले आहे. अर्ज आलेला आहे. दुसरा प्रश्न महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय ? त्याचे उत्तर असे आहे की, राज्य शासनाने या हॉटेलला एफएसआय वाढवून देताना अट घातली आहे की, पर्यावरण विभागाची एनओसी घेऊन यावी आणि नंतरच मुंबई महानगरपालिकेने परवानगी द्यावी. म्हणून मुंबई महानगरपालिकेने त्यांना अद्याप पर्यंत परवानगी दिलेली नाही. हे हॉटेल 12 मार्च 1993 मध्ये मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यात बाधित झालेले हे हॉटेल आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अकोला शहराला दरवर्षी भेडसावणारी पाणी टंचाई

मु. शी. : अकोला शहराला दरवर्षी भेडसावणारी पाणी टंचाई याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजीत कांबळे (पाणीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "अकोला शहराला दरवर्षी भेडसावणारी पाणी टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला शहराला आज सात दिवसा आड पाणी पुरवठा होत आहे. अकोला शहराची पाणी टंचाई दूर व्हावी यासाठी शासनाने नागपूर अधिवेशनामध्ये बैठक घेतली होती. त्या बैठकीत सचिव पाणी पुरवठा विभाग यांनी एक प्रस्ताव अकोला महानगरपालिकेकडून मागविला. अकोला महानगरपालिकेने 10 टक्के लोकवर्गणी भरण्याची तयारी दाखविली. आता उत्तरात असे दिले की, तो खर्च अकोला महानगरपालिका आता करू शकत नाही. निधी उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे सदर योजना शासनाने मान्य केलेली नाही. आज 7 दिवसानंतर अकोला शहराला पाणी पुरवठा होत आहे. महान प्रकल्पातून या शहराला पाणी पुरवठा होतो. आज तेथे 7.32 एवढाच पाणी साठा उपलब्ध आहे. पुढच्या दोन महिन्यामध्ये पाण्याचे बाष्पीभवन झाल्यानंतर 50 टक्के साठा कमी होणार आहे. त्यामुळे पाण्याची समस्या अत्यंत गंभीर होणार आहे. माझी शासनाला विनंती आहे की, महानगरपालिकेने जो प्रस्ताव पाठविला आहे,तो मान्य करून टंचाई निवारण्याच्या खाली सुजल निर्मल योजने अंतर्गत प्रस्तावाला शासन मान्यता देणार आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, दिनांक 21.11.2009 रोजी या पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मार्फत एक टेडर काढले होते त्या टेंडरचे पुढे काय झाले ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी अकोला शहरात सात दिवसानंतर पाणीपुरवठा केला जातो या सदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, त्या शहराला सात दिवसाआड पाणी पुरविले जाते हे खरे आहे. त्याचे कारण असे की ,पाणी पुरवठा करण्यासाठी झोनिग करण्यात आलेले आहे. सात दिवसानंतर आठव्या दिवशी जेव्हा एका झोनला पाणी दिले जाते तेव्हा दरडोई 320 लिटर्स या प्रमाणे हिशोब करुन पाणी दिले जाते. मागच्या अधिवेशन काळात सुध्दा या प्रश्नासबंधी एक बैठक आयोजित करण्यात आली होती आणि स्वजल योजनेअंतर्गत अकोला शहराच्या पाणी पुरवठयासबंधीची योजना प्रस्तावित केली होती हे खरे आहे. या योजनेसाठी 10 टक्के लोकवर्गणीची रक्कम महा नगरपालिका देणार असून 20 टक्के रक्कमेचे कर्ज घेण्यात येणार आणि उर्वरित 70 टक्के रक्कमेसाठी शासन मदत करणार आहे असे त्यावेळी ठरले होते. आता शासनाकडे फक्त 10 टक्के लोकवर्गणी संबंधीचा प्रस्ताव आला आहे आणि टंचाई कार्यक्रमा अंतर्गत 20 टक्के रक्कम माफ करुन ही योजना करण्यात यावी असे प्रस्तावात म्हटलेले आहे. या योजनेसाठी 25 किलोमिटर्स अंतरावरुन पाणी आणण्याकरिता पाईप लाईन टाकावी लागणार आहे.ही योजना पूर्ण करण्यासाठी पाच महिन्याचा कालावधी लागणार असल्यामुळे टंचाई कार्यक्रमामध्ये ही योजना घेणे शक्य होणार नाही.सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी जी दुसरी माहिती दिली आहे ती खरी आहे.आज त्या प्रकल्पामध्ये 7.33 एम.एम.क्यु.पाणी उपलब्ध आहे पाण्याचे बाष्पीभवन होईल हे गृहित धरलेले तर आपल्याकडे 6.35 एम.एम.क्यु पाणी उपलब्ध होणार आहे.दर महिन्याला 5.9 एम.एम.क्यु.पाणी ते घेत असतात हे पाणी मे 2010 पर्यत पुरेल. त्यानंतर त्या ठिकाणी जो डेड वॉटरस्टॉक आहे त्यामध्ये 4 एम.एम.क्यु पाणी आहे त्यामुळे जुलै 2010 पर्यत अकोला महा नगरपालिकेला निश्चितपणे पाणी देऊ शकतो त्या व्यतिरिक्त टंचाई कार्यक्रमामध्ये आपण 275 बोअर वेल्स घेतल्या आहेत.ज्या 72 हाय यिल्डीग

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ...

बोअर्स आहेत त्या बोअर्सवर 100 पंपसुध्दा बसविलेले आहेत.टंचाईचा जो आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यानुसार 20 महिन्याच्या आत निश्चितपणे उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यामुळे शासनाने जे काही निकष ठरविलेले आहेत त्याला बायपास करुन टंचाई कार्यक्रमामध्ये ही योजना घेणे शक्य होणार नाही. महानगरपालिकेने 20 टक्के रकमेचे कर्ज घेतले तर निश्चितपणे बाकीची रक्कम शासन देईल .त्याचबरोबर या योजनेसाठी जो प्रस्ताव दिला होता त्याला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे...

श्री.पांडुरंग फुंडकर : टेडर काढण्यात आले होते त्या टेंडरची प्रत माझ्याकडे आहे. ार त्याची माहिती दिली तर त्याची चौकशी करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते :संबधित अधिका-यांनी मंत्री महोदयांना माहिती का दिली नाही ?

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, अकोला महानगरपालिकेच्या पाणीपुरवठयाच्या संबंधीचा हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे . त्या कामाचे टेंडर काढण्यात आले होते असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सागितले आहे. आपण ती माहिती घेणे आवश्यक होते. त्याबाबतीत आता आपल्याकडे माहिती नसल्यामुळे आपण उद्या ती माहिती देऊ शकाल असे मला वाटते.

श्री.रणजित कांबळे :सभापती महोदय,आपण सागितल्याप्रमाणें सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जर मला त्यासबंधीची माहिती दिली तर त्याची चौकशी करुन मी उद्या पुन्हा उत्तर देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक तीन बाबत

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना मी सांगू इच्छितो की, आपण दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल.

सभागृहातील कामकाजासंबंधी

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले कामकाज पाहिल्यानंतर हे सर्व कामकाज पूर्ण करण्याकरता वेळ कमी पडणार आहे असे दिसते. आज सकाळी नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला होता तो सुध्दा अपूर्ण राहिला आहे. हा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे व सकाळच्या बैठकीमध्ये तो पूर्ण होणार नव्हता तेव्हा तो प्रस्ताव आता आपण पूर्ण करु या .

नंतर श्री.सरफरे ..

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजाबाबत

सभापती : सभागृहापुढील आजचे कामकाज पहाता लक्षवेधी सूचना मांडण्यासाठी वेळ नसल्यामुळे आज लक्षवेधी सूचना घेण्यात येणार नाहीत. तसेच, विशेष उल्लेखाच्या सूचनाही आज चर्चेला घेण्यात येणार नाहीत. विशेष उल्लेखाच्या सूचना उद्या चर्चेला घेण्यात येतील.

नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनासंबंधी

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी पहिल्या दिवशी नियम 93 अन्वये सूचना दिली होती, पहिल्या दिवशी देण्यात आलेल्या नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदन आठ दिवसात आले पाहिजे. त्यावरील निवेदन अजूनही सभागृहापुढे आलेले नाही...

सभापती : सहा दिवसामध्ये निवेदन आले पाहिजे..

श्री. विनोद तावडे : परंतु ते येत नाही.

अकोला शहराला दरवर्षी भेडसावणाऱ्या पाणी टंचाईबाबत

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी नियम 93 अन्वयेच्या निवेदनावरील प्रश्नोत्तराच्या वेळी मघाशी सांगितले आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, तो पत्र व्यवहार आहे, त्यामध्ये कुठेही टेंडरचा उल्लेख नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याजवळ त्या टेंडरची प्रत आहे...

सभापती : तो विषय संपलेला असल्यामुळे आपण आता उद्या बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.
सभापती महोदय, विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना कामाचा ताण असह्य झाल्याने आपल्या विधानमंडळातील कर्मचारी सर्वश्री सोपान भांगे, सुहास साळुंखे व डी.जे. खंदारे या तीन जणांचा हृदय रोगाने मृत्यू झाला. विधीमंडळ सचिवालयातील कर्मचाऱ्यांना अधिवेशन सुरु असतांना 12 तासापासून 17 तासापर्यंत काम करावे लागते. हा कामाचा ताण असह्य झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. माझी या औचित्याच्या मुद्याव्दारे आपणास एकच विनंती आहे की, विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना ज्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करावयास पाहिजेत, त्यामध्ये सर्व कर्मचाऱ्यांसाठी एक मोबाईल व्हॅन अधिवेशन काळात उपलब्ध असावी आणि ज्यावेळी असे प्रसंग घडतात त्यावेळी सचिवालयातील कर्मचाऱ्यांसाठी डॉक्टरांसह एक चांगली व्हॅन उपलब्ध असावी. आणि कामाचा ताण कमी करण्यासाठी दोन शिफ्टमध्ये कामाची विभागणी करण्यात येत असेल तर तिचाही विचार करावा. सभागृहामध्ये माननीय आरोग्यमंत्री उपस्थित असल्यामुळे त्यांनी याबाबत उत्तर दिले तर बरे होईल.

सभापती : माननीय आरोग्यमंत्र्यांनी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. या विषयासंदर्भात कालच माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्याबरोबर मी, सन्माननीय मंत्री आणि सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी यांनी एकत्रितपणे चर्चा केली. त्या अनुषंगाने या ठिकाणी चार दवाखान्यांची व्यवस्था करण्यासंबंधी ठरविण्यात आले आहे. या अधिवेशन काळामध्ये तीन चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे, ही घटना गंभीर स्वरुपाची आहे. त्यादृष्टीने त्यांच्या कुटुंबियांच्या बाबत सहानुभूतीने जे काही करणे जरुरीचे आहे ते करण्यात येईल. त्याचबरोबर याठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण-तणाव येणार नाही यादृष्टीने सुध्दा मी स्वत: लक्ष घालून काळजी घेईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, उद्या या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. पुणे शहर आणि जिल्हयामध्ये महिलांवरील अत्याचारांच्या संदर्भात दोन्ही सभागृहांमध्ये खूप गांभीर्याने चर्चा झाली. तरीदेखील अजूनही घटना घडत आहे. सांगली येथे एका 60 वर्षे वयाच्या मूक-बधिर महिलेवर 3 जणांनी बलात्कार करुन तिची सी.डी. तयार केल्याची घटना घडली, त्याचप्रमाणे चिपळूण येथे 5 वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. कालच विप्रो कंपनी, पुणे याठिकाणी टॅक्सी चालविणाऱ्या एका चालकाने चिंचवड येथे एका महिलेवर बलात्कार केल्याची पाचवी घटना घडली आहे. त्यामुळे या सभागृहाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे व पुणे शहराचे लक्ष लागले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याठिकाणी जी आश्वासने दिली जातात, ती सरकार मार्फत दिलेली असतात आणि अशा वेळेला पुणे शहराचे पोलीस आयुक्त श्री.सत्यपाल सिंह यांची बदली केली जाईल असे माननीय गृह राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी सरकार म्हणून जाहीर केलेले आहे आणि असे असून सुध्दा परत अत्याचार होत आहेत, म्हणजे अत्याचार करणाऱ्या लोकांना संरक्षणाची खात्री वाटते की काय अशी मला शंका वाटत आहे. या सरकारवर कसला दबाव आहे हे मला कळत नाही म्हणून मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्याव्दारे आपले लक्ष वेधत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात अत्यंत दुर्दैवी घटना घडलेली आहे. महाराष्ट्र विद्युत वितरण विद्युत कंपनीची तार पडल्याने त्याठिकाणी चार दुकाने बेचिराख झालेली आहेत आणि हे दुकानदार हवालदिल झालेले आहेत. आता या दुकानदारांना मदतीची आवश्यकता आहे. महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीची तार पडल्याने तेथील जनतेला रात्रभर वीज नसल्यामुळे त्रास सहन करावा लागला आहे. म्हणून महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीला याबाबतीत सूचना देऊन तेथील व्यवस्था दुरुस्त करण्याच्या बाबतीत लक्ष घालण्यात यावे ही विनंती.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.राज्यात मुंबई,पुणे, औरंगाबाद,नागपूर, अकोला व अमरावती येथे शासनाने कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करुन त्याठिकाणी कौटुंबिक न्यायालयाच्या कामकाजासाठी समुपदेशकाची पदे निर्माण केली असली तरी त्यांची संख्या अगदीच अल्प असणे, कुटुंब न्यायालयात दाखल होणाऱ्या दाव्यांच्या संख्येत दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेता समुपदेशकावर वाढणारा कामाचा बोजा व पडणारा ताण, परिणामी कौटुंबिक वाद-विवादाचे दावे निकाली निघण्यास होणारा विलंब विचारात घेता, कौटुंबिक न्यायालयाच्या संख्येत आणखी वाढ करुन नाशिक, कोल्हापूर व ठाणे येथे कौटुंबिक न्यायालये ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

स्थापन करण्याचा शासनाने अलिकडेच घेतलेला निर्णय विचारात घेता समुपदेशकाची जादा पदे निर्माण करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, त्यातच समुपदेशकांना सहाव्या वेतन आयोगाने निश्चित केलेली वेतनश्रेणी दिली जात असली तरी त्या वेतनश्रेणीसाठी असलेला पे-ब्रँड न देता प्रत्यक्षात मात्र पे-ब्रँडची निम्मी रक्कम दिली जात असल्याने समुपदेशकांच्या मनात निर्माण झालेली नाराजीची भावना या संदर्भात त्यांनी शासनाला निवेदन दिलेले असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष विचारात घेता समुपदेशकांची जादा पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा शर्थी व पे-बँड मध्ये सुधारणा करण्याचे दृष्टीने शासनाने कार्यवाही करणे नितांत गरजेचे आहे. तरी त्यांच्या बाबतीत योग्य तो विचार करण्यात यावा. धन्यवाद.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा देखील औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या औचित्याचा मुद्दा माझ्याकडे आलेला नाही.

आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. 3 वाजून 10 मिनिटांनी सभागृहाची बैठक पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 43 मिनिटांनी, 3 वाजून 10 मिनिटांपर्यंत स्थगित करण्यात आली.)

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>

उपसभापती : आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेले विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 तातडीने चर्चेला घ्यावयाचे होते परंतु सभागृहात माननीय नगरविकास मंत्री उपस्थित दिसत नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर (बसून) : सभापती महोदय, प्रथम महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करण्यात यावी त्यांनतर विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 घेण्यात यावे. आज लक्षवेधी सूचना घेण्यात येणार नाहीत असे जाहीर करण्यात आलेले आहे.

उपसभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विदर्भ मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना.

मु.शी.: विदर्भ मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, अरुण गुजराथी, नितीन गडकरी, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री उल्हास पवार, जयप्रकाश छाजेड, सय्यद.जमा, जैनुद्दीन जव्हेरी, वसंतराव खोटरे, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, सर्वश्री विलासराव शिंदे, रमेश शेंडगे, जयंत प्र. पाटील, कमलकिशोर कदम, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

(चर्चा पुंढे चालू)

उपसभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे व इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये जलसिंचनाचे प्रकल्प सुरु आहेत. मला विनंती करावयाची आहे की, सिचंनाचे काम होत असताना या राज्यामध्ये फक्त 17 टक्के सिंचन होत आहे आणि देशातील सिंचनाचे प्रमाण काही ठिकाणी 90 टक्क्यापासून ते 98 टक्क्यापर्यंत आहे. महाराष्ट्र राज्याचे सिंचनाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न होण्याची गरज आहे. सिंचनाची कामे करीत असताना आपण जिल्हा हा घटक मानतो पण जिल्हा हा घटक न मानता तालुका हा घटक मानावा आणि त्याप्रमाणे योजना आणि प्रकल्प राबवावेत असे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

मी माननीय जलसंपदा मंत्रिमहोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो. महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक दुष्काळी तालुके आहेत आणि राज्याच्या इतर भागामध्ये जलसिंचनाच्या विकासाची कामे करीत असताना सांगली जिल्हयातील कवठेमहंकाळ तालुका असेल, जत तालुका असेल,आटपाडी असेल, खानापूर असेल, मिरजपूर्वचा भाग असेल, सातारा जिल्हयातील मान असेल, दहीवडी असेल, खटाव असेल, सोलापूर तालुक्यातील मंगळवेढा तालुका,सांगोला, बार्शी या दुष्काळी तालुक्यांसाठी दुष्काळी भागातील सगळे लोकप्रतिनिधी आणि नेतेमंडळी मागणी करीत असताना माननीय मंत्रिमहोदयं श्री. अजित पवार यांनी याठिकाणी विशेष असा निधी उपलब्ध करुन दिला तसेच या भागामध्ये राबविण्यात येत असलेल्या जलसिंचनाच्या योजना मग ती ताकारी योजना असेल, टेंभू, म्हैसाळ,उरमोडी असेल या प्रकल्पांना भरीव निधी दिला. माननीय जलसंवदा मंत्री श्री. अजित पवार तेथे स्वत: अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन आले आणि या प्रकल्पांची जी अर्धवट राहिलेली कामे होती त्या कामांना गती दिली आहे.

सभापती महोदय, मला मुद्दाम या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की, या महाराष्ट्र राज्यात विकासाची, सिंचनाची कामे होत असताना ठराविक भागांवर आरोप केले जातात. पश्चिम महाराष्ट्राचा विकास जास्त झाला किंवा या भागाचा विकास जास्त झाला की त्या भागाचा विकास जास्त झाला मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते की, आज या राज्यामध्ये 221 तालुक्यांमध्ये दुष्काळ पडलेला आहे. त्याबाबतीत वेगळे नियोजन करुन वेगळया योजना राबविण्यात येत आहेत. हे होत असताना त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र आहे का, विदर्भ आहे का, मराठवाडा आहे हे पाहिले गेले नाही. राज्यामध्ये असलेल्या या संपूर्ण भागासाठी नियोजन सुरु झालेले आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

म्हणून आता कोणताही अनुशेष भरुन काढत असताना पिढ्या न पिढ्या जे कायम दुष्काळी तालुके आहेत, ज्या दुष्काळी भागामध्ये पावसाळ्यामध्ये सुध्दा काही ठिकाणी फक्त चार-आठ दिवसच गवत बघावयास मिळते अशा कायम दुष्काळी तालुक्यांसाठी विशेष वेगळा निधी उपलब्ध करुन द्यावा आणि त्यांचे जे अर्धवट राहिलेले प्रकल्प असतील किंवा आता जे नवीन प्रकल्प करावयाचे असतील त्याबाबतीत नियोजन करावे अशी मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री. पवार साहेबांनी राज्यामध्ये दुष्काळ पडल्यानंतर डिसेंबर, जानेवारी महिन्यामध्ये 671 कोटी रुपये राज्याला दिले. त्याबद्दल आदरणीय श्री. पवार साहेबांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. कारण महाराष्ट्र राज्याने या देशाला काही आदर्श दिलेले आहेत. या ठिकाणी पश्चिम महाराष्ट्रावर आरोप होत असतना पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी या राज्याला आदर्शवत तत्वे दिलेली आहेत आणि त्या तत्वानुसार आपल्या राज्याचा विकास होत आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर भाग, अर्धा पश्चिम महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईमध्ये आहे. इतरही विभाग दुष्काळाच्या खाईमध्ये आहेत. स्व. यशवंतरावजी चव्हाण, स्व. वसंतदादा पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून सहकाराचे धोरण राज्यामध्ये राबवले. स्व. वि.स.पागे ज्या तासगाव परिसरातील होते त्यांनी रोजगार हमी योजना आणली. आदरणीय श्री. पवार साहेबांनी राज्यामध्ये योजना राबविल्या. महाराष्ट्रातील आदर्शवत अशी रोजगार हमी योजना देशाने स्वीकारली. अशा प्रकारचे आदर्श महाराष्ट्राने देशाला दिलेले आहेत. म्हणून या ठिकाणी आरोप करण्यापेक्षा सगळ्यांना बरोबर घेऊन मागास भागाला कसे पुढे आणता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, कृष्णा नदीला जे पूर येतात त्या पुराचे कोट्यवधी लिटर पाणी कर्नाटकमध्ये वाहून जाते. ते पाणी अडवून त्याचे लिफ्टींग केले तर सांगली, सातारा, कवठेमहांकाळ, आटपाडी, सांगोला या जिल्ह्यांना आणि तालुक्यांना पाणी मिळू शकते आणि त्यांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटू शकतो. आमच्या भागामध्ये काही गावे अशी आहेत की, ज्या ठिकाणी वर्षभर टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. पिण्यासाठी पाणी नाही, शेतीसाठी पाणी नाही, दुष्काळ पडला तरी आमच्या भागातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत. ते कोणाच्या देणगीची वाट बघत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

नाहीत. आमच्या दुष्काळी तालुक्यातील शेतकरी खांद्यावरुन पाणी आणून फळबागा वाढवतो. कवठेमहांकाळ तालुका हा कायम दुष्काळी तालुका आहे. त्या ठिकाणी 2 एकरमध्ये 8 ते 10 लाख रुपयांच्या डाळिंबाचे पीक घेतात. त्या ठिकाणी कलिंगड, बोर, द्राक्ष अशी फळपिके घेतात. द्राक्षावर प्रक्रिया करुन मनुके तयार करतात. आपण पाहिले तर त्या दुष्काळी तालुक्यांमध्ये मनुका तयार करणाऱ्या शेड्स आणि रॅक्स लागलेल्या दिसतील. नैसर्गिक आपत्ती असेल, अवर्षण असेल त्याला जिद्दीने सामोरे जाण्याचा प्रयत्न करणारे लोक त्या ठिकाणी आहेत. आदरणीय श्री. अजितदादा पवार यांनी भरपूर दिलेले आहे परंतु मला अशी विनंती करावयाची आहे की, आज नियोजन करण्याचा विचार होत असताना जे कायम दुष्काळी तालुके आहेत त्याच्या विकासासाठी सुध्दा 2 हजार कोटी रुपयांचा निधी राखून ठेवावा. मागील काळामध्ये शासनाने असे आश्वासन दिले होते की, दुष्काळी तालुक्यांचे एक महामंडळ स्थापन ठरविले आहे. ते महामंडळ स्थापन त्यासाठी सुध्दा विशेष निधी देऊन त्याच्या मार्फत योजना राबविता आली तर तसा प्रयत्न करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहासमोर आलेल्या प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, 1974 साली गोविंदभाई श्रॉफ यांनी वैधानिक विकास मंडळाची पहिल्यांदा मागणी केली. घटनेच्या कलम 371 (2) अन्वये वैधानिक विकास मंडळाची स्थापना करता येते याची सगळयांना कल्पना आहे त्याप्रमाणे वैधानिक विकास मंडळाची स्थापन करण्यात आली. वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या पाठीमागे जे निकष होते किंवा अपेक्षा होत्या त्यानुसार आर्थिकदृष्टया उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्गाचे प्रमाण समप्रमाणात असावे, कारखान्यांची संख्या सगळीकडे समप्रमाणात असावयास पाहिजे, वीज खर्च, रस्ते, रेल्वेची लांबी, शिक्षणाचा दर्जा, तंत्र शिक्षण संस्थांची संख्या, साक्षरतेचे प्रमाण, कुशल कामगारांची उपलब्धी , जीवनमान, लोकांची क्रयशक्ती व सिंचनाचे प्रमाण या सर्व पातळयांवर महाराष्ट्र समप्रमाणात येणार नाही तोपर्यंत ख-या अर्थाने महाराष्ट्राचा विकास झाला असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, 1984 साली नेमलेल्या अर्थतज्ज्ञ वि.म.दांडकेर समितीच्या अहवालावर बरीच चर्चा झालेली आहे. त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. पण अलिकडेच राज भवनातून प्रसिध्द केल्याप्रमाणे दिनांक 1.4.2007 रोजी मराठवाडयाचा 720.64 कोटी म्हणजे 22.40 टक्के आर्थिक सिंचन अनुशेष आहे, विदर्भाचा 2496.94 कोटी म्हणजे 77.60 टक्के सिंचनाचा अनुशेष आहे. उर्वरित महाराष्ट्राचा आर्थिक सिंचन अनुशेष 0 टक्के आहे असे म्हटले आहे. दांडेकर समितीनंतर किंवा त्यानंतरच्या काळात सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्राचा सिंचनाचा अनुशेष दूर झालेला आहे, परंतु मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष राहिलेला आहे. 2009-10 सालच्या अंदाजपत्रकानुसार दिनांक 1 एप्रिल, 2009 रोजी राज्याचा सिंचनाचा अनुशेष केवळ 947 कोटी रुपये इतका होता. यासाठी सन 2009-10 च्या अंदाजपत्रकात तरतूद केली गेली म्हणून अनुशेष शून्य झाला, अनुशेष शिल्लक राहिला नाही असा अर्थसंकल्पात उल्लेख केलेला आहे. मराठवाडा व विदर्भाच्या शिल्लक असलेल्या अनुशेषापोटी जी कामे करावयाची होती ती कामे मंजूर झालेली आहेत. परंतु ती कामे पूर्ण झालेली नाहीत, याची शासनाला दखल घ्यावी लागेल. सिंचनाच्या व्यतिरिक्त शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, कृषी पंपासाठी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

वीज पुरवठा व तांत्रिक शिक्षण ही मागास विभागांच्या अनुशेषाची इतर क्षेत्रे आहेत याचाही शासनाला विचार करावा लागेल. या क्षेत्रात 2007 पर्यंत अवघा 15 ते 20 टक्के खर्च केल्यामुळे राज्यपालांनी चिंता व्यक्त केली होती. याचीही शासनाला दखल घ्यावी लागेल. सन 2009-10च्या अर्थसंकल्पात नमूद केले आहे की, रस्ते, शिक्षण, पाणी पुरवठा, भूमि जलसंधारण, कृषी पंप, वीज पुरवठा या क्षेत्रातील अनुशेष दूर झालेला आहे. आरोग्य सेवेसाठी 807.51 कोटी, तंत्रशिक्षणासाठी 40.49 कोटी व पशुपैदास यासाठी 0.36 कोटी इतक्या रकमेला मंजुरी दिली आहे याचाही उल्लेख केलेला आहे. तथापि, मंजुरी दिलेली विहित कामे पूर्ण झालेली नाहीत याची शासनाला दखल घ्यावी लागेल. विदर्भातील 9 हजार कोटींचा भौतिक अनुशेष आहे, सिंचनाचा अनुशेष शिल्लक आहे. मराठवाडयातील प्रकल्प पूर्तीची कामे लांबली तर तो अनुशेष निश्चितच वाढणार आहे. म्हणून आश्वासित पाणी साठा उपलब्ध करुन दिला पाहिजे. एकीकडे शासन म्हणत आहे की, मराठवाडयातील अनुशेष दूर केला आहे. जे पाणी मिळावयास पाहिजे ते पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून तलावात साचलेला गाळ काढला पाहिजे, नादुरुस्त झालेले सांडवे दुरुस्ती केले पाहिजेत, पाझर तलावांची दुरुस्ती केली पाहिजे, चा-यांची कामे पूर्ण केली पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर ख-या अर्थाने अनुशेष दूर झालेला नाही हे दिसून येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख किंवा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी मागणी केली की भौतिक अनुशेष गृहित धरण्यात आला पाहिजे. त्यादृष्टीने पाऊल टाकून मराठवाडा व विदर्भाचा विकास करावा लागेल. कोणत्याही परिस्थितीत शासनाला ही बाब गांभीर्याने घ्यावी लागेल. 1994 पर्यंतचा अनुशेष दूर झालेला आहे, परंतु 1994 ते 2010 पर्यंतचा अनुशेष हा निश्चित करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी वैधानिक विकास मंडळांना 10 वर्षांची मुदतवाढ देणे गरजेचे आहे. एकीकडे विदर्भ व मराठवाडयाच्या वाटयाच्या निधीपैकी अर्ध्याहून अधिक निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळवून दोन विभागातील कामे अपूर्ण ठेवली आहेत असा केंद्रीय नियोजन आयोगाने महाराष्ट्र सरकारवर ठपका ठेवला होता. त्याची शासनाला दखल घ्यावी लागेल. या सर्व गोष्टींचा विचार केला तर एक बाब निश्चित आहे

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

की, शासनाने अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यासाठी मोठया प्रमाणावर तरतुदी केल्या, परंतु त्यातून ज्या प्रमाणात भौतिक अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे तो आजपासून करावा लागेल. हे करावयाचे असेल तर दरवर्षी अनुशेष अद्ययावत करावा लागेल. भौतिक अनुशेष पाहिला पाहिजे, सरासरी वाढली आहे, विकास झाला, महाराष्ट्राचा झाला, परंतु मागासलेला भाग मागासच राहिला आहे. अर्धवट स्थितीत असलेली कामे तशीच राहिली आहेत. सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करीन की, त्यांनी आमच्या जिल्हयात बॅरेजेस बांधले आहेत. सन्माननीय सांगितल्याप्रमाणे सध्या जे पाणी आहे ते अडविले गेले. गोदावरी खो-याचे जे पाणी मिळावयास पाहिजे होते अगोदरच अडविले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाला विचार करावयास पाहिजे आणि अनुशेष दूर करण्यासाठी जर काम करावयाचे असेल तर ही जी वैधानिक विकास मंडळे आहेत त्यांची मुदत 30 एप्रिलला संपते आहे. त्या मंडळांना मुदतवाढ दिली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे...

आणि भरीव आर्थिक करुन भौतिक अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. असे केले तरच महाराष्ट्राचा समान विकास झाल्या शिवाय रहाणार नाही. वेगळ्या विदर्भाची मागणी होत आहे. परंतु हा अखंड महाराष्ट्र अखंडच राहील आणि तो अखंड ठेवायचा असेल तर विदर्भाची तहान भागवली पाहिजे. विदर्भाचा विकास झाला तरच वेगळया विदर्भाची मागणी पुढे येणार नाही. तेव्हा या वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढवून द्यावी अशी विनंती करुन सभापती महोदय, आपण मला संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपविते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी एक अत्यंत महत्वाचा ठराव या ठिकाणी आणलेला आहे. या ठरावाची व्याप्ती देखील फार मोठी आहे. दरवर्षीच्या अद्ययावत सरासरीच्या संदर्भात, सर्व क्षेत्रातील विकास कामांना आवश्यक तो निधी मिळण्यासाठी आणि जल सिंचनाच्या संदर्भात आताची पध्दत सक्षम नसल्यामुळे ती त्याज्य करण्यात यावी, जिल्हा निहाय साध्य झालेली भौतिक सिंचन क्षमता व वाढलेली राज्याची सरासरी लक्षात घेऊन पुनश्च भौतिक अनुशेष राज्य सरासरीवर आणावा ही एक मागणी आहे. वैधानिक विकास महामंडळ पुनश्च सुरु ठेवले पाहिजे, अशा प्रकारची मागणी या ठरावाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या वैधानिक विकास महामंडळाची गरज आहे काय, हा प्रश्न आहे. अनुशेषासाठी अजून निधी देण्याची आवश्यकता आहे काय, हा देखील प्रश्न आहे. आपण 2004-05ची दारिद्र्याच्या संदर्भातील देशाची आणि राज्याची आकडेवारी लक्षात घेतली तर देशाची आकडेवारी 27.5 टक्के आहे तर राज्याची आकडेवारी 30.7 टक्के आहे. म्हणजे राज्यात दारिद्र्य मोठे आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. दारिद्र्य कमी करावयाचे असेल तर सिंचना शिवाय पर्याय नाही. म्हणून हे सिंचन वाढविण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजेत. राज्यातील 25 जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न हे राज्याच्या सरासरी उत्पन्नापेक्षा कमी आहे. मग हा निधी कोठे दिला पाहिजे ? तर तो या 25 जिल्ह्यात दिला पाहिजे. मग ते मराठवाड्यातील जिल्हे असतील, विदर्भातील असतील, पश्चिम महाराष्ट्रातील असतील किंवा उत्तर महाराष्ट्रातील असतील. आपण आकडेवारी पाहिली तर वाशिम, लातूर आणि गडचिरोली जिल्हयाचे दरडोई उत्पन्न सर्वांत कमी आहे. जालना जिल्हयाचे 23,635 रु. आहे. हिंगोलीचे 29,190 रु. आहे. विदर्भाचा विचार केला तर अमरावती आणि नागपूर या दोन जिल्हयातील आकडेवारीमध्ये मोठी तफावत आहे. अमरावतीचे वार्षिक दरडोई उत्पनन 33,202 रु. तर नागपूरचे दरडोई उत्पन्न 47,73 रु. आहे. जवळपास 12-13 हजाराचा वार्षिक दरडोई उत्पन्नामध्ये फरक आहे. या बाबतीत एक गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे ती म्हणजे नागपूर जिल्ह्यामध्ये नागपूर शहराचा समावेश असल्यामुळे दरडोई उत्पन्न जास्त आहे. सभापती महोदय, आपण मानव विकास निर्देशांकाचाही विचार केला पाहिजे. खानदेशातील धुळे, नंदूरबार त्याच पध्दतीने बुलढाणा या जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक खूप कमी आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...

ग्रामीण आरोग्य, शिक्षण, रहाणीमान, दरडोई उत्पन्न, कृषी पंपांची संख्या, विजेचा वापर, रोजगाराच्या संधी, क्रयशक्ती या सर्व बाबी अत्यंत महत्वाच्या आहेत. या संदर्भात या शासनाने काही केले आहे की नाही याचा आधी विचार केला पाहिजे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि नागपूर करार या दृष्टीने आपण सातत्याने बोलत असतो. माननीय यशवंतराव चव्हाण साहेब यांनी मराठवाडा, विदर्भ कोकण अशा संपूर्ण महाराष्ट्राची एकात्मता जपण्याचा प्रयत्न केला. नागपूर करार 1952ला झाला. 1956 पासून त्याच्या पहिल्या टप्प्याच्या कामाला सुरुवात झाली. 1989 मध्ये दांडेकर समितीची स्थापना झाली. 1994मध्ये श्री. वि.म.दांडेकर समितीच्या सत्यशोधन समितीने दिलेल्या अहवालानुसार 1982 पर्यन्त निर्मित सिंचन क्षमता 1385 हजार हेक्टर होती ती त्यानंतर कमी झाली. म्हणजे शासनाने काम केले नाही ही वस्तुस्थिती आहे. जून 1994 ला निर्देशांक अनुशेष समिती आली.

....नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

ती आकडेवारी पाहिली तर आकडेवारीवर आधारित राज्यात 1383 हजार हेक्टर रब्बी समतूल्य अनुशेष होता, तो कमी झाला. 7148 कोटी रुपयांवर आला. 2007 अखेर अमरावती जिल्हयात 4.27 लाख आणि नागपूर जिल्हयाला केवळ 17 हजार आहे. नागपूर आणि अमरावती या दोन जिल्हयांबाबत किती अंतर आहे ही आकडेवारी निश्चितपणे दिसून येईल. विदर्भा 8414 कोटी रुपयांचा अनुशेष असताना 6.10 लाख हेक्टर सिंचन क्षमतेचे 144 सिंचन प्रकल्प सर्व्हेक्षण आणि प्रशासकीय मान्यता अशा विविध टप्प्यांवर आहेत. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाले तर महाराष्ट्रातील नव्हे तर हिंदुस्थानातील सर्वात जास्त हरित प्रदेश म्हणून विदर्भाचे नाव घ्यावे लागेल. मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, Will of the government म्हणतो ते आपल्याला याठिकाणी दिसते. आपण दहा वर्षापासून मंत्री आहात. 1 एप्रिल, 2009 रोजी विदर्भाचा अनुशेष 6674 कोटीवरुन 874 कोटीवर आला आहे. या शासनाने काम केले आहे का? केले आहे म्हणूनच आकडेवारी बोलते. मराठवाड्याचा 4 हजार कोटीचा अनुशेष 449 कोटीवर आणि उर्वरित महाराष्ट्राचा 3378 कोटीचा अनुशेष 472 कोटीवर आला आहे. आता अनुशेषाच्या संदर्भातील जबाबदारी शासनाची नाही. प्राथमिक जबाबदारी माननीय राज्यपालांची आहे. अनुशेष निर्मूलनाची पूर्ण जबाबदारी घटनेच्या कलम 371 अन्वये माननीय राज्यपालांकडे सोपविली आहे. ते ज्या दृष्टीकोनातून निदेश देतील त्या निदेशाचे पालन करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. त्यादृष्टीकोनातून राज्य सरकार प्रयत्न करीत आहे म्हणून मी शासनाचे अभिनंदन करतो.

विदर्भातील अनुशेष दूर करण्यासाठी पाटबंधारे प्रकल्प विशेष महामंडळ दोन वर्षापूर्वी सुरु केले. त्या माध्यमातून विदर्भाला काय मिळाले याची माहिती दिली तर याचा कितपत फायदा झाला हे कळून येईल. मंत्रीमहोदयांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो. माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार, केंद्र शासन आणि केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांनी गोसीखूर्द प्रकल्प आणला. 6 ते 7 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून आणला. राज्य शासनाचे अंशदान केवळ 10 टक्के आहे. 4500 ते 5000 कोटी रुपये केंद्र शासनाकडून मिळविले. खात्याचा अर्थसंकल्प कितीही असला तरी त्यापेक्षा जास्त रक्कम विदर्भाला मिळवून दिली. विदर्भाच्या संदर्भात सापत्नभाव दाखविला जात आहे, वेगळी वागणूक दिली जात आहे असे बोलायला जागा उरणार नाही. त्यादृष्टीने अत्यंत चांगले काम केल्याबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो, आपण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सगळ्यांनी केले पाहिजे. हा राजकीय विषय आहे असे मी मानत नाही. महाराष्ट्रातील कदाचित पहिला राष्ट्रीय प्रकल्प असेल. मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, आणखी असे प्रकल्प हाती घेता आले तर मराठवाडयात असेल, खानदेशात असेल, विदर्भात असेल त्यादृष्टीकोनातून प्रयत्न सुरु करावेत. विदर्भामध्ये कृषि पंपाचा बॅकलॉग फार आहे असे सांगितले जाते. आकडेवारी अशी दिली जाते की, संपूर्ण विदर्भात 9 लाख कृषि पंप आहेत आणि एकट्या नगर जिल्हयात 11 लाख कृषि पंप आहेत. काय सत्य आहे मला माहिती नाही. परंतु दोन लाखाचा फरक आहे. एका जिल्हयात 11 लाख आणि संपूर्ण विदर्भात 9 लाख कृषि पंप आहेत. मंत्रीमहोदयांना मी विनंती करतो की, ऊर्जा खाते आपल्याकडेच आहे. या संदर्भात जे काही देता येईल ते देण्याचा प्रयत्न करावा. दि. 4.4.2004 रोजी सभागृहात चर्चा झाली. खानदेशसाठी स्वतंत्र विकास मंडळ दिले पाहिजे. त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील जे 148 दुष्काळी तालुके आहेत त्याबाबत माननीय विधानसभा सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांनी विषय मांडला होता. मी विधानसभेचा अध्यक्ष होतो. खानदेशाला वेगळे विकास मंडळ देण्यास आमचा विरोध नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील 148 दुष्काळी तालुक्यांसाठी देखील स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची त्यांनी मागणी केली. ही मंडळे होतील की नाही हे मला माहिती नाही. कारण घटनेच्या कलम 371(2) च्या संदर्भातील संपूर्ण अधिकार केंद्र शासनाचे आहेत.

नंतर 3एफ.1..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंदी

श्री. अरुण गुजराथी .....

कोकण विभागाची सुध्दा हीच मागणी आहे, असे सकाळच्या चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी अगदी भावनाविवश होऊन बोलत होते. हे बोलत असताना त्यांनी असेही सांगितले की, महाराष्ट्र हा संपूर्ण एकच असावा. आमच्या खानदेशच्या संदर्भात मी एकच शेवटचा मुद्दा सांगणार आहे की, 4 एप्रिल, 2007 रोजी शासनाने केंद्रशासनाकडे स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ पाहिजे म्हणून प्रस्ताव पाठविला होता. मी माननीय सभापतींना विनंती करणार आहे की, याच विषयावर अर्धा तास चर्चा मांडण्याची अनुमती दिल्यास त्या अनुषंगाने सविस्तर असे बोलता येईल. माननीय मंत्री महोदयांना मी अशी विनंती करणार आहे की, आमच्याकडे सुध्दा अनेक प्रकल्प रखडलेले आहेत. निम्न तापी प्रकल्प आज किती वर्षांपासून रखडलेला आहे, त्याला निधी मिळत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, अशा निधीचे न्याय्य वाटप हा सर्वात महत्वाचा भाग आहे. मग त्यात विदर्भ, खानदेश अथवा मराठवाडा असेल यादृष्टीने मी विनंती करणार आहे की, खानदेशसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा. राज्यशासनाने अशाच प्रकारच्या चर्चेच्या अनुषंगाने प्रयत्न केला पाहिजे की, खानदेशमध्ये किती अनुशेष आहे आणि तो पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत. पण त्याला माननीय राज्यपालांनी उत्तर दिले की, जोपर्यंत वेगळे वैधानिक विकास मंडळ होत नाही तोपर्यंत असा अनुशेष स्वतंत्रपणे काढता येणार नाही. मी पुन्हा असे सांगू इच्छितो की, सिंचनाच्याच माध्यमातून खरी प्रगती शक्य असते. रस्ते वगैरे ठीक आहे, कारण रस्त्यात खड्डा असेल तर आपल्याला डोळे दिले आहेत त्यांचा आपण वापर करतो परंतु पोटाचा खड्डा भरण्यासाठी मात्र आपल्याला सिंचनाची व्यवस्था होण्याची गरज आहे. त्यासाठी जास्तीत जास्त निधी केंद्रशासन असेल, एआयबीपी असेल अथवा वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून जेथून शक्य असेल तेथून उपलब्ध करावा आणि संपूर्ण राज्यातील पाण्याची तहान पूर्ण करावी. यात मग मराठवाडा असेल, खानदेश असेल, विदर्भ असेल किंवा पश्चिम महाराष्ट्रातील 148 दुष्काळी तालुके असतील त्यातील अनुशेष दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, अशी विनंती करतो आणि गेल्या तीन चार वर्षांपासून ज्या गतीने अनुशेष भरुन काढण्यासाठी शासनाने प्रयत्न केले त्याबद्दल पुन्हा शासनाचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, या चर्चेमध्ये सहभागी होत असताना काही गोष्टींकडे मी जाणीवपूर्वक लक्ष वेधू इच्छितो ते म्हणजे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये माझ्या 30 वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत मी तीन-तीन, चार-चार वेळा तालुक्या-तालुक्यापर्यंत गेलो आहे व त्याच्याच आधारे मी हे बोलणार आहे. सभागृहात या प्रस्तावावर चर्चा सुरु असताना मी असे म्हणेन की, ही चर्चा फक्त "जलसिंचन" या विषयापुरतीच सिमीत आहे. तेवढ्यापुरतेच मी येथे बोलणार आहे. जलसिंचनाच्या परिभाषेत बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी सभागृहात असा आभास निर्माण केला आहे की, पश्चिम महाराष्ट्रात संपूर्णपणे पैशाचा लोंढा गेला आहे आणि त्यामुळे तो भाग सुजलाम् सुफलाम् झालेला आहे. उर्वरित महाराष्ट्र मग त्यात मराठवाडा, कोकण अथवा खानदेश असेल या भागावर अन्याय झाला अशी धारणा कळत नकळत व्हायला लागली आहे. मी पश्चिम महाराष्ट्राचा असल्यामुळे याबाबतीत एवढेच सांगू इच्छितो की, असे म्हणणे म्हणजे हे एक अर्धसत्य आहे, ते पूर्ण सत्य नाही एवढेच मी थोडक्यात सांगेन. मघाशी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा दुष्काळी तालुके भरपूर आहेत, या भागात पिण्याच्या पाण्याचाच प्रश्न निर्माण झालेला आहे त्यामुळे सिंचनाचा तर प्रश्नच उद्भवत नाही. हे सर्व लक्षात घेतल्यानंतर शासनाने जी दांडेकर समिती सन 1982 ते 1984 मध्ये नेमली असे सभागृहात सकाळपासून चर्चेच्या दरम्यान अनेक सदस्यांनी सांगितले. त्या मुद्यांना कुठेही स्पर्श न करता मी वेगळ्या परिभाषेत बोलणार आहे. यातून थोडीसी फुटीरतावादाची चर्चा सभागृहात व्हायला लागली. कारण आज विदर्भ वेगळा मागितला आणि तो दिला तर उद्या खानदेश, नंतर कोकण व मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्राकडूनही अशी स्वतंत्र राज्याची मागणी होईल आणि मग भाषवार प्रांत रचना आणि त्यातही सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या टप्प्यापर्यंत आपण आलो आहोत अशा वेळेस अशी मागणी योग्य होणार नाही असे मला वाटते. ही भाषा काही लोक करीत असताना, हे मान्य केले पाहिजे की, पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये असलेला वेगळा गूण आणि उर्वरित महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये असलेला गूण यामध्ये फरक आहे. पश्चिम महाराष्ट्र हा सहकाराच्या माध्यमातून उभा राहिलेला प्रदेश आहे. सुरुवातीच्या काहात जरुर शासनावर विसंबून राहिला असेल पण नंतर मात्र आपला विकास पश्चिम महाराष्ट्राने स्वतंत्रपणे सहकाराच्या माध्यमातून केलेला आहे....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे ....

त्यामुळे थोडे शासन, थोडे सहकार आणि थोडे व्यक्तिगत अशा तिन्ही सूत्रातून पश्चिम महाराष्ट्राचा विकास झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास हा पूर्णअशांने झालेला आहे असे म्हणता येणार नाही.

जलसिंचनाच्या संदर्भात विचार मांडत असतांना आपण विदर्भ विकास महामंड, कृष्णा खोरे विकास महामंडळ अशी विकास महामंडळे स्थापन केलेली आहेत. या ठिकाणी आता जी काही चर्चा होत आहे त्याचे उत्तर देण्याची जबाबदारी माननीय अजित दादांवर आलेली आहे त्यामुळे मला अजित दादांची थोडी कीव येते. कारण त्यांना या चर्चेतून त्यांना कोण इकडे ओढतो आहे तर कोण तिकडे ओढतो आहे अशी परिस्थिती त्यांच्यावर आलेली आहे. त्यामुळे दादांच्या मनाची फरफट काय होत असेल असे माझ्या मनामध्ये येते. त्यामुळे मी याठिकाणी थोडा वेगळा विषय सूचविणार आहे. मला असे वाटते की, आपण आतापर्यंत विभागवार जलसिंचनाचा जो प्रयोग केलेला आहे तो लगेच बदलावा असे नाही परंतु जिल्हा हा घटक मानला जावा. प्रत्येक जिल्हयाचे पहिल्यांदा सर्व्हेक्षण केले जावे. राज्यातील प्रत्येक जिल्हयात आजपर्यंत तेथे झालेले सिंचन प्रत्यक्षात किती आहे याचा विचार करण्यात यावा तसेच हे जलसिंचन मग विहिरींच्या, तलावांच्या, किंवा कालव्यांच्या माध्यमातून किती झालेले आहे याची माहिती घ्यावी. त्या जिल्हयाचे एकूण जमिनीचे क्षेत्रफळ किती आहे याची टक्केवारी काढली की, मग कोणत्या जिल्हयात सर्वात जास्त जलसिंचन झालेले आहे याची माहिती मिळू शकेल. समजा आमच्या कोल्हापूर, पुणे किंवा सातारा-सांगली येथील जलसिंचन 30-35 टक्के झालेले आहे व मग इतर जे जिल्हे आहेत त्यातील काही जिल्हयांचे जलसिंचन 30 टक्के, 25 टक्के, 22 टक्के, 3 टक्के झालेले असेल. म्हणून ज्या जिल्हयात जास्तीत जास्त जलसिंचन झाले असेल व ज्या जिल्हयात सगळयात कमी जलसिंचन झाले असेल तो जिल्हा जास्त जलसिंचन झालेल्या जिल्हयाबरोबर नेण्यासाठी त्या जिल्हयांना आपण तशा प्रमाणात निधी देण्यास अग्रक्रम देऊ शकतो. जो प्रादेशिक अभिनिवेश आज वाढतो आहे ते अभिनिवेश यामुळे बाजूला पडेल.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आपले राज्य जर देशात पहिल्या क्रमांकाचे असेल तर आपल्या महाराष्ट्रात असलेल्या सर्व नद्यांचे पाणी अडवण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. या कामासाठी उत्तम प्रकारची राजकीय इच्छाशक्ती निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे....

करण्याची आवश्यकता आहे. सर्व अभिनिवेश बाजूला ठेवून प्रत्येक इंचनइंच जमीन पाण्याखाली कशी आणता येईल यासाठी योजना केली म्हणजे माननीय यशवंतरावांना अभिप्रेत असलेले कृषी औद्योगिक क्रांतीचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल. त्यामुळे जिल्हा हा युनीट मानून जलसिंचनाच्या संदर्भात प्रयत्न केले तर बाकीचे सर्व अभिनिवेश गळून जातील. आपण अजून सुध्दा 1984 साली दांडेकरांनी प्रादेशिक असमतोलाच्या घालून दिलेल्या परिभाषेत विचार करीत आहोत. पूर्व विदर्भामध्ये काही जिल्हयांमध्ये चांगले जलसिंचन झालेले आहे, पश्चिम विदर्भात मात्र जलसिंचन कमी जास्त झालेले आहे. पुढारलेल्या जिल्हयात 2-3 तालुके कायमचे दुष्काळी आहेत असे चित्र आपल्या सर्व राज्यात पहावयास मिळते. त्यामुळे जलसिंचनाच्या संदर्भात जिल्हा युनीट मानले तर चांगल्या प्रकारचे जलसिंचन होऊ शकेल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या व संवेदनशील प्रश्नावर या ठिकाणी आपण चर्चा करीत आहोत. महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आपण साजरे करीत असतांना सभागृहात माझ्या सहकार्यांनी "जय विदर्भाची" घोषणा दिली आहे ती सर्वांना आत्मपरीक्षण करण्यासाठी बाध्य ठरणारी आहे. 1 मे, 1960 रोजी म्हणजे 50 वर्षापूर्वी माननीय यशवंतरावजी चव्हाण यांनी विधानसभेत निवदेन केले.

यानंतर श्री.भारवि.....

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम...

आणि नागपूर करार आम्ही मान्य करतो. नागपूर करारातील सर्व अटींचे पालन करणे आणि याबाबतीत विदर्भातील जनतेने मनात कोणताही किंतू बाळगू नये. मराठवाड्यातील जनतेला सांगू इच्छितो की, आपली पार्श्वभूमी लक्षात घेता योग्य ते आपल्याला मिळेलच. आपल्याला झुकते माप देऊ. असे निवेदन श्री.यशवंतराव चव्हाण यांनी केले होते. 1953 च्या कराराची आठवण करून दिली. मराठी भाषिकांचे राज्य व्हावे म्हणून श्री.यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भातील मराठी भाषिक नेते,मराठवाड्यातील नेते यांच्याशी बसून चर्चा केली. विदर्भाचे नेते श्री.शेषराव वानखेडेजी, श्री.पी.के.देशमुख आणि मराठी समाजाचे नेतृत्तव करणाऱ्या नेत्यांनी काही अटी समोर ठेवल्या. महाराष्ट्र राज्याची निर्मिती करताना विदर्भातील राज्य गमाविणार आहोत. नागपूर हे अत्यंत महत्त्वाचे शहर होते. मध्यप्रदेशची राजधानी होती. तिचा दर्जा गमावून महाराष्ट्रामध्ये येत आहोत. आपण आमचा पुढच्या काळामध्ये योग्य तो विकास कराल याची हमी दिली पाहिजे. त्या चर्चेच्या वेळी काही महत्त्वाच्या अटी मान्य केल्या गेल्या. आपली अनुमती असेल तर नागपूर कराराच्या काही अटी मी वाचून दाखवितो. मुंबई,मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून हे राज्य स्थापन केले जावे. या राज्याच्या सीमेत व मर्यादेत कोणत्याही राज्याचे वेगळे अस्तित्त्व राहू नये. हा नागपूर करारातील एक भाग आहे. ही अट मान्य केलेली असेल तर मला असे वाटते की, स्वतंत्र विदर्भाची मागणी करणे हे या अटीत बसणार नाही. आपण आग्रही राहू. आपण आपल्या अधिकारासाठी संघर्ष करू, भांडू. पण राज्य मोडून आम्ही वेगळे होऊ ही मागणी नागपूर कराराच्या अटीमध्येच मान्य नाही. विविध प्रदेशावर खर्च करावयाच्या निधीचे वाटप त्या त्या प्रदेशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाईल. परंतु मराठवाड्यातील अविकसित स्थिती लक्षात घेता त्या भागाच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष दिले जाईल व याबाबतचा अहवाल राज्य विधानसभे पुढे दरवर्षी ठेवला जाईल. 1960 साली महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. आज आपण 2010 मध्ये आहोत. पण मागच्या 50 वर्षामध्ये राज्य शासनाच्यावतीने विकासाच्याबाबतीत काय केले यासंबंधातील अहवाल सभागृहापुढे आलेला नाही. नागपूर करारातील अटींचा मोठा भंग सरकारने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशारे कदम.....

केलेला आहे, हे मी सरकारच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सरकारच्या रचनेत त्या त्या विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान दिले जाईल. हे ही स्थान दिले गेलेले नाही. खाते वाटप करताना सुद्धा मराठवाडा आणि विदर्भाला काही तरी देणे एवढाच उद्देश असेल तर मला असे वाटते की, हे राज्य न्याय्य पद्धतीने चालते हे मला मान्य नाही. कधी तरी आरोग्य खाते दिले, कधी उच्च शिक्षण खाते दिले. कधी आणखी कुठले तरी खाते दिले. विदर्भाच्या वाट्याला कोणते खाते तर वस्त्रोद्योग.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम..

विदर्भाच्या वाटयाला टेक्सटाईल, कुक्कुटपालन, मेंढीपालन अशा प्रकारची खाती आलेली आहेत तेव्हा असे करता कामा नये. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या वेळी आपली वडील भावाची भूमिका होती कै. यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळी सांगितले होते की] आम्ही तुम्हाला बरोबर घेऊन जाणार आहोत व तुमचा सर्वागीण विकास करणार आहोत. अशा प्रकारे कै. यशंवंराव चव्हाण यांनी जो शब्द दिला होता तो पाळण्याची नेतिक जबाबदारी आजच्या राज्यकर्त्यावर आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना मी सांगू इच्छितो की, यातून कोणालाही पळवाट काढता येणार नाही कोणी असे म्हणत असेल की, जिल्हा वा तालुका घटक धरुन अनुशेष काढण्यात यावा. तेव्हा त्यांना मला असे सांगावयाचे आहे की,अशा प्रकारे अनुशेष काढता येणार नाही. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळी ऐतिहासिक करार करण्यात आला होता.त्यामध्ये महाविदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असे तीन प्रमुख विभाग दाखविण्यात आले होते अनुशेष काढावयाचा असेल तर` प्रादेशिक विभाग लक्षात घेऊनच अनुशेष काढावा लागेल. आज जिल्हा घटक म्हणून अनुशेष काढण्यात यावा असे सांगितले जात आहे. उद्या तालुका घटक धरुन अनुशेष काढण्यात यावा असेही सांगितले जाईल. त्यानंतर काही दिवसांनी खेडे घटक धरुन अनुशेष काढण्यात यावा असे सांगितले जाईल.परंतु अशा प्रकारे अनुशेष काढता येणार नाही. अनुशेष काढत असतांना विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असा विभागवार विचार करावा लागेल असे मला सांगावयाचे आहे. आपण तालुक्यापर्यंत आणि जिल्हयापर्यंत का जाऊ इच्छिता याचे थोडे फार गणित आम्हालाही समजते. नागपूर कराराप्रमाणे अशा प्रकारे अनुशेष काढता येत नाही.सभापती महोदय, मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की,महाराष्ट्र राज्याची एकात्मता वाढविण्यासाठी,महाराष्ट्र राज्य मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला पुढे नेण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. महाराष्ट्र राज्य तोडण्यासाठी प्रयत्न करावयाचा नाही. ही बाब मी पुन्हा एकदा सांगतो. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांनीसुध्दा हेच सागितले होते की, महाराष्ट्र राज्य तोडण्याची निती आम्हाला मान्य नाही. महाराष्ट्र राज्य तोडले जावे असे कोणत्याही मराठी भाषिकाला वाटणार नाही . अनुशेषाच्या बाबतीत फार चर्चा होत असते. त्यासबंधीची आकडेवारी सांगितली तर मुख्य प्रश्न बाजूला राहतो.

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम..

परंतु आकडेवारी सांगणे हा प्रक्रियेचा एक भाग आहे. म्हणून मी थोडी आकडेवारी देऊ इच्छितो. महाराष्ट्राचे पेरणी क्षेत्र 1 कोटी 80 लाख हेक्टर्स असून उर्वरित महाराष्ट्राचे पेरणी क्षेत्र 82 लाख हेक्टर्स आहे, एकूणं् क्षेत्राशी तुलना करता हे प्रमाण 46 टक्के एवढे येते. मराठवाडयातील पेरणी क्षेत्र 47 लाख हेक्टर्स असून एकूण क्षेत्राशी तुलना करता हे प्रमाण 26 टक्के आहे. विदर्भातील पेरणी् क्षेत्र 51 लाख हेक्टर्स असून एकूण क्षेत्राशी तुलना करता हे प्रमाण 28 टक्के आहे.1982 ते 2009 सालापर्यतची आकडेवारी माझ्याकडे आहे. 1982 सालामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र 10 लाख हेक्टर्स एवढे होते .2009 सालामध्ये हे क्षेत्र 24.8 लाख हेक्टर्स एवढे झाले म्हणजे 1982 साली हे प्रमाण साडेबारा टक्के होते आणि 2009 साली हे प्रमाण 30 टक्क्यापर्यत गेलेले आहे. कोणाला आकडेवारी सबंधी चर्चा करावयाची असेल तर आकडेवारी घेऊन बोलण्याची माझी तयारी आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी माझ्या बरोबर बसून यावर चर्चा करावी. मराठवाडयाची 1982 ची सिंचन क्षमता 10 लाख हेक्टर्स होती म्हणजे 1982 साली मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये 2.5 टक्के एवढाच फरक होता. महाराष्ट्र राज्य निर्माण होत असतांना सर्वाचा सर्वागीण विकास करण्याचा शब्द दिला होता.2008 सालातील परिस्थिती मी आज आपल्यासमोर ठेवतो. उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचन क्षमतेची टक्केवारी 30 आहे.मराठवाडयाची 20 टक्के आहे .यामध्ये 10 टक्क्याचा फरक पडला आहे.1982 साली अडीच टक्के फरक होता 1982 ते 2008 या कालाखंडामध्ये अडीच टक्क्याचा फरक 10 टक्क्यापर्यत जाऊन पोहोचला आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम...

ज्याला आपण अनुशेष म्हणतो तो सिंचन क्षेत्राचा अनुशेष 4 पटींनी वाढला आहे. विदर्भाची परिस्थिती सुध्दा अशीच आहे. विदर्भामध्ये 1982 मध्ये सिंचनाचा अनुशेष 8.6 टक्के होता. त्यानंतर सन 2009 मध्ये तो 20 टक्के झाला. म्हणजे 20 टक्के अधिक 9 टक्के याची तुलना केली तर 9 टक्क्यांचा फरक पडतो. अशापध्दतीने गणिताची आकडेवारी केली तर महाराष्ट्राचा आजचा अनुशेष 4 लाख हेक्टरचा आहे, आणि विदर्भाचा अनुशेष 5 लाख हेक्टरचा आहे. आपण अनुशेष दशांशामध्ये मोजत नाही, तो जर मोजला तर 10 लाख हेक्टरच्यावर जाईल. 10 लाख हेक्टरला 1 लाख हेक्टरने गुणिले तर किती शून्य द्यावे हे माझ्या लक्षात येत नाही. अशाप्रकारे गेल्या काही वर्षामध्ये हा अनुशेष निर्माण झाला आहे. सभापती महोदय, यामध्ये "हा सूर्य व हा जयद्रथ" अशापध्दतीने याठिकाणी मी आकडेवारी मांडली. 1982 नंतर काय परिस्थिती होती? व सन 2010 मध्ये काय परिस्थिती होती? कुणाला काय दिले? दिल्लीवरुन काय आणले? अजून कोठूनही आणले तरी हे संपणार नाही. यासाठी आपणा सर्वांना एकत्रित बसावे लागेल व विकासाचे प्रश्न समोर ठेवून अजेंडा करावा लागेल. कोणताही प्रादेशिक अभिनिवेश न ठेवता अगदी शांतपणे करावे लागेल., जल सिंचनाचा प्रश्न हा गरीब शेतकऱ्यांचा प्रश्न असल्यामुळे आमच्या मनामध्ये प्रादेशिक अभिनिवेश नाही. तुमच्या कवठेमहांकाळ, आटपाडी, गंगापूर, मुखेड, कंधार, वैजापूर इत्यादी तालुक्यामधील शेतकरी अर्धपोटी आहे, त्याला सुस्थितीत आणण्याचा प्रश्न आहे. त्याठिकाणी प्रादेशिक विषमतेचे राजकारण करावयाचे नाही. या गरीब शेतकऱ्याला खालून वर उलचण्याचे राजकारण करावयाचे आहे. आम्हाला स्वतंत्र राज्य पाहिजे, आम्हाला खुर्च्या मिळाव्यात म्हणून नाहीत. राज्य तुम्ही करा, परंतु सर्व प्रदेशांना समान न्याय मिळाला पाहिजे. विदर्भ आणि मराठवाडयाने तुमच्या राज्याकडे कधी लक्ष ठेवले नाही. परंतु तुम्ही राज्य करता त्यावेळी तुमची अशी धारणा असली पाहिजे. तुम्ही विदर्भाला विदर्भ म्हणून पाहू नका, मराठवाडयाला मराठवाडा म्हणून पाहू नका. महाराष्ट्र हा एकसंघ आहे अशाप्रकारचे विचार तुमच्या डोक्यात आले पाहिजेत.

सभापती महोदय, सन 1972 मध्ये मुख्यमंत्री पदाचा वाद पेटला. त्यावेळी कै.यशवंतरावांना पुण्याला अडवून सांगण्यात आले की, आमच्या मराठवाडयाला मुख्यमंत्रीपद मिळाले पाहिजे. त्यावेळी कै.यशवंतरावांनी शांतपणे सांगितले की, मी तुमच्याबरोबर चर्चा करतो. तुम्हाला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री व्हावयाचे आहे की, मराठवाडयाचा मुख्यमंत्री व्हावयाचे आहे. माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम...

पिढीमधील वाद हा माझ्याबरोबर जाऊ दे. येणाऱ्या नवीन पिढीने फक्त महाराष्ट्र म्हटले पाहिजे. अशाप्रकारे पाठीवर हात ठेवून कै. यशवंतरावांनी सांगितलेले विचार आजही आमच्यासमोर आहेत. महाराष्ट्र हे महाराष्ट्र राज्य राहिले पाहिजे. याठिकाणी मी अभिमानाने माननीय श्री.शरद पवार साहेबांचे एक उदाहरण देतो. कोकणामध्ये अलिबागच्या परिसरामध्ये मोठे प्रकल्प येऊ घातले होते. त्याठिकाणी हजारो कोटींची गुंतवणूक होणार होती. परंतु त्या उद्योगपतींचे म्हणणे असे की, सरकारने इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण केले पाहिजे. तरच आम्ही हजारो कोटी रुपये टाकू. पाताळगंगाच्या बाजूला प्रकल्प होणार होता. त्यासाठी लागणारे रस्ते आणि बाकीचे इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)

त्यावेळी महाराष्ट्र सरकारकडे त्या उद्योगासाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यासाठी तेवढे पैसे नव्हते. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी त्या भागातील सर्व लोकप्रतिनिधींना बोलाविले. मराठवाडयातील, उर्वरित महाराष्ट्रातील,विदर्भातील लोकप्रतिनिधींना बोलाविले आणि सांगितले की, याठिकाणी हजारो कोटींची गुंतवणूक होणार आहे.आपण त्याठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करुन दिले नाहीतर हे सर्व उद्योग महाराष्ट्राबाहेर जातील.म्हणून माझी विनंती अशी आहे की, आपण आपल्या भागासाठी असलेल्या निधीमधून थोडा थोडा निधी काढून द्या.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमल किशोर कदम . . ..

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बोलत आहेत की, आपण मला आपल्या भागातील जर थोडा-थोडा निधी दिला तर कोकणच्या भूमीमध्ये हजारो कोटी रुपयांची इन्व्हेसमेंट होऊ शकेल आणि कोकणाचा विकास होईल. माननीय श्री.शरदराव पवार यांनी असे सांगितल्यानंतर कोणी नाही म्हणण्याचा प्रश्न नव्हता. त्यावेळेला महाराष्ट्रातील रस्ते बांधणीचा संपूर्ण निधी कोकणामध्ये खर्च केला आणि तेथे एक उत्कृष्ट इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण केले. सर्वांना विश्वासात घेऊन काम करण्याची एक पध्दत असते आणि आपण जर त्यापध्दतीने गेलात तर मग महाराष्ट्रातील मराठवाडा विरोध करणार नाही, विदर्भ विरोध करणार नाही, कोकण विरोध करणार नाही, कोणीही विरोध करणार नाही. तुम्ही सर्वांकडे दुर्लक्ष करुन, माझे कोण काय करतो ? असा विचार करु नका. माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, विधानसभेच्या 288 सभासदांच्या सभागृहाबाबत सांगावयाचे तर विधानसभेच्या निवडणुकीमधून राज्य शासन स्थापन होते. त्याच्यामध्ये मराठवाडा व विदर्भाचे मिळून फक्त 108 सन्माननीय सदस्य आहेत आणि उर्वरित महाराष्ट्राचे 180 सन्माननीय सदस्य आहेत. त्यामुळे सभागृहामध्ये आम्ही बहुमताने कधीही आमच्या मागण्या पूर्ण करु शकणार नाही, तर तेथे उर्वरित महाराष्ट्राचे जे लोकप्रतिनिधी बसलेले आहेत, त्यांच्या सद्सद्विवेक बुध्दीला आव्हान करुन मी सांगू इच्छितो की, विदर्भाला विदर्भ म्हणून न्याय द्यावा, मराठवाड्याला मराठवाडा म्हणून न्याय द्यावा आणि संपूर्ण महाराष्ट्राला मजबूत करण्याची नैतिक जबाबदारी तुम्ही उचलावी आणि मराठवाडा मागासलेला आहे, विदर्भ मागासलेला आहे म्हणून आम्हाला काहीतरी द्या, आम्हाला काहीतरी द्या हे आम्हाला परत-परत सांगण्याची वेळ येऊ नये. नागपूर करारामध्ये असे म्हटलेले आहे की, तुम्ही काय दिले ? किती विकास केला ? आम्ही त्याचा आढावा दरवर्षी या सभागृहासमोर ठेऊ आणि त्याच्यावर चर्चा करु.

सभापती महोदय, वैधानिक विकास मंडळ होऊन अनेक वर्षे झाली. परंतु सरकारने या वैधानिक विकास मंडळाचा अहवाल या सदनाच्या पटलावर ठेऊन, त्यावर एखाद्या दिवशी चर्चा केल्याचे मला आठवत नाही.खरे म्हणजे या अहवालांवर दरवर्षी चर्चा व्हावयास पाहिजे. माननीय राष्ट्रपतींचे निर्देश गेल्यानंतर आणि दुसऱ्या वर्षीचे बजेट मांडण्यापूर्वी कमीत कमी तीन दिवस वैधानिक विकास मंडळाच्या सर्व तरतुदी आणि त्याबाबतीत कोणती अंमलबजावणी झालेली आहे यावर सदनामध्ये चर्चा व्हावयास पाहिजे. पण तशा प्रकारची चर्चा होत नाही. आम्ही बोलत नाही,

. . . .3 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण राजकारणामध्ये बोलून कोणाला दुखवावेसे वाटत नाही. पण ही स्विकारलेली जबाबदारी आहे. कै.यशवंतरावजी चव्हाणसाहेबांनी दिलेला शब्द आहे. त्यानंतर तो शब्द पाळण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे आणि माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदरावजी पवार यांच्यापर्यंत त्यांनी ही जबाबदारी उत्कृष्टपणे सांभाळली. पण नंतरच्या काही वर्षामध्ये याकडे दुर्लक्ष झालेले आहे हे मला दुर्दैवाने सांगावे लागत आहे. माझी आपणाला नम्र विनंती आहे की, सर्वांना बरोबर घेऊन चालण्याची जबाबदारी राज्यकर्ते म्हणून आपली आहे आणि ही जबाबदारी पार पाडत असताना मला असे वाटते की, कोणात्याही विभागाविषयी मनामध्ये किंतू ठेऊ नका. मला असे वाटते की, विदर्भाची जनता सुध्दा राज्य तोडून दुसरीकडे जाण्यासाठी फार आसुसलेली आहे असे नाही. पण अगोदरही संकटात होतो, त्यावेळी आपण फार मोठया आशेने यामध्ये सहभागी झालो, पण अजूनही येथे देखील काही होत नाही. तर मी फक्त एवढेच म्हणेन की,

हर दौर में फरेब के उन्वान बदलते गए
शोलों से बचे तो शबनम से जल गए

ऐसा मत होने दो. आम्ही तुमच्या खांद्यावर विश्वासाने मान ठेवलेली आहे. तुम्ही मित्र म्हणून आम्हाला छातीला लावा. पण चुकूनही आमची मान कापली जाईल असे काही करु नका एवढेच या प्रसंगी सांगतो आणि परत एकदा माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो, ते तरुण आहेत, धाडसी आहेत, त्यांना कामाचा उत्साह आहे आणि कामाची समज आहे, फक्त तुम्ही महाराष्ट्राचे व्हा. अजितदादा, तुम्ही महाराष्ट्राचे व्हा. तुमच्यातील जे सर्व गुण आहेत, ते तुम्ही संपूर्ण् महाराष्ट्र मजबूत करण्यासाठी वापरावेत एवढीच मी आपणाला विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीर्षकीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा सुरु आहे. मराठवाडयाला आणि विदर्भाला न्याय देण्यासाठी खऱ्या अर्थाने ज्या शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण सगळे मिळून सातत्याने या सभागृहामध्ये प्रश्न मांडीत असतो. त्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी मराठवाडा असो किंवा विदर्भ असो ही विकास मंडळे राहिली पाहिजेत, त्यांना मुदतवाढ दिली पाहिजे या उद्देशाने गेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे साहेबांनी हा प्रस्ताव मांडलेला हेता. दिनांक 30 एप्रिल रोजी या मंडळाची मुदत संपत आहे. दिनांक 30 एप्रिल,1984 रोजी माननीय राज्यपालांनी मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यांच्यासाठी विकास मंडळ 1994 या शिर्षकाखाली हा आदेश काढलेला आहे. त्यानंतर माननीय राज्यपालांनी दिनांक 21 जून,1984 रोजी या विकास मंडळांची स्थापना राज्यामध्ये केली. दिनांक 30 एप्रिल, 1999 रोजी पाच वर्षाचा अवधी या वैधानिक विकास मंडळानी पूर्ण केला. भारताच्या महामहीम राष्ट्रपती महोदयांनी या तिन्ही मंडळाचा अवधी आणखी पाच वर्षांनी म्हणजेच दिनांक 30 एप्रिल,2004 पर्यंत वाढविण्याचे काम केलेले आहे. त्यानंतर हा अवधी आणखी एक वर्षांनी वाढविण्याचे काम झाले. दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या आदेशाद्वारे विकास मंडळाचा अवधी आणखी पाच वर्षांनी म्हणजे दिनांक 30 एप्रिल,2010 पर्यंत वाढविला. हा अवधी आता दिनांक 30 एप्रिल,2010 रोजी संपणार आहे. यासंदर्भात विधानसभेत चर्चा झालेली आहे. आता याठिकाणी चर्चा होत आहे. खऱ्या अर्थाने विदर्भाला आणि मराठवाडयाला न्याय द्यायचा असेल तर या वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ दिली पाहिजे.

सभापती महोदय,या वैधानिक विकास मंडळाची स्थापना कां करण्यात आली? राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन तिन्ही प्रदेशामध्ये विकासखर्चाच्या निधीचे समसमान वाटप व्हावे या उद्देशाने या वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाली. त्याचे दोन उद्दिष्ट ठेवली गेली. संपूर्ण राज्याच्या गरजा लक्षात घेऊन तीन प्रदेशामध्ये तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी निर्माण करुन देणारी समसमान न्यायव्यवस्था या ठिकाणी निर्माण करणे हा उद्देश या वैधानिक विकास मंडळाचा ठेवण्यात आलेला आहे. ज्यावेळी ही विकास मंडळे अस्तित्वात आली त्यावेळी या तिन्ही विभागामध्ये नेमका अनुशेष किती आहे? याचा शोध घेण्याचे काम झाले. श्री. व्ही.एम. दांडेकर

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

यांच्या अध्यक्षतेखाली 1983 मध्ये समिती नेमली गेली. या समितीने अहवाल दिला. विदर्भामध्ये त्यावेळी 1246.55 कोटी रुपयाचा अनुशेष होता. मराठवाडयामध्ये 750.85 कोटी रुपयाचा अनुशेष होता. आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये 1189.38 कोटी रुपये इतका अनुशेष होता. दर पाच वर्षांनी याचा आढावा घेतला जातो. त्यानंतर या वैधानिक विकास मंडळांनी किती उद्दिष्ट साध्य केलेले आहे, कुठपर्यंत अनुशेष गेलेला आहे याचा विचार करण्यासाठी पुन्हा एकदा 1995 मध्ये एक समिती गठीत करण्यात आली. या समितीने आपला अहवाल दिनांक 27 सप्टेंबर,2000 रोजी माननीय राज्यपालांना सादर केला. त्यावेळी अशी परिस्थिती होती की,विदर्भामध्ये 6624.2 कोटी रुपये इतका अनुशेष राहिला. मराठवाडयामध्ये 4004.55 कोटी इतका अनुशेष राहिला. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 3378.20 कोटी अनुशेष राहिला.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

निधीचे वाटप समसमान व्हावे, अनुशेष दूर व्हावा या उद्देशाने या वैधानिक विकास मंडळांची स्थापना केली. परंतु मी जी आकडेवारी वाचून दाखविली त्यानुसार असमतोल वाढत गेला आहे. त्या ठिकाणी अनुशेष वाढत चाललेला दिसतो. आता 2008 मध्ये काय परिस्थिती आहे ? मराठवाडा वैधानिक विकास मंडळ केवळ सिंचनासाठी स्थापन केलेले नाही तर सिंचनाबरोबरच आरोग्य, शिक्षण, उच्चशिक्षण, तंत्रशिक्षण यामधील जो अनुशेष आहे तो दूर झाला पाहिजे या उद्देशाने हे मंडळ स्थापन झालेले आहे. 1 एप्रिल, 2008 रोजी सिंचनाचा जो अनुशेष होता त्यामध्ये विदर्भामध्ये 2196.84 कोटी रुपयांचा अनुशेष होता. मराठवाड्यामध्ये 535.87 कोटी रुपयांचा अनुशेष होता आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये अनुशेष शून्य टक्क्यावर आला. म्हणजे त्या भागाचा सगळा अनुशेष दूर झाला. एकीकडे तीनही भागांसाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन झाली त्यामध्ये मराठवाड्याचा अनुशेष तसाच राहिला, विदर्भाच्या अनुशेषामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली परंतु उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष शून्यावर आला. ही जादू कशी काय झाली ? उर्वरित महाराष्ट्रामध्ये जी जादू झाली तशी जादू विदर्भ आणि मराठवाड्यासाठी व्हावयास पाहिजे होती. म्हणूनच आम्ही या ठिकाणी या वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढवावी असे म्हणत आहोत. या ठिकाणी माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. या अनुषंगाने मी विनंती करतो. मराठवाड्यामध्ये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ 1998 मध्ये सुरु झाले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामध्ये अहमदनगर आणि नाशिक या भागाचा सुध्दा समावेश झालेला आहे. त्या अनुषंगाने 10 मोठे प्रकल्प, 58 मध्यम प्रकल्प आणि 497 लघु पाटबंधारे प्रकल्प त्या ठिकाणी पूर्ण झालेले आहेत. ते सगळे प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे शेतकऱ्यांची 7.29 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे. आज 20010-20011 मध्ये या महामंडळाच्या अंतर्गत 14 मोठे प्रकल्प, 12 मध्यम प्रकल्प आणि 364 लघु पाटबंधारे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांच्या प्रयत्नामुळे हे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत हे मला आवर्जून नमूद केले पाहिजे. मराठवाड्यामध्ये हे प्रकल्प पूर्ण झाले तर शेतकऱ्यांची 83 हजार 330 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. आजही आम्ही 21 टीएमसी पाण्यासाठी भांडत आहोत. मराठवाड्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

आणि उस्मानाबादच्या वाट्याला आलेले 21 टीएमसी पाणी, मराठवाड्याच्या हक्काचे पाणी त्या ठिकाणी आणण्यासाठी माझे वडील शिक्षक आमदार कै. वसंत काळे यांनी हे पाणी आम्हाला मिळाले पाहिजे यासाठी दोन्ही शासनाच्या विरोधात भूमिका घेतली. मराठवाड्यामध्ये पाणी परिषद घेतली आणि आम्हाला हक्काचे 21 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे यासाठी आग्रह धरला. 23.8.2007 रोजी 2382.50 कोटी रुपयांची प्रशाकीय मान्यता कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने दिली. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर उस्मानाबाद जिल्ह्यातील जवळपास 92 हजार 111 हेक्टर एवढी जमीन सिंचनाखाली येणार आहे. परंतु 2009 पर्यंत फक्त 17.29 कोटी रुपये एवढीच तरतूद झालेली आहे. प्रकल्प 2382 कोटी रुपयंचा आहे आणि फक्त 17.29 कोटी रुपये मंजूर केले. आज नांदेड जिल्ह्यातील प्रकल्प बघितले तर लेंडी प्रकल्प हा आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्राचा संयुक्त प्रकल्प आहे. तो प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बाभळीचा उच्च पध्दतीचा बंधारा त्या ठिकाणी होत आहे. परंतु त्याबाबतचा वाद सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलेला आहे. त्या बंधाऱ्याचे काम होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, एक अभिनंदनीय बाब नमूद करु इच्छितो. या राज्यामध्ये एक नवीन संकल्पना आणली आणि त्याचा पहिला प्रयोग मराठवाड्यामध्ये केला. त्या ठिकाणी नदीवर बॅरेजेस बांधण्याचे काम झाले. आज मराठवाड्यामध्ये लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातून मांजरा नदी वाहते त्या नदीवर 7 बॅरेजेस बांधण्याचे काम हाती घेतले आहे. त्यापैकी 4 बॅरेजेसची कामे पूर्ण झालेली आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांनी स्वत: जाऊन त्या ठिकाणी कामांची पाहणी केली तसेच क्वालिटीच्या बाबतीत कोणतीही तडजोड करावयाची नाही अशी भूमिका त्यांनी त्या ठिकाणी घेतली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

त्यामुळे एक सुंदर चित्र दिसते आहे. कोणी हेलिकॉप्टरमधून पाहतात. मी काही अजून हेलिकॉप्टरमधून पाहिलेले नाही. परंतु वरुन जात असताना या बॅरेजद्वारे पाणी अडविल्यामुळे ही नदी संपूर्णपणे पाण्याने भरली असल्याचे दिसते. त्यामुळे तेथील भागाची सिंचन क्षमता वाढली आहे, ही नदी शेतक-यांना वरदान ठरली आहे. यासाठी मी सन्माननीय मंत्री महोदय, श्री.अजित पवार यांचे अभिनंदन करीन. त्या भागातील शेतकऱ्यांनी उर्वरित बॅरेजेसची मागणी केलेली आहे. ती तात्काळ मंजूर करावी, त्यासाठी लागेल तेवढा निधी द्यावा, हा बाणेदारपणा भविष्य काळामध्ये ते दाखवतील आणि सिंचनाच्या बाबतीत मराठवाडा व विदर्भाला न्याय देण्याचे काम करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. विदर्भ व मराठवाडयाला न्याय द्यावयाचा असेल तर वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढवावी अशी मागणी करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी विदर्भ व मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागाचा जलसिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व विभागांचा समान विकास झाला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. आज परिस्थिती पाहिली तर या दोन्ही मंडळांना मुदतवाढ मिळावी अशाप्रकारचा हा प्रस्ताव आहे. मी कोकण विभागाचा प्रतिनिधी म्हणून एवढेच सांगेन की, या प्रस्तावाला कोणीही विरोध करणार नाही. परंतु कोकणाला सुध्दा समान न्याय मिळाला पाहिजे. महाराष्ट्रातील जे जे विभाग आहेत त्यांना समान न्याय दिला पाहिजे आणि त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, सुरुवातीपासून कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याची मागणी केली होती. त्यासाठी दोन वेळा ठराव करुन केंद्र सरकारकडे पाठविले. त्याचा विचार करता, उर्वरित महाराष्ट्रामध्ये कोकणाचा समावेश आहे. त्यामुळे कोकणावर वेगवेगळया कामांच्या माध्यमातून अन्याय होत आहे, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनीही केला आहे. सभापती महोदय, जलसिंचनाचा समान विकास का होत नाही असा माझ्यासमोर प्रश्न पडतो. विदर्भामध्ये 57 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते, त्यापैकी 10 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे म्हणजे 16 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. मराठवाडयामध्ये 56 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकते, त्यापैकी 9 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आली आहे. म्हणजे जवळजवळ 16 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 15 लाख 68 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते, त्यापैकी 1 लाख 4 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे म्हणजे केवळ 5 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. म्हणजे एकीकडे विदर्भ व मराठवाडा या दोन्ही विभागांमध्ये 16 टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली असताना दुसरीकडे कोकणात मात्र केवळ 5 टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. म्हणून या वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देत असताना याही गोष्टीचा विचार केला जाणार आहे की नाही ? दांडेकर समितीने अनुशेष काढला

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ SBT/

श्री.राजन तेली....

आहे. आज आपण भौतिक अनुशेषाबाबत बोलत आहोत. भौतिक अनुशेषावर बोलावयाचे असेल तर रत्नागिरीचा 16.94 हेक्टर भौतिक अनुशेष आहे. विदर्भ व मराठवाडयाचा अनुशेष काढण्यासाठी दांडेकर समिती नेमली गेली तशी महाराष्ट्रातील सर्व विभागांचा भौतिक अनुशेष काढण्यासाठी समिती नेमावी, तोपर्यंत थांबता येते का ते पहावे. जर थांबता येत नसेल तर कोकण वैधानिक विकास मंडळाला मान्यता कशी मिळेल यासाठी प्रयत्न करावेत तरच सर्व भागाला न्याय मिळणार आहे. मी उदाहरण म्हणून सांगेन की, कोकणात 6 हजार 500 कोटींच्या प्रकल्पांची कामे सुरु आहेत. परंतु या कामासाठी कदाचित 450 कोटी दिले जातील, त्यामध्ये 396 कोटी रुपये जुन्या कामासाठी असतील. त्यामुळे ही सर्व कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी किती वर्षे लागतील याचा विचार करावा लागेल. या कामांसाठी आणखी 50 वर्षे लागतील की काय असा प्रश्न माझ्यासमोर आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली...

मी एक उदाहरण सांगतो. 1986 साली तिल्लारी प्रकल्पाची कॉस्ट 48 ते 50 कोटी रुपये होती ती आता 1612 कोटी इतकी झालेली आहे. जुन्या टाळंबा प्रकल्पाची कॉस्ट 10 वर्षापूर्वी 300 कोटी रुपये होती ती आज 850 कोटीच्याही पुढे गेलेली आहे. अशा प्रकारे वर्षे वाढत गेली तर किती तरी अनुशेष निर्माण होईल. मग एक वेळ महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त अनुशेष हा कोकणाचा असल्याचे चित्र निर्माण होईल. म्हणून राज्याचा विचार करीत असताना कोकणाचाही विचार व्हायला पाहिजे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांना मी सांगू इच्छितो की, या सभागृहामध्ये कोयनेच्या पाण्यासंबंधीचा प्रश्न सातत्याने मांडला जात आहे. या पाण्यापासून 67 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकेल आणि मुंबई, नवी मुंबई, ठाणे या भागांचाही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. तेव्हा याबाबतीत राष्ट्रीय प्रकल्प होण्याकरिता सर्व्हे करण्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदय श्री. अजितदादा पवार यांना मनापासून धन्यवाद देतो. तसेच आपण जो निधी उपलब्ध करुन देणार आहात त्यामध्ये ठेकेदारांची मागील देणीही देण्याच्या रकमेचाही समावेश करावा. जुन्या प्रकल्पांची कामे 60 ते 70 टक्के झालेली आहेत. घळ भरणीची कामे व्हावयाची आहेत, असे काही प्रकल्प आहेत. हे प्रकल्प मार्गी लागण्याच्या दृष्टीने तरतूद करावी अशी मी विनंती करतो. राज्य शासन दोन वैधानिक विकास मंडळांच्या बाबतीत विचार करणार आहे. मी त्यास विरोधी करणार नाही. कारण आमच्या पक्षाच्या अध्यक्षांनी हा ठराव आणलेला आहे. परंतु कोकण वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीतही केन्द्र सरकारकडे राज्य सरकार आग्रह धरणार आहे की नाही यासंबंधीचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये करावा. भविष्यामध्ये साडेसहा हजार कोटीचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीचे नियोजन करावे अशी आग्रहाची मागणी करुन, सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एका कवीने असे म्हटलेले आहे की,

उंचावरुन वाहणा-या ढगांनी
थोडं खाली यावं
मातीमध्ये मळलेल्या जीवाला
अलगदपणे उचलून घ्यावं.

तेव्हा सन्माननीय मंत्री महोदय, श्री. अजित पवार यांना माझी विनंती आहे की, मराठवाडा आणि विदर्भ यामधल्या सर्वसामान्य जीवांना उचलून घेण्याचे काम करावे. कारण आपले हात लांब आहेत. मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. केन्द्र शासनाने एक तज्ज्ञ समिती गठीत केलेली आहे. त्या तज्ज्ञ समितीने देशामधील कृषी-मागास जिल्ह्यांची यादी जाहीर केलेली आहे. कृषी-मागास जिल्हे 100 आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील 11 जिल्हे आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश जिल्हे आहेत. याचा अर्थ असा की, मराठवाडा आणि विदर्भ हे आर्थिकदृष्टया, औद्योगिकदृष्टया मागासलेले आहेत. कृषीच्या दृष्टीने मागासलेले आहेत. शैक्षणिक मागासलेपणही दुर्दैवाने आमच्या वाटयाला आलेले आहे. म्हणून वैधानिक विकास मंडाळाला मुदत वाढ देणे ही काळाची गरज आहे. केन्द्रीय विकास नियोजन व मूल्यमापन समितीने वैधानिक विकास मंडळांची कार्यकक्षा वाढवावी असा आग्रह धरलेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

30 तारखेला या मंडळांची मुदत संपत आहे. कार्यकक्षा कशी वाढविणार आहात? वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ दिल्यानंतरच कार्यकक्षा वाढेल. त्यामुळे अगोदर वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. निम्न मानवी विकासामध्ये विदर्भ आणि मराठवाडा हा पश्चिम महाराष्ट्र, मुंबई आणि पुण्याच्या तुलनेत प्रचंड मागे आहे. मानवी दारिद्र्य निर्देशांक मराठवाड्यातील बीड जिल्हयाचा 21.21 टक्के, जालना जिल्हयाचा 22.14 टक्के, परभणी जिल्हयाचा 22.50 टक्के आहे. म्हणजे मराठवाडा आणि विदर्भामध्ये प्रचंड दारिद्र्य आहे. हे दारिद्र्य दूर तेव्हाच होऊ शकते, जेव्हा राज्य शासन वेगळा विकास निधी या भागाला देण्यासाठी तरतूद करु शकेल. तरच आमच्या भागातील दारिद्र्य कमी होऊ शकेल. म्हणून या वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ द्यावी असा आग्रह आहे. 1995 ते 2007 या 12 वर्षाच्या काळात ज्या आर्थिक तरतुदी करण्यात आल्या त्यापेक्षा कमी खर्च झालेला आहे. 3770.58 कोटी रुपयांची तरतूद प्रत्यक्षात करण्यात आली आणि 2384.02 कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च झाला. म्हणजे प्रत्यक्षात झालेला खर्च 63.2 टक्के आणि न झालेल्या खर्चाची टक्केवारी 33.8 आहे. 2004-05 या वर्षात फक्त 10.7 टक्के खर्च झाला. तरतूद एकीकडे केली जाते आणि निधी दुसरीकडे वळविला जातो. मराठवाड्याचा 1059.20 कोटी रुपयांचा सिंचनाचा अनुशेष आजही शिल्लक आहे. प्रामुख्याने उस्मानाबाद आणि जालना जिल्हयांचा यामध्ये समावेश आहे.

भौतिक अनुशेषाबाबत सांगू इच्छितो की, सिंचनासाठी मराठवाड्याला 21 टीएमसी पाणी मिळालेले नाही. उस्मानाबाद आणि बीड जिल्हयाला 21 टीएमसी पाणी कसे मिळू शकेल यादृष्टीने राज्य शासनाने तरतूद करावी अशी आग्रहाची विनंती करतो. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे. पैठण धरणाच्या वरच्या बाजूला 8 धरणे आहेत. त्याखाली शेकडो पाझर तलाव, गाव तलाव व साठवण तलाव आहेत. ही धरणे भरतील, त्यानंतर त्या धरणामधून पाझर तलाव, गाव तलाव व साठवण तलाव भरतील. त्यानंतर पैठणच्या धरणामध्ये पाणी येणार आहे. हे मराठवाड्याचे दुर्भाग्य आहे. पैठणचे धरण आज गाळाने भरलेले आहे. गाळ साचल्यामुळे जवळजवळ 600 दशलक्ष घनमीटर पाणीसाठा कमी झाला आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, पैठणच्या धरणामध्ये 218 दशलक्ष घनमीटर पाणी साठले पाहिजे. वरच्या भागात नगर जिल्हयामध्ये जे काही पाणी वापरले जाते त्यापैकी अनुज्ञेय पाणी किती आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

आणि प्रत्यक्ष किती पाणी वापरले जाते याचा आढावा घेण्याची गरज आहे. छत्रपती शिवरायांचे आपण नाव घेतो. छत्रपती शिवरायांनी रंजलेल्या, गांजलेल्या जिवांना बरोबर घेतले. सर्वसामान्यांचा उत्कर्ष व्हावा म्हणून त्यांनी स्वराज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अंबारीत बसून राज्य केले नाही, घोड्यावर बसत होते. त्यांना माहिती होते की, आमचे मावळे घोड्यावर बसतात, त्यामुळे मी अंबारीत बसून चालणार नाही. मलाही घोड्यावर बसावे लागेल. हिंदवी स्वराज्य उभे करावे लागेल. त्यांनी त्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले. आम्ही मुंगीवर बसलो आहोत. या मुंगीवर बसलेल्या लोकांना अलगद उचलून घेतले पाहिजे.

नंतर 3क्यू.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

गरिबांचा संपूर्ण विकास करण्याचा संकल्प यापूर्वीच्या नेत्यांनी केलेला आहे. नागपूर करारामध्ये काय तरतुदी होत्या, काय अटी होत्या यामध्ये मी काही जाणार नाही. आश्वासन पाळण्याची जबाबदारी शासनाची आहे आणि ही जबाबदारी शासन पाळल्याशिवाय राहणार नाही अशी मला खात्री आहे. जाता जाता मी कविवर्य विठ्ठल वाघ यांची एक कविता आपल्याला सांगतो.

पान नाही , फल नाही
आला ऋतू कुठं गेला
भिरभिर पाखराचा जीव झुरणी लागला.

सभापती महोदय, दुसरी कविता अशी आहे की,

चिच नदीच्या काठची
तिची मायाळू सावली
तिचा गळता फुल्लोर एक
डाव तरी पाय
मैना उडून गेल्यान
माहा उदास पिपय.

सभापती महोदय, या प्रस्तावावर मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे तसेच अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वयेचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. या भारत देशात महाराष्ट्र राज्याची एक उज्वल परंपरा आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला यावर्षी 50 वर्षे पूर्ण झाल्यामुळे आपण सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आपल्या राज्याचा कानाकोप-यात विकास झाला परंतु काही बाबतीत मात्र विकास झाला नाही आणि तो म्हणजे, शिक्षणाचा, सिंचनाचा आणि नोक-यांचा विकास झाला नाही. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी 1972-73 मध्ये हरित क्रांतीची योजना आणली तेव्हा पासून महाराष्ट्राचा ख-या अर्थाने विकास सुरु झाला. हा विकास होत असतांना मात्र विदर्भ, मराठवाडा, कोकण, उर्वरित महाराष्ट्र या भागांचा विकास इतर भागांसारखा झाला नाही. त्यामुळे या भागाचा विकास करण्यासाठी आपल्याला फार कष्ट घ्यावे लागणार आहेत. मी शासनाला विनंती करतो की, ज्या प्रमाणे जलसिंचनाचा अनुशेष आहे त्या प्रमाणे विदर्भ, मराठवाडयामध्ये शिक्षणाचा देखील फार मोठा अनुशेष आहे. मुंबई, पुणे किंवा इतर ठिकाणी बघितले तर त्या ठिकाणी कॉलेजेस, शाळा, वैद्यकीय कॉलेजेस, इंजिनिअरींग कॉलेजेस हे विदर्भ, मराठवाडयांपेक्षा किती तरी पटीने जास्त आहेत. विदर्भ-मराठवाडयात हे प्रमाण फार अल्प असल्यामुळे या ठिकाणचे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत खोटरे....

कारण ते दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे नोकरीचा देखील अनुशेष आहे. येथे सर्व सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत. जो भाग अविकसित असेल त्याला जास्तीतजास्त निधी उपलब्ध करून द्यावा एवढीच मी मागणी करीत आहे. विदर्भ,मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र यासाठी असलेल्या वैधानिक विकास महामंडळाची मुदत 30 एप्रिल 2010 आहे. ती वाढवून देण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे. आपण मराठी भाषिक आहोत. आपल्याला अखंड, संपूर्ण महाराष्ट्र हवा आहे. त्याचे तुकडे करू नका. महाराष्ट्राला आपण कणखर देश, दगडांचा देश म्हणतो. तो तसाच राहू द्यावा, एवढेच मी सांगू इच्छितो. येथे मोठ्या मनाची माणसे आहे. श्री.अजितदादा पवार आता सभागृहात आहेत. मी काही राजकारणी नाही. मी या सभागृहात 5-6 वर्षे आहे. श्री.अजितदादा पवार यांनी विदर्भ-मराठवाड्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. पण ते थोडेसे अपुरे आहेत. जलसिंचनाचा अनुशेष आहे, तो भरून काढण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, येथे उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेवर अत्यंत थोडक्यात विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. वैधानिक विकास महामंडळाला मुदतवाढ द्यावी अशा एक सूर या चर्चेमध्ये आहे. त्याच वेळी मराठवाड्याचा भौतिक अनुशेष कमी होण्याऐवजी वाढला आहे,अशी विरोधाभासाची परिस्थिती आपल्यासमोर येते. तरीही अशा प्रकारची वैधानिक विकास महामंडळे कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रसाठी पाहिजे अशी मागणी पुढे येते. तेव्हा या गोष्टींचा समन्वय कसा होऊ शकेल असा प्रश्न निर्माण होतो. खरा प्रश्न ऑप्टीमम युटिलायझेशन ऑफ वॉटर रिसोर्सेसचा आहे. त्याच बरोबर पर्यावरणाची अवस्था देखील बदलत चालली आहे. त्यामुळे लहरी झालेला पाऊस, अचानक येणारे पूर किंवा अजिबात पर्जन्यवृष्टी न झाल्यामुळे येणारे दुष्काळ याचे चक्र आपल्या भोवती सदैव फिरत असते. त्यामुळे पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्यासाठी किती पाणी लागणार आहे, उद्योगासाठी किती पाणी लागणार, शेतीसाठी किती पाणी लागणार आहे याची विभागवार आखणी नियोजनबद्धरितीने पुढच्या काळासाठी करावी लागणारी आहे. शेतीला पाणी द्यायचे म्हणतो त्यावेळी साहजिकच विजेची जोड निश्चित लागते. अशा वेळी आपण औष्णिक वीज प्रकल्प आणण्याचे प्रयत्न करतो त्यालाही मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. तिथेही आपल्याला स्थानिक विरोधाला सामोरे जावे लागते. त्यामुळे आपल्याकडे असलेली जलसंपदा आणि ऊर्जा खाती एकत्रित केलेली आहेत. त्यामुळे आपल्याला निश्चितपणे असमतोल दूर करता येऊ शकेल. विदर्भाच्या संबंधातील अनेक समस्या येथे मांडलेल्या आहेत. आमचे सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन झव्हेरी म्हणतात की, अतिशय नैसर्गिक संपत्तीने सपन्न असा विदर्भात काही भाग आहे. ज्याची खनिज संपत्ती देखील फार महत्त्वाची आहे. त्याचे रक्षण देखील फार महत्त्वाचे आहे. या भागातील सामान्य शेतकरी शेती करायला जातो. त्याला नक्षलग्रस्त समस्यनेसुद्धा ग्रासलेले आहे. त्यामुळे ह्या सगळ्या गोष्टींचा ताळमेळ पुढच्या काळामध्ये घालावा लागणार आहे. तसेच जलसंपदाची उपलब्धता करून देऊन हा प्रश्न सुटणार नाही. पुढच्या काळात जे नवे प्रश्न निर्माण होतील त्याला कसे सामोरे जायचे याची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

सुरूवात या महामंडळाच्या चर्चेतूनच सुरू होते. पुढच्या काळामध्ये शेतकऱ्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन आणि त्यांच्या ज्या काही गरजा आहेत त्या विचारात घेतल्या पाहिजेत. नुसती जलसंपदा असून उपयोग नाही. शेती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी याचा वारंवार उल्लेख अनेक चर्चेच्या निमित्ताने या सभागृहात होतो. मग खत असो, औषधे असो,बी-बियाणे असो,त्यावर प्रक्रिया करणरे कारखाने असो,

यानंतर श्री.गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री हेमंत टकले...

या सगळयाचे नियोजन या मूळ विषयाशी जोडले गेलेले आहे. त्यामुळे त्याचे सरंक्षण करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणें आपण विजेची गळती थांबवितो त्याचप्रमाणे जलसंपदेची गळती थांबविणे सुध्दा गरजेचे आहे. नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जी जलसंपदा आज आपल्याकडे आहे ती संरक्षित कशी राहील तिचे चांगल्या प्रकारे संरक्षण कसे करता येईल, या दृष्टीने आपल्याकडे यंत्रणा असण्याची आवश्यकता आहे. 1952-53 सालापासून ते 2010 सालापर्यंतच्या वाटचालीचा आढावा या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी घेतला आहे. खूप आशेने या शासनाकडे आपण बघत आहोत. विशेष करुन जलसंपदा खात्याचा कारभार ज्या मंत्र्यांकडे आहे त्या मंत्र्यांकडे आपण सर्वजण मोठया आशेने पहात आहोत. त्यांची काम करण्याची पध्दत चांगली आहे, कामामधील दर्जा जपण्याच्या बाबतीत त्यांचा असलेला आग्रह, त्यानंतर भविष्य काळात येणा-या समस्यांना सामोरे जाण्याची तयारी या सर्व दृष्टीने परिपूर्ण असे नेतृत्व करण्याचे आव्हान पुढच्या काळासाठी आपल्याकडे आहे. त्याचा आपण समर्थपणे मुकाबला कराल, इतकेच नव्हे तर विदर्भातील, मराठवाडयातील, खानदेशातील, कोकणातील आणि संपूर्ण महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यासह सगळयांना आपण योग्य तो न्याय आपल्या योग्य त्या नीतीने, धोरणाने आणि अंमलबजावणीने पुढील काळात द्याल, असा विश्वास व्यक्त करतो आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल, आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामुळे मी फार वेळ घेणार नाही आणि विषयाची पुनरावृत्ती करणार नाही. सभापती महोदय, हा प्रस्ताव डिसेंबर 2009 च्या नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी मांडला होता.परंतु वेळे अभावी त्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. म्हणून तो ठराव ऑन लेग ठेवून मार्च एप्रिलच्या अधिवेशनामध्ये त्यावर चर्चा केली जाईल, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. सभापती महोदय, हा प्रस्ताव पहिल्याच आठवडयात घेण्यात येऊन त्यावर चर्चा घडवून आणावी, त्याप्रमाणे पहिल्या आठवडयात या प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन केन्द्र सरकारला विनंती करणारा प्रस्ताव एकमताने सभागृहाने मंजूर करावा. या साठी कामकाज सल्लागार समितीमध्ये आग्रह धरण्यात आला होता, असे सन्माननीय सदस्यं श्री. दिवाकर रावते यांनी संगितले आहे. त्याप्रमाणे पहिल्या आठवडयात या प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन केन्द्र सरकारला विनंती करणारा प्रस्ताव एकमताने सभागृहाने मंजूर करावा. परंतु या अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात वा दुस-या आठवडयात हा प्रस्ताव आला नाही तर अधिवेशनाच्या शेवटच्या आठवडयात हा प्रस्ताव चर्चेसाठी ठेवण्यात आलेला आहे. या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. हा प्रस्ताव विरोधी पक्षाने आणावा की सत्ताधारी पक्षाने आणावा याबाबतीत चर्चा सुरु असतांना सर्व पक्षीय प्रस्ताव असला पाहिजे, असे मत पुढे आले आणि त्यानुसार सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या प्रस्तावावर प्रथम आपले विचार मांडावेत, असे ठरले त्याला आम्ही सर्वांनी संमती दिली. त्यानुसार हा प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आला आहे.

सभापती महोदय, हा प्रस्ताव अत्यंत विस्तृत स्वरुपात आहे. परंतु वैधानिक विकास मंडळाची मुदत 30 एप्रिल 2010 रोजी संपत असल्यामुळे, ही मुदत वाढवण्यासबंधी केन्द्र सरकारला विनंती केली पाहिजे, असा या प्रस्तावाचा अर्थ निघत आहे. वैधानिक विकास मंडळाची मुदत 30 एप्रिल 2010 रोजी संपत आहे आणि या मंडळाची मुदत वाढविण्यासाठी केन्द्र सरकारला राज्य सरकार शिफारस करीत आहे असा एक ओळीचा जर प्रस्ताव शासनाने मांडला असता तर

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

यावर सविस्तर चर्चा करण्याची वेळ आली नसती. परंतु दुर्दैवाने तसे न घडल्यामुळे हा प्रस्ताव आणावा लागत आहे. खानदेश आणि कोकण भागासबंधी ज्या सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या त्या भावनाशी मी सहमत आहे.

सभापती महोदय या प्रस्तावाला जोडूनच खानदेश आणि कोकणसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ असावे, यादृष्टीने उल्लेख केला असता तर तो व्यापक प्रस्ताव झाला असता .

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सर्व मराठी भाषिकांचे राज्य झाले पाहिजे या भावनेने सर्व मराठी भाषिक एकत्र आले. आणि याठिकाणी सांगितले गेले की, त्यावेळचा विदर्भ मध्य प्रांताला जोडला गेला. मराठवाडा निजामशाहीमध्ये होता. संपूर्ण मराठी भाषिकांचे एक राज्य असले पाहिजे याकरिता दोन्ही प्रांतातील मराठी भाषिकांना आवाहन करण्यात आले. त्यामुळे विदर्भ व मराठवाडयातील माणसे या महाराष्ट्रामध्ये सामील व्हावयास तयार झाली. सामील होत असतांना त्यांनी कशापध्दतीने सामील व्हावे? त्यांना कसे वागविले जाईल? त्यांना कशापध्दतीची वागणूक दिली जाईल? अशा अनेक शका-कुशंका निर्माण झाल्या. त्यामधून संपूर्ण नागपूर करार तयार करण्यात आला. त्या करारामधील काही वाक्ये मी याठिकाणी वाचून दाखविणार आहे. "भाषावार प्रांतरचनेच्या वेळी मध्यप्रदेशामध्ये असलेल्या विदर्भ प्रांताने मुत्सद्देगिरी दाखविली. मध्यप्रदेशची राजधानी असलेल्या नागपूर या नगरीचे वैभव जाणार होते. परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या धूर्त राजकारणावर त्यांचा विश्वास नव्हता. म्हणून विदर्भाच्या नेत्यांनी कमिशनसमोर सशर्त विलिनीकरणाची भूमिका लावून धरली आणि त्यातून नागपूर करार जन्माला आला."

सभापती महोदय, नागपूर करारानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या, लोकसंख्येच्या प्रमाणात तांत्रिक शिक्षण क्षेत्रात जागा, आणि लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या तिजोरीतही वाटा, शिवाय पायाभूत सोयींच्या बाबतीत रस्ते, रेल्वे,सिंचन, पिण्याचे पाणी, वीज, दवाखाने, शाळेच्या इमारती या सर्व बाबींचा उल्लेख होता. त्याशिवाय मागासलेपणा घालविण्यासाठी काही काळ झुकते माप दिले पाहिजे अशा 3 प्रमुख अटी मान्य करण्यात आल्या. त्यावेळी विदर्भाचे नेते बॅ. रामराव देशमुख, आर.के. पाटील, पी. के. देशमुख आदींनी याबाबतीत कायदेशीर बाबींची शंका उपस्थित केली होती. जोपर्यंत या शर्तींना घटनात्मक शक्ती मिळत नाही, तोपर्यंत आमचा या गोष्टींवर विश्वास राहणार नाही अशी जोरदार भूमिका त्यांनी मांडली. त्यावेळी त्यांनी किती दूरदृष्टी ठेवली होती? त्यावेळी आंधळेपणाने विदर्भ सामील झाला असता तर घटना दुरुस्ती होऊन 371(2) कलम आले नसते, आणि आज विदर्भाची काय अवस्था झाली असती याची कल्पना केलेली बरी. आणि म्हणून या आग्रहाखातर घटना दुरुस्तीव्दारे कलम 371(2) हे कलम अस्तित्वात आले. विदर्भाचा आग्रहामुळे विदर्भ, मराठवाडा, सौराष्ट्र आणि कच्छ या भागाचे हित सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने घटनेमध्ये त्यांना संरक्षण मिळाले. सभापती महोदय, "घटनेमधील या तरतुदीनुसार माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

राष्ट्रपती, माननीय राज्यपाल यांच्यावर खालील बाबींच्या संदर्भात जबाबदारी टाकतील असेही त्या ठिकाणी म्हटले आहे. विदर्भ, मराठवाडा सौराष्ट्र आणि कच्छ यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापून त्यांच्या कार्याचा वार्षिक अहवाल विधानसभेत ठेवतील. (2) संपूर्ण राज्याची गरज भागवून उपर्युक्त विभागासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात विकासासाठी निधीची तरतूद करतील. तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणक्रमासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आणि राज्याचा अधीन असलेल्या सर्व नोकऱ्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात संधी देतील." सभापती महोदय, पुढे त्यांनी असे म्हटले आहे की, "संयुक्त महाराष्ट्राच्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनामध्ये पहिल्या दिवशी धोरणात्मक भूमिका मांडतांना महाराष्ट्राच्या समतोल विकासाचे कै. यशवंतरावजी चव्हाण यांनी दिलेले आश्वासन पाळले गेले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता." परंतु सन 1960 ते 1990 पर्यंतच्या कालखंडामध्ये कोणतेही शब्द पाळले न गेल्यामुळे तब्बल 30 वर्षे विदर्भातील व मराठवाडयातील लोकांना वाट पहावी लागली. 30 वर्षामध्ये काहीही न घडल्यामुळे त्यामधून वैधानिक विकास मंडळाच्या निर्मितीची मागणी पुढे आली. घटनेमध्ये 371(2) कलम असतांना व माननीय राज्यपालांवर ते बंधनकारक असतांना सुध्दा 30 वर्षामध्ये काहीही घडले नाही.आणि त्यामधून ही मागणी पुढे आल्यानंतर त्यामधून वैधानिक विकास मंडळाचा जन्म झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . .. .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाऊ गुजराथी यांनी या सभागृहामध्ये सरकारचे ज्या पध्दतीने समर्थन केले, त्याबद्दल मला थोडेसे वाईट वाटले. सन्माननीय सभासदांनी सरकारचे समर्थन केले, त्याबद्दल आमच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल कोणताही दुजाभाव नाही. पण त्यांनी सांगितले की, हा बॅकलॉग कमी झाला. मी यासंबधात दोन-तीन गोष्टी मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सांगण्यात आले की, याठिकाणी वैधानिक विकास मंडळ आल्यानंतर हा बॅकलॉग कमी-कमी होत गेला. परंतु जेव्हा विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा जोर वाढला, हा आकडा दिवसेंदिवस वाढत गेला आणि त्याबाबतीत ओरड झाली. आत्महत्येच्या घटनेमुळे संपूर्ण देश, संपूर्ण महाराष्ट्र हादरला. यासंबंधात वेगवेगळया कमिट्या स्थापन करण्यात आल्या. त्यातूनच सरकारने डॉ.नरेंद्र जाधव, अर्थतज्ज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आणि त्या कमिटीने जो अहवाल आहे, तो मी याठिकाणी कोट करु इच्छितो. तसेच या वैधानिक विकास मंडळाची गरज काय आहे ? माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजितदादा पवारसाहेब, आम्हाला भाषणातून सांगण्याची काही गरज नाही. पण मी आपणच नेमलेल्या अर्थतज्ज्ञ डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अहवालाच्या बाबतीत उल्लेख करु इच्छितो की, "विदर्भातील सिंचन सुविधांकडे 15 ते 20 वर्षामध्ये पुरेसे लक्ष दिले गेले नाही. कृषी पंपांना विद्युत उपलब्ध करण्याचा बॅकलॉग देखील कायम राहिला. विदर्भातील शेती किफायतशीर न रहाण्यामागे जी महत्वाची तीन कारणे आहेत, त्यात एक गोष्ट म्हणजे सिंचनाची अपूरी सुविधा आणि दुसरी गोष्ट अपूरी वीज आणि पंपसेट जोडणी ही दोन प्रमुख कारणे आहेतच आणि तिसरे कारण म्हणजे बँकाकडून होणारा अपूरा कर्ज पुरवठा हे देखील महत्वाचे कारण आहे"असा निष्कर्ष अर्थ तज्ज्ञ कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांनी आपल्या अहवालामध्ये काढलेला आहे. "माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार सिंचनाच्या निधीचे वाटप झाले नाही ही गेल्या अनेक वर्षापासून होत असणारी ओरड या निमित्ताने खरी ठरली." म्हणजे माननीय राज्यपालांनी निर्देश दिल्यानंतर सध्दा सिंचनाच्या निधीचे समान वाटप झाले पाहिजे. स्व.यशवतंराव चव्हाण यांनी समतोल विकासाची संकल्पना मांडली होती, त्याला हरताळ फासण्यात आला आणि याठिकाणी सिंचनासाठी निधीचे वाटप योग्य त्या प्रमाणात केले गेले नाही आणि विदर्भ, मराठवाड्यातील सिंचनाचा निधी उर्वरित महाराष्ट्रात वळविण्यात आला.त्यामुळे या भागात सिंचनाची

. . . .3 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . .. .

कामे मोठया प्रमाणावर झाली आणि विदर्भ, मराठवाडा हा भाग तहानलेला राहिला. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे हे देखील मुख्य कारण असल्याचा निष्कर्ष डॉ.नरेंद्र जाधव यांनी काढलेला आहे. गेली अनेक वर्षे सिंचन विभाग माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार हे सांभाळत आहेत, त्यामळे पर्यायाने आपल्याकडेच बोटे आहेत. सिंचनाच्या बॅकलॉग संबंधी बोलताना डॉ.नरेंद्र जाधव असे म्हणतात की, "स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्यातील इतर विभाग सिंचन सुविधांच्या बाबतीत विदर्भापेक्षा खूप मागे होते. पण 1984 साली विदर्भातील सिंचनाचा अनुशेष जो 38 टक्के होता, तो वाढत जाऊन 2002 साली 62 टक्क्यापर्यंत पोहोचला. याच कालावधीत उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष 39 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर आणण्यामध्ये शासन यशस्वी ठरले. जून 2004 पर्यंत महाराष्ट्र राज्याच्या संभावित सिंचन क्षमतेच्या सुमारे 48 टक्के सिंचन क्षमता झाली. परंतु विदर्भाच्या बाबतीत हे प्रमाण 31.6 टक्के एवढे होते. विदर्भातील सिंचन सुविधांकडे 15 ते 20 वर्षे पुरेसे लक्ष दिले गेले नाही हे दाखविण्यासाठी ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. विद्युत पंपसेटच्या अपूरी जोडणीबाबत सांगावयाचे तर सिंचनाच्या बॅकलॉगसोबत विद्युत पंपसेटच्या जोडणीबाबतचा बॅकलॉग मोठया प्रमाणावर असल्याचे डॉ.नरेंद्र जाधव यांनी निदर्शनास आणले. एका सर्वेक्षणानुसार 2003-2004 मध्ये राज्यातील कृषी पंपावर एकूण वीज युनिटच्या फक्त 11.50 टक्के खप विदर्भात व 22.24 टक्के मराठवाड्यात झाला. याउलट पश्चिम महाराष्ट्रात हाच खप 65.58 टक्के झाला. प्रत्यक्ष कृषी पंपांना विद्युत पंप उपलब्ध करण्याचा विदर्भाचा बॅकलॉग सुमारे 2 लाख 15 हजार पंप एवढा असून मराठवाडयामध्ये 1 लाख 9 हजार पंप इतका बॅकलॉग होता. खरे म्हणजे महाराष्ट्रात त्याच वेळेला 3 लाख 57 हजार जास्तीच्या पंपांना वीज पुरवठा झालेला आहे. विशेष म्हणजे राज्य शासनाकडून प्रत्येक पंपाला 9250 रुपये एवढे अनुदान उपलब्ध आहे. पण याचा फायदा विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी का घेऊ शकले नाहीत ? याची कारणे काय होती ? असा सवालही डॉ.नरेंद्र जाधव यांनी त्याठिकाणी केलेला आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मी कर्जाच्या बाबतीत बँकांचे उदाहरण देणार नाही.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. पांडुरंग फुंडकर...

परंतु तिसरे कारण त्यांनी असे सांगितले होते, बँकांच्या कर्जवाटपाच्या बाबतीत सुध्दा हेच घडले. बँकाचे कर्ज वाटप करताना सिंचन क्षमता ज्याठिकाणी होती तेथील शेतकऱ्यांना जो कर्जपुरवठा करण्यात आला त्या कर्जपुरवठयाच्या दहा टक्के सुध्दा कर्ज पुरवठा विदर्भ आणि मराठवाडयातील कोरडवाहू शेतकऱ्याला करण्यात आला नाही. म्हणून सिचंनात मागे, विद्युतपुरवठयात मागे अशा पध्दतीने बँकांच्या कर्जपुरवठयात मागे, अशा प्रकारे हा विदर्भ मागासलेला होत गेला. मराठवाडयात सुध्दा हीच गत झाली. याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला. वेगळया विदर्भाची मागणी पुढे का येते?सर्वच लोक वेगळया विदर्भाचे समर्थन करणारे नाहीत.पण वर्षानुवर्षे जर त्या लोकांवर अन्याय आणि अत्याचार होत राहिला की समाजातील कुठल्याही घटकाची ही अवस्था आहे. वर्षानुवर्षे तुम्ही जर अन्याय करीत राहिलात तर एक दिवस त्या अन्यायाला वाचा निश्चितपणे फुटत असते आणि त्यातून संघर्षाला सुरुवात होते. खरे म्हणजे 50 वर्षे विदर्भातील माणसाला बरोबरीच्या नात्याने वागवले असते, बरोबरीच्या नात्याने नागपूर कराराप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये निधीचे वाटप झाले असते,लोकसंख्येच्या प्रमाणात सिंचनाच्या नीट सोयी झाल्या असत्या. लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण आणि आरोग्य यादृष्टीने व्यवस्थित विकास झाला असता तर कुठल्याही माणसाला ज्या महाराष्ट्रात तो सामील झाला आहे त्या महाराष्ट्रापासून तुटून जाण्याची आवश्यकता वाटली नसती. वर्षानुवर्षे ओरड केली जात आहे पण त्यांची ओरड ऐकायला कोणी तयार नाही, त्यातूनच ही वेगळेपणाची भावना निर्माण झाली. सीएजीचा रिपोर्ट मी याठिकाणी कोट करणार आहे. लोक वेगळा विदर्भ कां मागतात? विदर्भावर होत असलेला अन्याय नियोजन आयोगाने मे,2006 मध्ये तसेच सीएजीच्या 2006 च्या अहवालत केंद्र सरकारला दाखवून दिलेला आहे. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा तो एक दमदार पुरावा ठरु शकतो. विदर्भावर आर्थिक अन्याय होत आहे याची जाणीव नियोजन आयोगाला होती. त्यामुळे मागास भागाच्या विकासातील बॅकलॉगचा विषय आयोगाकडून राज्य सरकारकडे सातत्याने मांडण्यात येत होता.

सभापती महोदय, दिनांक 10 मार्च,2006 रोजी राज्यसभेत तुमच्याच पक्षाचे विदर्भातील राज्यसभेचे खासदार श्री. विजय दर्डा आणि श्री. मेघे यांच्या ठरावामुळे हा विषय चर्चेस घेण्यात आला. विदर्भाच्या विकासाचा विभागीय असमतोल, आर्थिक दुरवस्था या विषयीच्या गांभीर्याची राज्य सभेला माहिती करुन देण्यात आली महाराष्ट्राच्या कर्जबाजारीपणाचा विषय केंद्र सरकारपुढे

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

मांडण्यात आला त्यामुळे वस्तुस्थिती तपासण्यासाठी माननीय पंतप्रधान महोदयांनी नियोजन आयोगाला सांगितले. म्हणजे माननीय पंतप्रधानी नियोजन आयोगाला वस्तुस्थिती काय आहे हे तपासायला, राज्यसभेत हा विषय आल्यामुळे सांगितले होते. त्यांनी दिनांक 2 मार्च,2006 रोजी सत्यशोधन समितीची स्थापन करुन विदर्भातील शेतकऱ्यांची दुरवस्था अभ्यासून त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी माहिती देण्यास सांगितले. नियोजन आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. त्या अहवालात पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण्यांकडून विदर्भाची जाणीवपूर्वक उपेक्षा करण्यात येत असल्याची बाब नमूद करण्यात आली. 225 पानाच्या या अहवालातून राज्य सरकार विदर्भाला सापत्नभावाची वागणूक देत असल्याचे स्पष्ट झाले. या अहवालात नियोजन आयोगाने जे निष्कर्ष काढलले आहेत ते निष्कर्ष वेगळया विदर्भाच्या मागणीचे समर्थन करणारे आहेत. सभापती महोदय, मी या पूर्ण अहवालाचे वाचन करणार नाही पण यापध्दतीने सिंचनाच्या बाबतीत त्यांनी असे म्हटले होते की,"महाराष्ट्र शासन माननीय राज्यपालांचे कार्यालय आणि वैधानिक विकास मंडळ यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार असे दिसते की, महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांच्या सूचनांचे पालन करताना चालढकल करण्यात येते. म्हणजे माननीय राज्यपालांच्या सूचनांची सुध्दा चालढकल झाली. महाराष्ट्र शासनाने सन 2002-2003,2003-2004 आणि 2004-2005 या सालच्या वार्षिक योजनेत पाटबंधारे योजनांसाठी केलेली तरतूद आणि प्रत्यक्षात झालेला खर्च यामुळे सुध्दा विदर्भ आणि मराठवाडा हे दोन्ही विभाग मागे आहेत. या दोन्ही विभागात मिळून 3675.86 कोटी रुपये इतका कमी खर्च करण्यात आला तर उर्वरित महाराष्ट्र विभागात 1585.67 कोटी रुपये अतिरिक्त खर्च करण्यात आला केवळ विदर्भाचा विचार केला तर या तीन वर्षात एकूण तरतुदीपेक्षा 2528.21 कोटी रुपये कमी खर्च करण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, अनुशेष कमी झाल्याचे या ठिकाणी सांगितले जाते परंतु हा अनुशेष वाढत गेला आहे. विदर्भातील प्रकल्पांची काय अवस्था आहे ते मी दोन चार मिनिटांमध्ये सांगतो. यासंदर्भात मी फक्त पश्चिम विदर्भाचा उल्लेख करणार आहे. माझ्याकडे संपूर्ण विदर्भाच्या पाटबंधारे प्रकल्पांसंबंधीची माहिती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी उल्लेख केला. कोट्यवधी रुपये खर्च करुनही विदर्भातील एकही प्रकल्प आज पूर्ण क्षमतेने सुरु नाही. विदर्भामध्ये एकूण सिंचन क्षमतेच्या 20 ते 25 टक्केच सिंचन होत असल्याची धक्कादायक माहिती अलिकडे माहितीच्या अधिकाराखाली मिळालेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या अनुषंगाने सिंचनावर भर देण्याच्या घोषणा वारंवार होत असतात. परंतु असलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही होत नाही. प्रकल्पाच्या भिंती उभ्या आहेत. मात्र कालवे आणि वितरिकांची कामे अपूर्ण आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करुन पश्चिम विदर्भामध्ये 40 वर्षापासून काम सुरु असलेल्या प्रकल्पाची आताची सिंचन क्षमता जेमतेम 10 टक्के आहे. विदर्भामध्ये नागपूर विभागात 10 मोठे, 30 मध्यम आणि 41 लघु असे 81 प्रकल्प आहेत. अमरावती विभागात 12 मोठे, 14 मध्यम आणि 134 लघु असे 160 प्रकल्प आहेत. म्हणजे विदर्भात एकूण 241 प्रकल्प आहेत. यापैकी एकही प्रकल्प आज निर्धारित क्षमतेने सुरु नाही. त्यातील एकूण सिंचन क्षमतेपैकी केवळ 20 ते 25 टक्के सिंचन होत आहे. काही धरणांमध्ये पाण्याचा साठा आहे पण ते पाणी शेतीपर्यंत जाण्यासाठी आवश्यक असलेले कालवे आणि वितरिकांची कामे पूर्ण झालेली नाहीत. यातील काही प्रकल्पांची उदाहरणे बोलकी आणि अनास्थेचे दर्शन घडविणारी आहेत. वर्धा आणि अमरावती या जिल्ह्याला वरदान ठरणारा उर्ध्व वर्धा प्रकल्प 1965 मध्ये मंजूर झाला. त्याला जवळपास 44 वर्षे पूर्ण झाली. विदर्भातील लोकांनी किती वाट पहावयाची ? 1965 साली मंजूर झालेला प्रकल्प आज 44 वर्षानंतरही अपूर्ण असल्याचे अधिकारी सांगतात. सुरुवातीला या प्रकल्पाची मूळ किंमत 3 कोटी 78 लाख रुपये होती आणि सिंचन क्षमता 80 हजार 250 हेक्टरची होती. आतापर्यंत त्या प्रकल्पावर 963 कोटी रुपये खर्च होऊनही 80 हजार हेक्टर सिंचन क्षमतेपैकी फक्त 17 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

हेक्टर सिंचन क्षमता गाठली गेली आहे. वर्धा जिल्ह्यातील कोथळानाला प्रकल्पाला 1977 मध्ये मंजुरी मिळाली. त्यावेळी त्या प्रकल्पाची मूळ किंमत 2 कोटी रुपये होती. आज 31 वर्षानंतर या प्रकल्पाची किंमत 2 कोटी रुपयांवरुन 59 कोटी रुपयांवर पोहाचलेली असताना अपेक्षित 11 हजार 632 हेक्टरऐवजी फक्त 3 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली.

सभापती महोदय, मी प्रत्येक जिल्ह्यातील एका एका प्रकल्पाचे उदाहरण देणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्प 1992 साली मंजूर झाला. त्या प्रकल्पाची त्यावेळचा अंदाजित 190 कोटीचा खर्च आज 1057 कोटी रुपयांवर गेला तरीही 47 हजार हेक्टर शेतीला पाणी देण्याची क्षमता असलेल्या या प्रकल्पाने केवळ 150 हेक्टरचाच टप्पा ओलांडला. राजमाता जिजाऊं मॉसाहेबांचे जन्मस्थान समजल्या जाणाऱ्या आमच्या बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. सिंचन वाढीत भर घालणारा प्रकल्प आहे. मलकापूर, नांदुरा, शेगाव तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पाकरिता घेतलेल्या आहेत, सिंचन होणार आहे म्हणून ज्या लाभधारक शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्यांना अद्याप मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे प्रकल्पाचे काम रखडले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी प्रकल्प 1989 मध्ये मंजूर झाला. या प्रकल्पाचा सुरुवातीचा 16 कोटी रुपयांचा खर्च 179 कोटीवर पोहोचला तरी त्या प्रकल्पाचे काम अपूर्ण आहे. निर्धारित 14 हजार 332 हेक्टरपैकी फक्त 6330 हेक्टर क्षेत्राला पाणी मिळते. खडकपूर्णा प्रकल्प 79 कोटीवरुन 525 कोटीवर पोहोचला तरीही 15 हजार हैक्टर सिंचन क्षमतेपैकी एकाही हेक्टरला पाणी मिळालेले नाही. संपूर्ण विदर्भातील सध्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पांची अशी स्थिती असताना नवीन कामांचे प्रस्ताव मंजूर होत आहेत. जुनी कामे बाजूलाच राहिली पण नवीन कामांचे प्रस्ताव मंजूर होत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

5 हजार कोटी रुपये किंमतीच्या गोसीखूर्द प्रकल्पाची कामे टप्प्याटप्प्याने करण्याचे प्रस्तावित केले होते. जल व नियोजन आयोगाने सन 2008-09 मध्ये 5 वर्षाच्या कामांना मंजुरी दिली होती. सन 2009 ते 2014 पर्यंत प्रत्येक वर्षी 1 हजार कोटी रुपये खर्च करावयाचे होते मात्र या मंजुरीला फाटा देऊन विदर्भ पाटबंधारे सिंचन मंडळाने 2013 मध्ये करावयाच्या असोलमुंडा या गोसीखूर्द प्रकल्पाचा भाग असलेल्या प्रकल्पासाठी आता निविदा काढल्या आहेत. पुढील 5 वर्षात कामे करावयाची आहेत, त्यासाठी आताच निविदा काढण्याची काय गरज होती ? परंतु निविदेची प्रक्रिया सुरु झाली आहे. शासकीय दराला न जुमानता चढया दराने निविदाची रक्कम ठरविण्यात आली. त्याची चौकशी करावी लागणार आहे. राज्यातील अन्य पाटबंधारे मंडळांची तुलना केली तर ही रक्कम अर्धी असल्याचे दिसून येते, इतक्या मोठया रकमेच्या निविदा काढल्या आहेत. निविदातील प्रत्येक बाब 50 टक्के चढया दराने दाखविण्यात आली. कालव्यांना सध्या तरी काँक्रीटचे आवरण घालण्याची आवश्यकता नसताना त्याचेही प्रस्ताव टाकले. म्हणजे अजून धरणेच झाली नाहीत. परंतु कालव्याच्या काँक्रीटीकरण करण्याच्या प्रस्तावाच्या निविदा काढल्या आहेत. जल आयोगाच्या शिफारशीनुसार कालव्याचे बांधकाम झाल्यानंतर 2-3 वर्षानंतर आवरणाचे काम करता येते, परंतु विदर्भ पाटबंधारे मंडळाने त्यासाठी घाईने निविदा काढून ते काम पूर्ण केले. त्यामुळे कालव्याच्या गुणवत्ता व मजबुतीकरणावर परिणाम झाला. काँक्रीटीकरणाच्या आवरणाला भेगा पडल्या. या भेगाच्या दुरुस्तीसाठी पुन्हा निविदा काढण्यात आल्या. आवश्यकता नसताना एकाच कामावर दुप्पट खर्च करण्यात आला. एका क्यूबीक मीटरसाठी 4 हजार रुपये दर असताना येथील कंत्राटदारांना 507 हजार दर देण्यात आला.

सभापती महोदय, विदर्भात झालेल्या प्रकल्पांचे 3 हजार कोटी रुपये देणे बाकी आहे. पुनर्वसन व भूसंपादनाचे कोटयवधी रुपये शासनाकडे थकित आहेत. असे असताना शासनाने जून, 2009 मध्ये 1,400 कोटी रुपये व ऑगस्ट, 2009 मध्ये 1,007 कोटी रुपयांच्या कामाच्या निविदा ऐन विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर काढल्या आहेत. अगोदरचे 3000 कोटी रुपये द्यायचे आहेत, त्यामुळे पुन्हा निविदा काढण्याचे कारण काय ते कळले नाही. अशा अनेक बाबी मला

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.पांडुरंग फुंडकर...

सांगता येतील. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष आता 5 लाख हेक्टरवरुन 10 लाख हेक्टरवर गेला आहे. सिंचन विहिरींच्या बाबतीत हीच स्थिती आहे. विदर्भात 31 हजार सिंचन विहिरी आहेत तर पश्चिम महाराष्ट्रात ही संख्या 2 लाख 40 हजारपर्यंत आहे. कृषी पंपाच्या अनुशेषाचे हेच चित्र आहे. येथील कृषी पंपांना 2025 साली वीज मिळेल असे राज्याचा ऊर्जा विभाग कळवितो. मग 2025 साली असलेल्या कृषी पंपांचा अनुशेष 2099 साली पूर्ण करणार काय, असा प्रश्न आमच्यासमोर आहे. या सर्व बाबी विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वैधानिक विकास मंडळांना मंजुरी देण्यात यावी. हा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवावा. परंतु यासंदर्भात मी एक दुरुस्ती सुचवित आहे. या वैधानिक विकास मंडळाच्या कामाच्या पध्दतीवर विचार करण्यासाठी सुध्दा बसावे लागणार आहे. वैधानिक विकास मंडळे ज्यासाठी निर्माण झालेली आहेत त्यामध्ये शिक्षण व्यवस्था, आरोग्य, रेल्वे, रस्ते, पाटबंधारे या बाबी यामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. परंतु वैधानिक विकासाचे काम करीत असताना राजकीय दृष्टीकोन ठेवून ही मंडळे काम करीत असतील तर त्यावर कोठे तरी बंधन घालावे लागणार आहे. विदर्भाचा असो, मराठवाडयाचा असो समतोल विकास होण्यासाठी आणि तुमच्या बरोबरीने येण्यासाठी ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्या त्या गोष्टी वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून झाल्या पाहिजेत. नको त्या गोष्टी वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून केल्या जात असतील, एखाद्या गावातील रस्त्याचे काँक्रीटीकरण केले जात असेल, एखाद्या नाल्याचे काम केले जात असेल तर या कामांपेक्षाही मराठवाडयाला व विदर्भाला सिंचनाची अधिक गरज आहे. तेथील जमीन तहानलेली आहे, तेथील जमिनीला पाणी पाहिजे. तेथील शेतक-यांच्या विहिरीला विजेचे पंप पाहिजेत. विजेच्या पंपाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी या वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून निधीची तरतूद केली गेली व शेतीला पाणी, वीज, गावाचे आरोग्य, गावाचे शिक्षण या प्रमुख बाबीवर जोर देण्यासाठी या मंडळाच्या माध्यमातून तो दृष्टीकोन ठेवून जर कामे झाली तर मग निश्चितपणे त्याचा लाभ अनुशेष कमी होण्यासाठी होऊ शकतो.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

MSS/ ST/ D/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

(श्री. पांडुरंग फुंडकर....

या सर्व बाबी विचारात घेता आज जरी वैधानिक विकास मंडळांची मुदत संपली असली तरी मराठवाडा आणि विदर्भाची गरज संपलेली नाही, त्यांचा अनुशेष संपलेला नाही म्हणून या मंडळाची गरज आहे, राज्यपालांच्या अंकुशाची गरज आहे, घटनेच्या अनुच्छेद 371(2)ची गरज आहे. तेव्हा ही वैधानिक विकास मंडळे व्हावीत अशा प्रकारचा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री) : सभापती महोदय, ज्येष्ठ सहकारी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आणलेल्या प्रस्तावावर या सदनातील सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री दिवाकर रावते, अरुण गुजराथी, कलमकिशोर कदम आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर या मान्यवरांनी आपले विचार मांडलेले आहेत.

सभापती महोदय, सकाळी 10 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त या प्रस्तावावर चर्चा होणार होती. परंतु दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपापली मते मांडावयाची असल्यामुळे त्या वेळेत ही चर्चा संपविता आली नाही. एक गोष्ट खरी आहे की, 30 एप्रिलला या वैधानिक विकास मंडळांची मुदत संपत आहे. त्यामुळे सहाजिकच तिस-यांदा निवडून आलेल्या लोकशाही आघाडीचे सरकार या मंडळांची मुदत संपल्यानंतर काय निर्णय घेणार याबद्दल सर्वांच्या मनामध्ये कुतूहल आणि विविध प्रकारच्या शंका कुशंका आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आज राज्याला 50 वर्षे पूर्ण होत आहेत. 105 हुतात्म्यांनी बलीदान देऊन या महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यास आज 50 वर्षे पूर्ण होत आहे. 1 मे आपण मोठ्या उत्साहाने साजरा करणार आहोत. हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असताना दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकल्यानंतर विविध पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी आपापली भूमिका मांडल्याचे दिसून आले. प्रामुख्याने हा प्रश्न विचारला पाहिजे की, ही बोलण्याची वेळ आपल्यावर का यावी ?. या 50 वर्षाच्या वाटचालीमध्ये राज्यातील विविध विभागांना प्रतिनिधीत्व मिळाले की नाही ? विदर्भाला प्रतिनिधीत्व मिळाले, मराठवाड्याला प्रतिनिधीत्व मिळाले, पश्चिम महाराष्ट्राला प्रतिनिधीत्व मिळाले, कोकणाला प्रतिनिधीत्व मिळाले. राहिला खानदेश. काही अडचणीमुळे म्हणा किंवा दुर्दैवाने वरिष्ठांनी संधी दिली नाही म्हणून म्हणा खानदेशला आजपर्यन्त प्रतिनिधीत्व मिळाले नाही. खानदेश सोडून सगळया भागाला प्रतिनिधीत्व मिळाले. असे असताना सन्माननीय सदस्य अशी चर्चा करतात आणि गेल्या काही वर्षातील विधान भवनाच्या परिसरातील विविध चर्चांच्या माध्यमातून असे ऐकावयास मिळते की एखाद दुस-या मंत्र्यांचा यास विरोध आहे म्हणून हे लांबलेले आहे. वास्तविक ही सगळी चर्चा होत असताना जसे विदर्भाला वाटते की आपल्यावर अन्याय झाला तसे मराठवाडयालाही वाटते की आपल्यावर अन्याय झाला, उर्वरित महाराष्ट्रामध्ये मोडणा-या कोकणाला वाटते की, आपल्यावर अन्याय झाला. पश्चिम

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अजित पवार...)

महाराष्ट्राच्या बाबतीत असे बोलले जाते की, पश्चिम महाराष्ट्र सर्व घेऊन गेलेला आहे. आता पश्चिम महाराष्ट्राला ना आगा ना पिछा राहिलेला आहे. भाजप-शिवसेना युतीचा कालावधी सोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या लोकशाही आघाडी सरकारच्या माध्यमातून सगळे निर्णय घेत असताना आम्हाला अन्य सहकारी पक्षांनी देखील पाठिंबा दिला. हा पाठिंबा दिल्यानंतर एकंदरीत जो काही कारभार झालेला होता त्याबाबतीत काही सन्माननीय सदस्यांनी अशी भूमिका मांडली की काही भागातच निधी जातोय इतर भागामध्ये जात नाही. मला या निमित्ताने सभागृहाला सांगावयाचे आहे की, मागील 10 वर्षापूर्वीच्या काळात

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

भारतीय जनता पक्ष-शिवसेना पक्षाचे सरकार सत्तेवर असताना साडेचार वर्षात काय झाले? अनुशेष भरुन काढण्यासाठी किती पुढाकार घेतला गेला? किती निधी दिला गेला? याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी भाषण करीत असताना एस.एम.जोशी, बर्धन, वसंतराव नाईक यांची नावे घेतली. श्री.शरद पवार व स्व.वसंतदादा पाटील यांचेही नाव घेतले गेले. ते देखील दहा वर्षे राज्याचे मुख्यमंत्री होते. असे असताना मराठवाड्याला देखील मुख्यमंत्री लाभले होते. गेल्या दहा वर्षाचा विचार केला तर किती वर्षे मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद लाभले? पाटबंधारे खाते किती वर्षे मराठवाड्याकडे किंवा दुर्लक्षित भागाकडे होते. मागील पाच वर्षापासून हे खाते माझ्याकडे आले. मी अधिकारवाणीने सांगेन की, लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आम्ही आवश्यक ते सगळे प्रयत्न केले. माननीय राज्यपाल महोदयांच्या सूचना होत्याच होत्या. ते प्रयत्न करुन गेल्या मार्चपर्यंत कुठल्याही परिस्थितीत हा अनुशेष भरुन काढण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची भाषणे मी गेली दहा वर्षे ऐकली आहेत. अत्यंत पोटतिडकीने विदर्भाचे प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून त्यांनी भूमिका मांडली आहे. त्यासाठी जेवढी काही मदत करण्याची गरज आहे ती भूमिका आम्ही देखील स्वीकारली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विदर्भातील काही कामांच्या संदर्भात निवडणुकीच्या तोंडावर चुकीचे काम केले गेले असे सांगितले. मी त्याबद्दल सभागृहाला सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहात विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा होत असताना मी उत्तर दिले होते. मी या सभागृहाला देखील सांगू इच्छितो की, त्याठिकाणी ज्या काही तक्रारी आहेत त्याबद्दल चौकशी करण्यासाठी निवृत्त प्रधान सचिवांची एक सदस्यीय समिती नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पूर्ण माहिती मागविली आहे. जे जे कोणी अधिकारी दोषी असतील, चुकीचे काम केले असेल त्यांना अजिबात थारा दिला जाणार नाही असा मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि सभागृहाला या निमित्ताने शब्द देतो. सभापती महोदय, एवढ्या मोठया प्रमाणात विदर्भाला निधी देत असताना त्या निधीबद्दल चुकीच्या गोष्टी घडत असतील तर कोणत्याही परिस्थितीत माफ केले जाणार नाही ही गोष्ट मी आपल्यामार्फत सभागृहाच्या लक्षात आणून देतो. हे सगळे करीत असताना मोठया प्रमाणावर हा अनुशेष भरुन काढण्याचे काम केले आहे. अनुशेष भरुन निघत असताना कोकणाच्या लोकांसाठी कोकण वैधानिक विकास मंडळ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

स्थापन करण्याबाबत दि.13.3.1989 ला का ठराव करावा लागला? ज्यावेळी आपण ही सगळी वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात आणली, त्यावेळेस उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या निमित्ताने कोकणवासियांच्या लक्षात आले की, आपल्यावर देखील अन्याय होत आहे. दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव केला होता. असे असून सुध्दा 21 वर्षे झाली, परंतु त्याला मान्यता मिळाली नाही. खानदेशातील अनेक सन्माननीय सदस्यांना वाटते की, खानदेशासाठी देखील उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ स्थापन झाले पाहिजे. त्याबाबतचा ठराव दि.13 जुलै, 2006 रोजी मंजूर केला गेला. केंद्र शासनाच्या गृह विभागाकडे तो प्रस्ताव तशाच पध्दतीने अजून पडून आहे. दोन्ही विभागांना त्यांच्यावर अन्याय होतो, त्यांना योग्य प्रमाणात निधी दिला जात नाही असे वाटते. काही काही भागांमध्ये हे सगळे काम करीत असताना मराठवाड्याला निधी मिळाला पाहिजे, विदर्भाला निधी मिळाला पाहिजे असे वाटते. माननीय अर्थमंत्री याठिकाणी बसले आहेत. यंदाच्या वर्षी माननीय मुख्यमंत्री आणि आम्हा सगळयांना मिळून गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदाच्या बजेटमध्ये मराठवाड्याला जास्त निधी द्यावयाचा होता. वाढीव निधी देता आला नाही. गेल्या वर्षीपेक्षा 100 कोटी रुपये कमी द्यावे लागले. सगळ्याच भागांना विकासाच्या कामासाठी निधी हवा आहे. विधीमंडळामध्ये त्याठिकाणची दुसरी पिढी प्रतिनिधीत्व करायला आली आहे. काही भागातील तिसरी पिढी आलेली आहे. या लोकप्रतिनिधींना वाटते की, आम्ही आपल्या भागाचे प्रतिनिधीत्व करीत असताना आमच्या भागातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कधी सुटणार? प्रत्येक प्रश्न सोडविण्यासाठी काही निर्णय घ्यायचा झाला तर वेगवेगळया प्रकारच्या अडचणी येतात.

सभापती महोदय, आपण ठाणे जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करीत आहात. त्या भागात देखील अशाच पध्दतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. वास्तविक ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात धरणे झाली. परंतु धरणातील पाणी मुंबई, ठाणे, उल्हासनगर, भिवंडी, वसई-विरार भागात दिले जाते. धरणे त्या भागात झाली.

नंतर 4ए.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. अजित पवार....

माणसांना पिण्याचे पाणी पहिल्यांदा उपलब्ध करुन द्यावे लागते. पिण्याच्या पाण्यामुळेही सिंचनाचा अनुशेष देखील निर्माण झालेला आहे. मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, पुणे-पिंपरी-चिंचवडला वर्षाला पिण्याचे पाणी 15 टि.एम.सी. उपलब्ध करुन द्यावे लागत आहे. म्हणजे दीड लाख एकराचे सिंचन होईल इतके पाणी पिण्यासाठी वापरले जात आहे. जेथे जेथे शहरीकरण मोठया प्रमाणात झाले त्या त्या ठिकाणी आपल्याला मोठया प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे लागत आहे. औरंगाबादला पिण्यासाठी नाथसागराचे पाणी मोठया प्रमाणात द्यावे लागत आहे. त्यामुळे असे प्रश्न अनेक ठिकाणी निर्माण झालेले आहेत. काही काही ठिकाणी रेकॉर्डला धरणे दिसत आहेत परंतु त्या धरणाचे जास्ती जास्त पाणी माणसांना पिण्यासाठी द्यावे लागते तसेच बिगर सिंचनासाठी सुध्दा द्यावे लागते. सकाळी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी रायगड जिल्हयातील काळ प्रकल्पाचा प्रश्न उपस्थित केला होता. या ठिकाणचे पाणी सुध्दा आपल्याला बिगर सिंचनासाठी द्यावे लागते. शेवटी आपल्याकडे कारखानदारी सुध्दा आली पाहिजे हा त्यामगील उद्देश आहे. सिंचनाचा प्रश्न जसा सुटला पाहिजे तसा कारखानदारीचा प्रश्न सुध्दा सुटला पाहिजे, कारखानदारीतून सुध्दा रोजगार निर्माण झाला पाहिजे अशा प्रकारचा सर्व समावेशक विचार करुन राज्यकर्त्यांना निर्णय घ्यावा लागत असतो. या ठिकाणी या चर्चेच्या निमित्ताने अनेक गोष्टी समोर आलेल्या आहेत. आपल्याकडे सुरुवातीला मूळ डीपीएपी तालुक्यांची संख्या 87 होती परंतु ते वाढत वाढत 150 च्या पुढे गेले. या 87 तालुक्यातील काही भाग असा आहे की, तेथे माणसांना जगण्याकरिता जेवढे पाणी मिळाले पाहिजे तेवढे पाणी सुध्दा मिळत नाही. त्यामध्ये अटीतुटीचे खोरे, माण खोरं, अग्रणी खोरं, येराळ खोरं, सिना खोरं असेल सगळीकडची परिस्थिती मी बघितलेली आहे. मी सकाळ पासून सन्माननीय सदस्यांचे विचार बारकाईने ऐकत होतो. काही सन्माननीय सदस्यांनी अशीही भूमिका मांडली की, आम्ही मराठवाडा, विदर्भातून 108 सदस्य निवडून येतो परंतु तुम्ही 188 सदस्य आहात त्यामुळे अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्यकर्ते म्हणून काम करीत असतांना आम्ही अशा प्रकारे कधीही विचार केला नाही. संपूर्ण महाराष्ट्र मग चांद्यापासून बांद्यापर्यंत आम्ही आपलाच मानलेला आहे व त्याप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत. जर आमचे 188 आमदार असते तर आम्ही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

108 आमदरांचे कधीच चालू दिले नसते. जे काही करायचे ते 188 लोकांनीच केले असते. परंतु असे करुन चालत नाही. आपल्या वडीलधा-यांनी तशा प्रकारची शिकवण आपल्याला शिकवलेली नाही. या चर्चेच्या निमित्ताने काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, "तुम्ही आमच्या बाजूने विचार केला नाही तर आम्हाला वेगळया विदर्भाचा विचार करावा लागेल." प्रत्येकाने अशा टोकाची भाषा बोलायची किंवा 1 मे रोजी महाराष्ट्रात चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आपण सर्व करीत असतांना काहींनी काळे झेंडे लावण्याची भाषा करावयाची हे काही योग्य नाही. मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, ज्यांनी अशा प्रकारची भाषा केलेली आहे त्यांनी चांगल्या प्रकारे मंत्री पदे भूषवली होती त्यावेळेस त्यांनी कधी तोंड उचकटले नाही. परंतु आता त्यांच्याकडे काही पद नसल्यामुळे त्यांना आता एक एक सूचायला लागले आहे. वास्तविक या सगळया गोष्टी करीत असतांना उद्या विदर्भामध्ये चुकीच्या प्रवृत्तीचे लोक असे बोलतात. या ठिकाणी मराठवाडयातील काही सन्माननीय सदस्य म्हणाले की, "आमच्यावर अन्याय होता कामा नये, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. ज्यावेळेस मराठी भाषिक म्हणून आम्ही सर्व एकत्र आलो त्यावेळेस आमच्या मराठवाडयाने आमचा वेगळा मराठवाडा असावा असे आम्हाला कधीच वाटले नाही." त्यामुळे मराठवाडयामध्ये प्रकल्प करीत असतांना गोदावरी, मांजरा नदी असेल किंवा तिच्यावरचे बॅरेजेस असतील या सर्व प्रश्नांची सोडवणूक झाली पाहिजे असे विचार व्यक्त केले. एखादी व्यक्ती पहिल्यांदाच निवडून आल्यानंतर त्याला वाटते की, माझ्या भागात एमआय टँक झाला पाहिजे किंवा के.टी.वेअर झाले पाहिजेत. परंतु आम्हाला नवीन कोणताही प्रकल्प हातात घेता येत नाही असे त्यांना नाइलाजास्तव सांगावे लागते. शेवटी सदस्यांना 3 लाख लोकांचे प्रतिनिधीत्व करावे लागत असते त्यामुळे मी आताच निवडून गेलो आहे व एकही प्रकल्प करणार नाही असे आपल्या मतदारांना सांगितले तर मतदार ते ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतात. या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विधायक सूचना केलेल्या आहेत.

यानंतर श्री.भारवि.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)

श्री.अजित पवार.....

दोन्ही बाजूचे सदस्य उपस्थित नाहीत. राज्याचे हित ज्यात असेल ते जोपासले जाईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेते विधान सभा व विधान परिषद, माननीय सभापती, विधान परिषद, माननीय अध्यक्ष, विधान सभा, माननीय उप सभापती विधान परिषद, माननीय उपाध्यक्ष, विधानसभा आणि प्रमुख गट नेते या सगळ्यांशी चर्चा केलेली आहे.

मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, आपल्याला मुदतवाढ द्यायची आहे. याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु, मुदतवाढ देत असताना खानदेशवर अन्याय होत आहे, कोकणावर अन्याय होत आहे, असे सांगितले. यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, काही ठिकाणी 70 ते 80 टक्के कामे झालेली आहेत. विदर्भात देखील एवढी कामे झालेली आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले विदर्भातील काही भागांमध्ये कामे झालेली आहेत. परंतु, सिंचनाकरिता तेवढे पाणी वापरले जात नाही. म्हणून आम्ही काटेकोरपणे त्याकडे लक्ष देत आहोत. कुठल्याही परिस्थितीमध्ये आज इतर लोकांना असे वाटता कामा नये की, ही मुदतवाढ देत असताना आम्ही किती वर्षे थांबायचे. मागच्या निवडणुकीच्या निमित्ताने बरेच जण बोलताना असे सांगत होते की, आर्थिक अनुशेष भरून काढण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले आहे. गेली 5-6 वर्षे सातत्याने निधी दिल्यामुळे आपण तेथपर्यंत पोहोचलेलो आहोत. त्याबद्दल चर्चा होऊ शकते. भौतिक अनुशेषासंबंधी प्रत्येकाची वेगवेगळी मते येऊ शकतात. तज्ज्ञ समिती नेमली जाऊ शकते. आर्थिक अनुशेषासाठी कोणत्या सालातील रक्कम धरायची यासंबंधी देखील वेगवेगळ्या प्रकारची मते असू शकतात, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. प्रत्येक गोष्टीत चर्चेद्वारे चांगल्या प्रकारे मार्ग काढता येऊ शकतो. मघाशी बोलत असताना काही माननीय सदस्यांनी असेही विचारले की, आपण इतके वर्षे हे काम करीत आहोत. परंतु एआयबीपी, नाबार्ड आणि केंद्र सरकारकडून किंवा जागतिक बँकेकडून निधी आणण्याचे काम का करीत नाही ? सर्व बाबतीतले सोर्सेस आम्ही शोधत आहोत. मला सभागृहाला सांगितले पाहिजे की, 1996-97 पासून 2009-10 पर्यंत म्हणजे 14 वर्षाचा एआयबीपीचा निधी देण्यास केंद्र शासनाने सुरूवात केली आहे. सुरूवातीला 1996 ते 2004 पर्यंत एआयबीपीचा 600 कोटी रूपये निधी मिळाला. सन 2004-2005 पासून सन 2009पर्यंत सहा वर्षामधील एआयबीपीचा मोठा निधी मिळाला आहे. यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरद पवार साहेब, अवजड उद्योग मंत्री श्री.विलासराव देशमुख, ऊर्जा मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, श्री.पृथ्वीराज चव्हाण, या अनेक मान्यवरांनी आम्हाला मदत केली. हे सर्व माजी मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या शब्दाला केंद्र सरकारमध्येमान आहे. मल सभागृहाला सांगायला अभिमान वाटतो की, 6500 कोटी रूपये एआयबीयपीमधून आणलेले आहे. पहिल्या आठ वर्षामध्ये आम्ही फक्त 600 कोटी रूपये केंद्र शासनाकडून आणले. गोसीखूर्द प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्पाची मान्यता दिली. आता देखील बोलताना कोकणातील माझ्या सन्माननीय सदस्यांनी एक मुद्दा मांडला की, कोयनेचे 67 टीएमसी पाणी वीज निर्मिती करून झाल्यानंतर खाली म्हणजे कोकणामध्ये येते व वशिष्ठी नदीला जाऊन मिळते व पुढे ते पाणी समुद्राला जाऊन मिळते. त्याला राष्ट्रीय प्रकल्पाचे स्वरूप देऊन ते पाणी मुंबईपर्यंत काही प्रमाणात पिण्यासाठी आणण्यासंबंधीचा विचार सुरू आहे. एवढेच नव्हे तर हे पाणी वेगवेगळ्या शहरी भागांकरिता देता येईल काय हे देखील तपासून पहात आहोत. तसेच उरलेले पाणी कोकणातील फलोत्पादन शेतीसाठी देता येईल काय याचा देखील विचार करण्यात येत आहे. निधी आहे. पण पाणी उलपब्धतेचे प्रमाणपत्र नसल्यामुळे तेथे काम सुरू करता येत नाही. याबाबत आपण नागपूरला बैठका घेतले. या बैठकीमध्ये मुख्य अभियंत्यांना अधिकारी दिले. त्यावेळी श्री.बी.टी.देशमुख हे सांगतील ते मी ऐकण्याचा प्रयत्न केला. कारण आपण वैयक्तिक काहीही सांगत नव्हता. शेवटी विदर्भ, मराठवाडा हे देखील आमचे भावंड आहे. स्वगीर्य चव्हाण साहेब हयात नसले तरी चव्हाण साहेबांवर विश्वास ठेवून ह्या गोष्टी केलेल्या आहेत. आज आम्ही सर्वजण प्रतिनिधीत्त्व करीत असताना त्या विश्वासाला तडा जाऊ न देता आपल्याला काय काय चांगल्या गोष्टी करता येतील व ह्या चांगल्या गोष्टी करीत असताना इतरांवर अन्याय होणार नाही अशा प्रकारची खबरदारी आपण घेत आहोत.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.अजित पवार ....

सभापती महोदय, केन्द्रामध्ये देखील यु.पी.ए.सरकारमध्ये महाराष्ट्रावर प्रेम करणारे अनेक दिग्गज मान्यवर आम्हाला वारंवार मदत करीत असतात ही गोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.या प्रस्तावावर चर्चा् करीत असतांना सन्माननीय सदस्यांकडून अनेक प्रश्न मांडण्यात आले आहेत. मधल्या काळात शासनाने सम न्यायी पाणी वाटपसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन केले होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी असे सांगितले की, मराठवाडयामध्ये नाथसागर प्रकल्प बांधण्यात आला व त्या प्रकल्पाच्या खाली बॅरेजेस बांधण्यात आली आहेत परंतु वरच्या बाजूला 15-20 धरणे बांधण्यात आली आहेत त्यामुळे ही धरणे भरल्याशिवाय खालच्या धरणामध्ये वा बॅरेजेस मध्ये पाणी येत नाही व त्यामुळे बाभळी बंधा-यापर्यत पाणी येत नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या वरच्या भागातील लोकांनी पाणी घ्यावयाचे आणि खालच्या भागातील लोकांनी फक्त बघतच बसावयाचे काय ? म्हणूनच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन केले असून त्यासबंधी कायदा केला आहे तसेच नियमसुध्दा केलेले आहेत .त्या प्राधिकरणाला काही अधिकार देखील देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्राच्या जडण घडणीसबंधाच्या बारकाईची खरोखर चांगली जाण आहे, माहिती आहे अशा प्रकारच्या राज्यातील चांगल्या चांगल्या लोकांना त्या ठिकाणी चेअरमन आणि सदस्य म्हणून निवडलेले आहे त्या प्राधिकरणाचे काम राज्यात सुरु आहे. राज्यावर मोठया प्रमाणावर कर्ज झालेले असले तरी काही प्रकल्पाचे प्रश्न सोडविण्यासाठी मध्यतरी कर्ज रोखेसुध्दा काढले होते. कृष्ण खो-यासंबंधीची कर्जरोखे का खपत आहेत आणि बाकीचे कर्जरोखे का खपत नाहीत अशीही तक्रार करण्यात आली होती.त्यामुळे हे कर्ज रोखे विकण्याचे थांबविण्यात आले होते.राज्य सरकारची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर प्रत्येक विभागाला चांगल्या प्रकाराचा निधी देण्याचे धोरण स्वीकारले गेले सुरुवातीच्या काळात जेवढी तरतूद असावयाची तेवढा खर्च होत नव्हता परंतु सन्माननीय सदस्य प्रा बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की,नंतरच्या काळात सातत्याने तुम्ही देखील अनेकदा डोळयात तेल घालून पहात होता. तसेच इतरांचेसुध्दा त्याकडे बारकाईने लक्ष असावयाचे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांकडून जी मागणी करण्यात येत आहे ती मागणी चुकीची नाही असे शासनाला सुध्दा वाटावयाचे. त्यामुळे मराठवाडा विदर्भ, उर्वरित महाराष्ट्रासाठी जी काही तरतूद दिलेली आहे ती तरतूद पूर्णपणे खर्च झाली पाहिजे जर ती तरतूद खर्च झाली

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

नसेल तर प्रकल्प वाईज महामंडळामध्ये ती शिल्लक ठेवली जाते. गेल्या वर्षी काही प्रकल्पाच्या कामावर खर्च न झालेली तरतूद शिल्लक ठेवली असून या वर्षी ते पैसे खर्च करण्यात येत आहेत. त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या तसेच विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी असे मनात आणता कामा नये कोठे तरी आम्हाला वेगळे टाकले जात आहे, दुजाभावपणा केला जात आहे.सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असतांना काही सन्माननीय सदस्यांनी गुजराथ आणि सौराष्ट्रातील वैधनिक विकास मंडळाच्या संदर्भात उल्लेख केला होता. त्या ठिकाणची वैधानिक विकास मंडळे बंद पडली असून आपल्या राज्यातच फक्त ही वैधानिक विकास मंडळे व्यवस्थितपणे चालविली आहे. आज सुध्दा यु.पी.ए. सरकारमध्ये काम करीत असणा-या राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ मंडळीचे मत असेच आहे की, वैधानिक विकास मंडळाला मुदत वाढ देण्यात आली पाहिते. ज्याबाबतीत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देत असतांना 288 नवीन आमदार निवडून आलेले आहेत त्याचप्रमाणें या सभागृहातसुध्दा अनेक सन्माननीय सदस्य प्रथमच निवडून आलेले आहेत. काही सन्माननीय सदस्यांची मुदत संपत आली असून त्या भागातील जनतेने संधी दिली तर ते पुन्हा निवडून येणार आहेत येथे पुन्हा निवडून आल्यानंतर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना असे वाटत असते की, माझ्या भागातील काही प्रश्न सुटले पाहिजेत.हे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना असतात . त्या भावना समजावून घेत असतांना त्यांना काही गोष्टी पटवून दिल्या आणि सांगितले की तुम्हालाही काही निधी देत आहोत परंतु ते देत असतांना ज्या ठिकाणी मोठया प्रमाणावर कामे हाती घेतली आहेत ती कामे पूर्ण करावयाची आहे असे सांगितले तर कोणाचीही अडचणं रहात नाही .त्यामुळे काही वेळा सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, आमच्या भागाकरता पॅकेज दिले आहे. वास्तविक सगळया भागात पॅकेज देत असतांना चांगला विचार डोळयासमोर ठेवून पॅकेज देण्याची राज्य सरकार म्हणून आमची इच्छा असते. आज सुध्दा राज्यामध्ये कितीही प्रयत्न केला तरी देखील एकंदरीत लागवडीखालील क्षेत्राच्या 38 टक्क्याच्या पुढे आपण सिंचनाच्या बाबतीत जाऊ शकत नाही. पाचही विभागात प्रयत्न करुन 20.50 टक्के लागवडी लायक क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. वेगवेगळया भागात वेगवेगळे प्रकल्प आल्यानंतर तेथील सिंचनाचे पाणी कमी करुन पाणी पुरवठा करणा-या योजनांना पाणी देण्याचा निर्णय जलसंपदा मत्री म्हणून मला घ्यावा लागला. मघाशी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अकोला शहराच्या पाणी पुरवठयासबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता ..

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

मागील टर्मच्या वेळी अकोला शहराला रेल्वेच्या टँकरने पाणी देण्याचा विचार करीत होतो. त्यावेळी त्याठिकाणी असलेल्या कोणत्याही महत्वाच्या धरणामधून वेळ पडली तर सिंचनाला पाणी न देता पहिल्यांदा अकोला शहराला पाणी देऊ. अशाप्रकारचा विचार राज्यकर्ते म्हणून नाईलाजास्तव आम्हाला करावा लागतो . त्यामध्ये राज्य सरकारची वेगळी भावना कधीच नसते. सभापती महोदय, साडे 20 टक्यापर्यंत लागवडीलायक सिंचनाखालील क्षेत्र आले आहे. त्यावर बोलतांना सन्माननीय सदस्यांनी दुष्काळी तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ काढा अशाप्रकारचा विचार मांडला. ते महामंडळ काढून प्रश्न सुटणार आहे काय? आपल्याला त्यामधून फक्त समाधान मिळेल. मी त्या माननीय सदस्यांबरोबर चर्चा केली. स्वतंत्र महामंडळ काढून दुष्काळी तालुक्याचे प्रश्न सुटणार असतीलतर ते काढण्यास राज्य सरकार तयार आहे. त्यामध्ये कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. मागील विधानसभेमध्ये त्या बाबत चर्चा झाली होती. याठिकाणी चर्चा करीत असतांना माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. हे सर्व करीत असतांना आतापर्यंत जलसंपदा विभागाने 52 हजार कोटी रुपये खर्च केले तरीसुध्दा राज्यातील 25 जिल्हयामध्ये राज्याचे दरडोई उत्पन दिवसें दिवस कमी होत आहे. मानव विकास निर्देशांक वाढीच्या काळात या सर्व गोष्टी करीत असतांना त्याप्रमाणे आपल्याला वाढत्या लोकसंख्येचा विचार करावा लागेल. महाराष्ट्राच्या नंदूरबार, धुळे व जळगाव या जिल्हयांमध्ये अतिशय वाईट परिस्थिती आहे. कोकणामध्ये धो धो पाऊस पडतो.परंतु शेवटचे चार महिने त्याठिकाणी काय परिस्थिती असते? कोकणवासियांना काही ठिकाणी टँकरने पाणी द्यावे लागते असा विरोधाभास आहे. त्यामध्ये आलेले ग्लोबल वॉर्मिगचे संकट हा आता नवीन विषय झाला आहे. आज आपण जगामध्ये अनुभव घेत आहोत, युरोपमध्ये संपूर्ण विमान वहातूक बंद पडली आहे, कुठेही टेक ऑफ घेऊ शकत नाहीत. अशाप्रकारचे वेगवेगळे प्रश्न निर्माण होत आहे.

मघाशी बोलतांना माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, कृषी पंपाचा अनुशेष मोठया प्रमाणात आहे. त्यांना मला सांगितले पाहिजे की, यापूर्वी ऊर्जामंत्री म्हणून माननीय श्री. तटकरे काम करीत होते, आता त्यांच्याकडे वित्त खाते आले आहे. त्यामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर चांगल्या पध्दतीने तयार करुन नवीन ट्रान्सफॉर्मर देऊन, नवीन पॉवर लाईन देऊन, नवीन वीज प्रकल्प आणून कोणत्याही परिस्थितीत राज्यामध्ये जादा सिंचन व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

शेतकऱ्यांनी वीजेच्या पंपाकरिता मागणी केली तरी आपण त्यांना कनेक्शन देऊ शकत नाही. त्यांना वीजेचे कनेक्शन देता आले पाहिजे यासाठी केंद्रीय ऊर्जामंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे हे देखील आपणास चांगल्या प्रकारची मदत करीत आहेत. मघाशी बोलतांना माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, आम्ही काय 25 वर्षे थांबायचे काय? तेवढे वर्षे थांबण्याचे कारण नाही. सद्या चंद्रपूरच्या तलावातील पाणी कमी झाल्यामुळे त्याठिकाणी शहरासाठी पाणी देण्यासाठी अग्रक्रम द्यावा लागत आहे. त्यामुळे बरेचसे प्रकल्प आज अडचणीत आले आहेत. म्हणून नैसर्गिक संकटामुळे हे प्रकल्प अडचणीत आले आहेत, तापमान वाढले आहे, दरवर्षीपेक्षा 1 ते 2 टक्क्यांनी टेंपरेचर सर्व भागामध्ये वाढले आहे. आणि म्हणून सर्व ठिकाणी मागणी वाढली आहे. याबाबत विचार करुन सन 2012 पर्यंत नियोजन करुन या राज्यातील भारनियमन मुक्त करावे आणि यापुढे राज्याला कधीही विजेच्या संदर्भात कमतरता भासू नये यासाठी सातत्याने माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्र्यांबरोबर बसून त्याबाबत निर्णय घेत आहोत. त्यासाठी निधीची अडचण येऊ दिली जात नाही. अशाप्रकारची सर्व कामे केली आहेत. मागील दहा वर्षामध्ये आम्ही वीज निर्मितीच्या बाबतीत कमी पडलो होतो. तरीदेखील महाराष्ट्रातील जनतेने आम्हाला स्वीकारले, आणि पुन्हा या राज्यामध्ये निवडून देण्याचे काम केले. माननीय श्री. रावते साहेब तुम्ही याबाबतीत जनतेला सांगायला कुठे कमी पडलात की काय मला माहीत नाही. परंतु जनतेने आम्हाला निवडून दिले ही वस्तुस्थिती आपण नाकारु शकत नाही. आणि म्हणून लोकांसमोर जात असतांना हा मुद्दा लोकांसमोर आता राहणार नाही याची शासन खबरदारी घेत आहे. आज चर्चा करीत असतांना अत्यंत महत्वाच्या विषयावर, संवेदनशील अशाप्रकारच्या सर्व प्रश्नावर चर्चा झाली. त्यामध्ये सर्वच वेगवेगळया विधायक सूचना करण्यात आल्या. सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्री, सभागृहाचे नेते आले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

त्यामुळे आम्ही सर्वजण एकत्र बसून चर्चा करणार आहोत आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, अजून आपल्या हातामध्ये आठ दिवस आहेत. ही मुदत 30 एप्रिल रोजी संपणार आहे. त्यामुळे सभागृहाने याबाबतीत काळजी करण्याचे अजिबात कारण नाही. फक्त हे सगळे करीत असताना आज खानदेशमधील सन्माननीय सदस्यांनी, माझ्या कोकणवासियांनी काही प्रश्न मांडलेले आहेत, तसेच मराठवाडयातील सन्माननीय सदस्यांनी देखील प्रश्न मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे विदर्भातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील सन्माननीय सदस्यांनी देखील प्रश्न मांडलेले आहेत. या सगळयांचा विचार करुन, माननीय राज्यपालांनी ठरविलेल्या सूत्रानुसार काही निधीचे वाटप करावे लागेल. आपल्याला आठवत असेल की, आपण पाठिमागच्या काळामध्ये जो निधी दिला, तो देत असताना साधारणत: एम.के.व्ही.डी.सी.ला 25.5 टक्के, गोदावरी-मराठवाडा इरिगेशन डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशनला 27.5 टक्के, तापी इरिगेशन डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशनला 10 टक्के, कोकण इरिगेशन डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशनला 10.5 टक्के आणि विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाला 26 टक्क्याच्या काही वर अशा प्रकारे निधीचे वाटप केलेले होते. 50 टक्के लोकसंख्येचा विचार करुन माननीय राज्यपाल महोदय तशा प्रकारच्या सूचना देतात आदिवासी उपयोजनेतून देखील आदिवासी लोकसंख्येच्या 50 टक्के आणि आदिवासी क्षेत्राला 50 टक्के अशा प्रकारचा विचार करुन निधी देता येईल काय ? याबाबत माननीय राज्यपाल महोदयां कडे सर्व पक्षांचे समावेशक अशा पध्दतीचे शिष्टमंडळ नेऊन सगळया गोष्टी करण्याच्या बाबतीत राज्य शासनाची भूमिका आहे. त्याबद्दल कोणीही काळजी करण्याचे कारण नाही हे देखील मला आजच्या चर्चेच्या उत्तराच्या निमित्ताने नम्रतापूर्वक सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या सगळया गोष्टी करीत असताना अलिकडच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून एखाद्या विभागाचा विकास करण्याकरता नवीन-नवीन दृष्टीकोन अंगिकारले जातात. ज्या वेळेस मागच्या काळामध्ये वेगवेगळया समित्या नेमलेल्या होत्या, त्यावेळेची भौगोलिक परिस्थिती आणि आता 2010 सालामध्ये आपण सर्वजण आल्यानंतर नव्याने काही निर्माण झालेले प्रश्न या सगळयांची तुलना करता, नवे-नवे दृष्टीकोन अंगिकारले गेले पाहिजेत. मानव विकास निर्देशांक ज्याला एच.डी.आय.असे म्हणतात तो आणि इतर निर्देशांक याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आरोग्य, शिक्षण किंवा महिला सक्षमीकरण व समानता इ.बाबत देखील

. .. .4 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संयुक्तपणे विचार केला पाहिजे. या गोष्टी देखील तेवढयाच महत्वाच्या आहेत. त्यामुळे या गोष्टींचाही राज्य शासन निश्चितपणे विचार करीत आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य बोलत असताना त्यांनी गडचिरोली जिल्ह्याबाबत सांगितले. गडचिरोली जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात नक्षलवादी कारवाया होत असतात. म्हणून तेथील प्रकल्पांना आकस्मिकता निधी देण्याच्या बाबतीत माझे माननीय अर्थमंत्री महोदयांशी बोलणे झालेले आहे. तेथे महागाव गरी मध्यम प्रकल्प असेल, हल्दीपुरानी मध्यम प्रकल्प, कोरगल मध्यम प्रकल्प, चिंचडोण मध्यम प्रकल्प असेल, तर याही बाबतीत सी.एफ.ॲडव्हान्स घेऊन ती कामे मार्गी लागावीत. कारण तेथील जनतेला देखील असे वाटता कामा नये की, आमच्याकडे एवढया मोठया प्रमाणावर सुरक्षितेतेच्या संदर्भातील प्रश्न असताना देखील राज्यकर्ते आमच्याकडे लक्ष देत नाहीत अशा प्रकारची भावना येथील जनतेच्या मनामध्ये निर्माण होता कामा नये हा आमचा यामागील प्रयत्न आहे. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, 2010-2011 या वर्षामध्ये विदर्भातील सिंचनाच्या बाबतीत शासनाचे काय नियोजन आहे ? माननीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, आम्ही 2010-2011 मध्ये 3236 कोटी रुपयांची तरतूद केलेलीच आहे. नागपूर विभागामध्ये 48 हजार हेक्टर आणि अमरावती विभागामध्ये 49 हजार हेक्टर असे 1 लाख 27 हजार हेक्टर इतके सिंचनाचे उद्दिष्ट आपण ठेवलेले आहे आणि 53 प्रकल्प पूर्ण करावयाचे आहेत. एक गोष्ट खरी आहे की, हे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण झाले पाहिजेत. पण हे पूर्ण् करीत असताना मला सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे. आपण बऱ्याच वेळा बोलत असताना सांगतो की, आमच्याकडे कर्ज प्रकरणे होत नाहीत. आज आमच्याकडे शेतकऱ्यांसाठी 50 हजारापर्यंत शुन्य टक्के व्याजाची योजना आहे.पण त्याचा फायदा होत नाही. आता त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधी हे तेथील प्रतिनिधीत्व करीत असताना सुध्दा काहीच भागातील बँका सेक्शन 11 खाली का जातात? आणि काही भागामध्ये सहकारी साखर कारखानदारी चांगल्या प्रकारे का चालू शकत नाही ? याला राज्य सरकार दोषी आहे काय? काही भागामध्ये दुधाचा धंदा वाढण्यासाठी पंतप्रधान पॅकेजमधून मोठया प्रमाणावर गाईंचे वाटप झाले.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / शोधित नाही

श्री. अजित पवार..

त्यातून दुधाचा धंदा कां वाढत नाही. आपण कुठे कमी पडतो? सुदैवाने श्री. नितीन राऊत यांच्याकडे दुग्धविकास खाते आहे. ते विदर्भातील आहेत. राज्य सरकार कितीही मदत करायला तयार आहे. विकास कामाकरिता पैसा दिलाच पाहिजे त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही.परंतु विकास कामाकरिता, सूत गिरण्यांकरिता, अर्बन बँकाकरिता, साखर कारखान्यांकरिता, जिल्हाबँकांकरिता ज्यावेळी राज्य शासनाचे मदतीचे धोरण असते त्यावेळी त्या त्या भागातील सर्व सहकाऱ्यांनी सर्वांनीच मग तो पश्चिम महाराष्ट्र असेल, कोकण असेल, खानदेश असेल, मराठवाडा विदर्भ असेल या सगळया भागातील सहकाऱ्यांनी व्यवस्थितपणे त्या संस्था चालविल्या पाहिजेत. आज केंद्र सरकार, राज्य सरकार कोटयावधी रुपये, पन्नास हजार रुपये शून्य टक्के व्याजाने देत आहे. आणि काही जिल्हा बँका मात्र एक रुपयाचे कर्ज देखील त्या शेतकऱ्यांना देऊ शकत नाहीत कसे ते शेतकरी पुढे येतील? सभापती महोदय, याही गोष्टीचा अतिशय शांतपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. मी कुणावर टीकाटिप्पणी करीत आहे अशा प्रकारची भावना कृपा करुन कोणीही मनामध्ये आणण्याचे काही कारण नाही हे देखील मला याठिकाणी नम्रपणे सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. या सगळया गोष्टी होत असताना रेशीम सारखा उद्योग असेल हॉर्टिक्लचर सारखा उद्योग असेल, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु जे जे काही कोकणवासियांकरिता करायचे असेल त्यालाही भागभांडवल देण्याची राज्य सरकारची तयारी आहे. आज अर्थमंत्री स्वतः कोकणातील आहेत. ते कोकणाला पहिल्यांदा काही देण्यासाठी इच्छूक आहेत फक्त प्रस्ताव आणण्याची ते वाट बघत आहेत. वास्तविक प्रस्ताव चांगले असले पाहिजे. राज्याचे मुख्यमंत्री असतील, उपमुख्यमंत्री असतील सर्वांनाच वाटते की, वेगवेगळया भागातील प्रश्न सुटले पाहिजेत. शिक्षणाच्या संदर्भातील प्रश्न देखील सुटले पाहिजेत.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी बोलत असताना शिक्षणाबद्दल सांगितले की, ठराविक भागातच शैक्षणिक संस्था का वाढतात? सभापती महोदय, काही जण मागासलेल्या भागातील आहेत परंतु संस्था मात्र मुंबई-पुण्यात येऊन काढतात. का हो असे करता? ते जर मागासलेल्या भागातील आहेत तर त्यांनी शिक्षण संस्था मागासलेल्या भागात काढाव्यात ना? त्याला परवानगी देण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तयार आहेत. परंतु इकडे काय मलिदा मिळतो का आणखी काय मिळतो हे मला माहीत नाही. बरेचजण आपापल्या भागामध्ये संस्था

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

काढतात परंतु काही जण मात्र वेगळया पध्दतीचा विचार करतात. असा विचार करता कामा नये. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ते नाशिकला गेल्यानंतर भुजबळ नॉलेज सिटी किती सुंदर काढली आहे हे आपल्याला माहीत आहे. उद्या तशा पध्दतीने येवल्याला होईल किंवा नांदगावला देखील होईल. मुंबईला होते तेव्हा त्यांनी मुंबईला देखील काढली. सन्माननीय सदस्य रावते साहेब आपल्याला सरसेनापतींनी तिकडची जबाबदारी दिली ती जबाबदारी आपण पार पाडली पण संस्था काढली नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे (बसून) : बरेच लोक आम्हाला सांगतात की, पवार साहेब पुण्यात आहेत.

श्री. अजित पवार : तुम्हाला सांगतात पवार साहेब पुण्यात आहेत पण मला सांगतात डॉ. नीलमताई पुण्यात आहेत म्हणून आम्ही पुण्यात संस्था काढतो. सभापती महोदय, यातील विनोदाचा भाग जाऊ द्या.

सभापती महोदय, एकंदरीत आज देखील राज्यासमोर खूप गंभीर प्रश्न आहेत. हे सगळे प्रकल्प पूर्ण करीत असताना आपल्याला 87 हजार कोटी रुपयाची आवश्यकता आहे. थोडयावेळा पूर्वी बोलत असताना सन्मानीय सदस्य श्री. राजन तेली का कोणीतरी मुद्दा काढला होता की, कोकण पाटबंधारे विकास मंडळाचे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता पाच हजार कोटी रुपयापेक्षा अधिकचा निधी पाहिजे. तापीचे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता जवळपास बारा हजार कोटी रुपये पाहिजेत. एमकेव्हीडीसीचे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता अठरा हजार कोटी रुपये पाहिजेत. गोदावरीचे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता साडेसोळा हजार कोटी रुपये पाहिजेत. विदर्भातील प्रकल्पाकरिता पस्तीस हजार कोटी रुपये पाहिजेत. म्हणूनच आपण केंद्राकडून पैसा आणून गोसीखुर्दच्या संदर्भातील मुद्दा बराचसा मार्गी लावलेला आहे. बऱ्याचदा मंत्रिमंडळामध्ये देखील चर्चा होते किंवा दोन्ही बाजूचे सर्व सदस्य चर्चा करीत असतात की, एक लाख नव्वद हजार कोटी रुपये कर्ज आहे? किती झाले कर्ज? ते 2 लाख 50 हजार कोटी रुपये झाले तरी चालेल कारण आज जगामध्ये महासत्ता म्हणून कुणाकडे बघितले जाते? अमेरिकेकडे बघितले जाते. जगामध्ये सर्वात जास्त कर्ज प्रा. बी.टी. देशमुख साहेब अमेरिकेवर आहे. माननीय अर्थमंत्री येथे आहेत. विकास कामांकरिता उद्या अधिकचा निधी उभा करावा लागला तरी चालेल ते कर्ज 2 लाख 50 हजार कोटी रुपयांपर्यंत गेले तरी काही बिघडत नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्ध मुद्रित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

परंतु या पाचही विभागातील सर्व प्रश्न, मग शेतीचे प्रश्न असतील किंवा इतर वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न असतील तो अनुशेष दूर करण्याकरिता या राज्य सरकारची भूमिका अतिशय बेरजेची आणि मदतीची राहणार आहे, हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्प पूर्ण झाल्यावर आमच्या 21 टीएमसी पाण्याचे काय याबाबत मुद्दा उपस्थित केला. खरे तर आपण भीमा स्थिरीकरणातून 21 टीएमसी आणि सीना-कोळेगाव प्रकल्पातून मुक्त पाणलोट क्षेत्रातून 2.65 टीएमसी असे 23.66 टीएमसी पाणी वळविण्याचे नियोजन आहे. याबद्दलच्या प्रस्तावित कामांची सुरुवात देखील झालेली आहे. आपण त्यामध्ये सोमनथाळी बॅरेज, उदघट बॅरेज, निरा-भीमा बोगदा याबाबतच्या निविदा निश्चित करुन काम सुरु केलेले आहे. त्यामध्ये कृष्णा-भीमा स्थितीकरणातून देखील पूरक असे पाणी नेता येईल. याही सगळ्या गोष्टी करीत आहोत. त्याबाबत नुसती कोठे तरी घोषणा नाही तर प्रत्यक्षात हक्काचे पाणी देण्याच्या बाबतीत, कोणी वेगळे पाणी देत आहे असे नाही तर ते मराठवाड्याच्या हक्काचेच पाणी आहे आणि ते देण्याच्या बाबतीत राज्य सरकार सतत प्रयत्नशील आहे. ही गोष्ट मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे.

सभापती महोदय, इतर अनेक वेगवेगळ्या प्रकारचे मुद्दे या ठिकाणी चर्चेला घेतलेले आहेत. कदाचित मला सगळ्या मुद्यांना स्पर्श करता आला नाही परंतु मला आवर्जून सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, कधी कधी कारण नसताना वैयक्तिक माझ्या नावाचा उल्लेख करुन या ठिकाणी हे सगळे होणार आहे परंतु कोठे तरी जलसंपदा मंत्र्यांचा विरोध आहे असे सांगितले जाते. सभापती महोदय, अशा पध्दतीने कोठेही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागाला निधी देण्याकरिता आमचा विरोध नव्हता. कालही नव्हता, आजही नाही आणि उद्याही नसणार आहे. उलट मी खात्रीने सांगतो की, या पाच सहा वर्षामध्ये सर्वात जास्त मराठवाडा आणि विदर्भाला निधी देण्याचे काम आणि त्या भागातील बॅरेजेस पूर्ण करण्याचे काम, त्या भागातील इतर प्रश्न मार्गी लावण्याचे काम सर्वांनी मिळून केलेले आहे. मला माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे. यामध्ये काही प्रकल्प होतात परंतु त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

प्रकल्पाच्या बाबतीत बाकीचे सहकार्य मिळाले पाहिजे. आम्ही गोसीखूर्द प्रकल्पामध्ये 10 टीएमसी पाणी अडवू शकतो. परंतु त्या ठिकाणी ज्यांचे पुनर्वसन करावयाचे आहे त्यांना त्या ठिकाणी सर्वतोपरी मदत झालेली आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये काही मुद्दे राहिलेले होते ते सुध्दा आपण अधिकचे काही कोटी रुपये देऊन सोडविले आहेत. सी.एफ.ॲडव्हान्स देखील दिला. एकीकडे 60 कोटी रुपये आणि दुसरीकडे 65 कोटी रुपये दिले. मला असे वाटते की, श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी सांगितले होते ते 65 कोटीचे एक काम होते आणि गोसीखूर्दचे 60 कोटीचे काम होते. परंतु त्या ठिकाणी अजूनही तेथील ग्रामस्थ जायला तयार नाहीत. स्थानिकांनी पण त्याबाबतीत मदत केली पाहिजे. जसे वर्धा डायव्हर्शनबाबत सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी पुढाकार घेतला तसेच डॉ. सुनील देशमुख साहेब यांनी पुढाकार घेतला आणि ते प्रश्न मार्गी लागले. या ठिकाणी आपण निधी देऊ. जलसंपदा विभागाचे मंत्री किंवा अधिकारी या नात्याने आमची जबाबदारी आहे. आम्ही पण त्या ठिकाणी जाऊ आणि सांगू परंतु स्थानिकांनी पण त्याबाबतीत मदत केली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये काही भागात प्रकल्प करण्याकरिता काही लोक शब्दाखातर त्या ठिकाणाहून ताबडतोब हलले. काही लवादाचे प्रश्न असतात. ठराविक काळामध्ये पाणी अडविले गेले पाहिजे. ते पाणी जर त्या वेळेत अडविले नाही आणि ते पुढे गेले तर आपला त्या पाण्यावरचा हक्क आपला निघून जातो त्यामुळे तेथील स्थानिकांना सुध्दा तितक्याच गंभीरतेने संमजावून देण्याचे काम सर्वांचे आहे. बऱ्याचदा विशेषत: विदर्भामध्ये या बऱ्याच गोष्टी सोडवित असताना आमच्या जलसंपदा विभागाचे अधिकारी कधी कोठे मोजणी करावयास गेले तर त्यांना मारतील, त्यांचे कपडे फाडतील, त्यांना बनियनवरच ठोकून काढतील याही गोष्टी होतात. कोठे तरी कोणाची तरी जमीन-जुमला, घरे-दारे, शेती हे सगळे काही प्रमाणात पाण्यामध्ये गेल्याशिवाय बाकीची जमीन सिंचनाखाली येणार नाही. हा तरी विचार सर्वांनीच त्या ठिकाणी केला पाहिजे. म्हणून अशा काही कामामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी नागपूर आणि अमरावती विभागामध्ये देत असताना, विशेषत: मराठवाड्यामध्ये तशा प्रकारची अडचण येत नाही. मराठवाड्यामध्ये थोडसे समजावून सांगितले, स्थानिक लोकांनी पुढाकार घेतला, त्यांना व्यवस्थित दर दिला, रेडीरेकनर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

प्रमाणे बाजारभावाप्रमाणे जर त्यांना किंमत दिली तर त्या ठिकाणी मार्ग निघू शकतो. परंतु मला गोसीखूर्दला मागच्या ऑक्टोबरमध्ये पाणी अडवावयाचे होते. ते पाणी अडविता आले नाही. 10 टीएमसी पाणी अडविण्यासारखी सगळी व्यवस्था झाली. मघाशी बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी आमच्यावर टीका केली की नुसती धरणे दिसतात पण काही ठिकाणी गेट बसलेले नाहीत

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

परंतु त्याठिकाणी गेट बसवावेत, त्याठिकाणी पाणी अडवावे, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही ठिकाणी कालवे झालेले नाहीत. वास्तविक कालवे होण्याच्या कामाचे नियोजन अग्रक्रमाने कसे व्यवस्थित करता येईल याबद्दल शासन लक्ष देण्यास तयार आहे. त्यासाठी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या उपस्थितीत वेगळी बैठक लावावयाची असेल तर माझी केव्हाही तयारी आहे. त्यासाठी जलसंपदा विभाग किंवा राज्य सरकार आडमुठेपणाची भूमिका घेणार नाही. परंतु हे सर्व करीत असतना स्थानिक लोकप्रतिनिधींची जबाबदारी असते, त्यांनी पण अनुशेष भरुन काढण्याच्या कामाच्या बाबतीत मदत केली पाहिजे. हे प्रकल्प होण्यासाठी मार्ग काढला पाहिजे. सभापती महोदय, 100 टक्के सिंचन कोठेच होऊ शकत नाही. मी बारामती मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतो, 11 वर्षे राज्याचा मंत्री म्हणून काम केलेले आहे, सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार साहेबांनी राज्याचे 4 वेळा मुख्यमंत्री म्हणून काम केलेले आहे म्हणून बारामतीमध्ये 100 टक्के बागायती झालेली नाही. शेवटी तेथे पडणारे पावसाचे पाणी आणि वरच्या भागामध्ये असलेली धरणे आणि धरणाच्या साईड या सर्वांचा विचार करुनच राज्यकर्त्यांना नियोजन करावे लागते. त्यामुळे आज वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ दिली म्हणून 288 मतदार संघामध्ये पाणी जाईल अशातील भाग नाही. काही ठिकाणी कितीही प्रयत्न केले तरी पाणी जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत तेथे दुसरा कोणता पर्याय उपलब्ध होऊ शकतो यावर विचार करता येऊ शकतो. तेथे उद्योग वाढविता येतील काय, तेथे नवीन रोजगार निर्माण करता येतील काय, तेथे वस्त्रोद्योगाचा प्रकल्प उभा करता येईल काय, अशाही वेगवेगळया गोष्टी निर्माण करता येतात. तेथील सिंचनाचा अनुशेष भरुन निघाला नाही तरी वेगळया पध्दतीने मग रस्त्याच्या कामाचा असेल, आरोग्य सेवेतून असेल, पाणीपुरवठयाचा असेल तो अनुशेष भरुन काढण्यासाठी राज्यसरकारचे धोरण आहे. आज मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, तंत्रशिक्षणाचा अनुशेष विदर्भाचा 8 कोटी 71 लाखाचा आहे. मराठवाडयाचा शून्य आहे, उर्वरित महाराष्ट्राचा 13 कोटी 41 लाखाचा आहे. आरोग्य सेवेचा विदर्भाचा अनुशेष 68 कोटी 80 लाखाचा आहे, मराठवाडयाचा 287 कोटीचा आहे. उर्वरित महाराष्ट्राचा 428 कोटींचा आहे. उर्वरित महाराष्ट्राचा पशुवैद्यकीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.अजित पवार...

सेवेचा 36 लाखांचा आहे, बाकीच्या ठिकाणी शून्य आहे. म्हणजे कोणता तरी एक विभाग पुढे गेलेला आहे आणि तेथे कोणताही अनुशेष शिल्लक राहिलेला नाही असेही नाही. सगळीकडेच वेगवेगळया विभागात कमी अधिक प्रमाणात अनुशेष आहे. परंतु कोणत्याही भागात कोणत्याही प्रकारचा अनुशेष राहू नये अशी सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भूमिका आहे त्या भूमिकेशी मात्र राज्य सरकार निश्चितपणे सहमत आहे. हे मला पुन्हा एकदा चर्चेच्या निमित्ताने लक्षात आणून द्यावयाचे आहे. म्हणून राज्यपालांची विशेष जबाबदारी, 1994 ची मुदत 30 एप्रिल, 2010 रोजी संपुष्टात येत असल्याने ती मुदत आणखी पाच वर्षांसाठी राज्य शासनाने वाढविण्यासाठी केंद्र शासनाला विनंती करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी असा प्रस्ताव प्रांताध्यक्ष व सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. त्याला बाकीच्या सर्व पक्षातील सन्माननीय सदस्यांनी एकमुखी पाठिंबा दिलेला आहे. परंतु तो पाठिंबा देत असताना प्रत्येकाची वेगवेगळी मते आपण ऐकलेली आहेत. या मंडळांना मुदतवाढ द्यावयाची आहेच. पण ही मुदतवाढ देत असताना कोणाच्याही मनात शंका कुशंका राहू नयेत एवढेच मी सांगतो. यासाठी आणखी 8 दिवसांची मुदत आपल्या हातामध्ये आहे. त्यामुळे राज्यातील कोणत्याही भागातील जनतेने काळजी करण्याचे कारण नाही. वेगळया प्रकारची शंका कुशंका घेण्याचे कारण नाही. आपण सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आलेलो आहोत. राज्याची निर्मिती होऊन 50 वर्षे झालेली आहे. उलट आपण सगळयांनी मिळून काम करुन दाखवू या. ठराविक लोकांच्या मनात वेगळया विदर्भाची भावना आलेली आहे. ती भावना त्यांच्या मनातून निघून जावी एवढा चांगल्या पध्दतीचा निर्णय घेऊ व राज्यात चांगल्या पध्दतीचे वातावरण निर्माण करु यासाठी राज्य सरकार तसूभरही कमी पडणार नाही, केंद्र सरकार यासाठी भरीव सर्व प्रकारची मदत करण्यास तयार आहे. हे सुध्दा मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. या सर्व चर्चेच्या निमित्ताने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

अशुधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(श्री. अजित पवार....

कदाचित एखाद्या मुद्याला मी स्पर्श केला नसेल आणि त्याबाबतीत सन्माननीय सदस्य मला वेगळे भेटले तर राज्य सरकारची भूमिका किंवा जलसंपदा विभागाची भूमिका त्या त्या भागाला मदत करण्यासाठी कशी सकारात्मक आहे हे मी सांगेन. या सगळया बाबतीत कोणाच्याही मनामध्ये कोणत्याही प्रकारच्या शंका कुशंका राहू नयेत हेही मी येथे सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य प्राध्यापक सुरेश नवले हे केवळ प्राध्यापकच नाही तर ते उत्तम कवी आणि गायकही आहेत. त्यांचा आवाज खणखणीत आहे. मला वाटते त्यांचा आवाज ऐकूण माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी त्यांना घेतलेले असावे. त्यांनी देखील चांगले मत मांडलेले आहे. त्यांच्या बीड जिल्ह्यातील प्रश्नही आम्ही पहात असतो. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे, प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, अरुण गुजराथी, गुरुनाथ कुलकर्णी, केशवराव मानकर, जैनुद्दीन जव्हेरी, सय्यद जमा, रमेश शेंडगे, ॲड. उषा दराडे अशा मान्यवर सदस्यांनी भाग घेतला. अन्य सन्माननीय सदस्यांना देखील या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा होता. परंतु वेळेअभावी त्यांना आपली मते मांडता आली नाहीत.

सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की मागच्या 5 वर्षामध्ये आर्थिक अनुशेष भरुन काढण्यासाठी माननीय राज्यपाल महोदयांनी सूचित केले होते त्या रकमेच्या बाबतीत, कोणतीही किंमत ठरविण्याच्या बाबतीत, विविध सूचना असू शकतात, पण माननीय राज्यपालांनी जे निदेश दिले होते त्या निदेशांचे तंतोतंत पालन केलेले आहे. लोकशाही आघाडीचे सरकार निर्विवादपणे सत्तेवर आणण्याचे काम 1990नंतर पहिल्यांदा झालेले आहे, या सरकारला पाठिंबा मिळालेला आहे. त्यामुळे या 5 वर्षामध्ये काम करीत असताना कोणत्याही विभागातील लोकप्रतिनिधीला किंवा त्या भागातील व्यक्तील असे वाटता कामा नये की आम्हाला कुठे तरी दुर्लक्षित करुन येथे निर्णय घेतले जातात, ठराविक भागामध्ये जास्तीत जास्त निधी ओढून नेला जातो. असा कोणताही प्रकार घडणार नाही याची खबरदारी राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, राज्याचा जलसंपदा विभाग आणि मंत्रिमंडळातील सर्व सहकारी, आम्ही सर्वजण घेऊ असा शब्द या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने अत्यंत महत्वाच्या अशा विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनुशेषाच्या संदर्भात, संविधानाच्या अनुच्छेद 371(2)च्या संदर्भात या सदनामध्ये चर्चा झाली. या चर्चेमध्ये सदनातील अनेक मान्यवर सदस्यांनी सहभाग घेतला. जे सन्माननीय सदस्य विदर्भ आणि मराठवाड्यातील नाहीत त्यांनी सुध्दा वैधानिक विकास मंडळ व्हावे अशी मागणी केली. हा विषय फार महत्वाचा आहे असे मी समजतो. त्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने चांगली भूमिका घेतलेली आहे. सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार यांचे मी मनापासून आभार मानतो. घटनेतील तरतुदी नुसार विदर्भ आणि मराठवाड्यासाठी अशा प्रकारची वैधानिक विकास मंडळे स्थापन करता येतात. मागील 10 वर्षाच्या काळामध्ये अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला आहे. पुढच्या 5 वर्षामध्ये वैधानिक विकास मंडळाला मुदत वाढ देण्याच्या संदर्भात शिफारस करण्याचा निर्णय माननीय मंत्री महोदयांनी जाहीर केला त्या बद्दल मी त्यांचे आणि राज्य शासनाचे मनापासून आभार व्यक्त करतो. 30 एप्रिल अंतिम तारीख आहे. 30 तारखेपूर्वी आपल्याला केन्द्र शासनाकडे शिफारस करावयाची आहे. या मध्ये केन्द्रीय मंत्रिमंडळाचा भाग आहे, त्यानंतर महामहीम राष्ट्रपतींची सही व्हायची आहे. या सगळ्या बाबी 30 तारखेपर्यन्त पार पाडायच्या आहेत. त्या दृष्टीकोनातून कार्यक्रमाची आखणी करुन या वैधानिक मंडळांना मुदत वाढ देण्याच्या संदर्भात आवश्यक ती पावले उचलावीत अशा प्रकारची मी विनंती करीत आहे. माननीय मंत्री महोदयांनी या प्रस्तावावरील चर्चेला अतिशय चांगले उत्तर दिले. त्यांच्या उत्तरामध्ये कोणतीही गोष्टी राहिली आहे असे मला वाटत नाही.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

त्याबद्दल ज्या काही भावना व्यक्त केल्या, वैधानिक विकास मंडळाच्या मुदतवाढीबद्दल शंका निर्माण झाली किंवा शंका उत्पन्न केली गेली. शेवटी करावे की करु नये असा प्रश्न निर्माण झाला. अनेकदा सभागृहात प्रस्तावावर चर्चा होत असते. या चर्चेच्या निमित्ताने दोन्ही बाजूने शंका व्यक्त केली गेली की, होणार की होणार नाही. परंतु माननीय मंत्रीमहोदयांनी अंतिम निर्णय जाहीर केला. महाराष्ट्रातील जो भाग दुर्लक्षित आहे त्यांना सुध्दा न्याय द्यायचा आहे, कोकणाला न्याय द्यायचा आहे, खानदेशला न्याय द्यायचा आहे त्यादृष्टीने वेगळी तरतूद केली गेली पाहिजे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची चर्चा झाली. चर्चेचा शेवट गोड झाला. मी सर्वांच्या वतीने शासनाचे आणि माननीय मंत्रीमहोदयांचे आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

उपसभापती : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

मु.शी.: L.C.BILL No.VI OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MINIMUM WAGES ACT, 1948, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 6, किमान वेतन अधिनियम, 1948 महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 6 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 6 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका, नगरपरिषदा आणि प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक.

मु.शी.: L.C.BILL No.VII OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965 AND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...4जे.4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाचा हेतू चांगला आहे. शहरामध्ये बेकायदेशीर बांधकामे वाढत आहेत. या संदर्भात उपाययोजना करीत असताना, बेकायदेशीर बांधकामे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही कारवाई होत नाही त्यादृष्टीने विचार करुन या विधेयकामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. आयुक्तांमार्फत ज्या अधिकाऱ्यांना या संदर्भात कारवाई करण्याचे अधिकार दिले जाणार आहेत, त्या अधिकाऱ्यांबद्दल शिक्षेची तरतूद करणारे हे विधेयक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका आणि नागपूर शहर महानगरपालिका कायद्यामध्ये त्याप्रमाणे सुधारणा करणारे हे विधेयक आहे.

नंतर 4के.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी या दोनच गोष्टींसाठी उभा आहे. या विधेयकाचा हेतू चांगला आहे तो म्हणजे कालपर्यंत बेकायदेशीर बांधकाम असेल तर त्या नगरसेवकाचे पद जात होते. परंतु आता या विधेयकाच्या माध्यमातून शासकीय अधिकाऱ्यांवर निर्बंध बसणार आहे. या विधेयकाच्या पहिल्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, "मुंबई, पुणे आणि नागपूरसारख्या मोठ्या शहरांत शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणे, खाजगी जमिनीवर अनधिकृत बांधकाम करणे ही नित्याची बाब झाली आहे असे आढळून आले. विकास नियंत्रण नियमांचा भंग करुन सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी न घेता मालमत्तेचा विकास करण्याची प्रवृत्ती नागरिकांमध्ये वाढली आहे, त्यामुळे शहरांची अनियंत्रित व अनिर्बंध रित्या वाढ होत असून त्यामुळे लोकसंख्येची बेसुमार वाढ होत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी, शाळा, रुग्णालये, पाणीपुरवठा, जलनि:सारण, खरे तर येथेच अधिकाऱ्यांची चूक झालेली आहे. ती म्हणजे "जलनि:सारण" हा शब्दा वापरला आहे त्याऐवजी "मलनि:सारण" असा शब्दप्रयोग करणे आवश्यक होते. अशा उपयुक्त सेवांवर ताण येऊन अनेक समस्या उद्भवतात." हा ताण मुंबई शहरावर इतक्या मोठ्या प्रमाणात आलेला आहे की मुंबई एक दिवस त्यानेच उडून जाईल की काय अशी भीती निर्माण झाली आहे. घटनेच्या कलम 19 (5) व (6) अंतर्गत रिझनेबल रिस्ट्रिक्शन्स, वाजवी निर्बंध निर्माण करण्याचा अधिकार शासनाला आहे अशाच आशयाचे एक अशासकीय विधेयक मी सभागृहात सन 2007 मध्ये आणले होते परंतु असे विधेयक आपल्याला मांडता येणार नाही म्हणून ॲडव्होकेट जनरलचे मत घेण्यात आले होते. ॲडव्होकेट जनरलने त्यासंबंधीचे मत प्रदर्शित करुन मला थांबविण्यात आले होते. मी त्यावेळेस सन 1995 मध्ये दिलेले सर्वोच्च न्यायालयाचे जज्मेंट सुध्दा दाखविले होते तरी देखील मला ते अशासकीय विधेयक मांडण्याला बंधन घालण्यात आले होते. त्यावेळेस माझा देखील हाच मुद्दा होता की, राज्यात परप्रांतियांचे जे लोंढे येत आहेत ते थांबवावेत, त्यामुळे शहरातील नागरी सुविधांवर ताण पडतो. आता मात्र शासन त्यासाठीच सभागृहात विधेयक आणत आहे. कारण शहरांची अनिर्बंध होत असलेली वाढ व त्यामुळे शहरांवर येणारा ताण यासाठी 100 टक्के रिझनेबल रिस्ट्रीक्शन्स घालता यावे म्हणून शासन हे विधेयक आणत आहे. त्यावेळेस मला हरकतीचा मुद्दा मांडण्यास देखील विरोध करण्यात आला होता. मी विनंती केली होती की, निदान मला हरकतीच्या मुद्यावर तरी किमान अर्धा तास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

बोलू द्यावे परंतु ती सुध्दा परवानगी दिली नाही. त्यानंतर मी देखील ज्येष्ठ वकीलांचे याबाबतीत मत विचारले होते. ॲडव्होकेट जनरल हे नेहमीच शासनाची बाजू घेत असतात असा आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेऊन मी तो हरकतीचा मुद्दा मांडण्याची इच्छा व्यक्त केली होती. कारण हरकतीचा मुद्दा मांडल्यानंतर त्यावर रुलिंग देता येते व ते रुलिंग घटनात्मक असल्यामुळे सहजासहजी ते उडवून टाकता येणार नाही म्हणून मुंबई शहराचा होणारा ऱ्हास, परप्रांतियांचे येणारे लोंढे व त्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती इतकी बिकट झालेली आहे की, सध्या जरी शासनाने 2000 पर्यंतच्या झोपड्या अधिकृत केल्या असल्या तरी आता 2010 पर्यंत असलेल्या अनधिकृत झोपड्या सुध्दा काढण्याची हिंमत आपण दाखवू शकत नाही, अशी वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारची कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे सभागृहात अनेक वेळा सांगण्यात आले परंतु आजपर्यंत कोणत्याच अधिकाऱ्यावर अशी कारवाई मतांच्या लाचारीमुळे शासनाने केल्याचे दिसत नाही. अशा प्रकारे या मुंबई शहराचा बट्टयाबोळ करण्याचे काम सध्या चालू आहे आणि ही लागण आता संपूर्ण राज्यात झाली आहे. त्यात ठाणे, मुंब्रा, कल्याण, नागपूर अशा अनेक मोठ्या शहरातून हीच समस्या निर्माण होत आहे. त्याचबरोबर संभाजीनगर, नांदेड वगैरे शहरांमध्ये सुध्दा परप्रांतियांचे लोंढे येऊन या शहराची अनिर्बंध व्याप्ती एवढी भयानक झाली आहे असे मला वाटते. या विधेयकातील उद्देश सफल झाला तरी किमान भविष्यात तरी अशा प्रकारची बेकायदेशीर बांधकामे होणार नाहीत, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि मला हरकतीचा मुद्दा मांडण्यापासून थांबविले ती परवानगी आता देखील मिळणार नाही, कारण उद्याच हे अधिवेशन संपणार आहे, त्यामुळे मला तो हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी कदाचित मिळणार नाही.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

पण तरी देखील मी आपल्याकडे लेखी देणार आहे. पीठासीन अधिकारी म्हणून यावर आपले मत मिळाले असते बरे झाले असते. मुंबईला वाचविण्याचा मला कायद्याने अधिकार दिलेला आहे अयोग्य रितीने म्हणता येणार नाही कारण वकील बेकायदेशीरच बोलत असतात. यासंदर्भात दोन वकिलांपैकी एक वकील बेकायदेशीर बोलत असतो म्हणून दुस-याचा फायदा होता असतो. मी या मुद्यावर माझे मत व्यक्त केलेले आहे. सभापती महोदय, यांसदर्भात आपण आपले मत व्यक्त केले असते तर मला कोर्टात जाता आले असते. आपले मत येत नाही त्यामुळे मी थांबलेलो आहे. मला संधी मिळाली तर मी माझे मत मांडेन. परंतु या निमित्ताने मुंबई शहर वाचवावयाचे असेल तर घटनेचे कलम 5 व 6 नसणार. निर्बध आणावे लागतील ते परप्रांतियांना रोखण्यासाठी नव्हे, प्रांतवादा करिता नाही , भाषा वादाकरिता नाही तर मुंबईत जे राहतात त्यांना आता तरी जगू द्या यासाठी हे आणावे लागेल. विधी मंडळाचा सदस्य असल्यामुळे मला अशासकीय विधेयक मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. अशासकीय विधेयक स्वीकारावयाचे की, नाही हा शासनाचा अधिकार आहे. अशासकीय विधेयकाच्या निमित्ताने चर्चा उपस्थित करुन मुंबई शहरावर आज जो अत्याचार होतो आहे तो थांबविण्यासाठी मला जो अधिकार आहे त्या अधिकारापासून मला थांबविण्यात आलेले आहे हे मी अत्यंत खेदाने येथे नमूद करतो.

धन्यवाद.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर मी दोन तीन मुद्दे मांडणार आहे. मुंबईचा विचार केला तर शासकीय जमिनीपैकी 90 टक्क्यापेक्षा अधिक जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. महापालिकेच्या जमिनीवर शासनाच्या जमिनीपेक्षा कमी अतिक्रमण झाले आहे त्याचे कारण असे आहे की, महापालिकेने यासंदर्भात काळजी घेतलेली आहे. शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण होऊ नये म्हणून अतिक्रमण हटविण्यासाठी शासनाने ॲडीशनल कलेक्टर लेव्हलच्या एका अधिका-याची तसेच 3 उपजिल्हाधिकारी लेव्हलच्या अधिका-याची पदे निर्माण केली आहेत व एक ॲडीशनल कमिशनर ऑफ पोलीस दर्जाचे एक पद निर्माण केले परंतु दुर्दैवाने ही पदे कधीच भरली गेली नाहीत. आपण कायदा करतो, आपण पदे निर्माण करतो आणि त्यानंतर ते थांबेल म्हणून वाट पाहतो. तशाच पध्दतीने बिल आणतांना जो सिरिअसनेस असतो तो सिरिअसनेस इम्पीलीमेंट करतांना शासनाचा, मंत्र्यांचा आणि अधिका-यांचा किती असतो याबद्दल मनात शंका येते. देशभरात नागरीकरणाची टक्केवारी 24 टक्के असतांना आपल्या राज्यात 45 टक्के नागरीकरण का आहे ? मुंबई आणि महाराष्ट्रातील शहरे आर्थिक उत्पन्न मिळविण्याची सोपी साधने जरी असली तरी आपण बिलामध्ये असे म्हटले आहे की, "कार्यवाही करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर झाल्याचे सिध्द झाले तर" असे म्हटलेले आहे. मला वाटते कळीचा मुद्दा हाच आहे.

मी आपल्याला उदाहरण देतो की, मुंबईमध्ये एखाद्याची जमीन असेल, ती जमीन माझी नसेलही परंतु एक व्यक्ती त्याच्यावर घर बांधते, ती जमीन माझी नसली तरी मी कोर्टात जातो. हे प्रकरण कोर्टात गेले आणि आम्ही तक्रार केली तर अधिकारी सांगतात की, ही बाब न्याय प्रविष्ठ असल्यामुळे सांगता येत नाही व अधिकारी उत्तर देण्याचे टाळतात. त्यामुळे अशा प्रकारे त्यांना बचाव करता येणार नाही असे विधेयक असले पाहिजे. बांधकाम करतांनाच आधी ठरते की, तू बांधायचे, मी कोर्टात जायचे आणि अधिका-यांनी सांगायचे की, ही बाब न्याय प्रविष्ठ आहे. त्यामुळे काहीही न पाहता पुढे चालू द्यायचे. हा कायदा करीत असतांना बचाव करण्याची संधी मिळणार असेल तर या बाबत कागदावर शब्द टाईप होती परंतु प्रत्यक्षात काही होणार नाही त्यामुळे खरे म्हणजे यासंदर्भात शासनाकडे विल पॉवर असली पाहिजे ती पॉवर या विधेयकातून येईल असे वाटत नाही. त्यामुळे बचाव करण्याची संधी मिळणार नाही एवढाच मला मुद्दा मांडावयाचा होता.

धन्यवाद.. --- यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मला थोडक्यात दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. सरकारने पूर्वी आमचे नागरी विकास धोरण आहे असे जाहीर केले आहे. प्रत्येक शहरात कशी वाढ व्हावी यासंदर्भातील धोरण आहे. आताच माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, हे विधेयक मुंबईच्या संदर्भातील आहे. पण विधेयक वाचल्यानंतर असे दिसते की, हे विधेयक संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे, हे मला मुद्दाम नमूद करायला पाहिजे. मुंबईसह आपण अनेक छोट्याछोट्या नगरपालिकांचे चित्र बघितले तर असे दिसते की,ओढ्याच्या मध्ये बांधकाम केलेले असते. जुन्या बांधकामाचा बोजवारा उडणे. अपघात झाल्यानंतर कोण अधिकारी जबाबदार आहे हे शोधण्यास जातो. पदनिर्देशित अधिकारी असा येथे उल्लेख आहे. त्या महानगरपालिकेत, नगरपालिकेत पदनिर्देशित अधिकारी कोण आहे हे सामान्य लोकांना माहिती असणे आवश्यक आहे. अन्यथा असे होते की, कोण म्हणते टक्का दिला. एका अधिकाऱ्याची जबाबदारी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्यात येते. त्यावेळी मग ते पद रिक्त होते. अशा पद्धतीची जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती आपल्याला मोठ्या प्रमाणावर दिसते. मध्यंतरी पुणे शहरात अनधिकृत बांधकामांना विरोध करणाऱ्या स्थानिक नागरिकाला लाथाबुक्क्याने मारण्याचे प्रकार झाले. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी खून करण्याचे प्रकार देखील झाले आहेत. श्री.गो.रा.खैरनारा यांची फार मोठी वातावरण निर्मिती झाली होती. आज सिनेमामध्ये अतिक्रमण तोडणाऱ्या व्यक्तीला हिरो म्हणून पाहिले जाते. परंतु, त्या अतिक्रमणाच्या मुळाशी असलेली भ्रष्टाचाराची साखळी आहे, ती थांबविण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे असे मला वाटते. तसेच यात तरतूद केलेल्या शिक्षेची अंमलबजावणी होणे हे देखील आवश्यक आहे. उद्देश व कारण यामध्ये आपण म्हटले आहे की, नागरी धोरणाची अंमलबजावणी सर्व नगरपालिकांना करण्यासाठी देखील सूचना केली पाहिजे. त्या दृष्टीने शहराचे सौंदर्य देखील टिकेल. शेवटचा एक मुद्दा मांडते. आज मुंबई शहरामध्ये बघतो की, सर्व इमारतीतील खिडक्या कव्हर करण्यात येतात. एवढेच नव्हे तर काचेची भिंत उभारण्यात येते.यासंबंधी कोठेही स्पष्टता नाही. आपण प्रत्येक इमारतीचे चित्र बघितले तर प्रत्येक इमारतीने वेगवेगळे नियम लावलेले आहेत, असे आपल्याला दिसून येईल. केवळ अधिकाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी नव्हे तर परंतु, त्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने चांगल्या पद्धतीने नियमावली होईल तेवढा त्याचा चांगला उपयोग होईल.

====

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा (विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 7 पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. इस विधेयक के माध्यम से अनधिकृत निर्माण कार्य होने पर स्थानीय अधिकारियों को जिम्मेदार ठहराने संबंधी संशोधन किया जा रहा है, जो स्वागत योग्य है. मुझे एक शंका है, हमारे नागपुर में मेट्रो रीजन भी आया है, उसके चुनाव हुए हैं और बॉडी बन गई है. इसके तहत 25 किलोमीटर तक के गांव नोटिफाईड हो गए हैं. अब कुछ क्षेत्र म्युनिसिपल कौंसिल के अन्तर्गत आते हैं और कुछ क्षेत्र महानगरपालिका के अन्तर्गत आते हैं. ऐसी स्थिति में ओवरलैपिंग न हो, महानगरपालिका के अधिकारी यह न कहे कि अमुक क्षेत्र मेरे अधिकारक्षेत्र में नहीं है. वह नगरपरिषद के अधिकारक्षेत्र में है. तो इस स्थिति में क्या निर्णय लिया जाएगा, यह मेरे मन में शंका है. अत: इसका स्पष्टीकरण होना चाहिए.

सभापति महोदय, दूसरी बात यह है कि आज हम अनधिकृत निर्माण कार्य रोकने के लिए, अतिक्रमण रोकने के लिए सजा का प्रावधान करने संबंधी और अधिकारियों की जिम्मेदारी निश्चित करने संबंधी बिल पास कर रहे हैं. ऐसी स्थिति में अधिकारियों को भी कुछ अधिक अधिकार मिलने चाहिए. जैसे सम्माननीय सदस्य श्री तावडे जी ने कहा कि ऐसे मामले कोर्ट में पेश करके कार्रवाई को टालने की कोशिश की जाती है. अत: ऐसी परिस्थिति में अतिक्रमण न हो, अनधिकृत निर्माण कार्य न हो, ऐसे अनिधिकृत निर्माण कार्य को रोकने हेतु अधिकारियों को कार्रवाई करने का अधिकार मिलना चाहिए, इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी येथे फक्त 2-3 गोष्टींचा खुलासा करणार आहे. या बिलामध्ये केवळ मुंबई आणि पुणे या शहरांचा उल्लेख केला असला तरी हे विधेयक महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांच्याकरिता हे विधेयक लागू आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पुरेशा कारणा शिवाय याचा अर्थ विचारला आहे. याचा अर्थ असा आहे की, ज्या विभाग अधिकाऱ्याच्या हद्दीमध्ये किंवा कार्यक्षेत्रामध्ये अनधिकृतपणे, नियमबाह्य बांधकाम सुरू असेल आणि ते त्या अधिकाऱ्याच्या लक्षात आणून दिले आणि त्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले तर त्याच्या विरूद्ध फौजदारी स्वरूपाचा गुन्हा लावण्याची तरतूद केली आहे. त्याला तीन महिन्याच्या शिक्षेची देखील तरतूद करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ..

आज पर्यंत असे घडत होते की,एखाद्या ठिकाणी जर अनधिकृत बांधकाम झालेले असेल आणि महानगरपालिकेचे वा नगरपालिकेचे अधिकारी ते अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी गेले असतांना नगरसेवक जर त्यांना काही सांगण्यासाठी गेला तर त्या नगरसेवकाला डिसक्वालिफाय केले जात होते. परंतु या संदर्भात अधिका-यावर कोठल्याही प्रकारची जबाबदारी निश्चित केली जात नव्हती या विधेयकामध्ये अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. कोर्टात जाण्याचे अगोदरच ठरलेले असते.असे सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी मघाशी सागितले आहे. ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्या ठिकाणच्या जिल्हा वा दिवाणी कोर्टात जाऊन तात्काळ स्टे घेतला जात होता. आता हायकोर्टात गेल्याशिवाय अनधिकृत बांधकामासंबंधी स्टे दिला जाऊ नये अशा प्रकारची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यु.जमा यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्या प्रश्नाचे देखील मी उत्तर दिलेले आहे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी असे सांगितले की यासंदर्भात जनतेला माहिती दिली गेली पाहिजे. मी त्यांना सांगू इच्छितो की,सर्व नगरपालिकांना ही माहिती दिली जात आहे त्याचबरोबर प्रत्येक ठिकाणी प्रभाग समित्या स्थापन करण्यात आल्या असून कोणत्या प्रभाग समितीच्या अंतर्गत किती वॉर्डस येतात हे देखील निश्चित करण्यात आलेले असल्यामुळे त्यासंबंधीची अडचण येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आता निवृत्त होत आहेत त्यांची सभासदत्वाची मुदत संपत येत आहे हे मला आता समजले आहे. एक अशासकीय महत्वाचे विधेयक eh आणत आहे. परंतु त्यावर विचार मांडण्यापासून तुम्ही मला दूर का ठेवत आहात ? असे सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी मघाशी सांगितले होते. हे विधेयक मांडण्यासाठी त्यानी पुन्हा सभागृहात यावे अशी मी त्यांना आमच्या सर्वाच्या वतीने शुभेच्छा देतो तसेच आता जे विधेयक मांडलेले आहे ते मंजूर करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

श्री.विनोद तावडे : हायकोर्टात गेल्याशिवाय अनधिकृत बांधकामासाठी स्थगिती मिळवता येणार नाही अशी तरतूद या विधेयकात करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. परंतु खालच्या कोर्टात गेल्याशिवाय हायकोर्टात जाता येणार नाही.

श्री.भास्कर जाधव : काही बाबतीत स्टेजेस ठरलेल्या असतात..

प्रश्न मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 31 (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.भ्ास्कर जाधव :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 7 - महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 7 संमत झाले आहे.

<u>विधेयक क्रमांक 49 संबंधी</u>

उपसभापती : विधेयक क्रमांक 49 अजून विधानसभेकडून संमत होऊन आलेले नाही. त्यामुळे ते विधेयक पुढे ढकलण्यात आलेले आहे.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, आता अर्धा तास चर्चा घेण्यात याव्यात

उपसभापती : अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत. यानंतर निवृत्त सदस्यांना निरोप देण्यात येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी . निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, या सभागृहाचे 9 सन्माननीय सदस्य येत्या 8 जून व 7 जुलै 2010 रोजी निवृत्त होणार आहेत. निवृत्त होणा-या 9 सन्माननीय सदस्यांना नेहमीच्या प्रथेप्रमाणे भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान भवनाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम व त्यानंतर विधान भवनाच्या दुस-या मजल्यावरील विधान परिषद सभागृहाच्या लॉबीमध्ये चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे सबब खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याची बाब आता घेण्यात येत आहे.

1) श्री. वसंत डावखरे, माननीय उपसभापती
2) श्री.संजय दत्त,वि.प.स.
3) ॲड.अनिल परब,वि.प.स.
4) श्री.शिवाजीराव पाटील,वि.प.स.
5) श्रीमती मंदा म्हात्र,वि.प.स.
6) श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील,वि.प.स.
7) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.
8) श्री.मुझफ्फर हुसेन,वि.प.स.
9) श्रीमती मधू जैन.,वि.प.स.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, या सन्माननीय सभागृहाला आपण वरचे सभागृह म्हणतो, अप्पर हाऊस म्हणतो, त्या अप्पर हाऊसचे आतापर्यंत सन्माननीय सदस्य असलेले व आतापर्यंत या सभागृहामधून ज्यांनी जनतेचे प्रतिनिधीत्व केले, जनतेच्या वेगवेगळया प्रश्नांना वाचा फोडली. शासनातर्फे आलेल्या विषयावर किंवा सन्माननीय सदस्य, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडून आलेल्या विषयांवर आपल्या मतांची मांडणी केली आणि महाराष्ट्र शासनाचा कारभार जनताभिमुख व्हावा,

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत पाटील)

जनकल्याणासाठी या राज्याचा जास्तीत जास्त उपयोग केला जावा म्हणून त्यांनी आतापर्यंत या ठिकाणी आपल्या मतांची मांडणी केली. शासन जर चुकत असेलतर शासनाला धारेवर सुध्दा धरले, शासनाने चांगले केले असेल तर त्याबद्दल अभिनंदन सुध्दा केले. काही विषयांच्या बाबतीत कायदा करीत असतांना त्यामध्ये त्यांनी बदलसुध्दा सुचविले. शासनाच्या किंवा मंत्र्यांच्या अनेक गोष्टी लक्षात आल्या नसतील तर या सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी त्या प्रश्नांना वाचा फोडली, जनतेला न्याय मिळवून दिला. असे काही सन्माननीय सदस्य या सभागृहातून निवृत्त होणार आहेत. यामध्ये या सभागृहाचे उपसभापती सन्माननीय श्री. वसंत शंकर डावखरे, सन्माननीय सदस्य श्री. संजय सतीशचंद्र दत्त, ॲड. अनिल दत्तात्रय परब, श्री. शिवाजी दत्तात्रय पाटील, श्रीमती मंदा विजय म्हात्रे, सर्वश्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते पाटील, दिवाकर नारायण रावते, मुझफ्फर हुसैन नझर हुसैन सय्यद, व श्रीमती मधु रमेश जैन हे या सभागृहामधून निवृत्त होणार आहेत. त्यांचे कौतुक करण्यासाठी आणि या सभागृहाच्या वतीने त्यांनी या सभागृहामध्ये जे काम केले आहे त्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी व पुढील आयुष्यामध्ये त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, यापैकी काही सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहामध्ये येतील, आणि त्यांना पुन्हा काम करण्याची संधी मिळेल. काही सन्माननीय सदस्य या सभागृहामध्ये पुन्हा येणार नाहीत त्याबाबतीत त्यांचा पक्ष किंवा त्यांची संघटना दुसऱ्या ठिकाणी त्यांच्या कर्तृत्वाचा उपयोग करुन घेईल. आणि कदाचित पुढील आयुष्यामध्ये सुध्दा त्यांना याहीपेक्षा मोठया पदावर जाण्याची संधी मिळेल. ते कदाचित या सभागृहातून निवृत्त होतात, परंतु ज्या समाज जीवनामध्ये ते काम करीत असतात त्या समाज जीवनामधून ते निवृत्त होत नाहीत. किंबहुना, जनता त्यांना होऊ देत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. छगन भुजबळ....

नाही. मग घरी कितीही अडचणी असल्या, स्वत:ची प्रकृती बरी असेल नसेल, घरामध्ये प्रश्न निर्माण झाले असतील नसतील तरी सुध्दा त्यांनी या समाज सेवेचे काम हातामध्ये घेतले असल्यामुळे त्यांना कोणत्याही ठिकाणी एखादी खुर्ची मिळाली न मिळाली, एखादे पद मिळाले न मिळाले तरीही ती व्यक्त स्वस्थ बसू शकत नाही. ज्याठिकाणी असेल त्याठिकाणी सामाजिक काम करीत रहाते आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करीत रहाते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

म्हणून या सर्व सन्माननीय सदस्यांना मी माझ्यावतीने, शासनाच्या वतीने शुभेच्छा देण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, या सदनाचे माननीय उप सभापती श्री.वसंतराव डावखरे यांनी हिवरे ग्रामपंचायती पासून सरपंच म्हणून काम करण्यास सुरुवात झालेली आहे. लोकनेते कै.बाळासाहेब देसाई यांच्याबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळाली. शिरुर तालुक्यातील दुष्काळग्रस्तांसाठी त्यांनी मदतकार्य केले. ठाणे महानगरपालिकेचे 1986 आणि 1992 मध्ये सदस्य झाले. तसेच 1997 मध्ये ते ठाणे महानगरपालिकेचे महापौर झाले आणि महापौर म्हणून सुध्दा त्यांची कारकीर्द अतिशय उजवी ठरली. ठाणे महानगरपालिकेमधील त्यांच्या महापौर पदाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी नाविन्यपूर्ण कामे केली. तसेच सांस्कृतिक काम केले. तसेच शैक्षणिक व क्रिडा विषयक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आणि म्हणूनच त्यांनी पुढची पायरी गाठली. 1992 ते 1998 आणि 1998 ते 2004 या कालावधीमध्ये ते विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य झाले. त्यानंतर जुलै 1998 पासून 11 मे 2004 पर्यंत उप सभापती पद भुषविले. जून 2004 मध्ये परत त्यांची विधान परिषदेवर निवड झाली. तसेच माननीय राज्यपाल यांच्या मार्फत हंगामी सभापती म्हणून नियुक्त केल्यानंतर देखील त्यांनी काम केले. त्यांची दि.13 ऑगस्ट 2004 मध्ये परत विधान परिषदेचे उप सभापती म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि ती आजतागायत आहे. त्यांनी परदेशातील अनेक देशांना भेटी दिल्या. तसेच राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या माध्यमातून अनेक देशांचे अभ्यास दौरे केले. या सदनामध्ये काम करताना आपण नेहमीच पाहिले आहे की, सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत किंवा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत, या सर्वांमध्ये ते अतिशय लोकप्रिय आहेत. किंबहुना ज्या-ज्या वेळेला या सदनामध्ये एखादी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होते, तेव्हा माननीय श्री.वसंत डावखरे हे हमखास त्यातून मार्ग काढण्यामध्ये यशस्वी ठरतात आणि दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य सुध्दा त्यांच्या म्हणण्यानुसार वागतात, असे अनेक वेळा घडलेले आहे. मी त्यांच्याबाबत अधिक बोलावे असे नाही. आपण सर्वांनीच त्यांची कारकीर्द पाहिलेली आहे आणि आता ते देखील निवृत्त होणार आहेत. मी मघाशी सांगितले की, जे वेगवेगळया पक्षाचे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. कदाचित ते पक्ष काही सन्माननीय सदस्यांना परत येथे येण्याची संधी सुध्दा देतील. कदाचित पक्ष त्यांना यापेक्षा वरच्या जागेवर पाठविण्याच्या बाबतीत .....

. . . .4 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

विचार करतील किंवा इतर काही जबाबदारी दिली जाईल. मी माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि आतापर्यंत जशी त्यांची कारकीर्द यशस्वी झाली आहे, तशी त्यांची पुढील कारकीर्द सुध्दा आणखी यशस्वी होवो अशा प्रकारच्या शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट केले असून, ते एल.एल.बी.झालेले आहेत. 1982 ते 1985 मध्ये त्यांनी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष म्हणून काम केले आहे. अखिल भारतीय काँग्रेसचे पदाधिकारी म्हणूनही काम केले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटी आणि सेवा दलाचे संघटक सचिव म्हणूनही काम केले आहे. तसेच 2000 पासून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून सुध्दा काम केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे अतिशय अभ्यासू म्हणून आपल्या सर्वांच्या दृष्टोपत्तीस आले आहेत. पक्षामध्ये तर गल्ली पासून दिल्लीपर्यंत त्यांचा संचार असतो. त्यांना पक्षाचे कार्यकर्ते आणि नेते सुध्दा येथून तेथपर्यंत ओळखतात. जेव्हा एखाद्याची विधान परिषदेवर नियुक्ती होते, तेव्हा त्यांना असे वाटत असते की, मी पक्षाच्या नेत्यांच्या समोर गेलो, त्यांच्या बरोबर कामे केली की, आपल्याला एखादे पद मिळते आणि पक्षाचे नेते सुध्दा एखादे पद देतात. पण त्या पदाला न्याय देण्याचे काम मात्र त्या व्यक्तीला स्वत:ला करावे लागते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

तेथे पक्षाचे नेते उपयोगी पडत नाहीत. पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला त्यांना येथे पाठवले. पण त्यांनी हे सिध्द केले की, तुम्ही मला येथे पाठविले असले तरी मी येथे केवळ बसून राहात नाही. त्यांनी वेगवेगळया प्रश्नावर सातत्याने या सभागृहामध्ये अभ्यासपूर्ण भाषणे केली, आपला आवाज उठविला आणि अनेक प्रश्न सोडवून घेतले आहेत. त्यांचे राजकीय वय अजून बरेचसे बाकी आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे पूर्ण पक्षामध्ये त्यांच्या बाबतीत एक अतिशय चांगले मत असल्यामुळे व त्यांचे सर्वांबरोबर चांगले संबंध असल्यामुळे व त्यांनी येथे उत्कृष्ट काम केल्यामुळे निश्चितपणे त्यांच्या या गुणांचा उपयोग त्यांचा पक्ष भविष्यामध्ये सुध्दा करुन घेतल्याशिवाय रहाणार नाही अशी माझी खात्री आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल दत्तात्रय परब यांनी शिवसेनापक्षात पक्षसंघटनेत विभाग प्रमुख म्हणून काम केले आणि ते येथे निवडून आले. त्यांनी याठिकाणी सुध्दा अतिशय चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. कालसुध्दा त्यांनी वांद्रयाच्या संदर्भातील प्रश्न उठविण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला. आंदोलन, प्रश्न विचारणे आणि प्रश्नाच्या संदर्भात आपला आवाज उठविणे हे आपले काम असते. अनेक आंदोलने आपण करतो सगळयाच आंदोलनामध्ये आपल्याला यश मिळेल अशातला भाग नाही. परंतु समाजिक जीवनामध्ये काम करणाऱ्या माणसाचे एक कर्तव्य असते, कामच असते की, जेथे आपल्याला वाटते की, आपला आवाज उठवायला पाहिजे,आंदोलन केले पाहिजे, त्या ठिकाणी कुठेही न कचरता त्यांनी ते काम केले पाहिजे. काही आंदोलनामध्ये यश मिळते काही आंदोलनामध्ये यश मिळत नाही परंतु जी भूमिका आपल्या वाटयास आलेली आहे ती भूमिका मात्र आपण पार पाडली पाहिजे त्यांनी सुध्दा त्याप्रमाणे काम केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव दत्तात्रय पाटील हे अखिल भारतीय प्राथमिक शिक्षण महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. त्यांच्या अनेक कार्यक्रमांना मी गेलेलो आहे. हजारो कदाचित एक-एक लाख शिक्षक त्यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले मी पाहिलेले आहे. शिक्षण प्रबोधन परिषदेचे ते संस्थापक आहेत. अखिल भारतीय प्रबोधन परिषदेचे संस्थापक आहेत. कोल्हापूर, जळगाव, शिर्डी, रत्नागिरी, पुणे, बेंगलोर, नाशिक अशा ठिकाणी त्यांनी शिक्षकांची भव्य अधिवेशने घेतली. सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षण सहकारी बँकेचे ते संचालक आणि चेअरमन आहेत. त्यांनी सुध्दा अतिशय चांगले काम केलेले आहे आणि शिक्षकांच्या प्रश्नावर, शिक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी आपली मते याठिकाणी मांडलेली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

सन्मानीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सुध्दा या सभागृहामध्ये फार चांगले काम निश्चितपणे केलेले आहे. महिलांसाठी त्यांनी प्रौढ शिक्षण वर्ग सुरु केले. 1991 मध्ये बालवाडी प्रशिक्षण सुरु केले. महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आणि पुढे 1994-95 साली त्यांनी बालकल्याण समिती नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये काम केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये आणि काँग्रेस आयमध्ये सुध्दा त्यांनी काम केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशच्या महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. सरचिटणीस म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. गोवर्धन महिला बचत गट यांच्या त्या संस्थापिका चेअरमन आहेत. महिलांचे 300 पेक्षाही जास्त बचत गट त्यांनी निर्माण केले आणि त्यामध्ये त्यांनी चांगले काम केलेले आहे. नवी मुंबई येथे महिला उद्योग मेळावा भरवून हजारो महिलांना रोजगार मिळवून देण्याचे त्यांनी काम केले. याठिकाणी त्यांनी आपल्या विभागातील जनतेसाठी, राज्यातील जनतेसाठी आणि महिलांच्या प्रश्नावर चांगले काम केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते पाटील यांनी 1985 मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन केले. एकाच दिवशी 1001 व्यक्तींनी रक्तदान केले एकूण 130 रक्तदान शिबिरे घेऊन 10,000 व्यक्तिंनी रक्तदान केले त्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य खात्याकडून त्यांचा गौरव करण्यात आला. ब्लड बँकेची स्थापना 1981 साली केली. संचालक सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी औद्योगिक वसाहत अकलूजचे ते दहा वर्षे चेअरमन होते. सहकारी बॅकेचे सुध्दा ते संचालक राहिले , अध्यक्ष राहिले आणि त्या बँकेमध्ये अध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्यांनी उत्कृष्ट कामाबद्दल त्या संस्थेला गोल्डमेडलसुध्दा मिळवून दिलेले आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

यानंतर श्री. बरवड...

श्री. छगन भुजबळ ....

एवढेच नव्हे तर उस्मानाबाद येथील भूकंपग्रस्तांसाठी त्यांनी मदतकार्य केलेले आहे. त्यांच्या कामांची यादी पाहिली तर फार मोठी कामे त्यांनी केलेली आहेत. त्यांना सुध्दा मी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या सभागृहात येण्याच्या आधीपासून त्यांचा आणि माझा परिचय आहे. आम्ही एकाच पक्षात एकत्र काम केलेले आहे. मला असे वाटते की, महानगरपालिकेमध्ये माझ्या महापौरपदानंतर श्री. दत्ताजी नलावडे महापौर झाले. त्यानंतर श्री. रमेश प्रभू महापौर झाले आणि त्यानंतर श्री. दिवाकर रावते यांनी महापौर म्हणून चांगले काम केले. त्या ठिकाणी सभागृहाचा नेता म्हणून, स्थायी समितीचे चेअरमन म्हणून त्यांनी काम केलेले आहे. अनेक वेळा महापालिकेवर टीका करताना त्यांना आपण पाहिलेले आहे. पण त्या ठिकाणी त्यांनी खूप चांगले काम केले आहे त्यामुळे त्या ठिकाणी काय चुकत आहे हे त्यांना चांगले कळते. त्यामुळे त्यांनी कधीही, कोणाचीही, कसलीही चिंता न करता, कोणत्याही पक्षाचा असो, चुकत असेल तर त्या ठिकाणी बोट ठेवण्याचे काम त्यांनी केलेले आहे. ते विधान परिषदेचे सदस्य आहेत. एवढेच नव्हे तर ज्यावेळी युतीचे सरकार होते त्या सरकारमध्ये मंत्री म्हणून सुध्दा त्यांनी काम केलेले आहे. हे सांगावयास नको की, प्रत्येक विषयामध्ये सखोल अभ्यास करुन मग ते बिल असेल, एखादी चर्चा असेल, विचारलेला एखादा प्रश्न असेलत्या सगळ्या बाबतीत त्यांनी आपली आग्रही मते मांडलेली आहेत. ते कधीकधी अती आग्रही होतात हे आपण पाहिलेले आहे. एक मित्र म्हणून मी निश्चितपणे त्यांना सल्ला देऊ इच्छितो. त्यांचे कर्तृत्व एवढे आहे की, ते स्वत: घरी बसू शकणार नाहीत. ते काम करीतच राहणार. पक्ष सुध्दा त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. त्यांच्या कर्तृत्वाचा उपयोग निश्चितपणे त्यांचा पक्ष करुन घेईल. लोक असे म्हणतात की, काही वर्षापूर्वी मी सुध्दा थोडासा अतिशय आग्रही आणि अतिशय रागीट होतो. आता तो स्वभाव बराचसा कमी झालेला आहे. पुढे वय वाढत असते आणि आपण सुध्दा हार्टबिट्स किती वाढवावयाचे ? त्यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी आग्रह करावयाचा त्या ठिकाणी जरुर आग्रह करा पण काही वेळा आपल्या मताला आणि आपल्या आग्रहाला थोडीशी मुरड घालण्याचा प्रयत्न केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

पाहिजे. हे मी त्यांना मित्र म्हणून सांगतो. हे त्यांच्यासाठी उपयोगी आहे. त्यांच्या पक्षाच्या दृष्टीने सुध्दा उपयोगी आहे. त्यांचे कर्तृत्व, त्यांचा अभ्यास मग महापालिकेचा असेल किंवा वेगवेगळ्या खात्याच्या बाबतीत असेल, त्याबाबत त्यांचा अतिशय खोलवर अभ्यास आहे आणि म्हणून त्यांच्या या अनुभवाचा उपयोग निश्चितपणे होईल. कदाचित यापुढे सुध्दा ते या सभागृहामध्ये येतील. कदाचित त्यांना यापेक्षा आणखी मोठ्या जागेवर त्यांचा पक्ष पाठवील किंवा दुसरी काही जबाबदारी देईल. परंतु जनतेचे काम करीत असताना त्यांच्या ज्ञानाचा, त्यांच्या अनुभवाचा निश्चितपणे अतिशय चांगला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही. निश्चितपणे या सभागृहात त्यांची उणीव जाणवल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन नझर हुसेन सय्यद यांचे सुध्दा काम मोठे आहे. युवक काँग्रेसमधून त्यांनी कामाला सुरुवात केली. विशेष म्हणजे ते एज्युकेशन ट्रस्टवर विश्वस्त म्हणून आहेत. ते भारत सेवक समाजाचे उपाध्यक्ष आहेत. उमरान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च या संस्थेचे ते विश्वस्त आहेत. त्या ठिकाणी ते काम करतात. जामा मस्जीद अल शम्स मदरसा या ठिकाणी ते काम करतात आणि पॅट्रन सुध्दा आहेत. ते मेंबर ऑफ इस्कॉन इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्शसनेस तसेच प्रमुख स्वामीनारायण मंदिर या ठिकाणी सुध्दा ते आश्रयदाता, पॅट्रन, मेंबर म्हणून काम करीत आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

इंडियन मुस्लिम फेडरेशनमध्ये काम करतात, इस्लामिक कल्चरल सेंटरमध्ये काम करीत आहेत. म्हणजे हा आनंददायी भाग आहे की वेगवेगळया धर्माच्या ज्या काही संस्था आहेत त्याठिकाणी ते आत्मियतेने काम करीत आहेत. त्याचबरोबर रोलर स्केटिंग असोसिएशन, नवी मुंबई, ठाणे यांचे त्यांनी काम केले आहे, हज समितीमध्ये काम केले आहे. अशा अनेक ठिकाणी त्यांनी काम केलेले आहे. एका दिवसामध्ये 9 हजार रक्ताच्या बाटल्या गोळा करण्याचा उच्चांक स्वतःच्या हिंमतीवर स्थापित केलेला आहे. भूकंपग्रस्तांना मदत करण्याचे काम केलेले आहे. त्यांना सुध्दा फार मोठे उज्वल भविष्य आहे.

सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन या निवृत्त होत आहेत. त्या डेट्रॉइट विद्यापीठ, मिशीगन च्या एमबीए आहेत. उच्च विद्याभूषित आहेत, त्यांनी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रचंड काम केलेले आहे. त्याबाबतची 3-4 पाने भरुन माहिती माझ्यासमोर आहे. एवढे मोठे काम केलेले आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाचे काम केलेले आहे, राष्ट्रीय हस्तव्यवसाय हातमाग संग्रहालयात काम केलेले आहे. अनेक परदेशामध्ये त्या गेलेल्या आहेत. वेगवेगळया शिष्टमंडळातून त्यांनी वेगवेगळया संस्थांना भेटी दिलेल्या आहेत. महिलांसाठी त्यांनी काम केलेले आहे. महाविद्यालयात मानद अधिव्याख्याता म्हणून त्यांनी काम केलेले आहे. संगीतामध्ये त्यांनी काम केलेले आहे. बी.ए.(संगीत) सतार वाजविण्याच्या बाबत विशारद आहेत. म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. त्यांना सुध्दा त्यांच्या भावी आयुष्यामध्ये उज्वल कारकीर्द त्यांच्या वाटयाला येवो अशाप्रकारची मी शुभेच्छा व्यक्त करतो. परत एकदा जे जे सभासद निवृत्त होत आहेत त्यांची उणीव या सभागृहाला भासेल, काही सभासद मघाशी सांगितल्याप्रमाणे परत येतील. काही सभासद कदाचित याही मोठया जागेवर जातील. परंतु कोठेही काम करीत असताना गोरगरीबांचे अश्रू पुसत असताना त्यांचे काम थांबणार नाही. येथे त्यांनी जे कॉन्ट्रीब्यूशन दिलेले आहे ते सभागृह कधी विसरणार नाही आणि या सभागृहातून संपूर्ण राज्याचे प्रश्न माहीत झाल्यावर शासन कशाप्रकारे काम करीत आहे ते माहीत झाल्यावर लोकशाहीच्या गाभ्यामध्ये असलेले

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

खाचेखोचे माहीत झाल्यावर बाहेरच्या जीवनामध्ये काम करीत असताना त्याचा त्यांना चांगला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या पुढच्या आयुष्याच्या वाटचालीसाठी मी सभागृहाच्या वतीने व स्वत:च्या वतीने त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. यापेक्षाही चांगली कारकीर्द चांगले काम त्यांच्या हातून घडो अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो. धन्यवाद.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, आज आपल्या सभागृहातून 9 सन्माननीय सदस्य हे पुढील 15-20 दिवसामध्ये निवृत्त होत आहेत. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपल्या सभागृहामध्ये हा एक चांगला पायंडा आहे. या सभागृहातून जे सदस्य निवृत्त होतात किंवा ज्यांची मुदत संपते त्यांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा दिल्या जातात. पण खालच्या सभागृहामध्ये असे होत नाही, कारण तेथे दर 5 वर्षांनी सभागृहाचीच मुदत संपते, त्यामुळे सगळे सदस्य एकदम जातात आणि पुन्हा नवीन सदस्य एकदम येतात. पण या सभागृहात मात्र दर दोन वर्षांनी सदस्य निवृत्त होत असतात आणि नवीन सदस्य येत असतात. आज या सभागृहातील 9 सदस्यांना आपण निरोप देत आहोत. हे सर्व सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहामध्ये यावेत अशी मी सुरुवातीलाच परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

आपण कित्येक वर्षे सोबत काम करीत आहोत, तेच काम पुढे या सभागृहाच्या माध्यमातून आपल्या हातून व्हावे अशी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.

निवृत्त होणा-या 9 सन्माननीय सदस्यांमध्ये आपल्या सभागाचे माननीय उपसभापती यांचा सुध्दा समावेश आहे. मला कल्पना नव्हती की माननीय उपसभापती हे देखील परवा निवृत्त होतील. आम्ही गेली सात-आठ वर्षे शेजारी बसत आहोत. आता माझ्या शेजारची खुर्ची खाली होणार आहे. काल माझी आणि त्यांची भेट झाली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की त्यांची मुदत सुध्दा आता संमत आहे. श्री. वसंतरावजी डावखरे हे एक प्रसन्न असे व्यक्तिमत्व. त्यांच्याशी मैत्री करावी असे कोणालाही वाटेल. सभागृहाचे कामकाज चालवित असताना त्यांनी सभागृहामध्ये कधी तणाव निर्माण होऊ दिला नाही आणि कदाचित तो झाला तर अगदी हसतखेळत तणाव दूर करण्याचा प्रयत्न केला. अत्यंत चांगल्या पध्दतीने त्यांनी सभागृह चालविले. त्यांचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी असल्याची चुणूक त्यांनी अनेकदा सभागृहाला दाखवून दिली आहे. मी तर असे म्हणेन की, एक रसिक आणि दिलदार मनाचे हे व्यक्तिमत्व. नागपूरचे अधिवेशन असो किंवा मुंबईचे अधिवेशन असो डावखरेसाहेबांचा जेवणाचा कार्यक्रम हा सुगम संगिताशिवाय कधीच पार पडला नाही. राजकारणामध्ये काम करीत असताना अशा प्रकारची बहुआयामी व्यक्तिमत्वे निश्चितपणे समाजाला काही तरी देत असतात. डावखरेसाहेबांबद्दल मी एकच सांगेन की अगदी ग्रासरुटमधून आलेला हा कार्यकर्ता आहे. मी त्यांच्याबद्दलची माहिती घेतली त्यावेळी मला समजले की, सरपंच पदापासून त्यांनी आपली कारकीर्द सुरु केली. एका छोट्याशा खेड्यामध्ये जन्माला येऊन सरपंच पदापासून आपली कारकीर्द सुरु करुन ते येथे पर्यन्त पोहोचले. काही काळ त्यांनी लिपिक म्हणून नोकरी केली. बाळासाहेब देसाईसारख्या सिंहासारख्या माणसाकडून त्यांनी राजकारणाचे धडे घेतले. बाळासाहेब देसाईसारख्या महान व्यक्तिमत्वा सोबत राहून त्यांनी जे धडे घेतले त्यानुसार त्यांनी पुढचा राजकीय जीवनामध्ये ते एक-एक पायरी चढत गेले. ते ठाणे महानगरपालिकेचे सदस्य झाले, त्यानंतर ठाण्याचे महापौर म्हणून त्यांनी काम केले. ठाण्याचे महापौर झाल्यानंतर एका वर्षाच्या काळात त्यांनी सांस्कृतिक, शैक्षणिक, कला आणि क्रीडा या क्षेत्रात विविध प्रकारचे कार्य केले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

महापालिकेतून त्यांनी थेट विधानपरिषदेत पाऊल टाकले. जवळपास तीन टर्म म्हणजे सलग 18 वर्षे ते या सभागृहाचे सदस्य आहेत. या 18 वर्षाच्या काळात दर दोन वर्षांनी निवृत्त होणाऱ्या अनेक सन्माननीय सदस्यांचा तद्वत नव्याने निवडून आलेल्या सन्माननीय सदस्यांचा त्यांना सहवास लाभला आहे. गेली दहा वर्षे ते उपसभापती म्हणून कार्यरत आहेत. असे एक चांगले व्यक्तिमत्व आज या सभागृहातून निवृत्त होत आहे. मला असे वाटते की, माननीय श्री.डावखरे साहेब कदाचित पुढील अधिवेशनात तुमचे अभिनंदन करण्याची आम्हाला संधी मिळेल. निश्चितच तुम्हाला या सभागृहात पुनश्च येण्याची संधी मिळो अशी मी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय सतीशचंद्र दत्त हे या सभागृहातून निवृत्त होत आहेत. त्यांनी विद्यार्थी चळवळीपासून आपले कार्य सुरु केले. काँग्रेस पक्षाच्या एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेत ते काम करीत होते. त्या संघटनेचे पदाधिकारी म्हणून त्यांनी कार्याला सुरुवात केली. 1978 पासून आजपर्यंत पक्ष संघटनेमध्ये सातत्याने ते काम करीत आहेत. मागील 5-6 वर्षात मी माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल विचार करतो तेव्हा शहरी भागात जन्माला आलेले असतानाही ज्या ज्यावेळी सभागृहात संधी मिळाली त्या त्यावेळी त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा आवाका शहरी भागापुरता, विशिष्ट वर्गापुरता न राहता संपूर्ण महाराष्ट्राशी निगडित असलेले प्रश्न सभागृहात उपस्थित करुन न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी केले आहे. सभागृहात नेहमी चर्चा होत असे की, नेहमी यांचेच प्रश्न का लागतात? माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे एखाद्या दिवशी दोन-दोन, चार-चार प्रश्न, लक्षवेधी सूचना, 93 ची निवेदने सभागृहात चर्चेला आल्यानंतर साहजिक इतरांच्या दृष्टीने तो कुतूहलाचा विषय असायचा. त्यांच्या पक्षाने त्यांना या सभागृहात येण्याची संधी दिली आणि त्यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून सभागृहाच्या कामकाजाचा अनुभव नसताना अभ्यास करुन प्राप्त झालेल्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न केला. विषयांना न्याय मिळवून दिला. आपल्या पदाला न्याय दिला. गेल्या सहा वर्षाच्या काळात आपल्या कर्तृत्वाने आमदार कसा असावा हे त्यांनी आपल्या कामाच्या पध्दतीने दाखवून दिले. पक्ष कोणताही असो, सर्वपक्षीय सदस्यांशी विनम्रतेने वागून, कोणताही वाद टोकाला जाणार नाही अशा पध्दतीने सर्वांशी सलोख्याचे संबंध निर्माण केले. त्यांची ही पहिलीच टर्म असल्यामुळे निश्चितपणे त्यांचा काँग्रेस पक्ष त्यांना पुन्हा या सभागृहात येण्याची संधी देईल याबद्दल माझ्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

मनात तिळमात्र शंका नाही. मी त्यांना शुभेच्छा देतो आणि परमेश्वराजवळ प्रार्थना करतो की, त्यांना पुन्हा या सभागृहात येण्याची संधी मिळू दे. त्यांच्यासारखे सदस्य नीट अभ्यास करतात, पदाला न्याय देतात, रंजलेल्या-गांजलेल्या समाजासाठी, समाजातील भ्रष्टाचारासारख्या वाईट गोष्टींसाठी सातत्याने आवाज उठवून वेळप्रसंगी स्वत:च्या पक्षातील मंत्र्यांविरुध्द संघर्ष करुन न्याय मिळविण्याचा प्रयत्न करतात. अशी फार कमी उदाहरणे आपल्याला पहावयास मिळतात.

नंतर 4व्ही.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे अशी माझी इच्छा आहे. कारण एक चांगला तरुण आमदार म्हणून त्यांनी सभागृहात आदर्श घालून दिलेला आहे आणि असेच लोक सभागृहात आवश्यक असतात म्हणून ते पुन्हा सदस्य म्हणून याच सभागृहात येतील अशी अपेक्षा आपण व्यक्त करुन मी त्यांना शुभेच्छा देतो.

ॲड. अनिल दत्तात्रय परब हे खरे शिवसैनिक, सच्चे शिवसैनिक म्हणून ओळखले जातात. सतत आंदोलने व धडपड करणारे म्हणून त्यांची ख्याती आहे. सतत समाजासाठी झगडणारा एक चांगला आमदार गेल्या 6 वर्षांपासून आपण त्यांचे काम पाहिले आहे. हे नेतृत्व आंदोलनातूनच उभे राहिलेले आहे. अशा चळवळीतील एक कार्यकर्ता, या कार्यकर्त्याला समाजात काम करीत असताना सभागृहात येऊन समाजाची कामे करण्याची संधी पक्षाने दिली. कालचाच विषय आपण सर्वांनी पाहिला. काल सदनात सरकारी कर्मचाऱ्यांना कॉलनीत घरांसाठी जागा देण्याबाबतचा विषय मांडतांना त्यांची तळमळ आपण सर्वांनी पाहिली. एखाद्या विषयाला न्याय देण्यासाठी ते जो प्रयत्न करतात तो वाखाणण्यासारखाच आहे. मग पोलिसांचा विषय असो, मुंबईचा विषय असो अशा विविध विषयांवर आवाज उठवून त्या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न केला त्यांची सुध्दा सभागृहात सदस्य म्हणून पहिलीच वेळ होती. ते देखील या सभागृहात पुन्हा येतील अशी शुभेच्छा त्यांना आपण देऊ.

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. शिवाजीराव दत्तात्रय पाटील, मौ. येलूर, ता. वाळवा, जि. सांगली या खेड्यातून सभागृहात सदस्य म्हणून आलेले आहेत. शिक्षकांमध्ये काम करीत असताना शिक्षण क्षेत्रात विशेषकरुन प्राथमिक शिक्षक संघटनेचे ते अध्यक्ष म्हणूनही ते काम करीत आहेत. प्राथमिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असताना शिक्षकांचे जे प्रश्न आहेत ते अनेक वेळा सभागृहात त्यांनी मांडलेले आहेत. प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी हा उद्याचा भारताचा नागरिक आहे, भारताचे भविष्य आहे, उद्याची भावी पिढी आहे व ती कशा रितीने घडली पाहिजे आणि त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांच्या समस्या दूर झाल्या नाहीत तर त्याचा शिकविण्यावर परिणाम होऊ शकतो. अशा प्रकारे शिक्षकांची बाजू सतत मांडत असताना अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक महासंघाबरोबरच प्राथमिक शिक्षण सहकारी बँक आणि अखिल भारतीय प्रबोधन परिषद अशा अनेक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

संस्था त्यांनी काढल्या. शिक्षकांना त्यांनी चांगल्या प्रकारे हात दिला व त्यांचे प्रबोधन केले, त्यांची सभागृहात दुसरी टर्म असून त्यांनी देखील या सभागृहात पुन्हा सदस्य म्हणून यावे अशी मी शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या देखील आज आपल्यातून निवृत्त होत आहेत. खरे म्हणजे 33 टक्के महिलांना प्राधान्य दिले पाहिजे असे विधेयक देशभर गाजत आहे अशा वातावरणात आपल्या सभागृहातून एक महिला कमी होऊ नये अशीच आमची इच्छा आहे. त्यांनीही सभागृहात पुन्हा यावे अशा शुभेच्छा आपण सर्वांनी देऊ या. त्यांनाही माझी विनंती आहे की, सभागृहातील महिलांचे प्रमाण कमी होऊ देऊ नये. त्यांनी आपल्या कार्यासंबंधी जी पुस्तिका काढली आहे ती माझ्या हातात आहे. ती पुस्तिका पाहिली असता अनेक क्षेत्रात त्यांनी चांगल्या प्रकारची कामे केली आहेत. आमदारकी पूर्वीपासूनच त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरु केलेले असून त्याच कार्याचा ठसा त्यात उमटला आणि समाजामध्ये काम करता करता या सभागृहापर्यंत त्या पोहचल्या. खऱ्या अर्थाने समाजाचं देण त्यांनी जपलं आणि सामाजिक चळवळीतून येथपर्यंत त्या आल्या. महिला काँग्रेसच्या अध्यक्षा असताना सर्व राज्यातील महिलांच्या संघटना तसेच आमदारकीच्या काळात बचत गटाचा मोठा वर्ग सुध्दा त्यांनी उभा केला आणि महिलांचे सक्षमीकरण या माध्यमातून त्यांनी प्रयत्न केलेले आहेत म्हणून मी त्यांना पुन्हा शुभेच्छा देतो आणि पुन्हा या सभागृहात सदस्या म्हणून येतील अशी प्रार्थना करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या संदर्भात मी विचार मांडणार आहे. माझ्याकडे त्यांच्यासंदर्भातील जवळपास दीड पान माहिती आहे. ते राजकारणाला समाज कारणाची व रचनात्मक कामाची जोड देत आपले आयुष्य जगत आहेत. 1982-83 पासून गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे मोफत वाटप, रक्तदान शिबिराचे आयोजन, एकाच दिवशी 1000 व्यक्तींचे रक्तदान व एकूणू 130 रक्तदान शिबिरे त्यांनी आयोजित केलेली असल्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे. त्यांनी ब्लड बँक काढली असून त्यांनी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी औद्योगिक वसाहत सुध्दा काढलेली आहे. ते अकलूज भागातील 40 संस्थांचे चेअरमन आहेत. इतक्या संस्था एक व्यक्ती कशी चालवू शकते हे त्यांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिलेले आहे. शेतक-यांच्या आंदोलनाचे त्यांनी नेतृत्व केलेले आहे, ग्रामीण भागात त्यांनी गावोगावी भजनी मंडळे तयार केलेली आहेत, लेझीमची मंडळे उभी केली म्हणजे समाजाच्या प्रत्येक स्थरात जाऊन त्यांनी काम केलेले आहे. त्यांनी केवळ राजकारण नाही, समाज कारणच नाही तर रचनात्मक कामातून समाजाला दिशा देण्याचे, समाजाला मोठे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य आज आपल्या सभागृहातून निवृत्त होत आहेत त्यामुळे त्यांनाही मी शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर नारायणराव रावते यांच्या बाबत मी विचार मांडणार आहे. रावते साहेब माझे अनेक वर्षापासूनचे मित्र आहेत. मला थोडी चिंता वाटते आणि लगेच समाधानही वाटते. गेल्या 7-8 वर्षापासून रावते साहेबांनी राज्याच्या दृष्टीने, सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने या सभागृहात काम केलेले आहे. गेल्या पाच सात वर्षात रावते साहेब एकाही बिलावर बोलले नाही असे मी कधीही पाहिले नाही. कोणत्या तरी बिलाच्या संदर्भात विषय उपस्थित झाला तेव्हा त्यांनी सांगितले की, मी या बिलावर दोन दिवस बोलू शकतो. अंधश्रध्देचे बील खालच्या सभागृहात मंजूर झाल्यानंतर ते बिल या सभागृहात आले. वरच्या सभागृहात पाच वर्षे हे बिल प्रत्येक अधिवेशनात मांडले गेले परंतु पाच वर्षे बिल रोखून धरण्याचे काम माननीय रावते साहेबांनी केले होते. रावते साहेब हे संघटनेतील कार्यकर्ते आहेत. एका सच्चा शिवसैनिका पासून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

त्यांनी आपल्या जीवनास सुरुवात केली होती. संघटनेतून काम करत करत जो माणूस येथपर्यंत येतो त्याला समाजातील सर्व घटकांच्या दु:खाची जाणीव असते. त्यांनी संघटनेतून महापालिकेत, महापालिकेतून महापौर, महापौरातून विधान परिषद आणि विधान परिषदेतून युतीचे सरकार असतांना मंत्रीपद सुध्दा सांभाळलेले आहे. एक कर्तुत्ववान कार्यकर्ता या सभागृहातून आज निवृत्त होतो आहे.

सभापती महोदय, हिंदुत्वाचा मुद्दा आल्यानंतर त्या मुद्यावर त्यांनी कधीही तडजोड केली नाही. आम्ही त्यांना अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी कधीही तडजोड केली नाही. या ठिकाणी माननीय भुजबळ साहेबांनी सांगितले की, रावते साहेब कधी कधी फार संतप्त होतात. मी सुध्दा त्यांना अनेक वेळा समजावण्याचा प्रयत्न करतो. मी त्यांना सांगतो की, तुम्ही एवढे संतप्त होत जाऊ नका. रावते साहेबांचा प्रत्येक विषयावरचा अभ्यास दांडगा आहे, प्रत्येक विषयावरील बोलण्याची पध्दत, आणि प्रत्येक विषयाला, सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याची तळमळ होती. मी या ठिकाणी बोललो तर कोणाचे मन दुखावणार नाही असे वाटते परंतु शिवसेनेत तळागातील माणसापासून, शेतक-यापर्यंत जाऊन पोहचणारा एकमेव कार्यकर्ता असेल तर ते दिवाकर रावतेच असतील.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

पायात चप्पल न घालता, अनवाणी 300 किलोमीटरची पदयात्रा करणारा कार्यकर्ता शेतकऱ्यांच्या प्रती तळमळ असल्याशिवाय काम करू शकत नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेणे, तळमळीने मांडणे, कष्ट सहन करणे, ही श्री.रावते साहेबांची खरी बाजू आहे. ते शेतकऱ्यांच्या प्रश्नासह संसदीय कामकाजामध्ये, सामाजिक कामामध्ये कधी कंटाळा करीत नाही, हे मी पाहिलेले आहे. संघटनेतील एक कार्यकर्ता नक्षलवाद्यांनी मारला. तेथे जाण्याची मनाई होती. 100 टक्के जीव धोक्यात घालून माझा कार्यकर्ता मारला गेला असेल तर मी तिथ पर्यंत जाऊन पोहोचेल इतकी कार्यकर्त्यांच्या प्रती ज्या नेत्याची तळमळ असते त्या संघटनेमध्ये कार्यकर्ता हा त्या नेत्याला सोडत नाही. श्री.रावते साहेबांनी पायाला चक्र बांधले होते. मराठवाडा, विदर्भामध्ये ते पायाला चक्रच लावून फिरले. माननीय शिवसेनाप्रमखांकडून जी काही जबाबदारी मिळाली तिला न्याय देण्याचा प्रयत्न केला. ज्याच्या अंगी चांगले गुण असतात तीच व्यक्ती परिपूर्ण होते. सर्वगुणांनी संपन्न असलेल्या श्री.रावते साहेबांना एकच मित्रत्त्वाचा सल्ला देणार आहे की, त्यांनी डोक्यावर थोडा बर्फ ठेवावा. त्यांनी अनेक वर्षे राजकारणात काम केले आहे. त्यांच्या पायाला चक्र आहे. आमचे नेते दिवंगत श्री.रामभाऊ म्हाळगी मला नेहमी सांगायचे. आदर्श कार्यकर्त्यांची संकल्पना काय ? आदर्श कार्यकर्त्याची संकल्पना म्हणजे पायाला चक्र, डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर. या तीन गोष्ट कार्यकर्त्याजवळ असल्या तर तो नेहमी पुढे जाईल. त्यांनी असेही सांगितले की, हृदयामध्ये चैतन्याची ज्योत असली पाहिजे. त्यांनी कार्यकर्त्याला बासरीची उपमा दिली. बासरीला स्वर नसतात. ती दुसऱ्याच्या सूरात सूर मिसळून गात असते. मी श्री.रावते साहेबांना एवढेच सांगेन की, आपण यशस्वी जीवन जगत आलेला आहात. आपल्यासाठी सभागृह महत्त्वाचे नाही. आपण सभागृहात असाल नसाल. शेवटी पक्ष संघटना ह्या गोष्टी ठरवत असते. सच्चा कार्यकर्ता जो असतो त्याला सभागृहात असले काय नसले काय काहीही फरक पडत नाही. आपण येथे याल हे निश्चित आहे. आपण असा संकल्प करून या की, माझ्याकडे परिपूर्ण काम करण्याची क्षमता असताना, माझ्या रागामुळे, संतापामुळे कोणी दुखावणार नाही. संताप आपल्याला जाणीवपूर्वक येत नाही. कुठे तरी मनाला बोचते म्हणून आपण संताप व्यक्त करतात. पण त्याच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे एवढीच भावना आपल्याबद्दल व्यक्त करतो. आपल्याला शुभेच्छा देतो. शेतकऱ्यांच्या मध्ये काम

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

करण्यासाठी परमेश्वराने आपल्याला चांगले आरोग्य द्यावे. विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या भाऊबीजेच्या दिवशी घरी जाऊन शेतकऱ्याच्या विधवेच्या हातून राखी बांधून घेऊन ओवाळणी देणारा एकमेव नेता म्हणजे श्री.दिवाकर रावते आहेत. शेतकऱ्यांच्या चळवळीत काम करणारा एकमेवा नेता म्हणजे श्री.दिवाकर रावते आहेत. म्हणून मला त्यांच्या कामाबद्दल निश्चित अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीमध्ये आम्ही आमच्या पक्षाच्या माध्यमातून काम करतो. काळ्या आईची सेवा करणारा शेतकरी आणि त्या शेतकऱ्याशी खऱ्या अर्थाने बांधिलकी ठेवून काम करणारा राजकीय पक्षाचा कार्यकर्ता याची जेव्हा नाळ जुळते तेव्हा शेतकऱ्याला निश्चितपणे न्याय देण्याचा प्रयत्न होतो. तो प्रयत्न माननीय रावते साहेबांनी केला. मी त्यांना शुभेच्छा देतो. पुन्हा इथे त्यांनी यावे. आपण जर नसाल तर शेतकऱ्यांचे विधेयक येईल आणि चर्चेविना मंजूर होईल आणि त्या शेतकऱ्यांवर अन्याय होईल. म्हणून आपण येथे आले पाहिजे अशी इच्छा व्यक्त करतो आणि आपल्याला शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, मुझफ्फर हुसेन हे माझे मित्र आहेत. श्री.मुझफ्फर हुसेन यांचे जीवन छोट्या छोट्या चळवळीतून वर आलेले आहे. मीरा रोड वॉर्ड युवक कॉंग्रेस अध्यक्षापासून राजकीय जीवन सुरू झाले. आपल्या कर्तृत्त्वाने पुढे जात जात ते इथ पर्यंत आले आहेत. त्यांनी आपल्या जीवनामध्ये रचनात्मक कार्याला जोड दिली आहे. एक वैशिष्ट्य पूर्ण काम त्यांनी केले. 1992 मधील मुंबईत झालेल्या जातीय दंगलीत शांतता राखण्यासाठी पुढाकार घेऊन दहिसर येथील दंगलग्रस्तांसाठी 150 घरे बांधून दिली.

यानंतर श्री.गायकवाड.....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

या ठिकाणी मला एका गोष्टीचा जरुर उल्लेख केला पाहिजे की दंगलीमध्ये गोरगरींबाची घरे जळतात परंतु दंगलखोरांची घरे कधीही जळत नाहीत. जो निरपराध आहे मग तो हिंदू असो वा मुसलमान असो त्यांची घरे जळतच असतात आणि दंगल पेटविणारे वेगळे असतात. ज्याची घरे जळाली आहेत अशा लोकांसाठी त्यांनी 150 घरे बांधून दिलेली होती इतकेच नव्हेतर लातूर येथे भूकंप झाला होता त्यावेळी त्यांनी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत आणि घरे बांधून दिली होती त्याचप्रमाणे वसई येथील पूरग्रस्तांच्या पुर्नवसनासाठी देखील त्यांनी मदत केली होती. त्यांनी राजकारण न करता केवळ पक्षाच्या सघटनेचे काम न करता रचनात्मक कार्य हातात घेऊन ते त्यांनी पूर्ण केले आणि समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला होता. कोणताही जातीयवाद न करता त्यांनी अनेक चांगल्या प्रकारची कामे केली आहेत. स्वामीनारायण मंदिर समितीचे ते सदस्य आहेत. सर्व धर्म भाव ठेवून काम करणारे ते एक चांगले कार्यकर्ते आहेत. एका बैठकीच्या निमित्ताने मी त्यांचे विचार ऐकलेले आहेत. त्यांचे विचार अतिशय चांगले आहेत ते निवृत्त होत असल्यामुळे मी त्यांना शुभेच्छा देतो. तसे त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे अशी इच्छा प्रदर्शित करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन. हया पोट निवडवणुकीच्या वेळी सभागृहात आल्या त्यांचा कालावधी पूर्ण झालेला नाही. त्या देखील आता निवृत्त होत आहेत या ठिकाणी निवडून आल्यांनतर त्यावेळी असे वाटले की एका श्रीमंत घराण्यातील ही महिला आहे. जळगाव जिल्हयामध्ये जैन कुटुंबाचे फार मोठे प्रस्थ आहे. त्या कुटुंबातील एक महिला या सदनामध्ये सदस्य म्हणून निवडून आलेली आहे तिचा समाजातील इतर लोकांशी काहीही सबंध आलेला नसेल असे मला वाटले होते. परंतु ज्यावेळी मी माहिती घेंतली तेव्हा मला असे आढळून आले की गर्भश्रीमंत असतांना सुध्दा त्यांनी समाजाची जाण ठेवली आहे सामाजिक बांधिलकी ठेवली असून अनेक सामाजिक संघटनेमध्ये त्यांनी काम केले आहे हे काम करीत असतांना पक्ष संघटनेच्या जबाबदा-या देखील त्यांनी आपल्याकडे घेतल्या आणि ज्या ज्या ठिकाणी काम करण्यास पक्षाने सांगितले होते त्या त्या ठिकाणी जाऊन त्यांनी काम केले होते. महिला असून सुध्दा त्यानी उत्तरप्रदेश, छत्तीसगड इत्यादी राज्यात जाऊन पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी चांगल्या प्रकारे पार पाडली होती. अशी चांगली कर्तृत्ववान सदस्या निवृत्त होत आहे त्यांना पक्षाने जर पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

निवडून येण्याची संधी दिली नाही तर त्यांच्यावर अन्याय होणार आहे म्हणून या कर्तृत्ववान महिला पुन्हा सभागृहात आल्या पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि त्यांना शुभेच्छा देऊन माझे भाषण सपवितो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जे 9 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना "पुनरागमनायच "अशी सुरुवातीलाच शुभेच्छा देण्यासाठी मी उभी आहे. जे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे. माननीय उपसभापती श्री वसतराव डावखरे निवृत्त होत आहेत त्यांच्या कार्य कर्तृत्वाबद्दल सांगावयाचे झाले तर मला एवढेच सांगावयाचे आहे की त्यांच्याकडे समयसूचकता आहे ते फक्त पीठासीन अधिकारी म्हणून निर्देश देतात असे नाही तर आम्ही काय बोलणार आहोत हे समजावून घऊन पीठासीन अधिकारी म्हणून तातडीने प्रतिउत्तर देत असतात. आपल्यामध्ये दुर्दम्य असा आत्मविश्वास आहे. अनेकांना हेवा वाटावा असा आपल्या पक्षश्रेष्ठींचा आपल्यावर विश्वास आहे. अशा प्रकारे त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये मला दिसून आली आहेत. सतत 18 वर्षे विधान परिषदेवर ते निवडून आलेले आहेत पुणें जिल्हयाच्या छोटया गावाच्या सरपंचापासून ते ठाणे जिल्हयाचे महापौर पदापर्यत त्यांनी अनेक पदावर काम केलेले असल्यामुळे ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागातील प्रश्नांचा त्यांना चांगल्या प्रकारची अभ्यास आहे. मैत्रीचे सामर्थ्य काय असते आणि त्याच्या मर्यादा काय असतात याची राजकारणामध्ये प्रत्येक कार्यकर्त्याला जाणीव ठेवावी लागते. परंतु धर्मवीर आनंद दिघे यांच्या बरोबर आपली असलेली मैत्री आणि त्याच्या मर्यादा याबद्दलचा समतोल किंवा भान आपण सातत्याने सांभाळले असून त्याचे आपल्याला विस्मरण झालेले कधीही दिसले नाही हे आपले वैशिष्टय आहे असे मला सांगावयाचे आहे. महाराष्ट्रातील अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्याचा आपण प्रयत्न केला आहे मांढरादेवी येथे मध्यंतरी एक दुर्घटना घडली होती त्यावेळी तेथील कामे वेळेवर पूर्ण झाली पाहिजेत अशी आमची अपेक्षा होती त्या ठिकाणी आपण स्वत: भेट देउन कामे वेळेवर व्हावेत म्हणून सूचना दिल्या त्याचबरोबर रांजणगाव येथील गणपतीच्या मंदिराचे काम असो वा पुलाचे काम असो अशा अनेक विषयाच्या संदर्भात आपण निदेश दिलेले आहेत. ज्यावेळी विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आरडा ओरडा करतात ....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ज्यावेळी कामकाज लवकर संपविले जाते, कामकाज गुंडाळले जाते. त्यावेळी आपण चेअरवर आल्यानंतर आम्ही गंमतीने "डावखरे एक्सप्रेस" आली असे सुध्दा म्हणतो. त्यावेळी या बाजूने आरडा ओरड आणि घोषणा चालू असतांना आमचे म्हणणे काय आहे हे सुध्दा आपण ऐकत असता. आणि त्यावेळी शक्य झाल्यास आपण शासनाला निर्देश देखील देत असता. त्यामधून संपूर्ण सभागृहाचे समाधान होत असते. आपण राष्ट्रवादी कॉग्रेसचे नेते आहात, त्यामुळे आपल्याला "प्राजक्ताचे झाड" अशीच उपमा दिली पाहिजे. कारण त्या झाडाची फुले ही नेहमी राष्ट्रवादी कॉग्रेसच्या दारामध्ये पडतात. आमचा आपल्या प्रती स्नेह लक्षात घेता आपण पुन्हा या सभागृहामध्ये यावे आणि याहीपुढे चांगल्या प्रकारचे कार्य आपल्या हातून असेच घडत रहावे. शिवसेनाप्रमुख आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस असेल, शिवसेना कार्यकारी प्रमुख आदरणीय श्री. उध्दवजी ठाकरे यांच्या आयुष्यातील एखादा महत्वाचा क्षण असेल, त्यावेळी सुध्दा आपण हटकून राजकारणाच्या मर्यादेपलिकडे येऊन पोहोचत असता. त्याचप्रमाणे लोकसभेची निवडणूक असेल, किंवा नवी मुंबईची निवडणूक असेल त्यावेळी कर्तव्य कठोर भावनेने आपण निवडणुकीमधील भूमिका बजावीत असता. मी आपणास मन:पूर्वक शुभेच्छा देते आणि आपण पुन्हा या सभागृहामध्ये याल असा विश्वास व्यक्त करते.

सभापती महोदय, आमचे नेते सन्माननीय श्री. दिवाकरजी रावते हे अतिशय आक्रमक व अभ्यासू, शेतीच्या विषयामधील प्रचंड अभ्यास, घणाघाती वक्तृत्व, त्याचबरोबर प्रचंड इर्षा व परिश्रम, आणि धारदार व्यक्तिमत्व असे एक वेगळेच समीकरण रावते साहेबांना लाभले आहे. आपण सर्वजण मघापासून रावते साहेब किती आक्रमक आहेत असा उल्लेख करीत आहात. परंतु ज्यावेळी ते शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे आणि श्री. उध्दवजी ठाकरे यांच्यासमोर उभे असतात त्यावेळी आम्ही त्यांना मेणापेक्षा मऊ झालेले पहातो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेबांनी मघाशी सांगितल्याप्रमाणे कार्यकर्त्यांनी नेहमी तोंडामध्ये साखर ठेवावी, हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु शिवसेनेचे मीठ त्यांच्या तोंडामध्ये आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला धारदारपणा सातत्याने येत असतो. हिंदुत्वाच्या मुद्यावर बोलत असतांना त्यांचा अनेक माननीय सदस्यांबरोबर संघर्ष होतो. रावते साहेबांचा आणि माझा पहिला परिचय झाला त्यावेळी ते मंत्री होते, याचा मला याठिकाणी मुद्याम उल्लेख करावासा वाटतो. त्यावेळी मी परभणीमधील सेलू या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

डॉ.नीलम गोऱ्हे...

गावामध्ये भगव्या सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्याठिकाणी गेल्यानंतर एक ठराविक समाज मला पहावयास मिळेल अशी माझी समजूत होती. त्या कार्यक्रमामध्ये बुरखा घातलेल्या शेकडो मुस्लिम स्त्रिया आल्या होत्या. हे दृश्य पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. त्या सर्वांचा शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचे काम रावते साहेबांच्या उपस्थितीमध्ये झाले होते. ते कॅबिनेट मंत्री होते व मी एक सामान्य कार्यकर्ती होते तरीदेखील रावते साहेबांनी महिलांचा कार्यक्रम असल्यामुळे ताई तुम्ही माझ्यानंतर भाषण करायचे असे त्यांनी मला सांगितले. अशी अनेक उदाहरणे याठिकाणी सांगता येतील.त्यांनी मंत्री म्हणून परिवहन, रोजगार, स्वयंरोजगार,सहकार, व्यापार,वाणिज्य, पणन व वस्त्रोद्योग अशा आठ विविध विभागांमध्ये काम केले आहे. त्यासोबत झुणका भाकर केंद्रे, अनुशेषाचा प्रश्न, मराठीचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांवर काम करीत व पक्षासाठी त्याग करीत पक्षाच्या सर्व लढायांमध्ये रावते साहेब नेहमी पुढे असतात. रावते वहिनीचा आणि माझा चांगला परिचय आहे, आम्ही त्यांना ताई म्हणतो. त्यासुध्दा रावते साहेबांचे सर्व कार्य संभाळीत असतात. मी शेतकरी दिंडीच्या निमित्ताने अनेक कार्यक्रमांना गेले त्यावेळी माननीय श्री. फुंडकर साहेबांनी केलेल्या उल्लेखाप्रमाणे् त्याच भागातील ते शेतकरी असावेत असे त्या दिंडयामधील शेतकऱ्यांबरोबरच्या लोकांना स्वाभाविकपणे वाटते. हे त्यांच्या कामाचे खूप मोठे यश आहे. ज्यावेळी आमच्या पक्षातील नेते म्हणविणारी मंडळी शिवसेनेतून निघून गेल्यानंतर संपूर्ण समाज शिवसेनेकडे पहात होता, इतर राजकीय पक्ष देखील पहात होते त्यावेळी मोठा प्रश्न पडला होता की, आता शिवसेनेचे काय होणार आहे? त्यावेळी ज्या नेत्यांच्या आणि ज्या कार्यकर्त्यांच्या आधाराने परत एकदा शिवसेना उभी राहिली त्यामध्ये श्री. दिवाकरजी रावते यांचा सिंहाचा वाटा आहे, असे एक कार्यकर्ती म्हणून मला निश्चितपणे वाटते. त्यांनी प्रत्येक बाबतीत पक्षाला सावरुन धरले, आणि आमच्या पळून जाणाऱ्या आमदारांना सुध्दा जागेवर थांबवून पक्षाचा डोलारा टिकविला. सकाळी माननीय मंत्री श्री. अजितदादा म्हणाल्याप्रमाणे् आम्ही कुठेतरी कमी पडलो. आम्ही मान्य करतो की, आमच्या पक्षातील सदस्य फुटून जाऊ नयेत यामध्ये आम्ही कुठेतरी कमी पडलो असू. परंतु आमच्याकडे रावते साहेबांसारखी नेतेमंडळी आहेत. त्यामुळे आजही आमच्यामध्ये उमेद आहे. आणि म्हणून रावते साहेबांना मी "निरोप" हा शब्द वापरणार नाही, परंतु त्यांच्या पुढील कामकाजासाठी पक्षाच्या वतीने शुभेच्छा देते. शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे आणि मॉसाहेब मीनाताई ठाकरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

डॉ.नीलम गोऱ्हे...

यांना ते अतिशय परमपूज्य मानतात या दोघांचेही आशिर्वाद रावते साहेबांच्या पाठिमागे कायम रहातील. आणि श्री. उध्दवजींच्या शुभेच्छा त्यांच्यासोबत निश्चितपणे आहेत हे मला याठिकाणी सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने या सभागृहामध्ये काम करणारे सर्वश्री संजय दत्त, मुझफ्फर हुसैन, प्रतापसिंह मोहिते पाटील व श्रीमती मधु जैन असे चार माननीय सदस्य या सभागृहामधून निवृत्त होत आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचा दिल्लीला जन्म झालेला असला तरी मला त्यांचे सुरवातीचे पाच-सहा माहिने आठवतात. त्यांची मराठी भाषा गेल्या पाच-सहा महिन्यामध्ये सुधारत गेली असे मला वाटते. तसेच हळूहळू मराठी बोलण्याबरोबरच ते मराठीमध्ये भांडावयास देखील लागले आहेत. कारण भांडणे आणि मराठी भाषा यांचा फार जवळचा संबंध आहे. सन्माननीय सदस्यांमध्ये जे परिवर्तन झाले आहे, ते निश्चितपणे चांगले आहे असे मला वाटते. सभापती महोदय, ते ज्यावेळी सदनामध्ये नवीन होते, तेव्हा आम्ही मुद्दाम कठीण मराठी शब्द वापरत होतो आणि मग सगळे सन्माननीय सदस्य हसावयाचे. आम्ही का हसतो ते त्यांना कळत नसे. पण आता त्यांना तेही कळावयास लागलेले आहे, त्यामुळे त्यावर देखील ते प्रतिशब्द बोलतात. ते 26 वर्षाच्या कामानंतर विधान परिषदेचे सदस्य झाले आहेत. मग सदनामध्ये लक्षवेधी सूचना असो किंवा प्रश्न असोत ते त्या चर्चेमध्ये भाग घेत असत. तसेच ते काँग्रेसमध्ये प्रवक्ते आहेत..अशा वेळेला मनामध्ये मतभेद असले तर देखील दुजाभाव येऊ न देतात ते सातत्याने विशाल भूमिका मांडत असतात. ते अनेक राज्यांमध्ये निरीक्षक म्हणूनही जात असतात. मला नेहमी आश्चर्य वाटत असे की,संजय दत्त नावाचा एक अभिनेताही आहे. पण हे ते नव्हेच किंवा तो मी नव्हेच असे म्हणण्याची तुमच्यावर कधी वेळ आली नाही म्हणजेच तुम्ही कार्याने अआणि चेहऱ्याने सर्वांना बऱ्या पैकी परिचित आहात. आपण पहिल्यांदाच जरी विधान परिषदेमध्ये निवडून आला असलात तरी आपण जे कार्य केलेले आहे ते नक्कीच अभिनंदनीय आहे आणि काँग्रेस पक्ष नक्कीच आपला विचार करेल अशी मी शुभेच्छा देते.

सन्माननीय सदस्य श्री.मुझपफर हुसैन यांचे जे काम आहे, त्याबाबत सांगावयाचे तर नियम समितीमध्ये त्यांच्या बरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. त्यामध्ये एक अवघड निर्णय होता की,आपले एक सन्माननीय सदस्य ते आजारी असताना,काही वेगळया पध्दती घडलेल्या होत्या.अशा वेळेला कर्तव्य कठोर होत असतानाच माणुसकीची जाणीव ठेवणे यावरुन त्यांची वेगळया प्रकारची कार्यपध्दती माझ्या लक्षात आली.त्यांची समज चांगली आहे.मीरा-भाईंदर मधील स्थानिक विकासाचे मुद्दे ते सातत्याने मांडत असतात आणि ज्यावेळेला एखाद्या गोष्टीवर वादंग होतो, त्याळेला संवाद साधण्याची त्यांची चांगल्या प्रकारची हातोटी आहे.सन्माननीय सदस्य रोलर्स् स्केटींग असोसिएशनचे देखील काम करीत असतात. त्यामुळे राजकारणातून सुध्दा व्यवस्थित स्केटींग करीत परत तुमचा मार्ग सुकर राहील. अशा प्रकारची मी आपल्याला शुभेच्छा देते.

. . . .5 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्याबाबत सांगावयाचे तर कॉंग्रेसची पाळमुळे ज्या परिवारांमुळे महाराष्ट्रात रुजलेली आहेत,अशा परिवारांपैकी सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील यांचा मला खास उल्लेख करावयास पाहिजे.माळशिरस भागामध्ये सहकाराचा पाया समृध्द करण्याबरोबरच शंकरराव मोहिते पाटील, सहकारी बँकेला गोल्ड मेडल मिळवून देण्यासारखे कार्य देखील आपण केले आहे. आपण सहकार खात्याचे माननीय राज्य मंत्री देखील होतात. 29 सप्टेंबर ते 6 फेब्रुवारी या कालावधीत ते लोकसभेमध्ये जेव्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने निवडून गेले, तेव्हा आम्ही त्यांच्या प्रचाराचेही काम केले आणि त्यांचे सोलापूर मध्ये काय मुद्दे आहेत, याचीही आम्हाला जाणीव आहे. त्यांनी मोजकेच प्रश्न विचारले असले तरी सोलापूर मधील स्थानिक प्रश्नाबाबत त्यांचा अभ्यास अतिशय चांगला आहे आणि मी त्यांना देखील शुभेच्छा देते.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील हे सुध्दा निवृत्त होणार आहेत. मी सहज सगळयांचा परिचय वाचत असताना माझ्या लक्षात आले की, त्यांचे वय जवळजवळ 80 वर्षाचे आहे म्हणजे एवढे प्रचंड काम या वयामध्ये केले आहे. आपण सिनिअर सिटीझन किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी काय करणार ? प्राथमिक शिक्षकांसाठी कार्य करणारी ही व्यक्ती आहे.इतक्या दीर्घकाळ शिक्षकांच्या प्रश्नासाठी आपली संपूर्ण हयात खर्च करणे आणि लक्षावधी शिक्षकांसाठी माहिती आणि प्रबोधन याचे काम करणे अशा प्रकारचे त्यांचे या सभागृहातील योगदान राहिलेले आहे. त्यांच्या कायार्बद्दल आणि शिक्षकांमध्ये त्यांनी जागृती निर्माण केली त्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करते आणि त्यांनाही शुभेच्छा देते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे बाबत सांगत असताना म्हटले तर आमची मैत्रीण, आणि एक म्हण आहे त्यात मी बदल करुन सांगितले जाते की, हृदयी अमृत नयनी पाणी, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी पण डोळयामध्ये अश्रू येऊ न देता कायम हसतमुखाने मग कोणताही प्रसंग असो. पण हृदयातील अमृताच्याच माध्यमातून प्रत्येकाशी बोलण्याचा प्रयत्न करणे अशा प्रकारच्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या कार्यकर्त्या आहेत. एक सामान्य कार्यकर्ती, सामान्य परिस्थितीतून आणि किती संघर्षातून काम करीत त्या येथपर्यंत आलेल्या आहेत, याची एक कार्यकर्ता म्हणून मला निश्चितपणे जाणीव आहे. मी जेव्हा नव्या मुंबईमध्ये जाते, तेव्हा सामान्य ....

. . . .5 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिला त्यांच्याबद्दल असे बोलतात की, मंदाताई जशा उभ्या राहिल्या ना, तर आम्हाला असे वाटते की, जशी काही एखाद्या सिनेमातील हिरॉईन असते, तशा सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे उभ्या आहेत आणि सघर्ष करीत आहेत. सामान्य महिलांच्या मनात तुमच्या बद्दलची विशिष्ट प्रतिमा आहे. जसे आमच्या शिवसेनेकडे लोकांचे लक्ष असते तसेच आता काँग्रेसचे काय होणार ? तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे काय होणार याबाबत सर्वजण निरीक्षण करीत होते. पण राष्ट्रवादी काँग्रेसच्या बरोबर महिलांना जोडण्यासाठी तुम्ही जे काम केले ते मी लांबून पहात होते आणि आमच्या डोळयासमोर तुमच्याकडे काही लोक आलेले पाहिले.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

तेव्हा मला असे वाटले की, शरदराव पवारांच्या बरोबरीने एक संघटन कौशल्य असणारी कार्यकर्ती असली तर बऱ्याचशा गोष्टी पुढे जातात आणि श्रीमती मंदाताईंचे हेच काम पाहून पक्षाने त्यांना संधी दिलेली आहे. कोकण असो, नवी मुंबई असो अशा अनेक कामामध्ये त्यांनी सातत्याने जी धडपड केली आहे त्याची जाणीव निश्चितपणाने पक्ष ठेवेल. कुठलेही छक्के-पंजे न करता आपण काम करीत असता त्यामुळे मला सांगावेसे वाटते की, निश्चितपणाने आपण विश्वास ठेवा, तुम्हाला चांगला न्याय मिळेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे बालपणापासून शिवसैनिक आहेत. ते नेहमी सांगतात की, मी वांद्रे येथेच जन्मलो असल्यामुळे मी लहानपासूनच मातोश्रीत आहे. त्यामुळे सभासद झाल्यानंतर मी मातोश्रीवर गेलो अशातला भाग नाही. शाळेमध्ये जात-येत असताना मी नेहमी शिवसेना प्रमुखांना बघायला जायचो. आपण नेहमी पुराणातील गोवर्धन पर्वत उचलण्याबाबतची उपमा देतो. गोवर्धन पर्वत उचलण्यासाठी जे हजारो सैनिक असतात त्यातील एक श्री. अनिल परब हे आमचे एक सहकारी आहेत. स्वत:चे बोट तुटते का स्वत:चा हात तुटतो याचा विचार न करता लढणारे एक शिवसैनिक आहेत. माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळसाहेब श्री. रावतेसाहेबांना म्हणाले की, डोक जरा शांत ठेवा, तसा बदल होऊ देत असे त्यांनी सुचविले परंतु श्री. अनिल परब एक लढवय्या कार्यकर्ता, प्रत्येक विषयामध्ये पुढे धावून जाणारा, मुंबई महानगरपालिकेत पक्षाच्या सदस्यांना निवडून आणण्यासाठी वेगवेगळया पध्दतीने लढणारा कार्यकर्ता आहे. ॲड.अनिल परब हे स्वत: वकील आहेत त्यामुळे त्यांचा बराचसा वेळ कोर्टात आणि पोलीसस्टेशनला जात असतो. तरी येथे येऊन जेव्हा ते तालिका सभापती म्हणून या आसनावर बसतात तेव्हा आम्हाला खरच अभिमान वाटतो. त्यांनी कधीही जातपात कोण गरीब आहे का श्रीमंत आहे याचा विचार केला नाही. माननीय शिवसेनाप्रमुखांनी जी संधी दिली त्याच पध्दतीने ते पुढेही न्याय देऊ शकतील असे मला खात्रीने वाटते.

सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन ज्यावेळी आल्या त्यावेळी त्यांचा एक आश्चर्यकारक असा प्रवास होता. निवडणुकीमध्ये काय होणार? याकडे सगळया महाराष्ट्राचे लक्ष होते. एका अर्थाने एक वेगळा चमत्कार तुम्ही निवडणुकीमध्ये करुन दाखविला. महिलांचे हक्क आणि कल्याण समितीमध्ये किंवा जळगावमध्ये जिथे जिथे मोठया प्रमाणात काँग्रेसच्या महिला जोडल्या गेल्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आहेत त्या श्रीमती इंदिराजी गांधी, सोनियाजी गांधी यांच्यामुळे महिला जोडल्या गेलेल्या आहेत त्या महिलांना मतदान करण्यास प्रवृत्त करण्याचे जे काम महिला कार्यकर्त्या करतात त्याच्यामध्ये आपला समावेश आहे. आपण सुविद्य आहात आपल्या बोलण्यामध्ये नेहमी शालीनता आहे. तुमच्याशी बोलले की मला नेहमीच असे वाटते की, मला यांच्यासारखे हळू आवाजात कधी बोलता येईल? पण मला ते कधीही शक्य होणार नाही. आम्हाला माईक नसताना झाडाखाली मिटिंग घेऊन असे मोठयाने बोलण्याची सवय लागलेली आहे. त्यामुळे श्रीमती मधु जैन या मधु जैन यांच्या जागी आहेत. आम्ही आमच्या जागी आहोत पण श्रीमती मधु जैन यांना पुढच्या काळात ज्या ज्या ठिकाणी शक्य होईल त्याठिकाणी चांगल्या प्रकारची संधी मिळेल. त्यांच्या विद्येचा, अभ्यासाचा, लोकसंग्रहाचा काँग्रेसपक्ष निश्चितपणाने उपयोग करुन घेईल अशा पध्दतीने मी सर्वांना शुभेच्छा देते धन्यवाद.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या ज्येष्ठ सदस्यांना निरोप देण्यासाठी नाही तर शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे. आपण घरातून जाणाऱ्या व्यक्तींला कधी तू जा असे म्हणत नाही तर ये असे म्हणत असतो आणि जाणाराही मी येतो असे म्हणत असतो ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आहे.

सभापती महोदय, ज्यांचे डाव नेहमी खरे होतात असे ज्यांच्याबद्दल म्हटले जाते ते माननीय श्री. डावखरे. त्यांचा प्रत्येक डाव कदाचित खरा झाला नसेल पण एक गोष्ट मात्र सांगतो की, श्री. डावखरे साहेबांनी राजकारणात नेहमी खऱ्याच्या बाजूने आपला डाव आखलेला आहे त्याचा अनुभव मी अनेकदा घेतलेला आहे त्यामुळे ते पुन्हा या सभागृहात यावेत, अधिक मोठे व्हावेत अशी माझी प्रामाणिक इच्छा आणि प्रार्थना आहे कारण तुम्हाला शुभेच्छा देण्याइतका माननीय श्री. डावखरे साहेब मी तुमच्या इतका मोठा नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेबद्दल माझ्या मनात एक खास ममत्व आहे. अनेकदा या सभागृहात त्यांच्याशी वादही करावा लागलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावतेसाहेबांचा जो संताप असतो तो सात्विक असतो. माराष्ट्रातील वाटनवाट हा माणूस अनवाणी पायांनी फिरलेला आहे. विधवा शेतकरी महिलांचे दु:ख त्यांनी पाहिलेले आहे त्या दु:खाचा स्फोट या सभागृहात त्यांच्या माध्यमातून अनेकदा होत आलेला आहे. ते कधी स्वत:साठी भांडले, स्वत:साठी संतापले आहेत असा एकही प्रसंग दाखवता येणार नाही म्हणून त्यांच्या संतापाबद्दल आपल्याला कितीही, काहीही वाटत असले तरी जो माणूस तळमळीने फिरतो, काम करतो,दु:ख पाहतो आणि ते दु:ख स्वत:चे मानतो तो माणूस संतापतोच म्हणून त्यांच्या एका डोळयात जरी अग्नी असला तरी दुसऱ्या डोळयात अश्रू आहेत. त्यांच्या प्रत्येक अश्रूचे फूल हे अग्नीफुल आहे. म्हणून सन्माननीय श्री. रावते साहेब तुम्ही येथे पुन्हा आले पाहिजे. तुमच्या सर्व सहकाऱ्यांना असे वाटते की, तुम्ही पुन्हा येथे नेतृत्व करायला परत यावे. म्हणून आम्ही तुमची जरुर वाट पहाणार आहोत.सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचे आणखी एक वैशिष्टय आहे. संसंदपटू कोणाला म्हणायचे असते?. या सभागृहात तासनतास बोलायचे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

बिल कसे रोखावयाचे हे त्यांच्याकडून शिकलो. मला ते फार जमले नाही. जे बिल यावे म्हणून आम्ही भांडत होतो ते बिल त्यांनी पाच वर्षे रोखून दाखवले. असे त्यांचे कुशल संसदपटूत्व मी पाहिलेले आहे. मी अनेकदा पत्रकार म्हणून वरच्या गॅलरीमध्ये पाहण्यासाठी बसलेलो आहे. पण सरकारचे एखादे विधेयक रोखून धरणे हा चमत्कार फक्त सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबच करु शकतात. म्हणून श्री. रावते साहेब, आपली गरज आम्हा सर्वांना आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे माझे जवळचे मित्र आहेत. मी पत्रकार असल्यापासून त्यांना पाहात आलेलो आहे. त्यांच्याबद्दल अनेकांनी अनेक पध्दतीची वक्तव्ये केली होती पण ती सगळी निवळून गेली. सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी त्यांच्या मराठीच्या प्रभुत्वाबद्दल सांगितले. इतका त्यांचा अभ्यास आहे. प्रश्न कसा लावावयाचा याबद्दल आधी लोकांना शंका वाटावयाची पण जेव्हा माझ्या लक्षात आले की, या सभागृहात प्रश्न लावून घेण्यासाठी एक कौशल्य आणि गणित लागते. ते गणित जर आपल्या लक्षात आले तर प्रश्न लागतात. पण नुसते प्रश्न लावून चालत नाही तर ते प्रश्न विचारता आले पाहिजेत आणि त्याची तड लावून घेता आली पाहिजे. आपण पाहतो की, त्याचे मराठी कधी कधी चुकत असले तरी त्याच्यातील भावार्थ नेमका असतो आणि तो बरोबर सभागृहात पोहोचत असतो आणि त्या प्रश्नाची तड लावून घेण्याचे काम ते करीत असतात. अगदी महिलांच्या प्रश्नापासून, आरोग्याच्या प्रश्नांपासून, नागरी प्रश्नांपासून तर अगदी मराठीच्या प्रश्नापर्यंत त्यांनी प्रश्नांची तड लावून घेण्याचे काम केले. परवा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जशी मराठीची लढाई लढली तशी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी परवा भाषेचा प्रश्न सभागृहात लावून धरला आणि यशस्वी करुन दाखवला त्याबद्दल खरोखरच त्यांना सलाम केला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब हा लढवय्या सैनिक आहे. शिवसैनिक काय असतो हे अलिकडे फारसे पहावयास मिळत नाही पण जे लढणारे आहेत त्यांचे सगळे दर्शन सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांच्यामध्ये आपल्याला पहावयास मिळते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील हे या राज्यातील शिक्षकांचे सर्वात मोठे नेते आहेत. शिक्षकांचे हजारोचे नव्हे तर लाखोचे मेळावे घेण्याचा चमत्कार फक्त सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यांनी केलेला आहे. इतके मोठे वय असून सुध्दा ते या सभागृहात आहेत. त्यांना पुढचे सारे आयुष्य अतिशय आनंदाचे आणि आरोग्याचे लाभो अशी मी शुभेच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या देवघरातील नंदादीपासारख्या आहेत. त्यांच्यात प्रेमळ आई आणि मायाळू ताई आहे. अत्यंत धडपडणाऱ्या आणि तळमळणाऱ्या कार्यकर्त्याही त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. श्री. शरद पवार यांच्यासारखे दुसरे रत्नपारखी मी पाहिलेले नाहीत. त्यांनी विविध क्षेत्रातील जी माणसे त्यांनी शोधली आणि ज्यांना मोठे केले त्यापैकी मंदाताई एक आहेत. म्हणून सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांची गरज सभागृहाला आणि आम्हा सर्वांना आहे. राजकारणात अशी माणसे येत राहिली पाहिजेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे माझे जवळचे मित्र आहेत. मिरा-भाईंदर मध्ये मी त्यांचे काम पाहिलेले आहे. पण त्यांची दोन वैशिष्ट्ये मला सांगावीशी वाटतात. ते पक्के पुरोगामी आणि पक्के सेक्युलर आहेत. या दोन्ही गोष्टी एकत्रपणे ठेवणे आणि राजकारणात राहून ते सांभाळणे याबाबत अल्पसंख्यांक समाजातील व्यक्तीला फार मोठी कसरत करावी लागते पण ते सर्व त्यांच्याकडे आहे. मोठ्या राजकारणात अल्पसंख्यांक समाजातील माणसाला यशस्वी होणे हे फार त्रासदायक असते. जरी सेक्युलर पक्षात असले तरी त्याही पक्षात त्याच अडचणी असतात ज्या छोट्या छोट्या पक्षात असतात. ते करीत असताना सगळ्या समाजाला बरोबर घेऊन त्या सगळ्या अडचणी पार करुन ते इथपर्यंत पोहोचलेले आहेत. त्यांनी पुन्हा या सभागृहात येणे आवश्यक आहे. आपण पुन्हा नक्की याल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मधुताई जैन यांच्याबद्दल काय सांगावयाचे ? आपण उच्चविद्याविभुषित आहात. पण आपल्या शालिनतेबद्दल कौतुक करता करता सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी जे आत्मपरीक्षण केले ते तर फारच मोठे आहे. आपल्यामध्ये जो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

परिसाचा गुण आहे तो इतक्या अल्पावधीत या सभागृहात दाखविला. आपण अधिक काळ जर या सभागृहात आला तर आणखी अनेक बदल घडतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे जे म्हणाल्या ते खरे आहे की, या राज्यातील काँगेसच नव्हे तर हे राज्य उभे करणारी जी थोडी घराणी आहेत, ज्यांनी विकासाप्रत या राज्याला नेले, सहकार मोठा केला त्या घराण्याचे ते नेतृत्व करतात. आम्ही युवक क्रांती दलामध्ये लक्षभोजनाबद्दल गाणी म्हणावयाचो. पण जेव्हा मी दादांना पाहिले आणि त्यांच्या बंधूंना पाहिले तेव्हा ही माणसे वेगळी आहेत, तळागाळातून आलेली आहेत आणि तळागाळातून आलेल्या माणसांचे जे व्यक्तिमत्व फुलत असते ते समाजातून फुलत असते. ते इथे आल्यानंतर लक्षात येते. ते फार मोजके बोलतात. पण मार्मिक बोलतात. त्यांचेही काम मोठे आहे. मी या सर्व सन्माननीय सदस्यांना आपण पुन्हा या, आपली वाट पाहतो, एवढेच सांगतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज या सभागृहामधून 9 सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आपण याठिकाणी एकत्र जमलेलो आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, हे सभागृह असे आहे की, या सभागृहामध्ये दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात आणि पुन्हा तेवढेच नवीन सदस्य या सभागृहात येतात. विधानसभा आणि विधानपरिषदेत हा एक फरक आहे. विधानसभेमध्ये निवडून आल्यानंतर एकदा शपथ घेतात आणि 5 वर्षांची मुदत संपली की, कोणताही निरोप समारंभ न होता पुढील निवडणुकीची तयारी करतात. या सभागृहाचे वैशिष्टय असे आहे की, हे सभागृह कायम आहे. येथे सदस्य निवडून येतात आणि निवृत्त होतात. या सभागृहाचे सन्माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे सहा वर्षापूर्वी निवृत्त होत असताना मी निरोप समारंभाच्या वेळी भाषण केले होते. त्यावेळी ते लोकसभेच्या निवडणुकीची तयारी करीत होते. ते तयारी करीत असताना निवडणुकीला उभे राहिले होते. मी त्यावेळी त्यांना म्हटले होते की, तुम्ही लोकसभेत जावे. तुम्ही लोकसभेत गेलात तर आम्हाला आनंद होईल. परंतु दुर्दैवाने त्या निवडणुकीत त्यांना यश आले नाही. परंतु ते या सभागृहात पुन्हा निवडून आले. आताही दिनांक 28 एप्रिल रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक होणार आहे. मी माझ्या पक्षाच्यावतीने जरुर सांगतो की, त्यांना त्यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळेल आणि पुन्हा ते या सभागृहामध्ये निवडून येतील. मी आपल्याला निवडणुकीसाठी शुभेच्छा देतो. आपण पुन्हा या सभागृहात यावे अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे आमचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी वर्णन केले आहे. त्यांचा स्वभाव निराळा आहे आणि माझाही स्वभाव निराळा आहे. आपण सर्वांनी त्यांची आणि माझी जुगलबंदी पाहिलेली असेल. परंतु ती जुगलबंदी तात्पुरती असते. ते एक अभ्यासू सदस्य आहेत. मी या सभागृहामध्ये गेली 8 वर्षे त्याचा अनुभव घेत आहे. ते एक प्रभावी व्यक्तिमत्व आहे. एखाद्या विषयामध्ये ते मुद्देसूद मांडणी करतात, सभागृहात आलेल्या विधेयकातील प्रत्येक कलमावर, उपकलमावर विश्लेषण करुन त्या बिलातील

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

विषयाचा उहापोह करतात. सभागृहात आलेले विधेयक कशासाठी आलेले आहे, त्याचे बाहेर परिणाम कसे होतील याबाबत ते इत्यंभूत वर्णन करीत असताना सगळयांना पाहिले आहे. या सभागृहातील एक प्रभावी व्यक्तिमत्व आहे, त्यांच्यापासून नवीन सदस्यांना पुष्कळ शिकण्यास मिळालेले आहे. मी चौकशी केली असून ते पुन्हा या सभागृहामध्ये येतील अशी माहिती मिळाली आहे. मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब हे देखील निवृत्त होणार आहेत. ते एक सच्चा शिवसैनिक आहेत. कोकणातील आहेत. एकदा वचन दिले की, तो शब्द शेवटपर्यंत पाळत असतात. गेली सहा वर्षे त्यांनी या सभागृहात प्रभावीपणे काम केलेले आहे. त्यांनी सुध्दा या सभागृहात पुन्हा यावे अशी मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील हे निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी म्हटले की, श्री.शिवाजीराव पाटील यांचे वय 80 वर्षे आहे. एक धिप्पाड शरीरयष्टी असलेले व्यक्तिमत्व. प्राथमिक शिक्षकांची अखिल भारतीय स्तरावर त्यांनी बांधणी केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस येथे दोन दिवस अधिवेशन झाले. त्यावेळी 50-60 हजार शिक्षक त्या अधिवेशनासाठी आले होते. शिक्षकांना एकत्र करुन त्यांची संघटना बांधण्याचे काम सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यांनी केलेले आहे. त्यामुळे माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी त्यांना मुद्दाम या ठिकाणी आणले. राज्यस्तरावर त्यांनी शिक्षकांची एक चांगल्या प्रकारची संघटना बांधली. त्यांच्या या कार्याची पावती म्हणून त्यांना येथे येण्याची संधी दिली. त्यांना देखील मी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त आणि सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे युवक काँगेसच्या चळवळीतील तरुण कार्यकर्ते. युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये असल्यापासून त्यांच्याशी माझ संबंध आला. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे पहिल्यांदा मीरा-भाईंदर नगर परिषदेचे नगरसेवक म्हणून निवडून आले. काँग्रेस पक्षाने श्री. संजय दत्त आणि श्री. मुझफ्फर हुसेन या दोन्ही तरुण कार्यकर्त्यांना संधी दिली. या दोघांनीही पुनश्च या सभागृहामध्ये यावे अशी मी इच्छा प्रकट करतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन यांचा येथील प्रवास हा थोड्या निराळया पध्दतीने झालेला आहे. मागच्या पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेस तर्फे इच्छूक उमेदवार म्हणून आमचे मित्र श्री. सुधाकर गणगणे यांचे नाव घेतले जात होते. पण त्यावेळी सुबोध मोहिते यांना पक्षाने तिकीट दिले. श्री. सुबोध मोहिते हे नागपूरहून पुण्याला आणि पुण्याहून मुंबईला येणार होते. परंतु त्यावेळी राष्ट्रपतींचा कायक्रम पुण्याला असल्यामुळे ते पुण्याहून मुंबईला विमानाने येऊ शकले नाहीत. त्यामुळे श्रीमती मधु जैन यांना फॉर्म भरण्याचे आदेश देण्यात आले. या निमित्ताने मी इच्छा व्यक्त करतो की त्यांनी अशा शॉर्टकट पध्दतीने येण्यापेक्षा डायरेक्ट पध्दतीने येथे यावे. त्यांनी देखील या सभागृहामध्ये पुनश्च यावे अशा मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना मी कित्येक वर्षापासून ओळखतो. त्या कार्यकर्त्या असल्यापासून , नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका असल्यापासून त्यांचा आणि माझा परिचय आहे. 1999मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. ही स्थापना करीत असताना या मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये जे काही थोडे फाऊंडर मेंबर होते त्यापैकी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

श्रीमती मंदाताई म्हात्रे ह्या एक. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी असे सांगितले की, या सभागृहामध्ये महिला सदस्य कमी आहेत. माझ्या पक्षाने नेते आदरणीय श्री. शरद पवारसाहेब यांनी अशी भूमिका घेतलेली आहे की जर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे दोन प्रतिनिधी या सभागृहामध्ये पाठवाचे असतील तर त्यापैकी एक प्रतिनिधी महिला असली पाहिजे. श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी काळजी करु नये, पुन्हा त्यांना या सभागृहामध्ये येण्याची संधी मिळेल अशी मी अशा व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील यांचा आणि माझा कित्येक वर्षापासून संबंध आहे. ते सोलापूर युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते तेव्हा पासून म्हणजे 1975 पासून त्यांचा आणि माझा संबंध आहे. श्री. शंकरराव मोहिते पाटील यांचे ते चिरंजीव. या मोहिते-पाटील कुटुंबाने सोलापूर जिल्हयाचे राजकारण करीत असताना त्या जिल्ह्याला सक्षम करण्याचे, आर्थिकदृष्टया समृध्द करण्याचे काम केले ...

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

त्याच कुटुंबातील माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील या सभागृहातून निवृत्त होत आहेत. त्यांना मी शुभेच्छा देतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी, पुढील राजकीय जीवनासाठी शुभेच्छा देत असताना, आमच्या पक्षातील निवृत्त होणाऱ्या सदस्यांना पुन्हा सभागृहात येण्याची संधी देण्याबाबत प्रयत्न केले जातील एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, आज आपल्या सदनातून 9 माननीय सदस्यांना आपण निरोप देत आहोत. मी मुद्दाम निवृत्त हा शब्द न उच्चारता तो शब्द गायब करीत आहे. निरोप देत आहोत. म्हणून हा निरोप देत असताना आज शिक्षक प्रतिनिधी माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांचा उल्लेख केला गेला. 80 वर्षाचे काँग्रेस पक्षाचे जूने निष्ठावंत, स्व.वसंतदादा पाटील यांच्या पठडीत तयार झालेले ज्येष्ठ नेते आणि स्वतंत्र भारतामध्ये शिक्षकांची संघटना ज्यांनी अत्यंत प्रभावीपणे निर्माण केली ते स्वातंत्र्य सेनानी आचार्य दोंदे, ज्या आचार्य दोंदेच्या नावाची स्मारके बिहार आणि उत्तरप्रदेशात आहेत, त्यांच्या पठडीत तयार झालेले माननीय सदस्य श्री.शिवाजीराव पाटील यांना सदनातून आपण निरोप देत आहोत. शिक्षक संघटनेतील त्यांचे काम, त्यांच्या एकूण देहयष्टीकडे पाहिल्यानंतर पैलवानाची प्रकृती लाभलेले, खऱ्याअर्थाने पूर्वीच्या काळात ज्यांना गुरुजी म्हणायचो, या गुरुजी शब्दाला वेगळा अर्थ होता. त्या दोन्ही विशेषणांना न्याय देणारे व्यक्तिमत्व म्हणजे शिवाजीराव पाटील. त्यांचा माझा फार जूना परिचय आहे. ज्यावेळी आम्ही सीपीएच्या माध्यमातून चीन, हाँगकाँग व मलेशियाच्या अभ्यास दौऱ्यावर गेलो होतो, त्या दौऱ्याचे नेतृत्व माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे यांनी केले होते. आमच्या बरोबरीने सर्व ठिकाणी वावरणारे माननीय श्री.शिवाजीराव पाटील यांना आज आपण निरोप देत आहोत. जून्या पठडीतील खऱ्या अर्थाने शिक्षक पेशाला न्याय देण्याचे कार्य करणारे एक चांगले शिक्षक म्हणून त्यांची प्रतिमा आहे. या सभागृहाचे सदस्य म्हणून खूप कमी वेळ त्यांनी कामकाजात सहभाग घेतला असेल परंतु पोटतिडकीने शिक्षकांचे प्रश्न मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, दुसरे आमचे मित्र माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरे यांनाही आपण निरोप देत आहोत. खरे तर श्री.वसंतराव डावखरे यांचे व्यक्तिमत्व म्हणजे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. काही काही माणसांची अशी वैशिष्ट्ये असतात. खऱ्या अर्थाने सर्वांचे मैत्र जपणारे. मित्र आणि मैत्र या शब्दामध्ये देखील अंतर आहे. मैत्र जिवाला जपणारा सर्वांचा मित्र अशी त्यांची प्रतिमा आहे. खरे म्हणजे सर्वांना सांगावेसे वाटते, ते निवडणुकीला उभे राहिले की एका पक्षाचे असतात परंतु सर्वपक्षीय असतात असे व्यक्तिमत्व त्यांच्या स्वभावातून, त्यांच्या मैत्रीतून, त्यांच्या वागण्यातून त्यांनी निर्माण केले आहे. आताच माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील हिवरे गावाचे सरपंच, स्वातंत्र्यसैनिकांचे सुपुत्र, रस्त्यावर भाजीपाला विकणाऱ्या बहुजन वर्गातील सर्वसामान्य मातेचे सुपुत्र अशी त्यांच्या जीवनाची सुरुवात, त्याचबरोबर कै.बाळासाहेब देसाई, कै.पी.के.सावंत हे दोन्ही खूप ज्येष्ठ आणि मातब्बर असे महाराष्ट्रातील नेते होते.....

नंतर 5जी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

त्यांच्या सहवासामध्ये, त्यांचे स्वीय सहाय्यक म्हणून माननीय श्री. वसंतराव डावखरे यांनी काम केलेले आहे. कै. बाळासाहेब सावंत आणि बाळासाहेब देसाई या दोघांनाही मी जवळून पाहिले आहे. त्यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करणे ही साधी गोष्ट नाही, माननीय सभापती महोदय आपण देखील हे सांगू शकाल. या दोन्ही व्यक्तिंबरोबर माननीय श्री. डावखरे साहेबांनी काम केले आणि त्या दोघांचे प्रेम व आशीर्वाद त्यांनी मिळविलेला आहे. या सर्व आदर्श नेतृत्वामध्ये तयार होत असताना जीवनाच्या वाटचालीत, सामाजिक कार्यात, राजकीय कार्यात सहभागी होताना आपल्या बरोबरीने सर्वांनाच बरोबर घेऊन जावे, सर्वांनाच सहकार्य करावे, आप-पर भाव न ठेवता मदतीचा हात सातत्याने खुला ठेवावा अशी मोजकीच व्यक्तिमत्व मी जवळून पाहिली आहेत त्यामध्ये माननीय श्री. वसंत डावखरे यांचा उल्लेख प्रामुख्याने मला करावा लागेल. काही काही लोकांबद्दल मला कुतूहल वाटते की, हिवरे गावचा सरपंच आणि ठाण्याचा महापौर अशी पदे त्यांनी भुषविली आहेत. मला एक जण भेटला होता तो म्हणाला की, माननीय श्री. डावखरे साहेब एवढे कर्तबगार आहेत की, ते एकाच वेळेस हिवरे गावचे सरपंच आणि ठाण्याचे महापौर सुध्दा होऊ शकतात. मी म्हणालो असे शक्य नाही, कारण ते घटनेच्या चौकटीत बसत नाही. ते सरपंच अगोदर होते नंतर ठाणे शहरात आले व महापौर झाले. मी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या आई-वडिलांना भेटण्याची संधी मला मिळाली होती. मला सांगण्यास आनंद होतो आणि मी यापूर्वी देखील सभागृहात सांगितले आहे की, ठाणे महापालिकेच्या त्यांच्या निवडणुकीच्या प्रचाराचा पहिला नारळ फोडण्याचे सौभाग्य मला लाभले होते. त्यावेळेस ते म्हणत होते की, चांगल्या माणसाच्या हातून प्रचाराचा नारळ फोडावा म्हणून आपणास विनंती करीत आहे. अशा प्रकारे मी त्यावेळेस त्यांच्या प्रचाराचा पहिला नारळ फोडला होता. ते महापौर झाल्यानंतर मी त्यांना भेटण्यासाठी जात होतो. तसेच शिवसेनेचे नेते डॉ.सतीश प्रधान यांच्या बरोबर त्यांचे मैत्रीचे संबंध होते. मी, रामभाऊ लिंगाडे आणि सुधाकर गणगणे ज्यावेळेस ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये नाटक पाहण्यासाठी जात होतो तेव्हा माननीय श्री. डावखरे साहेबांकडेच जात होतो, असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. सर्वांना कुठलाही भेदभाव न करता मदत करणारे, मदत या शब्दाला न्याय देणारे श्री. डावखरे यांना आपण आज निरोप देत आहोत. या सभागृहात ते नक्कीच पुन्हा येतील असे माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सुध्दा सांगितले. मी त्यांचे आभार व्यक्त करतो कारण त्यांनी सभागृहात बोलत असतांना दोन जणांचे तिकिट वाटपच करुन टाकलेले आहे असे हे भोळे नेतृत्व आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे दोघेही सारख्याच स्वभावाचे आहेत. त्यात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे शीघ्र कोपी आहेत. शीघ्र कोपी स्वभावाचा माणूस शास्त्रीय दृष्टया तेवढाच शीतल सुध्दा असतो, तेवढाच लवकर शांतही होतो, तसेच गुरुनाथ कुलकर्णी हे सुध्दा आहेत. सन्माननीय दिवाकर रावते यांचे जीवन देखील असेच आहे. सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्माला येऊन मुंबई महानगरपालिकेमध्ये काम करताना अनेक वर्षे महापालिकेचा सदस्य तसेच विविध समित्यांचे चेअरमन म्हणून देखील त्यांनी काम केले आहे. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय किर्ती असलेल्या, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या अवाढव्य नगरीचा महापौर होण्याचे सद्भाग्य त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना लाभले. शिवसेनेच्या संघटनेच्या माध्यमातून काम करीत असताना सभागृहात ज्या ज्या वेळेस त्यांनी भावना व्यक्त केल्या, परभणी, मराठवाडा किंवा विदर्भातील अकोला, अमरावतीचा प्रश्न असो, शेतकऱ्यांच्या गल्लीमधून अनवाणी फिरताना, पायाला फोड आलेले असताना फडके बांधून शेतकऱ्यांबरोबर फिरणारा हा कार्यकर्ता, सभागृहात जेव्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांबद्दल चर्चा होत होती तेव्हा दिवाकर रावते बोलत असताना प्रामाणिकपणे सांगतो की, सभागृहात बसलेल्या सदस्यांच्या डोळ्यातून अश्रू निघालेले आहेत असे त्या भागातील शेतकऱ्यांचे विदारक चित्र त्यांच्या भाषणातूनन, त्यांच्या शब्दांमधून, त्यांच्या वेदनांमधून मांडतांना मी पाहिलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

रावते साहेब हे एक वेगळया प्रवृत्तीचे आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी सांगितले आहे की, बिल रोखण्याचे सामर्थ्य ए का सभासदामध्ये कसे असू शकते हे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्याकडे पाहिल्यानंतर आणि त्यांचे भाषण ऐकल्यानंतर आपल्याला दिसून येते. कोणतेही बिल, कोणताही प्रश्न असो मग तो प्रश्न शेतक-यांच्या आत्महत्येचा असेल, मुंबईच्या चाळीचा असेल, मुंबईच्या गिरणी कामगारांचा असेल किंवा परभणी-अमरावती-अकोल्याच्या शेतक-यांचा असेल ते जाणून धेऊन त्यावर तळमळीने बोलणारी अशी ही व्यक्ती आहे. खरे म्हणजे तळमळ वगैरे शब्द काही माणसांना आपण विनाकारण लावत असतो परंतु मोजक्या माणसांना प्रामाणिकपणे हे शब्द लावले पाहिजेत असे मला वाटते. इतक्या तळमीने वेदना या ठिकाणी मांडतांना आपण माननीय रावते साहेबांना पाहिलेले आहे. कधी कधी मला असे वाटते की, कंटाळा हा शब्द कधी कधी आपल्या जवळ येतो. पण रावते साहेबांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवसाच्या चोवीस तासात कंटाळा हा शब्द कधीही त्यांच्या जवळ आलेला नसेल. त्यांच्यापासून कंटाळा हा शब्द मैलोनंमैल लांब पळाला असेल. न थकणा-या, अथक काम करणा-या, अथक परिश्रम करणा-या नेत्याला आपण जवळून पाहिलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी परत या सभागृहात यावे अशी माझी मनापासून इच्छा आहे. दुस-याला मनापासून दाद देणारा म्हणजे आपल्या मताच्या विरुध्द मत प्रभावीपणे कोणी मांडले तर त्याला बाहेर भेटून किंवा चिट्ठी पाठवून दाद देण्याची कुवत मला माननीय रावते साहेबांकडे पहावयास मिळाली आहे. ही गोष्ट फार रेअर असते.

सभापती महोदय, मी आता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांच्या संदर्भात विचार मांडणार आहे. नव्या मुंबईच्या महापालिकेच्या निवडणुकीत मी निरीक्षक म्हणून काम पाहत होतो. विषय नियामक समितीच्या प्रमुख पदाच्या निवडणुकीकरिता मी निरीक्षक म्हणून गेलो होतो. त्यांची एकदा मी निवडही केली होती. त्यांची त्या पदावर निवड झाल्यानंतर काही तांत्रिक गोष्टीमुळे मी त्यांना राजीनामा देण्याची विनंती केली. क्षणाचाही विलंब न लावता मंदाताई म्हात्रे यांनी राजीनामा दिला होता व दुस-याचा मार्ग मोकळा करुन दिला होता. असे उमदे मन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

त्यांच्याकडे आहे. ख-या अर्थाने पक्षाची निष्ठा, पक्षाचे, समाजाचे व्यापक हीत जपणा-या अशा या मंदाताई म्हात्रे आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांच्या विविध संघटना आहेत. त्यांनी 300 अल्पबचत गट तयार केलेले असून त्यांनी सामाजिक काम, रक्तदानाचे काम, महिलांना मदत करणा-या अनेक संस्था त्यांनी काढलेल्या आहेत. त्यांचे सर्व काम मी फार जवळून पाहिलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगून टाकले आहे त्यामुळे मंदाताई या सभागृहात निश्चितपणे परत येतील असा मला विश्वास वाटतो व त्यांनी परत या ठिकाणी यावे अशी सद्भावना मी त्यांच्याबाबत व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमच्या मधुताई जैन यांना एक फार मोठे राजकीय घराणे लाभलेले आहे. त्यांच्या घराण्याला राजकीय, सामाजिक, औद्योगिक अशी पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांचे माहेर हे राजस्थान मधील आहे. त्या या महाराष्ट्राच्या सून म्हणून जळगावमध्ये एका नामांकित घराण्यात आल्या. पहिल्या पासून तडफेने काम करणा-या पक्षाच्या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी काम केलेले आहे. आमच्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्यापर्यंत प्रश्न नेतात. श्रीमती मधु जैन यांनी अखिल भारतीय महिला पदाधिकारी म्हणून काम केलेले आहे. त्यांनी सुध्दा या सभागृहात पुन्हा यावे अशी सदिच्छा मी व्यक्त करतो.

माझे मित्र श्री. मुझफ्फर हुसेन यांच्या बाबतीत मी बोलणार आहे. मी स्वत:च महाराष्ट्राच्या युवक काँग्रेसच्या चळवळीतील एक कार्यकर्ता आहे. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, माननीय सभापती महोदय, या ठिकाणी बसलेले आहेत. माननीय सभापती महोदय, हे प्रदेश काँगेंसचे अध्यक्ष असतांना, विविध पदांवर असतांना चांगल्या तरुणांना पाठबळ देण्याचे काम माननीय सभापती महोदयांनी केलेले आहे. माननीय सभापती महोदयांनी मुझफ्फर हुसेन यांच्या पाठीशी सदैव उभे राहून सपोर्ट दिलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे सेक्यूलर आहेत असे विचार व्यक्त केलेले आहेत आणि ते खरेही आहे. त्यांनी अल्पसंख्यांक समाजामध्ये काम करतांना सगळया बाबींचे भान ठेवून, सर्व समाजाला एकत्र ठेवून काम केलेले आहे. त्यांनी स्वामी नारायण मंदिरापासून ते इस्लामिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

कल्चर सेंटर म्हणजे मौलाना वहिदुद्दीन यांचे जे दिल्लीला आदर्श केंद्र आहे त्या आदर्श विचारांची सगळी धारणा, वाटचाल आपल्या आयुष्यातून करीत असतांना त्यांनी सर्वधर्मसमभावाचे उत्तम काम केलेले आहे आणि हे सर्व श्री. मुझफ्फर हुसेन यांच्याकडे पाहिल्यानंतर आपल्याला दिसून येते. त्यांना उत्तम मराठी म्हणजे ज्याला कोकणस्थ मराठी म्हणता येईल असे मराठी श्री.मुझफ्फर हुसेन हे बोलतात.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

मराठी,इंग्रजी,उर्दू या भाषांवर त्यांचे प्रभुत्त्व आहे. त्यांना अनेक प्रश्नांची जाण आहे. महाराष्ट्र युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उत्तम शिबिरे घेतली आहेत. मेळावे घेतले आहेत. त्याला उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली आहे. डम्पिंग ग्राऊंडचे विदारक चित्र त्यांनी 40 ते 45 मिनिटे भाषण करून सदनासमोर आणले. त्यांनी या सरकारला, सदनाला डम्पिंग ग्राऊंडचे महत्त्व आणि भयानकता पटवून दिली आहे. असे विविध प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. अशा या मित्राने पुन्हा सभागृहामध्ये यावे अशी सदिच्छा व्यक्त करतो.

आमचे दुसरे मित्र श्री.संजय दत्त यांना देखील निरोप देण्यात येत आहे. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे ते चळवळीतील उत्तम कार्यकर्ते आहेत. एन.एस.यु.आय., महाराष्ट्र युवक काँग्रेस संघटना, महाराष्ट्र काँग्रेस संघटना, अखिल भारतीय काँग्रेस संघटनांमध्ये त्यांनी काम केले आहे. त्रिपुरा पासून ओरिसा पर्यंत जाण्याची त्यांची तयारी असते. संघटनेच्या माध्यमातून प्रामाणिकपणे काम करण्याचे कसब त्यांच्याकडे आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी त्यांचा परिचय वाचला. श्री.संजय दत्त यांनी बिझिनेस मॅनेजमेंटचा डिप्लोमा केलेला आहे. या डिप्लोमा पेक्षाही सभागृहाचा बिझिनेस याचा डिप्लोमा त्यांचा फार मोठा आहे. मग लक्षवेधी सूचना असू द्या, प्रश्न असू द्या, अल्पसूचना असू द्या. कल्याण-डोंबिवली-मुंबई येथे राहून सुद्धा त्यांनी पुण्यातील ग्रामीण भागाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एवढेच कशाला परवा त्यांनी पंढरपूरचा प्रश्न मांडला होता. प्रश्न वारकऱ्यांचा असू द्या, शेतकऱ्याचा असू द्या, कामगारांचा असू द्या तो मांडण्यामध्ये माननीय संजय दत्त नेहमी आघाडीवर असतात. मला असे वाटते की, प्रश्नोत्तराचा तास असला की, बहुताशी मंत्री हजर राहतात. कारण काही असले तरी प्रश्न उभा उपस्थित झाला की, संजय त्यांच्या समोर दत्त म्हणून उभा असतो. हे सर्व मंत्र्यांनी पाहिले. प्रश्न अभ्यासपूर्ण असल्याने सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या प्रश्नाला आपण योग्य ते उत्तर दिले पाहिजे याची काळजी घेऊनच मंत्री या सभागृहात येतात. हे विनोद म्हणून नाही तर अतिशय गांभीर्याने हे सांगत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना आपण निरोप देत आहोत. त्यांचेही घराणे राजकीय, सामाजिक, सहकार चळवळीमध्ये आहे. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला न्याय देणाऱ्या जेवढ्या म्हणून संस्था आहेत मग ती कुक्कुटपालन संस्था असेल, सहकारी साखर कारखाना असेल, सहकारी औद्योगिक वसाहत असेल, सहकारी बँक असेल इत्यादींच्या माध्यमातून त्यांनी कार्य केले आहे. तसेच जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले काम केलेले आहे. या सभागृहामध्ये काम केलेले आहे. राज्यमंत्री म्हणून काम केले आहे. थोडक्यात ग्रामीण भागातील प्रश्नांना न्याय देणारा नेता म्हणून माननीय श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांची आपणा सर्वांना ओळख आहे. त्यांनी या सदनामध्ये पुन्हा यावे अशी सदिच्छा मी व्यक्त करतो.

माझे मित्र श्री.अनिल परब यांना देखील आज निरोप देण्यात येणार आहे. ते शिवसैनिक आहेत. पेशाने वकील आहेत. उत्तम प्रकारे आणि मुद्देसूदपणे आपला आग्रह न सोडता, कोणतीही तडजोड न करता, मुद्दा मांडणारा शिवसैनिक म्हणून श्री.अनिल परब यांच्याकडे मी पाहतो. मी ज्या नऊ जणांचे वर्णन केले आहे, त्यांनी आपापल्या पक्षामध्ये उत्तम निष्ठा बाळगलेली आहे. सन्माननीय सभापती महोदयांना माहिती आहे की, कै.वि.स.पागे यांची जन्मशताब्दी सुरू आहे. ते काँग्रेस शिबिरामध्ये एकदा म्हणाले होते की, "निष्ठा" म्हणजे काय आणि आताचा काळ म्हणजे काय ? याचे त्यांनी वर्णन केले होते. ते म्हणाले की, आमच्या वेळी "निष्ठा" होती आणि आता "निसटा" आहे. वेळ मिळेल तसे "निसटा." या सर्व सन्माननीय सदस्यांनी काळाप्रमाणे निष्ठेने काम केलेले आहे. त्या सर्वांनी पुन्हा यावे येथे यावे. श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही त्यांची वाट पहात आहोत. धन्यवाद.

यानंतर श्री.गायकवाड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीकार नोंद

श्री.विनोद तावडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,निवृत्त सदस्यांना निरोप देत असतांना भाषणे होत असतात त्यावेळी माझा आग्रह असा असतो की, गट नेत्यांनी त्याबाबतीत बोलल्यानंतर इतर सन्माननीय सदस्यांनी बोलता कामा नये.अन्यथा निरोपाची भाषणे एवढी चालतात की पुढच्या सन्माननीय सदस्याला निरोप देण्याची वेळ येते तरी भाषणे सुरुच असतात. सभापती महोदय, दोन तीन निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत एक दोन मुद्दे मला मांडावयाचे असल्यामुळे मी आपल्याकडे बोलण्यासाठी परवानगी मागितली होती. मला या ठिकाणी मोठे भाषण करावयाचे नाही.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री उल्हास पवार यांनी सांगितले की निवृत्त हा शब्द वापरता कामा नये. त्याचबरोबर निरोप हा शब्द देखील वापरता कामा नये त्या ऐवजी शुभेच्छा देणे हा शब्द वापरण्यात यावा असे मला वाटते. एखाद्या सन्माननीय सदस्यांची मुदत संपलेली असली तरी त्याला राजकारणातून निरोप देत नाही किंवा सभागृहातून देखील निरोप देत नाही कारण तो सदस्य पुन्हा निवडून येत असतो तेव्हा शुभेच्छा देणे हाच शब्द वापरणे योग्य आहे तेव्हा ज्या नऊ सन्माननीय सदस्यांची मुदत संपत आहे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांना शुभेच्छा देण्याचा आजचा पहिलाच प्रसंग नाही. मागच्या वेळी देखील त्यांनी सांगितले होते की अच्छा तो हम चलते है, आणि ते पुन्हा सभागृहात निवडून आले होते.. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी असे झाले होते यावेळीसुध्दा माननीय श्री.वसंत डावखरे यांना शुभेच्छा देत असतांना ते पुन्हा या ठिकाणी येतील याची मला खात्री आहे. ज्यावेळी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या होत्या त्यावेळी श्री.वसंत डावखरे पुन्हा निवडून येतील हे निश्चित झाले होते.दिनांक 9 जुलै ते 13 ऑगस्ट या कालावधीत त्यांची सभापती म्हणून माननीय राज्यपालांनी निवड केली होती. श्री.वसंत डावखरे यांची सर्व पक्षातील सर्व नेत्यांशी मैत्री आहे.त्यांचा सर्व नेत्यांशी चांगला संपर्क आहे.मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आमचे नेते प्रमोद महाजन यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्यांना हिंदुजा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.त्यावेळी श्री.वसंत डावखरे प्रमोद महाजन यांना जाऊन भेटले त्याचबरोबर त्यांच्या मुलाची आणि सारंगी महाजन यांचीसुध्दा भेट घेतली होती. प्रमोद महाजन यांच्यावर जो हल्ला करण्यात आला होता तो हल्ला त्याने का केला असा प्रश्न

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाजपमधील कोणाच्याही मनात आला नाही कारण त्याने जे काही केले होते ते तरलभावनेतून केले होते. श्री.वसंत डावखरे यांचा अनेक राजकीय नेत्यांशी चागला संपर्क असून हा संपर्क राजकीय फायदा तोटयासाठी नसतो तर सहज संपर्क असातो अशा प्रकारचा सहजपणा एक दोन वर्षे जमू शकतो परंतु त्यांचा तसा स्वभाव असल्यामुळे त्यांना ते कायम स्वरुपी जमू शकते

सभापती महोदय, राजकीय जीवनामध्ये श्री.वसंत डावखरे यांच्याशी संबंध येणे व स्नेह मिळणे भाग्याची गोष्ट आहे. त्यांनी सभागृहाचे कामकाज कितीही हसतखेळत चालविले तरी पुण्याच्या इन्सपेक्टरचा विषय सभागृहामध्ये आला असता श्री.वसंत डावखरे यांनी सात्विक संताप व्यक्त केला होता. श्री.वसंत डावखरे यांच्या बाबतीत त्या इन्सपेक्टरने वैयक्तिक जे शब्द वापरले होते त्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केलेला नव्हता तर कोणत्याही लोकप्रतिनिधीच्या बाबतीत अपमान होईल अशा प्रकारची कृती घडली किंवा हक्क भंगाचा प्रकार घडला तर त्या लोकप्रतिनिधीच्या बाजूने ठामपणे उभे राहून त्याची बाजू ते लावून धरत असतात. माननीय उपसभापती श्री वसंत डावखरे यांना आज शुभेच्छा देत असतांना ते पुन्हा सभागृहात निवडून येतील याची मला 100 टक्के खात्री आहे.अनेकवेळा आम्हाला असे वाटते की त्यांनी मंत्री व्हावे परंतु मंत्री झाल्यानंतर ते त्या खात्यापुरतेच निदेश देऊ शकतील. उपसभापती म्हणून आज ते अनेक खात्याला निदेश देऊ शकतात त्यामुळे त्यांनी उपसभापतीपदावर असणे आवश्यक आहे सन्माननीय सदस्य पोट तिडकीने प्रश्न मांडत असतात त्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन व तो प्रश्न सोडविण्यासाठी माननीय उपसभापती निदेश देत असतात आणि सरकारकडून तो निदेश स्वीकारला जातो. निदेश देण्याच्या बाबतीत श्री वसंत डावखरे यांचे वैशिष्ट आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळी सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांचे निलंबन झाले होते त्यावेळी श्री वसंत डावखरे सभागृहात नव्हते परंतु सभागृहात काय घडले होते आणि सदस्यांना का निलंबित करण्यात आले होते यासबंधी त्यांनी फोनवरुन माहिती घेतली होती त्याचबरोबर निलंबन मागे घेण्यासाठी देखील अनेकांनी प्रयत्न केले होते त्याचप्रमाणे श्री वसंत डावखरे यानी देखील प्रयत्न केले होते. त्यामुळे अशा प्रकारचे व्यक्तिमत्व सभागृहात सातत्याने असावे असे प्रत्येक सन्माननीय सदस्याला वाटत असते.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय सन्माननीय सदय्य श्री दिवाकर रावते यांना देखील मी शुभेच्छा देतो.सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांच्या संदर्भात या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. मराठी भाषेच्या बाबतीत ते सतत आग्रह धरत होते जोपर्यंत माझा त्यांच्याशी सबंध आला नव्हता तोपर्यंत त्यांची ही मागणी मला राजकीय स्वरुपाची वाटत होती. परंतु मी जेव्हा त्यांच्या संपर्कात आलो आणि त्यांचे कामकाज जवळून पाहिले तेव्हा मराठी सबंधीचा त्यांचा आग्रह हा राजकीय नाही असे माझ्या लक्षात आले. एखाद्या विषयाच्या बाबतीत कमिटमेन्ट मिळविण्यासाठी पोटतिडकीने ते विषय मांडत असतात त्यावेळी केवळ लक्षवेधी सूचनेपुरती, प्रश्नापुरती किंवा त्या विषयापुरती ती पोटतिडकीत नसते तर प्रत्यक्षात फिल्डमध्ये जो प्रश्न निर्माण झालेला असतो तो सोडविण्यासाठी मनापासून त्यांची तळमळ असते.भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्याला एखाद्या विभागाचे पालकत्व किंवा प्रभ्ारी पद दिले गेले असेल तर ते कसे सांभाळले पाहिजे....

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

एखाद्या विभागाचे पालकत्व किंवा प्रभारी पद दिले गेल्यानंतर ते कसे संभाळले पाहिजे याबाबत माननीय श्री. नितीन गडकरी साहेब, माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेब नेहमी म्हणतात की, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते कसे काम करतात ते पहा. मराठवाडा तर मराठवाडा, विदर्भ तर विदर्भ. त्याठिकाणी ते कामामध्ये स्वत:ला गाडून घेतात. सभापती महोदय, आम्ही चीनमध्ये ऊर्जा प्रकल्प पहावयास गेलो होतो. त्यावेळी इंटरनेटवर महाराष्ट्रातील बातम्या ऐकत पहात होतो. एक दिवस विदर्भामध्ये प्रचंड पाऊस झाल्याची बातमी आली होती. आम्ही भारतामध्ये आलो, आणि मुंबईच्या विमानतळावर उतरल्यानंतर दहा ते बारा दिवस घराबाहेर असल्यामुळे एकदा आपण घरी जाऊ आणि शिल्लक असलेली काही कामे करु म्हणून आपापल्या घरी गेलो. परंतु माननीय श्री. रावते साहेब हे विमानतळावरुन उतरल्यानंतर थेट विदर्भामध्ये रवाना झाले. ते आपल्या घरी गेले नाहीत. अशाप्रकारे आपल्या कार्यक्षेत्राशी किती बांधिलकी असू शकते? अशाप्रकारचा अनुभव माननीय श्री. रावते साहेबांबरोबर काम करीत असतांना आपण घेतला आहे. अनेकांना त्यांचा तापटपणा आणि रागावणे माहीत आहे. त्याशिवाय ते आपले म्हणणे मांडीत नाही. चीनच्या दौऱ्यामध्ये त्यांच्याबरोबर सौभाग्यवती होत्या. ताईंचा आणि माननीय श्री. रावते साहेबांचा प्रेमविवाह आहे.त्यावेळी आम्ही ताईंना विचारले की, माननीय श्री. रावते साहेबांनी "माझ्याबरोबर लग्न कर" असे तुम्हाला कसे विचारले असेल? म्हणजे माननीय श्री. रावते साहेबांचा प्रेमविवाह असू शकतो. त्यांचे रागावणे हे नाटक आहे. सभापती महोदय, ज्यावेळी प्रबोधनकार ठाकरे यांना कमी दिसत होते त्यावेळी रोज तीन ते चार तास पुस्तक, पेपर वाचून दाखविण्याचे काम ताई करीत होत्या. त्या अर्थाने ठाकरे कुटुंबाबरोबर संबंध असलेल्या ताई होत्या. माननीय श्री. उल्हासदादांना सांगू इच्छितो की, माननीय श्री. रावते साहेब म्हणजे फायर आहेत. त्यांच्यामध्ये जशी चीड आणि राग उत्पन्न होतो त्याप्रमाणे त्यांच्यामध्ये सहवेदना सुध्दा उत्पन्न होतात. कोणतीही एखादी घटना उत्पन्न होते त्यावेळी त्या घटनेच्या वेदनेसह त्यांच्यामध्ये चीड सुध्दा निर्माण होते अशाप्रकारे माननीय श्री.रावते साहेबांना काम करीत असतांना मी पाहिले आहे.

सभापती महोदय, ॲड. अनिल परब यांच्यासारखा सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातील एक कार्यकर्ता राजकारणात येतो, स्वत:ला राजकीय कार्यकर्ता म्हणतो आणि संघटनेसाठी इतका समर्पित होतो. आजसुध्दा माननीय ॲड. अनिल परब या सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. 1 मे रोजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. विनोद तावडे...

शिवसेनेचा कार्यक्रम एमएमआरडीए येथे आयोजित करण्यात आला आहे. त्याठिकाणी ते गेले आहेत. मी त्यांना फोन करुन निरोप दिला की, आज सभागृहामध्ये आपली उपस्थिती आवश्यक आहे. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मी 1 मे च्या कार्यक्रमाची तयारी करीत बसलो आहे. त्यांनी माननीय श्री. उध्दवजींकडे एक दिवसाची परवानगी मागितली असती तर त्यांनी दिली असती. परंतु परवानगी मागायची नसते. प्रत्यक्ष जागेवर उभे राहून काम करुन घेणारा अशापध्दतीचा हा कार्यकर्ता आहे. ज्यावेळी अशाप्रकारचे कार्यकर्ते संघटनेला लाभतात त्यावेळी त्या संघटनेला बळ प्राप्त होते. संघटनेचे नेतृत्व अशा कार्यकर्त्यांची काळजी घेते. अशाप्रकारचे सभासद आपण पाहिले आहेत. मी त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांचे नाव आपण ऐकून होतो, त्यांची सक्रियता आपण वर्तमानपत्रामधून वाचत होतो. परंतु त्या ज्यावेळी सभागृहामध्ये आल्यानंतर त्यांच्याशी माझे बोलणे झाले. त्या सभागृहाला अधिक समजू लागल्या. भारतीय जनता पार्टीच्या महिला कार्यकर्त्यांबाबत मी सांगू शकेन की, माननीय श्रीमती सुषमा स्वराज, माननीय श्रीमती जयवंतीबेन मेहता या 33 टक्के आरक्षणाव्दारे राजकारणामध्ये किंवा पदावर आलेल्या नाहीत त्याप्रमाणे माननीय श्रीमती मंदाताई म्हात्रे या कोणतेही आरक्षण न घेता स्वकर्तृत्वावर या सभागृहामध्ये आल्या. त्या या सभागृहामध्ये गॉड फादर या पध्दतीने काम करतात. त्यांच्या स्वभावामध्ये मृदुता आहे, त्याचप्रमाणे कणखरपणा सुध्दा आपण पाहिला आहे. ज्यावेळी सामुदायिक विवाह आयोजित करावयाचा असेल, नवी मुंबईमध्ये कॉलेजसाठी काही उपक्रम करावयाचा असेल, त्यांनी "जाणता राजा" कार्यक्रम चांगल्या पध्दतीने नव्या मुंबईमध्ये यशस्वी करुन दाखविला. त्यामुळे माननीय श्रीमती मंदाताई म्हात्रे यांची या सभागृहामध्ये इतक्या जवळून ओळख झाली की, त्यांचा स्वभाव आणि त्यांचे काम जास्त जवळून पहावयास मिळाले, मी त्यांनाही शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे ट्वेंटी-ट्वेटी क्रिकेटमधील खेळाडू आहेत. त्यांच्या अगोदर दोन ते तीन वर्षे अगोदर मी या सभागृहामध्ये आलो असेन.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण त्यांनी ज्या तत्परतेने प्रश्नाच्या बाबतीत, लक्षवेधी सूचना समजून घेऊन फटाफट द्यावयास सुरुवात केली, ते पाहून असे वाटल की, आम्ही फायटर क्रिकेटीअर आहोत आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे ट्वेन्टी-ट्वेन्टी क्रिकेटीअर आहेत. कारण त्यांनी कोणता प्रश्न, कसा द्यावयाचा ? तसेच केवळ नुसते प्रश्न देणे नाही तर जो प्रश्न चर्चेसाठी येईल, त्यावर उप प्रश्न तयार असणे आणि ते केवळ ठाण्यापुरतेच मर्यादित नाहीत. तर महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील प्रश्न असोत. मला जो ग्रास्प आहे, तो त्याच वेळी प्राप्त होतो, ज्यावेळी मोठया प्रमाणावर फिल्ड वर्क झालेले असते. नाहीतर एरवी असे होते की, हा नेत्याबरोबर फिरणारा माणूस आहे. सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फरभाई हुसेन असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त असतील, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब असतील किंवा माझ्यासारखा एखादा कार्यकर्ता असेल तर आम्ही त्या-त्याठिकाणी मोठया प्रमाणात फिल्डवर पक्षाच्या नेतृत्वाला काही गोष्टी करण्यासाठी मदत करीत असतो. पण यातून जो अनुभव मिळतो, शिकावयास मिळते ते मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या सभागृहातील परफॉर्न्मन्स् मधून पहावयास मिळते. आम्ही येथून कितीही लेग-पोलींग केले तरी बाहेर आल्यानंतर "बंधू किंवा भाऊ" सांभाळून घेतले पाहिजे अशा प्रकारे प्रेमाने बोलणे असते. कधीही कोणत्याही विषयाच्या बाबतीत कोणीही रागाने बोलले तरी नंतर इतके प्रेमाने माणूस कसे बोलू शकतो असा मला नेहमीच प्रश्न पडतो. आम्ही एवढी तिखट टीका करावयाचो, तरी बाहेर भेटल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त म्हणावयाचे की, सांभाळून घ्यावे, मी शिकत आहे, म्हणजे तसे म्हणावयाचे, खरे म्हणजे आमच्याकडून काही शिकत नसतात. कारण ते बरेच शिकलेले असतात. पण त्यांची ही खासियत आहे की, मी तुमच्या सर्वांकडून शिकत आहे असे म्हणत रहावयाचे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फरभाई हुसैन हे मीरा-भाईंदर या परिसरामध्ये सक्रीय कार्यकर्ता असल्यामुळे स्वाभाविकपणे मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांच्या कामाविषयी माहिती मिळत असे.पण सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील म्हणाले ते खरे आहे की,मुस्लिम समाजातील नेता होणे आणि सेक्युलर असतानाही मुस्लिम समाजाने ते मान्य करणे ही खरच मोठी गोष्ट आहे.ते एवढे सोपे नाही आणि ही गोष्ट केवळ मीरा-भाईंदर परिसरातील लोकांनी मान्य केली आहे असे नाही तर ज्या पध्दतीने काँग्रेस पक्षाने त्यांना वेगवेगळया ठिकाणच्या

. . . .5एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जबाबदाऱ्या दिल्या. त्यातून या अल्सखंख्यांक समाजाचे नेतृत्व सक्षमपणे करु शकतो असा त्यांच्याबद्दल विश्वास असल्यामुळे त्यांच्यावर वेळोवेळी जबाबदारी टाकण्यात आली आणि त्यांनी नुकतेच मीरा-भाईंदरमध्य हॉस्पिटल उभे केले आहे, नाहीतर तेथील अवस्था काय होती हे आम्ही पाहिलेले आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फरभाई हुसेन यांनी या कामामध्ये पूर्णपणे प्राण ओतून मीरा-भाईंदरमध्ये असे एक चांगले हॉस्पिटल उभे केले. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी श्री.मुजफ्फरभाई हुसेन यांच्या कामकाजातून पहावयास मिळतील. त्यांनाही मी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती मधुजैन भाभी निवडून आल्या. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी, प्रामाणिकपणे सांगावयाचे तर राजकारणामध्ये 70 टक्के कर्तृत्व आणि 30 टक्के नशीब असावे लागते. कारण मला आठवते की, सभापती महोदय, जेव्हा विधान परिषदेसाठी निवडणूक झाली, त्यावेळी माझ्याबरोबर सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे हे देखील निवडणुकीसाठी उभे होते. त्यावेळी माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब अशी चर्चा होती की, सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणेसाहेब हरणार की सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हरणार ? परंतु जर आपण सभागृहामध्ये जागरुक राहिलो तर त्याचा फायदा कसा होतो हे मला तेव्हा कळले. मी माझ्या जागेवर बसलो होतो, माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख सदनामध्ये आल्यानंतर त्यांच्या बाजूला माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब बसले आणि त्यांनी काही चर्चा केली. पण त्यांच्या हावभावावरुन माझ्या लक्षात आले की, आता विधान परिषदेसाठी एक जागा जास्त होत आहे, मग ती कोणाची पडणार आहे ? मग माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमख यांनी माझ्याकडे बोट केले म्हणजे यावेळेस श्री.विनोद तावडे हे गिऱ्हाईक आहे आणि तो इशारा माझ्या लक्षात आला आणि कॉशिअस् झालो आणि त्यानंतर जी मेहनत केली, ती आपल्या सर्वांना माहिती आहे. त्या मेहनतीमुळे....बरोबर आहे की नाही ? कारण माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख बसलेले आहेत, त्यांच्या बाजूला माननीय संसदीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील बसलेले आहेत आणि माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुखसाहेब इशारा करीत आहेत. त्यामुळे यातील धोका किती आहे आणि कसा आहे हे मला चांगले कळले आणि सर्व काळजी घेतल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणेसाहेब हरले. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणेसाहेबांना तिकीट मिळणार असे सगळे सांगत होते, अगदी..

. . . .5 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार देखील सांगत होते आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी, श्रीमती मधुभाभी जैन यांचे तिकीट जाहीर झाले. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांच्याबाबतीत काही बदल झाला आणि श्री.सुबोध मोहिते यांना तिकीट देण्यात आले. ते पुण्याच्या विमानतळावर उतरले, तेथून हेलिकॉप्टरने महालक्ष्मी रेसकोर्सला लॅण्ड झाले आणि ते येथे पोहोचू शकले नाहीत आणि आम्ही ज्यापध्दतीने श्री.सुरेश हावरे यांच्यासाठी फिल्डींग लावली होती, त्यामुळे ते जिंकणार अशी खात्री होती आणि सन्माननीय सदस्या श्रीमती मधुभाभी केवळ चार मतांनी जिंकल्या. एकतर मुळामध्ये आमचे सन्माननीय सदस्य श्री.नवनाथ आव्हाड निवडून आले, पण ते सभागृहात कधीच येऊ शकले नाहीत. त्यांनी निवडून आल्यानंतर माननीय सभापतींच्या दालनामध्ये शपथ घेतली आणि गणपतीच्या आरतीच्या वेळी नाकातोंडामध्ये धूर गेल्यामुळे आजारी पडले आणि ते तीन-चार वर्षे सभागृहामध्ये येऊ शकले नाहीत म्हणून पोटनिवडणूक झाली. म्हणजे राजकारणामध्ये कधी आणि केव्हाही काहीही होऊ शकते. अगदी ही जागा रिकामी होण्यापासून ते सन्माननीय सदस्या श्रीमती मधुभाभी जैन यांचे जिंकणे . . ..

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे..

ही गोष्ट एंन्डोर्स करते की, शेवटी 70 टक्के कर्तृत्व तर त्यांच्या परिचयात आलेच आहे पण 30 टक्के नशिब याठिकाणी पोहचायला आणि परफॉर्म करायला लागते. त्यामुळे अगदी अलीकडचे उदाहरण सांगावयाचे झाले तर ते श्रीमती मधु जैन यांचे सांगता येईल. परंतु त्यांचे नशिब एवढे जोरात आहे की, बहुदा पुन्हा या सभागृहात आम्ही त्यांना पुन्हा बघू. मला याठिकाणी सूचना करावी वाटते की, श्री. प्रकाश शेडगे आणि श्री. जेथलिया हे विधानसभेत निवडून गेल्यामुळे त्यांना आपण आज अधिकृत निरोप किंवा शुभेच्छा देऊ शकत नाही. पण जवळ जवळ साडेचार ते पाच वर्षे ते या सभागृहात होते. सभापती महोदय, या निमित्ताने मी या सगळयांना शुभेच्छा देतो आणि माझे बोलणे संपवितो. धन्यवाद.

सभापती : माझ्याकडे बारा सन्माननीय सदस्यांची नावे बोलण्यासाठी आलेली आहेत त्याव्यतिरिक्त ज्या सन्माननीय सदस्यांना आपण शुभेच्छा देत आहेत त्यांनाही येथे बालावयाचे आहे. गट नेत्यांनी आपापले विचार मांडलेले आहेत व शुभेच्छा दिलेल्या आहेत. आता आपल्या सर्वांच्या मार्फत मी संसदीय कामकाज मंत्र्यांना बोलायला परवानगी देतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, आज सदनामध्ये हा निरोपसमारंभ आहे असे मी म्हणणार नाही परंतु सदभावना व्यक्त करणे आणि शुभेच्छा देण्याच्या संदर्भातील आजचा हा समारंभ आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, संसदीय कार्यमंत्री म्हणून गेले साडेपाच वर्षे म्हणजे मागची पाच वर्षे आणि आता जवळ जवळ सहा महिने या साडेपाच वर्षामध्ये या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांशी माझा जवळचा संबंध आला. आज जवळपास नऊ सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासाठी आपण याठिकाणी उपस्थित आहोत. मी फार विस्ताराने भाषण करणार नाही कारण वेळ खूप झालेला आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, सर्वच्या सर्व नऊ सन्माननीय सदस्यांचे कार्य आणि आता पर्यंतचे त्यांचे कर्तृत्व पाहिल्यानंतर मला असे वाटते की, त्यांना इन ॲडव्हान्समध्ये शुभेच्छा द्याव्यात अशा प्रकारचे सर्वांचे कर्तृत्व आहे म्हणून हे सर्वच्या सर्व नऊ जण पुन्हा या सदनामध्ये येतील अशा प्रकारच्या सदभावना मी यानिमित्ताने व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, या सदनाचे उपसभापती श्री. डावखरे साहेब हे पुणे जिल्हयातील आहेत. अनेक वक्त्यांनी त्यांच्याबद्दल याठिकाणी भावना व्यक्त केल्या. खरे म्हणजे त्यांचे कार्य प्रचंड आहे. सर्व क्षेत्रामध्ये त्यांचे कार्य आहे. असे कुठलेही क्षेत्र नाही की, जेथे श्री. डावखरे साहेबांचे कार्य नाही. खासकरुन संसदीय कार्य मंत्र्यांबरोबर माझ्यावर जेव्हा सांस्कृतिक खात्याची जबाबदारी आली त्यावेळेस त्यांचे मार्गदर्शन अधिक महत्वाचे होते. या राज्याचे सांस्कृतिक धोरण करताना त्यांनी माझ यासारख्या कार्यकर्त्याला ज्या सूचना केल्या त्यांचा अंतर्भाव सांस्कृतिक धोरणामध्ये आणण्याचा मी प्रयत्न केला. या राज्यातील कलेला राजाश्रय देण्याचे किंवा सन्मानित करण्याचे काम सुध्दा केलेले आहे. असे अनेक त्यांच्या बाबतीतील विषय आहेत. मला निश्चितपणे त्यांच्याबद्दल रास्त अभिमान वाटतो की, सर्वसामान्य कुटुंबातील एक सामान्य माणूस कोणत्या पदापर्यंत निष्ठेने पोहचू शकतो, याचे उदाहरण म्हणजे माननीय श्री. डवखरेसाहेब हे आहेत. सभागृहाला नेहमी तुमचे मार्गदर्शन झालेले आहे आणि विशेष करुन मी संसदीय कार्य मत्री मंत्री असल्यामुळे बऱ्याचवेळा आपण आसनस्थ झालेले असता आणि आम्ही येथे बसलेलो असतो,त्यामुळे बऱ्याचशा गोष्टी नुसत्या इशाऱ्यावर होतात त्यामुळे मला वाटते की, त्यांनी पुन्हा एकदा या सभागृहामध्ये यावे, हीच सदिच्छा मी यानिमित्ताने त्यांना देऊ इच्छितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/

श्री. हर्षवर्धन पाटील...

सभापती महोदय, सन्मननीय सदस्य श्री. रावते साहेबांचे अनेक रोल मला पहायला मिळाले. त्यापैकी एका रोलची मला याठिकाणी आठवण करुन देणे आवश्यक वाटते. एका अधिवशेनाच्या शेवटच्या दिवशी बिलावरुन वादळ झाले आणि सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचा उद्रेक किती असू शकतो हे मला त्यावेळी जाणवले. सभागृहामधून जात असताना पोर्चमध्ये त्यांनी सांगितले की, मी आता येथेच बसणार आहे. येथून जाणार नाही. सभापती महोदय, असे काही कटू प्रसंग सभागृहात आले परंतु निश्चितपणाने त्यांच्या भावना असायच्या की ही गोष्ट मला मान्य नाही. त्यामुळे विरोध करायचा म्हटले तर पूर्णपणाने विरोध करायचा आणि सहकार्य करायचे म्हटले तर पूर्णपणे सहकार्य करायचे, अशा पध्दतीची भूमिका सन्माननीय सदस्य श्री रावते यांनी मांडलेली आहे. कामकाज पत्रिकेमध्ये नेमके कोठे चुकले आहे ते बरोबर शोधून काढायचे आणि ती चूक लक्षात आणून द्यायचे. त्याबाबतीत या सभागृहात उभे राहून सरकारच्या वतीने दिलगिरी व्यक्त करण्याचा प्रसंग माझ्यावर सुध्दा आला.

.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

अशा पध्दतीने अभ्यासू आणि या सभागृहाच्या सर्व नियमांचे पालन करुन उत्तम पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालविण्यामध्ये त्यांनी नेहमीच सहकार्य केलेले आहे. ते राज्याचे पणन मंत्री सुध्दा होते. संघर्ष हा तर त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटकच आहे. त्यांच्या जीवनाची सुरुवातच संघर्षापासून झाली. अशी कमी माणसे असतात की, ज्यांना सातत्याने संघर्ष करावा लागतो आणि तो संघर्ष त्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी कधी केला नाही तर तो संघर्ष समाजाच्या हिताकरिता केला. आणि म्हणून निश्चितपणे आपला पक्ष याची नोंद घेईल आणि पुन्हा एकदा आपल्याला या सभागृहामध्ये संधी मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती चुकीची ठरणार नाही.

सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे बऱ्याच वेळा त्यांच्या नावाच्या बाबतीत घोटाळा होतो. मला सुध्दा काही वेळा मिडियावाले विचारतात की, संजय दत्त सभागृहात कसे काय आले ? मी त्यांना सांगतो की, हे संजय दुसरे आहेत. या सदनामध्ये कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आपण प्रतोद म्हणून निवड केली आणि ती जबाबदारी त्यांच्यावर दिली. ज्याला मॅनेजमेंटचे कौशल्य म्हणतो त्याप्रमाणे दिलेली जबाबदारी उत्तमपणे पार पाडण्याची किमया त्यांच्या कर्तृत्वामध्ये आहे आणि म्हणून एक सामान्य निष्ठावंत कार्यकर्ता विधान परिषदेमध्ये पोहचू शकतो. आज कॉंग्रेस पक्षाची राज्याचीच जबाबदारी नाही तर इतर कोणत्याही राज्यातील काम आले तरी निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून श्री. संजय दत्त हे त्या आदेशाचे पालन करतात. त्यांचे या सभागृहातील कामकाज पाहिले. त्यांची प्रश्न विचारण्याची पध्दत, प्रश्नामध्ये आपले नाव कसे पहिले येईल हे पाहण्याबद्दलची त्यांची हातोटी आहे. कारण बऱ्याचदा आपण पाहिले असेल की, कोणताही ठराव आला की, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे नाव त्यामध्ये कायम असणार. म्हणून एका तत्परतेने, जागरुकतेने या सभागृहाच्या कामकाजामध्ये त्यांनी नेहमीच सहभाग घेतला आणि मला तर संसदीय कार्य मंत्री म्हणून नेहमीच त्यांची या कामामध्ये खूप मदत झालेली आहे. त्यामुळे त्यांनाही निश्चितपणे पुढच्या काळासाठी शुभेच्छा देऊ इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब आता या सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. परंतु मध्यंतरी ते माझ्यावर खूप रागावले होते. कारण आम्ही म्हाडामध्ये जी एक योजना केली त्यामध्ये चुकून माझ्याकडून त्यांचे नाव राहून गेले. त्याचा त्यांना राग आला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सुध्दा राग आला होता. पण सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब हे पक्षाकरिता एक चांगले कार्यकर्ते आहेत असे म्हणण्यापेक्षा या सभागृहाचा डेकोरम नेहमीच त्यांनी राखण्याचा प्रयत्न केला. मलाही विश्वास आहे की, त्यांना पुन्हा त्यांचा पक्ष संधी देईल्.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील हे शिक्षक संघटनेचे प्रभावीपणे लढणारे कार्यकर्ते आहेत. मी शिक्षक संघटनेचे अनेक पदाधिकारी पाहिले पण लाखोच्या संख्येने एखादे अधिवेशन घ्यावयाचे म्हटले तर ते सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यांनीच घेऊन दाखवावे अशा पध्दतीचे काम त्यांनी केले. गेल्या वर्षी औरंगाबादमध्ये खूप मोठे राज्यस्तरीय शिक्षक संघटनेचे अधिवेशन झाले. तळागाळामध्ये शिक्षक संघटनेचे काम करणारा एक कार्यकर्ता नेता झाला आणि त्यांनी या सभागृहामध्ये सदस्य म्हणून उत्तम काम केलेले आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांचा आपणा सर्वांना जवळचा परिचय आहे. त्या सामाजिक क्षेत्रात काम करीत आहेत. सामूहिक विवाहाच्या संदर्भात त्या काम करतात. अनेक वेळा पुण्याला जाताना रोज त्यांचा एक तरी बॅनर बघावयास मिळतो. कधी रक्तदान असेल तर कधी सामूहिक विवाह असेल तर कधी पारायणाचा कार्यक्रम असेल. म्हणून सामाजिक आणि सार्वजनिक क्षेत्रामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने त्या काम करतात. लॉबीमध्ये बसलो की, त्यांच्या पर्समधून आपल्याला नक्की चॉकलेट मिळणार. आता त्यांचे अनुकरण वर्षाताई करावयास लागल्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी या सदनामध्ये चांगले काम केलेले आहे. असे मला वाटते की, त्यांना पुन्हा संधी मिळेलच. कारण हे सगळेच पक्षामधील स्टॉलवर्ड आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील हे तर आमचे सहकारी आहेत. मोहिते-पाटील आणि आमच्या घराण्याचा संबंध आजचा नाही तर गेल्या पाच सहा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

पिढ्यांपासूनचा संबंध आहे. सभापती महोदय, आपल्यालाही ते माहीत आहे कारण आपणही त्या सगळ्या गोष्टींचे साक्षीदार आहात. ते ग्रामीण भागामध्ये आणि शहरी भागामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करणारे आहेत. खासदार म्हणूनही त्यांनी सोलापूरमध्ये चांगल्या पध्दतीने काम केले. नंतर विधान परिषदेचे सदस्य म्हणूनही त्यांनी चांगले काम केले. राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी मंत्रिमंडळामध्ये चांगले काम केले. मला असे वाटते की, त्या जिल्ह्यामध्ये एक वेगळे असे व्यक्तिमत्व त्यांनी आपल्या कर्तृत्वाने निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मधुताई जैन यांचा या ठिकाणी उल्लेख झाला. आपण सांगितले की, विमान उशिरा आले, हेलिकॉप्टर उशिरा आले. खरे म्हणजे आम्ही दुसरा फॉर्म भरुन ठेवला होता. तुमची फिल्डींग नसती तर कदाचित दुसरे नाव सभागृहामध्ये आले असते. परंतु मला असे वाटते की, एखाद्याच्या नशिबामध्ये जर एखादी गोष्ट लिहिली असेल तर ती कशी घडते याचे उत्तम उदाहरण आमच्या मधुताई जैन आहेत. ती निवडणूक अतिशय चुरशीची झाली. जवळजवळ सर्वांनी असे गृहीत धरले होते की, आता श्री. हावरे निवडून येणार. त्यामुळे आमच्याकडे मतमोजणीला जायला कोणीही तयार नव्हते. मी त्यांना म्हणालो की, आपण काळजी करु नका, मी आपला काऊंटिंग एजंट होतो. ज्यावेळी काऊंटिंग सुरु झाले आणि पहिला राऊंड झाला तेव्हा मी सहज खिडकीतून बघितले.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

खाली आपल्या गेटसमोर गुलालाने भरलेले 3-4 टेम्पो उभे होते. तसेच हावरे कुटुंबिय आणि आपल्या पक्षाचे कार्यकर्ते जमले होते. केवळ निकाल घोषित करावयाचे राहिले होते. त्यानंतर काय घडले ते सर्वांना माहीत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन हया 6 मतांनी विजयी झाल्या. त्यांना मिळालेली संधी अपूर्ण आहे. त्यांचा कालावधी अत्यंत अल्प आहे. त्यांनी या कालावधीत उत्तम कार्य केले आहे. त्यांचा बायोडेटा वाचावयाचा म्हटला तर बराच वेळ जाईल. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांचा नेहमीच आदर केलेला आहे. भिवंडी, मिरा रोड येथे त्यांचे कार्य मोठे आहे. मध्यंतरी ते पोटनिवडणुकीला उभे राहिले होते. मी त्यावेळी तेथे गेलो होतो. सर्व समाजाला बरोबर घेऊन जाणारे हे व्यक्तिमत्व पुढे आलेले आहे. काही लोक संघटनेचे काम न करता पदाधिकारी होतात, काही लोक संघटनेचे काम करता करता संघटनेचे पदाधिकारी होतात. त्यांनी पदाधिकारी म्हणून चांगले काम केलेले आहे. हे सर्व सन्माननीय सदस्य त्या त्या पक्षातील स्टॉलवर्डस आहेत. त्यांनी आपल्या पक्षासाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून सगळयांनी आपापल्या पक्षामध्ये उत्तम प्रकारचे काम केलेले आहे. त्या त्या पक्षाच्या प्रमुखांची आणि सर्व सदस्यांची जवळीक आहे. आपण पक्षासाठी केलेले काम, संघटनेत केलेले काम आणि या सभागृहातील परफॉर्मन्स लक्षात घेता सर्व 9 सदस्य या सभागृहात पुन्हा यावेत आणि येतील अशी खात्री बाळगतो. पुन्हा हेच सन्माननीय सदस्य निवडून आल्यामुळे सभागृहातील कामकाज चालविण्यासाठी मला मदत होईल, ही सद्भावना व्यक्त करतो आणि आपले कार्य असेच चालू रहावे अशा शुभेच्छा देतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे (उपसभापती) : सन्माननीय सभापती महोदय, आता माघारी काय घेऊन जायचे ? येथे काळीज ठेवून पाय माघारी घेऊन जायचे अशी भावना आजच्या क्षणी माझ्या मनामध्ये निर्माण झाली आहे. सभापती महोदय, आज माझ्यासह 9 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. यातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या परीने आपल्या कामाचा ठसा उमटविलेला आहे. मला एक गोष्ट प्रामुख्याने सांगावीशी वाटते की, 1992 साली माझे या सभागृहात पदार्पण झाले. तेव्हापासून ते आजपर्यंत या क्षणापर्यंत ज्या ज्या महान व्यक्तींनी मला आशीर्वाद दिले त्या सर्वांचा मी सर्व प्रथम याठिकाणी उल्लेख करु इच्छितो.

मी प्रथमच 1992 साली या सभागृहात निवडून आलो. त्यावेळी कै.सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री होते आणि सभापती महोदय, आपण प्रांताध्यक्ष होता. त्यावेळी काँग्रेस मधून 1992 साली प्रथम निवडणूक ठरविली होती. त्यावेळी मी प्रथम बहुमताने निवडून आलो. त्यानंतर 1998 साली पुन्हा मला संधी दिली गेली. त्यानंतर 2004 साली पक्षाने मला पुन्हा संधी दिली. या सर्व कालावधीत माझ्या पक्षाचे आदरणीय नेते सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवारसाहेब, तत्कालीन मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण, तत्कालीन मुख्यमंत्री कै.सुधाकरराव नाईक यांच्या कालखंडामध्ये मला बहुमोल सहकार्य लाभले. या सर्वांबरोबर मी खास करुन सरसेनापती शिवसेनाप्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचा उल्लेख करु इच्छितो. मी प्रथमच ठाणे महानगरपालिकेचा महापौर झालो होतो. मोठया संघर्षमय वातावरणामध्ये ती निवडणूक झाली होती. त्यामुळे या दोन पक्षामध्ये आता संघर्ष होतो की काय असे वातावरण निर्माण झाले होते. परंतु मी महापौर झाल्यानंतर मी प्रथम कै.यशवंतराव चव्हाण यांना भेटलो आणि त्यानंतर तडक आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळसाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो होतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. वसंत डावखरे...

बाळासाहेब ठाकरे यांनी मला आशीर्वाद तर दिलेच परंतु मी महापौर असताना जसे शंकररावजी चव्हाण चार वेळा आले तसे बाळासाहेब ठाकरे देखील मी निमंत्रित केलेल्या कार्यक्रमाला आले होते. माझ्या प्रत्येक वाटचालीमध्ये या सर्वांचे मला आशीर्वाद लाभले. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी प्रमोद महाजन साहेबांचा उल्लेख केला. माझा त्यांच्याशी फारसा परिचय नव्हता. परंतु 2000 साली जेव्हा माझी उपसभापती म्हणून निवड झाली त्यावेळी मला असाच संध्याकाळी फोन आला. तो फोन होता आदरणीय पवार साहेबांचा. फोन असा होता की या ठिकाणी उपसभापती म्हणून तुमच्या नावाची चर्चा झाली आणि या चर्चेच्या वेळी प्रमोद महाजन यांनी देखील तुमच्या नावाला संमती दिली. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर बाळासाहेबांनी माझ्या नावाला संमती दर्शविली. हे सर्व योगायोग घडत गेले तरी मी निश्चितपणे असे समजतो की माझी काही तरी पूर्वपुण्याई असल्यामुळे या महनीय व्यक्तींचे आशीर्वाद मला लाभले. 18 वर्षाच्या कामातील 10 वर्षे उपसभापती म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली.

सभापती महोदय, आपल्या सारख्या एका थोर नेत्याच्या हाताखाली काम करताना आपण मला आपुलकी दिली, प्रेम दिले, मार्गदर्शन केले. आपण केलेले मार्गदर्शन मला माझ्या पुढच्या जीवनामध्ये निश्चितच मार्गदर्शक ठरेल. मी काही लांबलचक भाषण करणार नाही. पण सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या सद्भावना व्यक्त केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सभागृह चालवित असताना जसे सत्ताधारी पक्षाचे सहकार्य मला लाभले त्याप्रमाणे विरोधी पक्षाचेही अत्यंत बहुमोल सहकार्य लाभले त्यामुळे मी याठिकाणी यशस्वीपणे काम करु शकलो. मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. एखादे बिल काढायचे असेल त्यावेळी मी नेहमी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्याशी विचारविनिमय करुन बिल त्वरित पास करुन द्या अशी विनंती करीत असे. त्यांनी माझा हा हट्ट पुरविला, नव्हे लाड पुरविले असे मी म्हणेन. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे अशा प्रत्येक सदस्याबद्दल बोलायचे झाले तर भरपूर बोलता येईल. या सदनाचे जेवढे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्या सर्वाबद्दल सद्भावना व्यक्त केलेल्या आहेत. श्री. संजय दत्त हे ठाणे जिल्ह्यातील एक उमदे आणि तरुण नेतृत्व. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. वसंत डावखरे...

हुसेन यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावासा वाटतो. भिवंडीच्या निवडणुकीमध्ये ते निवडून येतील याची मला खात्री होती. पण तो मतदारसंघ वेगळा होता. इतरही काही कारणे असतील. पण त्यांचा जरी पराभव झाला तरी त्यांनी अत्यंत भूषणास्पद अशा प्रकारची निवडणूक लढविली. मी या माझ्या मित्रांना त्यांच्या पुढच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन, सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील, सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे आम्ही 9 सदस्य आज आपला निरोप घेत आहोत. हा निरोप घेत असताना आपणा सर्वांच्या सद्भावना आमच्या पाठीशी आहेत याचे मोठे समाधान मला लाभले आहे. या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आम्हाला मनापासून शुभेच्छा दिल्या. या शुभेच्या निश्चितपणे सतत आमच्या पाठीशी राहतील असे मला वाटते. अधिक काही न बोलता आपणा सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो आणि माझे निरोपाचे भाषण संपवितो. धन्यवाद.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहातील 9 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्यांच्या निवृत्तीचा दिवस दर दोन वर्षानी आपण बघत आलो. हा एक सन्मान असतो. या सभागृहामध्ये यायचे आणि पूर्ण टर्म झाल्यानंतर आपण एकमेकांनी जे काही अनुभवले ते सांगून कामाचा सन्मान करायचा. हा मर्यादित सन्मान या सभागृहातील कामापुरता असतो. आपण काय असतो ते आपणाला माहीत असते पण आपण कसे असतो हे अन्य सन्माननीय सदस्यांच्या शब्दातून जाणवते....

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मग आपल्या जाणिवा, उणिवा असतात त्या कळतात. माननीय शिवसेना प्रमुखांनी अनेक सामान्यातील सामान्यांना मोठे केले, त्याच्यापैकी मी एक आहे. शिवसेनेचा 19 जून, 1966 रोजी जन्म झाला. त्यापूर्वीपासून मार्मिक साप्ताहिकात प्रसिध्द होणाऱ्या व्यंगचित्रांचा मी शौकिन होतो. आवड म्हणून जायचे, पहायचे अशा पध्दतीने मी दुरुन ठाकरे कुटुंबाच्या संपर्कात आलो. शिवसेना अस्तित्वात आल्यानंतर माझ्या जीवनातील तो पहिलाच पक्ष आणि शेवटचा पक्ष. दुसरा पक्ष असूच शकणार नाही. माझ्यावर पूर्ण संस्कार माननीय शिवसेना प्रमुखांचे आहेत. जीवनामध्ये लहानपणापासून दुसरा आदर्श असा विषयच आला नाही. नेतृत्वाने दिलेला आदेश या पलिकडे विचार नसतो. नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयावर चर्चा नसते. हे संस्कार मी माझ्या जीवनात जपले. महाराष्ट्रात खूप काम केले. पण ते आदेश म्हणून करीत आलो. मुंबई महापालिकेमध्ये निवडून आल्यानंतर अनेक पदे भूषविण्याची संधी माननीय शिवसेना प्रमुखांनी मला दिली. हातातोंडाशी आलेले माझे महापौरपद माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांच्या हट्टामुळे त्यावेळी गेले. नंतर ते मला मिळाले. त्या खोलात जाऊन चर्चा करण्याचा हा विषय नाही. आम्ही दोघे एकत्र होतो. मी किती गरम आहे, किती थंड आहे, आम्ही दोघे तेव्हाही तसाच संघर्ष करीत होतो. तुमचे एवढ्या लवकर शांत होण्याचे वय झाले असेही त्यांनी सांगितले.

सभापती महोदय, महापौर पदानंतर माननीय शिवसेना प्रमुखांनी मला ग्रामीण भागात जाण्याचे आदेश दिले. त्यापूर्वी मी काम करीत होतो. त्यानंतर ग्रामीण भागात 20-21 वर्षे मी काम करीत आहे. मुंबईच्या महापौर पदापर्यंत जन्माने मुंबईत असताना देखील या संपूर्ण मुंबईच्या कामाचा त्याग करुन मी ग्रामीण भागात स्वत:ला समर्पित केले. ते निष्ठावंत आणि आदर्श शिवसेना प्रमुखांचा आदेश म्हणून. ग्रामीण भागातील समस्यांमध्ये एवढा गुंतून गेलो की, मी तिथेच काम करीत राहिलो. त्याचा पाढा येथे वाचावा असा भाग नाही. मराठवाडा, विदर्भात स्वत:ला वाहून घेतले. मला अभिमान वाटतो. मराठवाड्यामध्ये आजही तुम्ही कोणत्याही गावात, कोणत्याही घरात गेलात तर दिवाकर रावतेला ओळखत नाही असे होणार नाही. मी प्रत्येक ग्रामीण भागात प्रत्येकाच्या जीवनापर्यंत पोहोचत होतो. पक्ष बांधणीबरोबर सामाजिक बांधिलकी मी त्या ग्रामीण भागात शिकलो. चीड असते. मी माझ्या जीवनात व्यक्तिगत असे काही मागितले नाही, मिळविले नाही. सामाजिक बांधिलकीतून निर्माण होणाऱ्या या सगळ्या घटना असतात. या सभागृहातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

खूप अनुभव माझ्याजवळ आहेत. खूप जाणिवा सुध्दा मी अजून जपून आहे. सामाजिक जीवन किती पारदर्शक आणि हृद्य असते? आत्महत्यांबद्दल मी बोलणार नाही. अनेकदा सभागृहात सांगितले आहे. शेवटी आत्महत्या करीत असताना मातीने माखलेले शेतकऱ्याचे जोडे मी सभागृहात आणले. अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केल्यानंतर माननीय शिवसेना प्रमुख शतायुषी व्हावेत असा आशीर्वाद त्यांना मिळावा.....

नंतर 5पी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून ग्रामीण भागात वयोवृध्दांचा शाल, श्रीफळ आणि हार देऊन सन्मान आणि सत्कार करण्यासाठी मी जायचो. असा सत्कार करीत असताना माननीय शिवसेना प्रमुख शतायुषी व्हावे अशा शुभेच्छा त्यांनी द्याव्यात अशी त्यामागची भावना होती. त्या काळात अनुभवलेला एक प्रसंग मी मुद्दाम सांगणार आहे. एका 80 वर्षीय म्हातारी, जी झोपडीत राहत होती तिची राहणी साधी व परिस्थिती अगदी गरीब होती, तिचा सत्कार मी केला तेव्हा तिच्या डोळ्यातून अश्रू आले. तिच्या गळ्यात हार टाकल्यानंतर तर तिला अश्रू आवरेनासे झाले. मी बोललो की, शिवसेना प्रमुखांना शुभेच्छा मागण्यासाठी मी आलो. तेव्हा ती म्हणाली की, त्यांना शुभेच्छा तर आहेच परंतु आमच्या सामान्यांच्या जीवनात सत्काराचा हार टाकण्याचा हा प्रसंग आला म्हणून माझ्या डोळ्यात अश्रू आले. ती म्हणाली की आम्हाला फक्त लग्नातच हार घातला जातो आणि अनुभवाप्रमाणे मेल्यानंतरच आमच्या गळ्यात हार घालण्यात येतो म्हणून हे अश्रू आले. या ठिकाणी माझ्या दिंडीचाही उल्लेख झाला. माझी पहिली दिंडी "सेवाग्राम ते शेगाव" 556 किलोमीटरची होती. ती दिंडी अनवाणी नव्हती तरी देखील सतत फिरुन माझ्या पायाला फोड आले आणि त्या काळात दोन वेळा ऑपरेशन करावे लागले. ती शेतकऱ्यांच्या वेदनांची दिंडी होती आणि मला चालण्याचे सामर्थ्य सुध्दा त्या वेदनांनीच दिले होते. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबल्या नाहीत, त्याला आपण काही करु शकत नाही म्हणून आपल्यामध्ये एक संस्कार असतात की गेलेल्या माणसाच्या कुटुंबाला धीर देणे. शेवटी आपण त्यांचे सर्वस्व करु शकत नाही, त्यांना सांभाळूही शकत नाही म्हणून ही सांत्वन दिंडी होती, ती 1250 किलोमीटरची होती. सतत तीन महिने मी चालत होतो आणि प्रामाणिकपणे सांगतो की, त्या दिंडीत जवळपास 54 सभा झाल्या. पहिली दिंडी मौन होती. दुसऱ्या दिंडीत 54 सभा झाल्या आणि त्या सर्व सभांच्या कॅसेट्स माझ्याकडे आहेत. त्यात कोणत्याही प्रकारची टीका-टिप्पणी न करता मी फक्त व्यथा मांडत आहे त्यांना दूर करण्याचे काम मी करीत नाही. मी त्यात कोणत्याही प्रकारचे राजकारण केले नाही. या दिंडीत मला आमच्या नेत्यांचेही सहकार्य लाभले होते. माननीय शिवसेना प्रमुखांनी तर स्वत: या सांत्वन दिंडीसाठी पत्र दिले होते आणि ज्या ज्या कुटुंबांना मदत करणार त्यासाठी स्वत:च्या व्यक्तिगत पैशातून त्यांनी 5 लाख रुपये मला दिले होते आणि जेथे सांत्वन करण्यासाठी जाणार तेथे ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

भावाची भेट म्हणून माझ्या वतीने द्यावी आणि याच आशीर्वादावर मी 1250 किलोमीटर फिरु शकलो. तरी देखील शेतकरी आत्महत्त्येच्या जोखडातून मोकळा होत नाही म्हणून तिसरी दिंडी काढली त्याचा अनुभव आपण सर्वांनीच घेतला. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे देखील माझ्याबरोबर पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत होत्या. शिवसैनिक व प्रत्येक नेता सुध्दा येत होता. ही दिंडी अमरावतीमधील "गुरुकुल" आश्रमापासून सुरु केली होती ती नागपूरपर्यंत. या दिंडीमागचा उद्देश म्हणजे शेतकऱ्यांची कर्जमुक्ती. मी सामाजिक काम करताना खूप अनुभव घेतले, लोकांशी भिडलो आणि या सर्व वेदना घेऊनच मी येथे उभा राहत होतो, त्यात माझे व्यक्तिगत काहीच नव्हते. अनेक वेळा बोलत असताना मला माहिती आहे की, मागून काय बोलतात यापेक्षा समोर बोलतो त्याला फार महत्व असते. त्याचबरोबर महिला सदस्यांचेही मी कौतूक करतो. त्यांची माया आणि सर्वांकडून मिळालेले प्रेम यामुळे मी एवढे काम करु शकलो. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांचा अनुभव मी जीवनात घेतला आहे. सभागृहात जेव्हा प्रेम मिळते आणि पुन्हा या सभागृहात या असे म्हटले जाते तर मलाही वाटते की, का पुन्हा सभागृहात येऊ नये. माझ्या भगिनींनी मला विचारले की, साहेब इतकी वर्षे तुम्ही सभागृहात मागे बसूनच असतात. तेव्हा मी त्यांना सांगितले की, सभागृहात येणाऱ्या नवीन सदस्यांकडून अनेक नवीन गोष्टी आपल्याला शिकायला मिळत असतात. कारण तो जे घेऊन येतो ते आपल्यासाठी नवीनच असते, तो जे घेऊन येत असतो ते आपल्याला माहीत नसते. सभागृहात विधेयक हा विषय माझ्या आवडीचा आहे असे मी मानतो कारण मलाही असे वाटते की, राज्यासाठी जो कायदा तयार होणार असतो त्यावर चिकित्सा होऊनच तो तयार व्हावा, त्यात त्रुटी राहिल्या तर त्याला आपण जबाबदार असता कामा नये .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

प्रत्येक विधेयकाच्या संदर्भात आपल्याला अभ्यास करावाच लागतो. आताही आपल्याकडे जे विधेयक आलेले आहे त्यासंदर्भात सुध्दा मी 5-6 उपसूचना दिलेल्या आहेत. एक वेदना मात्र माझी राहून गेली आहे. यासंदर्भात मला खूप काही बोलायचे आहे परंतु आता ही ती वेळ नाही. या ठिकाणी माझ्या बद्दल या ठिकाणी जी काही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली त्यामुळेच मी या ठिकाणी माझे विचार व्यक्त करणार आहे. मी या ठिकाणी विधेयक अडविण्याकरिता आलेलो नाही. या सभागृहात बी.टी.कापसाच्या संदर्भात जे विधेयक आले होते ते आपल्या सहकार्यामुळे 5-6 अधिवेशनापासून थांबले होते. आपण मंत्रीमहोदयांना सांगितले होते की, या विधेयकाच्या संदर्भात रावतेसाहेबांना चर्चा करावयाची आहे त्यामुळे त्यांची चर्चा झाल्याशिवाय हे विधेयक मंजूर करावयाचे नाही. या विधेयकावर मी ऑस्ट्रेलिया, दिल्लीपर्यंतच्या लायब्ररीमध्ये जाऊन माहिती घेतली होती. हे विधेयक योग्य आहे की, अयोग्य आहे हे माझ्या चर्चेवरुन आपल्याला समजून आले असते. बी.टी.वांग्यापासून हा विषय किती अपायकारक ठरणार आहे हे आता लोकांना समजू लागले आहे. बी.टी.मुळे उद्या शेती नष्ट होणार आहे. शेतक-यांच्या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या बी.टी. कॉटनमुळे झालेल्या आहेत हे मी येथे ठामपणे सांगू शकतो. बी.टी.कापूस लावल्यानंतर त्याला लागणारा जो पाऊस आहे तो कमी असल्यामुळे बी.टी.ची वाढ होत नाही व पर्यायाने शेतक-याचे नुकसान होते. मला आठवते विधेयक 16 जुलै रोजी आले होते, माऊली आपल्याकडून निघून मामाकडे जाण्याचा तो दिवस होता. मला माऊलीकडे जावयाचे होते परंतु अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता तसेच बी.टी. कॉटनच्या विधेयकावर मला बोलायचे होते, हे बिल पास झाले तर माझ्या शेतक-यांचे नुकसान होईल म्हणून मला ख-या अर्थाने विचार मांडावयाचे होते. म्हणून मी माऊलीला भेटण्यासाठी जाऊ शकलो नाही. मी माऊलीकडे असतो तर पुढील घटना घडली नसती. योगायोगाने मला आपण त्याच दिवशी सभागृहातून मोकळे केले. त्या दिवसाच्या गोंधळात ते बील चर्चेविना मंजूर झाले. शेतक-यांच्या हिताच्या चार गोष्टी या सभागृहात सांगावयाच्या राहून गेल्या. शेतक-याचे दु:ख मांडण्याची विधेयकाच्यावेळी मला संधी होती. या बी.टी.कॉटनच्या विधेयकाच्या संदर्भात मी माननीय राज्यपाल महोदयांना एक निवेदन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

दिले असून ते निवेदन आपल्या पर्यंत पोहचले असेलही. हे विधेयक मंजूर केल्याचे मला दु:ख नाही कारण आपण बहुमतामध्ये आहात. आपला तो अधिकार आहे. मी माझ्या जीवनामध्ये काम करीत असतांना, क्रोध व्यक्त करीत असतांना माझ्या गुरुपंरपरेप्रमाणे मी माझ्या संवेदना सांभाळीत असतो. माझे गुरु महर्षी विनादजी यांचे जे अभंग आहेत ते माझ्या जीवनातील सार आहेत. "निघे जेथे जेथे मंद करुनीया श्वास तेथे माझा वास असू द्यावा....." माझ्या गुरुंनी मला जी शिकवण दिली ती मी माझ्या जीवनात आचरणात आणीत असतो व त्याच वेदना घेऊन मी सभागृहात येत असतो. मी माझ्या जीवनात कोणाचाही व्यक्तीगत द्वेष केलेला नाही आणि करणारही नाही. फक्त कधी कधी अनावधानाने भावनेचा स्फोट होतो, त्यावेळी माझ्याकडून आपल्याही काही भावना दुखावल्या असतील तर मी अत्यंत नम्रपणाने, कृतज्ञतापूर्वक माफी मागतो. सभापती महोदय, आपण मला जे प्रेम दिले त्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हे सर्व करीत असतांना पत्रकारांच्या गॅलरीत बसलेले पत्रकारांकडे आपण बघा की, न बघा ते आपले काम करीतच असतात. त्यांनी मला आतापर्यंत जी भरभरुन साथ दिली, सहकार्य दिले आणि माझे विचार जनतेपर्यंत पोहचविण्याचे त्यांनी काम केले त्याबद्दल मी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र...

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी प्रथम या सभागृहाला, आपल्याला आणि सर्व सन्माननीय सदस्यांना अंतकरणपूर्वक नतमस्तक होतो. आज माझ्या जीवनातील अतिशय महत्वाच्या टप्प्यातील एक शेवटचा दिवस आहे.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त...

गेली सहा वर्षे या सभागृहाने जे काही मला दिले त्याचा कधीही मला विसर पडणार नाही. माझ्या सारखा सामान्य कार्यकर्ता या सभागृहाचा सदस्य होऊ शकतो हे मी माझे भाग्य समजतो. म्हणूनच मी दोन शब्दात माझ्या भावना येथे व्यक्त करणार आहे. मी जेव्हा या सभागृहात प्रथम आलो तेव्हा सर्वप्रथम या सदनातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांना भेटलो आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. प्रा.बी.टी.देशमुख असो, पांडुरंग फुंडकर असो, उल्हास पवार असो, नीलम गोऱ्हे असो, रावते साहेब असो, दिवंगत नवलकर असो, जयंत पाटील असो, गुरूनाथ कुलकर्णी असो यासह जे जे ज्येष्ठ सदस्य आहेत त्यांच्याकडे गेलो. त्यांनी मला मार्गदर्शन केले. माझा विश्वास वाढविला. मी या सभागृहात येण्यापूर्वी निश्चय केला होता की, कितीही अडचणी आल्या तरी मी मराठी भाषेतच सभागृहाचे कामकाज करीन. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे हृदयापासून आभार मानतो. मी सभागृहात बोलत असताना, माझी भूमिका मांडत असताना भाषेच्या काही चुका झाल्या. आताही होतात. पण आपण सर्वांनी सांभाळून घेतले. त्यामुळे सर्वांना मनापासून धन्यवाद देतो. मला काँग्रेस पक्षामुळे आणि परम आदरणीय नेत्या काँग्रेस अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी यांच्यामुळे येथे येण्याची संधी मिळाली याची जाणीव मला आयुष्यभर राहील. मी या सदनाचा सदस्य झाल्यानंतर आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांना भेटायला गेलो. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला संधी दिल्याबद्दल आभार मानायला गेलो. आईला मुलगा विचारतो तसे त्यावेळी मी त्यांना विचारले की, माझ्याकडून आपल्याला काय अपेक्षा आहेत. मॅडम सोनिया गांधीजी यांनी मला सांगितले की, संजय तुला ही संधी पक्ष संघटनेतील कार्य पाहून दिलेली आहे. जी प्रामाणिकता संघटनेमध्ये दाखविली तिच सभागृहामध्ये दाखविली पाहिजे. सभागृहाच्या कामकाजात रस घेऊन काम कर. अभ्यासपूर्ण कामकाज कर. गोरगरीबांचे विषय सभागृहामध्ये उपस्थित कर. तो आदर्श घेऊनच मी प्रामाणिकपणे काम केले आहे. कुठे कमी पडलो असेल तर आपण सर्वांनी सांभाळून घेतले. म्हणनच मी आपणा सर्वांचे मनापासून आभार मानतो. माननीय सभापती हे मला पितृतूल्य आहेत. आपणही माझ्यावर पुत्राप्रमाणे प्रेम केले. आपणही माझा उत्साह वाढविला. प्रोत्साहन दिले. मार्गदर्शन केले. ते केले नसते तर मी येथे संसदीय आयुधांचा वापर करू शकलो नसतो. सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ, श्री.भाऊसाहेब फुंडकर, श्रीमती नीलम गोऱ्हे, श्री.कपिल पाटील,श्री.गुरूनाथ कुलकर्णी,श्री.उल्हास पवार,श्री.हर्षवर्धन पाटील, श्री.जयंत पाटील यासह अनेक अनेक माननीय सदस्यांनी माझ्या प्रती चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांचे मी आभार मानतो.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त ...

माननीय सभापती महोदयांनी जर मला मार्गदर्शन केले नसते, मला प्रोत्साहन दिले नसते तर ही संधी मला मिळाली नसती.

सभापती महोदय, माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे साहेबांचासुध्दा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करतो त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. इतकेच नव्हे तर कधी कधी बोलावून अमुक गोष्ट कर किंवा करु नको, याबाबातीत मोलाचे मार्गदर्शन केले होते. त्यांनी सुध्दा मला खूप प्रेम दिले आहे.

सभापती महोदय, गेल्या सहा वर्षापासून काम करीत असातांना मला ज्या वरिष्ठ नेत्यांचा स्नेह मिळाला, मार्गदर्शन मिळाले,प्रोत्साहन मिळाले त्यांचा मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख करु इच्छितो. कारण त्यांच्याच प्रेरणेतून मी माझे हे कार्य करु शकलो. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, माननीय श्री. राहुल गांधीजी ,माननीय श्री.अहमदभाई पटेल, माननीय श्री.ॲन्थनीजी, माननीय श्री.वायलर रवीसाहेब, माननीय श्री. प्रणव मुखर्जी, माननीय श्री. जनार्दन व्दिवेदीजी, माननीय श्री.मुकुल वासनिक, माननीय श्री. दिग्वीजय सिंग, माननीय श्रीमती आंबिका सोनी, माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण इत्यादी वरिष्ठ नेत्यांचा मला सतत मार्गदर्शन मिळाले आहे. त्यांचा मी आभारी आहे. त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबांचा आणि माननीय प्रदेश अध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे साहेबांचा मी या ठिकाणी प्रामुख्याने उल्लेख करु इच्छितो, कारण युवक कॉग्रेसचा पदाधिकारी असल्यापासून माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण आणि माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली होती. त्यामुळे मला अनेक गोष्टी शिकावयास मिळाल्या. माननीय श्री. अशोक चव्हाण आणि माननीय श्री. माणिकराव ठाकरे हे दूरदृष्टी ठेवणारे नेते आहेत. त्यामुळे मला येथे कामकाज करीत असातांना पुष्कळ गोष्टी त्यांच्याकडून शिकावयास मिळाल्या. या ठिकाणी बोलत असतांना मी जास्त बोलणार नाही. परंतु काही नेत्यांचा उल्लेख मला आवर्जून करावयाचा आहे. काम करीत असतांना मला ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांच्या नावाचा उल्लेख रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. म्हणून मी हा उल्लेख करीत आहे. आदरणीय श्री.शिवराज पाटील, आदरणीय सुशीलकुमार शिंदे, आदरणीय श्री विलासराव देशमुख्, आदरणीय श्रीमती प्रभा राव , आदरणीय श्री.गुरुदास कामत, आदरणीय मुरली देवरा, श्री.सुरेश कलमाडीजी, श्री.कृपाशंकर सिंह, आदरणीय श्री. नारायण राणे, आदरणीय डॉ पतंगराव

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त ...

कदम,आदरणीय श्री. हर्षवर्धन पाटील इत्यादी नेत्यांचे मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे. राज्यामध्ये लोकशाही आघाडी सरकार असून राष्ट्रवादी आणि कॉग्रेस पक्षाचे सदस्य मिळून सभागृहात काम करीत असतात म्हणून राष्ट्रवादी कॉग्रेसच्या नेत्यांकडे मी जेव्हा काही प्रश्न घेऊन गेलो होतो, तेव्हा त्यांनी सुध्दा मला मार्गदर्शन केले व प्रश्न सोडविण्यासाठी मदत केली. त्यामुळे आदरणीय श्री.शरद पवार, श्री.छगन भुजबळ, श्री.प्रफुल्ल पटेल, श्री.आर.आर.पाटील, श्री.अजित पवार, श्री.गोविंदराव आदिक, श्री.मधुकर पिचड यांनी मला चांगले मार्गदर्शन केले असल्यामुळे त्यांचा मी उल्लेख करु इच्छितो त्याचबरोबर विधानमंडळ सचिवालयाचे प्रधान सचिव श्री.अनंत कळसे, तसेच सचिव श्री.अ.मा.शिंदेकर आणि सह सचिव श्री.भाऊसाहेब कांबळे यांनी मला वेळोवेळी मदत केली असल्यामुळे त्यांचे सुध्दा मी आभार मानतो. तसेच ग्रंथालयातील श्री बा.बा.वाघामारे हे सर्वच सन्माननीय सदस्यांना मदत करीत असतात. त्याप्रमाणे त्यांनी देखील मला मदत केली आहे. या सभागृहातील ज्या सन्माननीय सदस्यांनी मला मदत केली, त्यांचे सुध्दा मी पुन्हा एकदा आभार मानतो. शेवटी मला कवितेच्या रुपाने दोन शब्द सांगावयाचे आहेत. ही कविता अशी आहे :-

लम्हे ये सुहाने साथ हों या न हों
आज में कल जैसी कोई बात हो न हो
आप सभी की याद हमेशा दिल में रहेगी
चाहे आने वाले समय में इस सभागृह में
आप से मुलाकात हो या न हो

सभापती महोदय, सभागृहाच्या पत्रकार गॅलरीत बसलेल्या पत्रकारांचे सुध्दा मी आभार मानतो. सभागृहामध्ये आम्ही महत्वाचे मुद्दे उपस्थित करतो. या विषयांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार बंधू व भगिनी करीत असतात. त्यामुळे सभागृहाच्या पत्रकार गॅलरीत बसलेल्या पत्रकारांचे व बाहेरच्या पत्रकार मित्रांचे सुध्दा मी आभार मानतो. सभापती महोदय, आज आपण या ठिकाणी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल नतमस्तक होऊन मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद .

---------- नंतर श्री.सरफरे

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला वंदन करुन मी माझे दोन शब्द याठिकाणी मांडीत आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये आल्यानंतर मी महाराष्ट्रामध्ये पक्षाच्या माध्यमातून जे काम केले आहे त्यामध्ये महिलांचे प्रश्न असतील, शेतकऱ्यांचे प्रश्न असतील, शेतमजुरांचे प्रश्न असतील, कामगारांचे प्रश्न असतील हे सर्व प्रश्न मी माझ्या नेत्यांकडे, मंत्रिमहोदयांकडे मांडीत होते. त्यामुळे माझ्या सारख्या एका सर्वसामान्य कार्यकर्तीला या सभागृहामध्ये येण्याची संधी मिळेल स्वप्नातही पाहिले नव्हते. आमचे नेते आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी इथे येण्याअगोदर दोन महिन्यापूर्वी मला बोलाविले आणि सांगितले की, मंदाताई मी तुम्हाला सभागृहामध्ये पाठविणार आहे. तुम्ही तुमचे सर्व भरावयाचे फॉर्म्स तयार करुन ठेवा. मला त्यावेळी आश्चर्याचा धक्का बसला. या वरिष्ठ सभागृहामध्ये मी येणार हा आनंदाचा दिवस मी आजही विसरु शकलेले नाही. आणि आज आमच्या पक्षामध्ये 50 टक्के आरक्षण देऊन माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील आणि मला इथे येण्याची संधी त्यांनी दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, यांच्या विचारांच्या या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये आपल्याला काम करण्याची संधी पक्षाच्या माध्यमातून दिल्यामुळे मी पहिल्यांदाच आदरणीय श्री. पवार साहेबांचे ऋणी आहे, मी त्यांना धन्यवाद देते. त्यांनी माझ्यासारख्या एका सामान्य महिलेला या सभागृहामध्ये पाठविले. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी माझे वर्णन केले. त्यांनी मला पाहिले आहे. मी दागिने विकून, सर्व संघर्षामधून इथपर्यंत आलेली महिला आहे. आपल्यावर जी संकटे आली, आपल्याला जे दु:ख झ ाले, आपल्याला जे शिक्षण मिळाले नाही. परंतु आपण समाजाला काहीतरी देऊ शकतो याचसाठी मी समाजामध्ये काम करण्यासाठी निघाले. या भावनेतूनच मी 1990 सालापासून काम करावयास लागले. तेव्हापासून आजपर्यंत मी काम करीत आहे. सभापती महोदय, मला नेहमी वाटते की,आपण किती जगलो यापेक्षा आपण कसे जगलो याला मी नेहमी महत्व दिले आहे. याठिकाणी माननीय श्री. भुजबळ साहेब उपस्थित नाहीत. मघाशी माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी एक उदाहरण सांगितले. त्या म्हणाल्या की, "मंदाताई तुम्ही नेहमी हसत असता" आणि त्यांनी रावते साहेबांना तुम्ही "भडकू नका" असे सांगितले. पण माननीय श्री.भुजबळ साहेब हे स्वभावाने कसे आहेते हे आपल्यालाही माहीत आहे. सभापती महोदय, मी नगरसेविका असतांना मला नेतेमंडळी कशी त्रास देतात हे सांगण्यासाठी एकदा त्यांच्याकडे गेले, आणि त्यांना जिल्हयातील परिस्थिती सांगितली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/ KTG/ SBT/

श्रीमती मंदा म्हात्रे...

त्यांनी माझ्याकडील पेपर फेकले आणि असे पेपर पुसण्यासाठी असतात, वाचण्यासाठी नसतात असे मला ते म्हणाले. त्यावेळी माझ्या डोळयातून पाणी वहायला लागले. ते म्हणाले की, असली रडणारी बाई कधीही राजकारणात काम करु शकत नाही. चला ऊठा, तुम्ही घरी जा आणि भाकऱ्या भाजा. असे म्हटल्यानंतर मी रस्त्याने घरी जात असतांना ज्यांनी मला त्यांच्याकडे नेले त्यांना ही सर्व कहाणी सांगितली . ते विरोधी पक्षाचे नेते असतांना मला असे कां बोलले? याबाबत मी सारखा विचार करीत होते. मी काम करु शकत नाही काय? मी चळवळीमध्ये येऊन महिलांचे प्रश्न सोडवू शकत नाही काय? सभापती महोदय, तेव्हापासून मी मनामध्ये एक निर्णय घेतला की, कितीही संकटे आली तरी मी हसेन पण रडणार नाही, मी काम करुन दाखवीन. त्या दिवसापासून मी कधी रडले नाही, परंतु आज तुम्ही बोलल्यानंतर माझ्या डोळयामध्ये पाणी आले.

सभापती महोदय, मी ज्यावेळी महाराष्ट्राची अध्यक्षा होती, त्यावेळी मी कोकणाची प्रमुख होते. मला या सदनातील माननीय सदस्य नेहमीच म्हणतात की, मंदाताई तुम्ही कोकणातील जास्त प्रश्न कसे काय मांडता? परंतु साहेबांच्या आशिर्वादामुळे मी त्यावेळी कोकणची प्रमुख होते. ज्यावेळी मी या सभागृहामध्ये आली आणि साहेबांना भेटायला गेले त्यावेळी नवीन सदस्यांनी नेमके काय केले पाहिजे यासंबंधी सभापती महोदयांनी मला खूप चांगले मार्गदर्शन केले. सभापती महोदय मला सांगत आहेत हे पाहून मी आश्चर्यचकित झाले. नवीन सदस्यांनी ग्रंथालयामध्ये गेले पाहिजे, त्याठिकाणी अभ्यास केला पाहिजे. विषय कसे मांडले पाहिजेत, लक्षवेधी सूचना कशा मांडल्या पाहिजेत? त्यांनी दिलेल्या ज्ञानाचा मला खूप उपयोग झाला.

सभापती महोदय, त्यानंतर सभागृहामध्ये माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी ज्या पध्दतीने बोलायचे, माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते ज्या पध्दतीने बोलायचे, कै. मधुकरदादा सरपोतदार असतील, किंवा माननीय श्री. अरविंदजी सावंत असतील, किंवा माननीय श्री. मधुकरजी चव्हाण असतील, माननीय श्री. पांडुरंग फुंडकर असतील, आमच्या माननीय डॉ. नीलमताई असतील हे जे जे प्रश्न उपस्थित करीत होते. त्यावेळी त्यांच्याकडे बघून त्यांचा अभ्यास करुन मी बोलायला शिकले. आमच्या पक्षाचे नेते माननीय श्री. गुरुनाथजी कुलकर्णी यांच्याबरोबर मी बरीच वर्षे काम केले आहे. त्यांनीही मला बरीच वर्षे मार्गदर्शन केले. या सर्वांच्या मार्गदर्शनामधून मी घडत गेले. सभापती महोदय, मी खरोखरच आपल्यासमोर नतमस्तक होते. मला पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कळसे साहेबांचा फोन आला त्यावेळी मी आश्चर्यचकित झाले.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

मला आणि पुरस्कार आणि तोही उत्कृष्ट वक्ता म्हणून मिळणार आहे. मी असे काय केले आहे ? मला माननीय सभापतींनी सांगितीले की, तुम्ही या सदनामध्ये व्यक्तीगत स्वरुपाचे नाही तर लोकांचे प्रश्न, त्यांच्या कामाच्या बाबतीतील विषय मांडलेले आहेत आणि तुम्ही 2005-2006 मध्ये एडस् संबंधातील विधेयक सदनामध्ये चर्चेसाठी मांडले आणि यासाठी आम्ही तुम्हा पुरस्कार देत आहोत. माननीय सभापती महोदय, खरोखरच मला तुमच्यामुळे इतकी मोठी ऊंची गाठता आली, त्यामुळे मी तुमच्या समोर मनापासून नतमस्तक होत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी काही सन्माननीय सदस्य आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजी सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे कडक आहेत, रागीट आहेत, पण त्यांच्याबाबतीत सांगावयाचे तर ते खरोखर कोकणातील फणसासारखे आहेत. ते जरी वरुन ओबडधोबड असले तरी ज्याप्रमाणे फणस कापल्यावर गोड गरे निघतात, त्याप्रमाणे या दोन्ही व्यक्ती आहेत. या दोन्ही व्यक्तींचा मी अभ्यास केलेला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मनापासून धन्यवाद देते. तुम्ही नेहमी जे-जे सांगता, बोलता ते आत्मसात करते. आमचे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजी माझ्यावर नेहमी रागवावयाचे, पण पुन्हा दुसऱ्या वेळेस त्यांच्याकडे गेल्यानंतर म्हणावयाचे की, या मंदाताई, बसा आणि असे विचारावयाचे की, तुम्ही अध्यक्ष होता काय ? 1995 मध्ये सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजी फादर कमिटीचे अध्यक्षपद देत होते. मी घाबरुन अध्यक्ष झाले नाही की मला कोणी मारेल. मी जर त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजींच्या सांगण्यावरुन अध्यक्षपद स्विकारले असते तर आज मी कदाचित लोकसभेमध्ये असते. एवढे त्यांचे मोठे मन होते.

सभापती महोदय, मला ग्रंथालयाबाबत बोलावयाचे आहे. कारण श्री.बाबा वाघमारे यांनी खरोखरच नवीन येणाऱ्या सन्माननीय सदस्यांना नेहमीच मार्गदर्शन केले आहे आणि त्यामुळे सन्माननीय सदस्य घडत गेले आहेत. त्यामुळे त्यांचेही मी मनापासून आभार मानते. आमचे माननीय श्री.छगन भुजबळसाहेब असतील किंवा आमचे माननीय श्री.आर.आर.पाटीलसाहेब असतील किंवा आमचे माननीय श्री.अजितदादा पवारसाहेब असतील किंवा माननीय मुख्यमंत्री असतील किंवा माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील असतील, आमचे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब असतील, तसेच आमचे सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवारसाहेब येथेच आहेत.त्यांनी

. . . .4 डब्ल्यू-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

येथे जो किस्सा सांगितला, पण तो अर्धवट सांगितला. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवारसाहेब, हे आमचे निरीक्षक होते आणि शिवसेनेच्या कालावधीमध्ये मी महिला बालकल्याणची सभापती होते. माझा हारतुरे देऊन सत्कार करुन मला केबिनमध्ये बसविले आणि मग सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार आले आणि म्हणाले की, मंदाताई, तुम्हाला आताच राजीनामा द्यावयाचा आहे. मी त्यांना विचारले की, कसला राजीनामा द्यावयाचा आहे ? तर सांगितले की, चेअरमन पदाचा. मी त्यावर त्यांना कोणताही प्रश्न न विचारता, ताबडतोब राजीनामा लिहून दिला. शेवटी पक्षाचा आदेश पाळला पाहिजे. कारण पक्षामध्ये निष्ठाच मिळवावयाची असते. पक्षश्रेष्ठीची निष्ठा मिळविणे हीच कमाई असते आणि ती मी मिळविलेली आहे. मला अजून खूप बोलावयाचे होते, पण वेळेचे बंधन असल्याने मी जास्त बोलत नाही. मी विधानमंडळातील सर्व अधिकाऱ्यांचे विशेषत: येथील प्रधान सचिव श्री.अ.ना.कळसेसाहेबांचे, आमचे पत्रकार बंधू असतील, मिडिया असेल आणि सदनातील सर्व सन्माननीय सदस्य ज्यांनी माझ्याबद्दल चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबद्दल मी त्या सर्वांसमोर नतमस्तक होते.मला या पवित्र मंदिरामध्ये येण्याचे भाग्य लाभले आणि याठिकाणी जो अनुभवाचा ठेवा मिळालेला आहे, त्याचा मी जनतेसाठी निश्चित उपयोग करीन. आपण सर्वांनी माझ्यावर इतके प्रेम दाखविले, त्याबद्दल आपले आभार व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे कोणतेही शब्द नाहीत. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / अशुद्धीरित नाही

`

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधान सभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : आदरणीय सभापति महोदय, मैं इस सदन की सदस्या अक्तूबर 2008 में बनी थी. और मुझे यहां पर 18 महीने हुए हैं. यहां पर सभी माननीय सदस्यों ने उल्लेख किया कि मैं किस तरह अकस्मात यहां पर इलेक्शन जीत कर आयी. यह बात सही है कि मुझे भगवान का आशीर्वाद था और भगवान के आशीर्वाद के साथ साथ मेरी पार्टी के जो बड़े नेता हैं, हमारी कांग्रेस की पक्षाध्यक्षा आदरणीय सोनिया जी और अन्य केन्द्र तथा महाराष्ट्र के कांग्रेस के नेता, उन सभी का आशीर्वाद मुझे प्राप्त था. उस समय के मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख जी, संसदीय कार्यमंत्री श्री हर्षवर्धन पाटील जी के अलावा कांग्रेस और राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी के नेता चाहे वह आदरणीय पवार साहब हों, अजित दादा हों, आर.आर. पाटील साहब हों या श्री राणे साहब हों,सभी का आशीर्वाद मुझे प्राप्त था. उन सभी के सहयोग और आशीर्वाद के कारण ही यह सब संभव हो सका.

माननीय सभापति जी, मुझे आज भी वह दिन याद है जब इलेक्शन जीतकर मैं इस सभागृह में आयी थी. उस समय मुझे बड़ा ही अजीब लग रहा था. क्योंकि सामने की सीट पर माननीय नितिन गडकरी साहब, श्री फुंडकर जी, श्री दिवाकर रावते साहब जैसे बड़े नेता बैठे हुए थे. इसके अलावा हमारे पक्ष के माननीय मुख्यमंत्री जी और माननीय उप मुख्यमंत्री जी के अलावा अन्य बड़े बड़े मंत्रिगण भी यहां पर उपस्थित थे. उन सभी बड़े नेताओं के सामने जब मुझे बोलने का मौका आया तो मुझे बड़ा ऑकवर्ड लग रहा था. लेकिन उस समय उपस्थित सभी मान्यवरों ने मुझे बोलने के लिए प्रोत्साहित किया.

माननीय सभापति जी, सभी माननीय सदस्यों के अलावा आपका भी बहुत प्रोत्साहन मुझे मिला. उस समय आपने मुझे आशीर्वाद और बेस्ट विशिज दी थी. आपने मुझे बताया था कि यहां पर लोगों के प्रश्न किस तरह उठाए जाते हैं और इस बात का मार्गदशन भी किया था कि प्रश्नों को उठाकर किस तरह से लोगों की समस्याएं हल की जाती हैं. मुझे याद है कि मेरे पहले अधिवेशन के तीसरे ही दिन मुझे जागतिक मंदी पर बोलने का मौका मिला था. उसके बाद मुझे यहां पर प्रश्न उठाने के कई मौके मिले. कई प्रश्न मैंने यहां पर जलगांव से संबंधित उठाए हैं.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन .....

उनमें से कई प्रश्न हल भी हुए लेकिन मुझे लगता है कि बहुत सारे प्रश्न हल होने अभी बाकी हैं. मुझे लगता है कि वे प्रश्न भी बाद में हल हो जाएंगे. माननीय सभापति जी, मुझे यहां सबसे बड़ी चीज यह महसूस हुई कि यहां पर सभी पक्षों के माननीय सदस्य लोकशाही विचार को मानते हैं. और जब जनहित का सवाल आता है कि तो सभी माननीय सदस्य अपने पक्षों को भूलकर जनहित के लिए आक्रमक भूमिका अपनाते हुए खड़े हो जाते हैं. चाहे हमारी कांग्रेस पार्टी के माननीय सदस्य हों, राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी के माननीय सदस्य हों या विपक्ष के माननीय सदस्य हों, सभी माननीय सदस्य जनहित के लिए एक साथ खड़े हो जाते हैं. यह बात मैंने इसी सभागृह में देखी और सीखी है.

मुझे यहां माननीय सदस्य श्री भाऊसाहब फुंडकर साहब, नितिन गडकरी साहब, दिवाकर रावते जी, उल्हास दादा, गुरु जी तथा अरुण भाई गुजराथी साहब जेसे बड़े नेताओं के भाषण सुनने को मिले. उनके भाषण सुनकर लगता था कि उनके पास ज्ञान का असीम भंडार है. और इन माननीय सदस्यों के अनेक प्रश्नों का उत्तर जब माननीय मंत्री महोदयों के द्वारा दिया जाता था तो समझ में आता था कि सभी अड़चनों को दूर करके किस तरह से यहां उन प्रश्नों को हल किया जाता है.

माननीय सभापति जी, हमारा महाराष्ट्र राज्य संतों का राज्य रहा है और इस बात का परिचय यहां पर अनेक बार हमें माननीय सदस्य श्री उल्हास दादा ने कराया है. क्योंकि उनके भाषण में उन संतों का उल्लेख हमेशा रहता ही है. मुझे यह भी कहना है कि जब जनहित की बात आती है तो सभी विपक्षी माननीय सदस्य चाहे वे नितिन गडकरी जी हों, भाऊ साहब फुंडकर जी हों, दिवाकर रावते जी हों, निलम ताई हों या विनोद तावडे जी हों, विपक्ष के ये सभी माननीय सदस्य जन हित के लिए किस तरह से आक्रमक भूमिका लेते हैं, यह देखने का एक अनूठा अवसर मुझे इस माननीय सभागृह में मिला है.

माननीय सभापति जी, इस सभागृह की सदस्या बनने के बाद मुझे इस विधान मंडल सचिवालय के प्रधान सचिव श्री कळसे साहब, सचिव श्री शिंदेकर साहब के अलावा भाऊ साहब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन.....

कांबळे इत्यादि सभी अधिकारियों की काफी मदद मिली. लायब्रेरी के अधिकारी श्री बा.बा. वाघमारे से भी हमें लायब्रेरी संबंधी हमेशा मदद मिलती रही. इसके अलावा हमारे कांग्रेस पक्ष कार्यालय में सचिव तथा अन्य कर्मचारियों के सहयोग से भी यहां पर मुझे बहुत कुछ सीखने को मिला. इस समय मुझे दो चीजें महसूस हो रही हैं. और मुझे लगता है कि वह चीज आज मैं इस निरोप समारंभ के अवसर पर बोलूं. मुझे कहना है कि लोकशाही प्रक्रिया में कई चीजें स्लो स्पीड से होती हैं, धीरे धीरे होती हैं. जिसकी वजह से सभी माननीय सदस्यों को पब्लिक का रोष सहना पड़ता है. इसलिए मुझे लगता है कि आज के इस बदलते समय में यदि इस प्रक्रिया में कुछ बदलाव हो जाये तो अच्छा रहेगा. आज फास्ड फूड का जमाना है और इसलिए आज स्थिति यह है कि पीजा जल्दी आ जाता है और एम्बुलेंस उससे लेट आती है. दूसरी बात जिसका रोष मेरे मन में रहा है वह यह कि संतों की इस भूमि पर महिलाओं पर होने वाले बलात्कार कम नहीं हो रहे हैं, वे बढ़ते ही जा रहे हैं. अभी बीड की एक आश्रमशाला में इस तरह की घटना हुई थी.

मुझे लगता है कि इस बारे में हमें कुछ और विचार करने की जरुरत है कि आखिर यह मानसिक विकृति इतनी क्यों बढ़ रही है ?

सभापति जी, मेरी एक ही इच्छा है कि यह महाराष्ट्र एक अखंड महाराष्ट्र रहे. यही हमारे महाराष्ट्र का महाराष्ट्रपन और मीठेपना है. इसलिए अंत में एक ही बात कहूंगी कि यह महाराष्ट्र है और यह "महाराष्ट्र" ही रहे.

इस पाठशाला में, जिसमें मैं पढ़ने के लिए आयी हूं. यहां पर मुझे डेढ़ साल ही हुआ है. इसलिए यहां मुझे कुछ अधूरा सा लग रहा है. ऐसा लग रहा है कि मैं पाठशाला में तो आयी हूं लेकिन यहां पर बाय इलेक्शन में आने की वजह से मेरी फीस पूरी नहीं भरी गयी थी. शायद इसलिए यह पाठशाला बीच में अधूरी ही छूट रही है. यदि यह फीस भर दी गयी तो शायद मैं वापस यहां पर आ जाऊं. खैर, जो भी है, मैं इतना ही कहूंगी कि मैं यहां पर सभी माननीय सदस्यों का नाम नहीं ले पा रही हूं लेकिन सभी के सहयोग से मुझे यहां पर बहुत कुछ सीखने

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन....

को मिला. इसलिए यहां पर बैठे माननीय सदस्यों को देखकर मेरा मन भावनात्मक होता जा रहा है. क्योंकि इन सभी माननीय सदस्यों से मैंने बहुत कुछ सीखा है. इसलिए मैं सभी माननीय सदस्यों की बहुत-बहुत आभारी हूं.

धन्यवाद.. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-0-

(इसके बाद श्री बरबड)....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज या ठिकाणी निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम होत आहे. मी राजकारणामध्ये प्रवेश केला तेव्हा नुकताच कॉलेजमधून बाहेर पडलो होतो. ठाणे जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांबरोबर कौटुंबिक संबंध असताना त्या ठिकाणी युवक काँग्रेसचा वॉर्ड अध्यक्ष म्हणून माझ्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला सुरुवात झाली. वॉर्ड अध्यक्ष झाल्यानंतर जिल्ह्याचा पदाधिकारी आणि त्यानंतर प्रदेश युवक काँग्रेसचा उपाध्यक्ष आणि त्यानंतर अध्यक्ष झालो. त्याचबरोबर तीन वेळा नगरपालिकेचा आणि महानगरपालिकेचा सदस्य म्हणून मी काम केले. ज्यावेळी माझा आपल्याशी संपर्क आला तेव्हा खऱ्या अर्थाने माझी राज्याच्या राजकारणाची सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत मला आपल्याकडून सातत्याने मार्गदर्शन, आशीर्वाद आणि पित्याचे प्रेम प्राप्त झालेले आहे. मी भाग्यवान समजतो की, आपल्यासारख्या नेतृत्वाने माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मला सातत्याने मार्गदर्शन केलेले आहे. त्याचबरोबर पक्षाच्या आदरणीय नेत्या श्रीमती सोनियाजी गांधी आणि त्याच्या आधी स्व. राजीवजी गांधी यांना दोनतीन वेळा भेटण्याची मला संधी मिळाली आणि नंतर श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षामध्ये काम करण्याची मला संधी मिळाली. त्यांनी माझे काम बघितले आणि प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी माझी नेमणूक केली. त्या माध्यमातून मी प्रदेश युवक काँग्रेसचे काम करीत होतो. 1995 ला मी बेलापूर मतदार संघातून विधानभेच्या निवडणुकीला उभा राहिलो होतो पण त्या निवडणुकीमध्ये मला यश प्राप्त झाले नाही. परंतु मी संघटनेचे काम सोडले नाही. संघटनेच्या माध्यमातून शहराच्या विकासाचे काम मी आजही सोडलेले नाही. जिल्ह्याच्या विकासाचे काम सोडलेले नाही. युवक काँग्रेसच्या माध्यमातून संपूर्ण राज्यामध्ये युवक काँग्रेसची चळवळ उभी करण्याची मला संधी मिळाली. राज्यामध्ये संघटना उभी केली. खूप तरुण मित्रांना राजकारणामध्ये सहकार्य करण्याची संधी मला मिळाली. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, जे जे युवक काँग्रेसचे पदाधिकारी होते त्यातील बरेच लोक विधानसभेमध्ये आमदार झालेले आहेत. माझे बरेच सहकारी मित्र जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले, महापौर झाले, नगरसेवक झाले. मला आनंद आहे की, जसे आपण काँग्रेस पक्षामध्ये आणि सामाजिक व राजकीय जीवनामध्ये आमचे एक रोप लावले तसे काम पुढे आम्हालाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

करण्याची संधी मिळाली. काँग्रेस पक्षाच्या राज्यातील सर्व नेत्यांनी तसेच देशाच्या सर्व केंद्रीय नेत्यांनी मला खूप प्रेम दिले, सहकार्य दिले, मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विरोधी पक्षाने सुध्दा मग ते जिल्ह्याचे राजकारण असो त्यांनी सुध्दा सहकार्य दिले. स्व. आनंद दिघे हे माझे अतिशय जवळचे मित्र होते. मला आठवते की, शिवसेना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे हे 1979 साली मिरा-भाईंदरला आमच्या घरी आले होते आणि त्यांच्या हस्ते नया नगरचा शिलान्यास करण्यात आला होता.

सभापती महोदय, माझा जन्म सेक्युलरीझम मानणाऱ्या कुटुंबामध्ये झाला. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपण सर्व धर्माचा मानसन्मान करावयास पाहिजे, लोकांना प्रेम दिले पाहिजे आणि आपले म्हणणे, आपले विचार प्रेमाने आपल्या वागण्यातून पटवून दिले पाहिजे. ही शिकवण कुराणमध्ये आणि इस्लाम धर्मामध्ये आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

तीच गोष्ट महात्मा गांधीजींनी सांगितली होती. महात्मा गांधीजी याचा आदर्श डोळयासमोर ठेवून समाजकारणात व राजकारणात काम करण्याचा प्रयत्न केला आहे. याठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी म्हटले आहे, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी म्हटले आहे, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी म्हटले आहे त्याप्रमाणे खरोखरच आज अल्पसंख्याक समाजामध्ये एक सेक्युलर नेता किंवा कार्यकर्ता म्हणून जगणे,वागणे किंवा आपली गोष्ट लोकांसमोर सांगणे अतिशय कठीण झालेले आहे. माझ्याबरोबर असे बरेच वेळा घडलेले आहे परंतु त्यावेळी सुध्दा मी तडजोड केलेली नाही. आमच्या समाजातील लोकांचे म्हणणे आहे की, तुम्ही हिंदू आहात आणि हिंदू समाजाचे लोक म्हणतात की तुम्ही मुसलमान आहात. मी कोठेही कधीही तडजोड केलेली नाही. आमच्या समाजामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असेल त्याठिकाणी आमच्या लोकांना ठणकावून सांगण्याची भूमिका मी घेतली आहे. तुम्ही चुकलेले आहात, तुमची चूक आहे असे सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे पोलिसांना सांगितलेले आहे की, या लोकांना अटक करा, या लोकांना नोटीस पाठवावी. ही भूमिका घेण्याची क्षमता माझ्यामध्ये गांधीजींचे विचार व माझ्या पक्षाच्या ध्येयधोरणामुळे, सेक्युलॅरिझम व आयडॉलॉजीमुळे आली. आपल्या सारख्या नेतृत्वाचे मला मार्गदर्शन मिळत आले आहे. त्यामुळे माझ्यामध्ये ही क्षमता निर्माण झाली आहे. अनेकदा हिंदू समाजातील दोन गटातील भांडणे मिटविण्यासाठी मला बोलविण्यात आलेले आहे. फक्त मिरा-भाईंदरची गोष्ट नाही तर ब-याच ठिकाणी हा अनुभव आला आहे. मला या गोष्टीचा आनंद झाला की, मी अल्पसंख्याक समाजातील असताना सुध्दा दोन हिंदू समाजातील लोक म्हणजे एक साऊथ इंडियन समाजाचे होते व एक गुजराथी समाजाचे होते, दोन्ही ठिकाणी मंदिराचा इश्यू होता. त्या दोन्ही समाजातील लोक माझ्याकडे आले आणि त्यांनी मला सांगितले की, आपण यासंबंधी निर्णय घेऊन आम्हाला मार्गदर्शन करावे. दोन्ही समाजातील लोकांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. तेथे कोणताही प्रश्न निर्माण झाला नाही. ही खूप मोठी गोष्ट आहे. मला विधानसभेसाठी 1999 मध्ये तिकीट दिले नाही. कारण मला युवक काँग्रेसचे अध्यक्ष केले होते. त्यानंतर 2004 साली राष्ट्रवादीला जागा सोडून देण्यात आली. मतदार संघाची नवीन रचना झाली त्यावेळी पुन्हा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.मुझफ्फर हुसेन...

राष्ट्रवादीसाठी जागा सोडून देण्यात आली. तरी त्या गोष्टीसाठी मला कमीपणा वाटला नाही. मी राजकीय जीवनामध्ये कमी पडलो, मी कोठेही थांबलो आहे असे मला कधीही वाटले नाही. कारण ज्या गोष्टीसाठी आपण समाजकारणामध्ये, राजकारणामध्ये आलो ती गोष्ट आपल्याला मिळाली आहे, आपण समाजाचा विश्वास प्राप्त झालेला आहे. जीवनामध्ये माझ्याबाबत दोन्ही समाजाचा विश्वास निर्माण झालेला आहे. सेक्युलॅरिझमबरोबर चालण्याची माझी ताकद कायम आहे. या सभागृहात आल्यानंतर घटनेवरील विश्वास अधिक वाढला आहे. कारण अल्पसंख्याक समाजामध्ये एक वेगळया प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचे काम काही लोक करीत असतात. या देशाची घटना आपल्या बाजूने नाही, मुस्लिम पर्सनल लॉ, वगैरे. अशा ब-याच गोष्टी घडत असतात. माझा घटनेवर विश्वास तर होताच, पण या सभागृहात आल्यानंतर तो अधिक मजबूत झाला. या सभागृहाच्या माध्यमातून प्रत्येक समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला जातो.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न मांडत असल्याचे मी अनेकवेळा पाहिलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बरोबर बुलढाणा जिल्हयातील अल्पसंख्याक समाजातील कार्यकर्ते काम करीत असतात. असे किती तरी समाजाचे प्रश्न मग ते मागासवर्गीयांचे असो, आदिवासींचे असो, ओबीसींचे असो या समाजातील प्रश्न या सभागृहाच्या माध्यमातून सोडविले जातात. म्हणजे आपली घटना ही सर्वश्रेष्ठ आहे. तिच्यावरील विश्वास होता तो अधिक बळकट झाला. मला या गोष्टीचा आनंद आहे. मला या सभागृहामध्ये माझ्या पक्षाच्या नेत्या आदरणीय सोनिया गांधीजींनी मला पाठविले. जेणे करुन मी समाजासाठी व पक्षासाठी काही तरी कॉन्ट्रीब्यूट करु शकलो, याचा मला गर्व आहे, आनंद आहे. मला सर्व पक्षाच्या नेत्यांनी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर त्याचप्रमाणे सन्माननीय उपसभापती श्री.वसंतराव डावखरेसाहेब तसेच राष्ट्रवादीच्या सर्व नेत्यांकडून मला प्रेम व सहकार्य मिळाले आहे. मला सभागृहात प्रश्न मांडण्याची पाळी खूप कमी वेळा आलेली आहे. राज्यातील संघटनेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचा जो संपर्क आहे, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी संबंधित मंत्री महोदयांकडे गेल्यावर त्यांच्याकडून प्रश्न सोडविल्यामुळे मला येथे प्रश्न मांडावे लागले नाहीत. मला ट्रेझरी बेंचचा मान ठेवण्याची मला संधी मिळाली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत पत्र / शुद्धीसाठी नाही

(श्री. मुझफ्फर हुसेन...

आपणासर्वांकडून सहयोग मिळाला, सहकार्य मिळाले, खूप काही शिकायला मिळाले. सभापती महोदय, मी पुनश्च सांगू इच्छितो की, आपले प्रेम आणि मार्गदर्शन मला असेच मिळत राहो. धन्यवाद. जयहिंद ! जय महाराष्ट्र !!

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपणा सर्वांचे सन्माननीय 9 सहकारी बंधु आणि भगिनी यांना सदिच्छा, शुभेच्छा देण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपण या ठिकाणी एकत्र जमलो आहोत. सदनाचे उपसभापती सन्माननीय श्री. वसंत डावखरे यांना मी गेली 25 वर्षे ओळखतो. आपली जी भारतीय लोकशाही आहे, ज्यामध्ये सामान्यातला सामान्य माणूस आपल्या कर्तव्य आणि कर्तृत्वावर किती मोठा होऊ शकतो याचे एक आगळे आणि वेगळे उदाहरण म्हणजे सन्माननीय श्री. वसंत डावखरे हे होय. उपेक्षित सामान्य समाजामध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आई-वडिलांना फार मोठे कष्टही सोसावे लागले. ठाण्यामध्ये उदरनिर्वाहाच्या निमित्ताने आलेले हे कुटुंब. त्यांच्या मातोश्री ह्या ठाण्यामध्ये काही दिवस भाजी विक्रीचेही काम करीत होत्या. श्री. वसंत डावखरे हे आपल्या गावचे सरपंच झाले, ठाण्यासारख्या मोठ्या शहरामध्ये महापौरही झाले. कला, क्रीडा या दोन्ही क्षेत्रामध्ये त्यांनी आपले नाव ठाणे आणि मुंबईमध्ये सातत्याने गाजवले, अशा पध्दतीचे हे व्यक्तिमत्व. सदनामध्ये गेली 18 वर्षे ते काम करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्री. वसंत डावखरे हे सक्रीय कार्यकर्ते असले, नेते असले तरी काँग्रेस असो, शिवसेना असो, भाजप असो या सगळया पक्षामध्ये त्यांची लोकप्रियता सातत्याने वाढली अशा प्रकारचे हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व. मला खात्री आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना यावेळी सुध्दा न्याय देईल. या पुढच्या काळात ते आपल्या कर्तृत्वाने पुढे येथील आणि पुन्हा या सदनाचे सदस्य होतील.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व. त्यांना शीघ्रकोपी म्हटले तर त्यांच्यावर काहीसा अन्याय केल्यासारखे होईल. सभागृहामध्ये आणि अन्य ठिकाणी काही वेळा परखडपणे ते बोलतात. पण मला वाटते की, ज्या उपेक्षित सर्वसामान्य कष्टक-यांचे ते नेते आहेत त्या कष्टक-यांचे दु:ख, त्यांच्या वेदना मांडायला अन्य कोणतेही माध्यम नसेल तर त्यानुषंगाने एखादे वाक्य रागामध्ये किंवा संतापामध्ये त्यांच्या तोंडून गेले तर त्याबाबतीत मी कधी असे म्हणणार नाही की तो क्रोध आहे. त्याचे व्यक्तिमत्व फणसासारखे आहे असे वर्णन एका सहकारी आमदारांनी केले. हात लागला तर टोचल्यासारखे वाटेल आणि गरे खाण्याचा प्रसंग आला तर आतून गोड आणि मऊ वाटेल असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सामान्य माणसाच्या प्रश्नाच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

अनुषंगाने ते सातत्याने आग्रही असतात. काही तत्वे आहेत, ध्येयवाद आहे आणि त्या अनुषंगाने ते आग्रहाने आपले विचार या ठिकाणी मांडत असतात आणि ते मांडत असताना समोर कोण आहे याचा मुलाहिजा सुध्दा नकळत काही वेळा ठेवला जात नाही. व्यक्तीद्वेष म्हणून ते कधी करीत नाही. प्रश्नाची उकल व्हावी या दृष्टीने त्यांनी टाकलेले अनेक राजकीय पध्दतीचे त्यांचे डावपेच मी सातत्याने बघतो.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

ज्या पक्षावर निष्ठा आहे, ती त्यांची निष्ठा आयुष्यभर आहे. कार्यक्रमावर निष्ठा आहे. पक्ष नेतृत्वावर निष्ठा आहे आणि जो उपेक्षित तुमचा आमचा केंद्रबिंदू असलेला शेतकरी, कष्टकरी आहे त्याच्यावर निष्ठा आहे. मला वाटते, या सदनामध्ये अशा पध्दतीच्या परखड सन्माननीय सदस्याची गरज आहे आणि शिवसेना पक्ष यादृष्टीने त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा विचार करुन शेतकऱ्यांशी असणारे त्यांचे ऋण लक्षात घेऊन त्यांना पुन्हा एकदा या सदनामध्ये काम करण्याची नक्की संधी देईल. यादृष्टीने माझ्या त्यांना नक्की शुभेच्छा आहेत.

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने सातत्याने लढणारे, मेहनत घेणारे असे नेते आहेत. मी एक वेळ बघितले, माझ्या दालनात येऊन त्यांनी सांगितले की, सभापती महोदय, तुम्ही परवानगी दिली किंवा नाही दिली तरी मी अर्ध्या मिनिटासाठी उभा राहणार आहे. त्याचे कारण असे होते की, ते उठून सांगणार होते, आज किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. आत्महत्येची आकडेवारी सांगणार होते. आज किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, 3 झाल्या, 7 झाल्या हे सांगणार होते. त्यांच्या मनात असणारी पोटतिडीक अशा पध्दतीची होती की, ज्यांना या देशाचे, या राज्याचे खऱ्या अर्थाने मालक म्हणायचे त्या शेतकऱ्यांची ही अवस्था झालेली आहे. ती बदलण्याकरिता तुम्ही आम्ही लढले पाहिजे. यादृष्टीने तळमळ असणारा कार्यकर्ता आणि नेता आहेत. त्याना आज सदनामध्ये आपण निरोप देत आहोत. निरोप म्हणण्यापेक्षा शुभेच्छा देत आहोत. पुन्हा ते या सदनामध्ये नक्की येतील. महाराष्ट्रातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या दृष्टीने काम करायला ते नव्या उमेदीने पुन्हा या सदनामध्ये येतील. मी त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

श्री.संजय दत्त एक तरुण, ध्येयवादी असे व्यक्तिमत्व आहे. मी त्याला गेली 20 वर्षे बघतो आहे. मी "त्यांना" म्हणण्याऐवजी हेतुत: "त्याला" म्हटले. याचे कारण असे की, माझ्यासमोर वाढलेले हे एक तरुण व्यक्तिमत्व आहे. ठाणे जिल्हयामध्ये, मुंबई शहरामध्ये, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयूआय अशा अनेक माध्यमातून काम केलेला टवटवीत चेहरा यादृष्टीने मी श्री.संजय दत्त यांच्याकडे बघतो. अनेक वर्षे प्रदेश काँग्रेस, युवक काँग्रेसमध्ये काम केल्यानंतर या सदनामध्ये येण्याची त्यांना संधी लाभली. जसे एखाद्या वेळी आम्ही हिंदी बोलण्याचा प्रयत्न केला तर काही वेळेला आम्हाला अडचण येते. त्याच पध्दतीने श्री.संजय दत्त हे मराठी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

बोलत असताना काय काय होईल असे आम्हा सगळ्यांना वाटत होते. परंतु गेल्या सहा वर्षात त्यांनी हे सिध्द करुन दाखविले की, मनापासून अभ्यास केला, तळमळीने आपण किती प्रश्न समजून घेतले आणि त्या अनुषंगाने रात्रंदिवस प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर कोणतीही गोष्ट इम्पॉसिबल नाही. Everything is possible. यादृष्टीने त्यांचे यश हे आगळेवेगळे यश आहे. अखिल भारतीय काँग्रेसच्या माध्यमातून ज्या युवकांना अनेक राज्यांमध्ये अभ्यासासाठी जाण्याची संधी दिली जाते, तेथील परिस्थितीचे अवलोकन करण्याची संधी दिली जाते, त्याठिकाणचा अभ्यास करण्याची संधी दिली जाते, त्या ठिकाणचे छोटया छोटया प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी जी काही युवा पिढी पाठविली जाते त्यामध्ये श्री.संजय दत्त यांचा समावेश होता. विधानपरिषदेतील त्यांचे काम अत्यंत चांगले आहे. त्यांचा प्रश्न पहिल्या क्रमांकावर असेल, पाचव्या क्रमांकावर असेल. मला वाटते की, प्रश्न दिल्यानंतर त्या प्रश्नाचा पाठपुरावा करणे या अनुषंगाने त्यांनी ज्या पध्दतीने अभ्यास केला तो पाहून नवीन सन्माननीय सदस्यांना मी सातत्याने सांगत असतो की, हे गणित तुम्ही समजून घ्या. त्यांनी अनेक प्रयत्न केले आणि त्यामुळे ते या कामामध्ये यशस्वी झाले. विशेषत: त्यांनी अत्यंत उत्कृष्ट पध्दतीचे काम याठिकाणी केले. त्यांना उज्ज्वल भवितव्य आहे. मला खात्री आहे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी या होतकरु तरुणाला निश्चित पुन्हा या सभागृहात येण्याची संधी देईल अशा माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत.

श्री.मुझफ्फर हुसेन या मुलावर मी पुत्रवत प्रेम केले.....

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती .....

20 वर्षापूर्वी एक दिवस त्याचे वडील आणि हा मुलगा माझ्याकडे आला होता. मी केवळ पाचच मिनिटे त्याच्याशी बोललो तेव्हा मला जाणवले की या मुलामध्ये सुप्त गुण आहेत. मी माझ्या तरुणपणात असे वातावरण कधीच अनुभवले नव्हते म्हणून गेली 25-30 वर्षे ज्या पध्दतीने मी राजकीय, सामाजिक जीवनात वावरत होतो त्यामुळे कोणत्याही जाती पंथातील तरुण आला की त्यात कोणते सुप्त गुण आहेत असे मला वाटले तर त्याला वाढवून मोठे करावयाचे, त्याला ताकद द्यावयाची असे माझे विचार होते आणि अशातील हे दुसरे टवटवीत नेतृत्व म्हणजे मुजफ्फर हुसैन. अत्यंत दिलदार वृत्तीचा माणूस, सर्वधर्मसमभावावर पूर्ण विश्वास असणारा, सर्व समाजामध्ये लोकप्रिय असलेला, काँग्रेसच्या माध्यमातून युवक काँग्रेसमध्ये 5 वर्षे काम करण्याची त्याला संधी मिळाली आणि नंतरची या सभागृहातील 6 वर्षे अत्यंत चांगली कामगिरी त्यांनी केली. मला खात्री आहे की, या युवकाला सुध्दा अत्यंत चांगले भवितव्य आहे. अखिल भारतीय युवक काँग्रेस कमिटी या दोन्ही तरुणांच्या पाठीमागे निश्चित उभी राहून पुन्हा त्यांना सभागृहात येण्याची संधी मिळेल तसेच माझ्या परीने जे शक्य आहे ते देखील मी त्यांच्यासाठी करीन. श्रीमती मधू जैन यांना सभागृहात फक्त दीडच वर्ष झाले. सभागृहात माझ्या भगिनींनी सांगितले की, दैव. दैव हे तर आयुष्यात प्रत्येक बाबतीत 5-10-15 टक्के असते. त्या 18 महिन्यांसाठी जरी येथे आल्या असल्या तरी यापुढील काळात सहा वर्षाकरिता त्यांना येथे पाठविणे आवश्यक आहे. या कमी काळात सुध्दा त्यांनी त्यांच्या भागातील अनेक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी माझ्याकडे आग्रहाने व अट्टाहासाने चर्चाही केली. यापुढील काळात देखील त्यांना काम करण्याची संधी जरुर मिळेल अशी मला खात्री आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना मी गेल्या 15-20 वर्षांपासून ओळखतो. त्यांची सामाजिक जीवनात काम करीत असताना जबरदस्त जिद्द आहे म्हणून सभागृहात सुध्दा अनेक वेळा अनेक प्रश्न मांडण्याचे प्रयत्न त्या करीत होत्या. ठाणे जिल्ह्यात व मुंबईत सुध्दा त्यांनी सातत्याने आपल्या कामाचे समाजात तसेच महिला वर्गात सुध्दा एक चांगल्या प्रकारचे वलय तयार केले असल्याने त्यांनाही चांगले भवितव्य लाभो अशा मी शुभेच्छा देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षि शंकरराव मोहिते यांचा खऱ्या अर्थाने अनुभव वारसा यादृष्टीने या तरुणाकडे मी बघतो. युवक काँग्रेसचा अध्यक्ष, काही काळ खासदार म्हणून त्यांनी काम केले आहे. तसेच माजी राज्यमंत्री आणि श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांचे बंधू. सर्वसामान्य गोरगरीब शेतकरी, कष्टकरी या सर्वांसाठी, त्यांचे अनेक प्रश्न मांडण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.

सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील, हे तर माझ्याच जिल्ह्यातील कार्यकर्ते आहेत. अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघटनेत अनेक वर्षे काम केलेले आगळेवेगळे हे व्यक्तिमत्व आहे. सातत्याने शिक्षण आणि शिक्षक या अनुषंगाने ते सभागृहात काम करीत असतात व त्यादृष्टीने एक उत्कृष्ट काम करणारा शिक्षक कार्यकर्ता म्हणून त्यांचा आणि माझा परिचय आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री अनिल परब हे अत्यंत परखड विचाराचे, तसेच कायद्याचा अभ्यास असणारे, शिवसेनेच्या संघटनेवर अढळ विश्वास ठेवणारे लढवय्या कार्यकर्ते म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो. निवृत्त होणा-या माझ्या सर्व सहकारी बंधू भगिनींना माझ्या शुभेच्छा आहेत. तसेच पुढच्या काळात कोणत्याही क्षेत्रात आपण काम केले तरी महाराष्ट्र विधान परिषदेच्या माध्यमातून जनसेवा करण्याची संधी आपल्याला मिळालेली होती त्या अनुषंगाने सर्वसामान्यांची सेवा करण्याचे ब्रीद ठेवा. तुमचे उज्ज्वल भविष्य राहील अशी अपेक्षा करतो.

निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम होईल व त्यानंतर विधानभवनाच्या दुस-या मजल्यावर अल्पोपहार व चहापाण्याचा कार्यक्रम होईल.

सभा□ह्यापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह्याची बैठ□ आता स्थ□□त होऊ□ उद्या शुक्रवार, दि□□ 23 एप्रिल, 2010 रोजी स□ळी 10.30 वाजता पु□ भरेल.

(सभा□ह्याची बैठ□ 9 वाजू□ 56 मि□□टां□, शुक्रवार, दि□□ 23 एप्रिल,2010 रोजीच्या स□ळी 10.30वाजेपर्य□त स्थ□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही